# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.१२/ २०१८** **दिनांक ०१.११.२०१८**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- दुपारी १२.३० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा गुरुवार दि.०१.११.२०१८ रोजी शिर्डी येथील संस्थानचे साईनिवास अतिथीगृहामध्ये दुपारी १२.३० वाजता आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/३७५९/२०१८, दि.२४.१०.२०१८ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते. त्यानुसार गुरुवार दि.०१.११.२०१८ रोजी दुपारी १२.३० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

०१. मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष ०२. मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष
०३. मा.ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य ०४. मा.डॉ.राजेंद्र राजाबाली सिंह, सदस्य
०५. मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य ०६. मा.सौ.योगिता अभय शेळके पाटील, सदस्या

मा.श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से.
मुख्यकार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत, समिती सदस्य मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे यांनी दूरध्वनीद्वारे कळविले होते, याची समितीने नोंद घेऊन, त्यांना अनुपस्थित राहण्याची अनुमती दिली.

मा.अमोल कीर्तिकर, सदस्य यांनी ई-मेलव्दारे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.०१.११.२०१८ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. या बैठकीस शिवसेनेचे तीनही सदस्य हजर राहणार नाहीत. हया संदर्भात शिवसेना सचिव श्री.अनिल देसाई व पर्यावरण मंत्री मा.श्री.रामदास कदम यांनी मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली होती व मा.मुख्यमंत्र्यांनी शिवसेनेला व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष पद देण्यास संमती दिली होती. याबाबत अजूनपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नसल्यामुळे खेद वाटत आहे. त्यामुळे या बैठकीस उपस्थित राहणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

सभेस आवश्यक गणपुर्ती नसल्यामुळे विधी व न्याय विभागाकडील दि.१३ जुलै, २०१७ रोजीचे अधिनियम दुरुस्तीतील कलम ३ (क) पोटकलम (२) मधील तरतूदीनुसार तीस मिनीटाकरीता सभेचे कामकाज तहकुब करणेत येऊन, त्यानंतर दुपारी ०१.०० वाजता सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

त्यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांनी विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु केली.

---

**विषय नं.०१** **दिनांक ०५.१०.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.६३८** **दिनांक ०५.१०.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करतांना खालील प्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या व त्यास मान्यता देण्यात आली.**

१) निर्णय क्र.५८२- यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोपाच्या आयोजित कार्यक्रमासाठी उभारण्यात येणा-या मंडप स्टेज सुविधेमधील स्टेज डेकोरेशनचे काम श्री.नितिन देसाई यांचे आयकॉनिक चंद्रकांत प्रॉडक्शन्स प्रा. लि. मुंबई या कंपनीकडून करून घेणेस व याकामी येणा-या सुमारे रु.२० लक्ष पर्यंतच्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच या व्यतीरिक्त Screen साठी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१५ ते २० लाख पर्यंतचे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- शताब्दी कक्ष प्रमुख)

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे-**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोपाच्या आयोजित कार्यक्रमासाठी उभारण्यात येणा-या मंडप स्टेज सुविधेमधील स्टेज डेकोरेशनचे काम ND'S Art World Pvt. Ltd. या कंपनीकडून करून घेणेस व याकामी येणा-या सुमारे रु.२० लक्ष पर्यंतच्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच या व्यतीरिक्त Screen साठी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१५ ते २० लाख पर्यंतचे खर्चास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- शताब्दी कक्ष प्रमुख)**

---

२) निर्णय क्र.५८६- यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान आस्थापनेवरील दिव्यांग (अपंग) अनुशेष भरतीसाठी पदे व संवर्ग यासह जाहिरात प्रसिध्द करुन भरती प्रक्रिया राबविणेत यावी, तसेच मे.वैभव प्लेसमेंट, नाशिक यांनी सादर केलेल्या संस्थानचे मनुष्यबळ अहवाल-भाग १ व भाग २ च्या प्रती सर्व.मा.सदस्यांना पुरविणेत याव्यात. सदर अहवालाबाबत फेर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करणेत यावा या अहवालावर अंतीम निर्णय झाल्यानंतर संस्थान सेवेबाबतचे सेवा प्रवेश नियम व बिंदू नामावली अंतीम करणेत यावी, असे ठरले. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग)

**याएवेजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान आस्थापनेवरील दिव्यांग (अपंग) अनुशेष भरतीसाठी पदे व संवर्ग यासह जाहिरात प्रसिध्द करुन भरती प्रक्रिया राबविणेत यावी. सदर भरती करताना संस्थानमध्ये कंत्राटी व आऊटसोर्स पध्दतीने मागील काही वर्ष काम करणाऱ्या दिव्यांग कर्मचाऱ्यांना प्राधान्य देण्यात यावे, असे ठरले. त्यासाठी संस्थानमध्ये कार्यरत असणाऱ्या कंत्राटी / आऊटसोर्स दिव्यांग (अपंग) कर्मचाऱ्यांना त्यांचे अनुभवासाठी वाढीव ३० गुण द्यावेत. सदर वाढीव गुण देतांना १ ते ५ वर्ष सलग सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना १० गुण, ५ ते १० वर्ष सलग सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना २० गुण व १० वर्षापेक्षा जास्त सलग सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना ३० गुण द्यावेत, असे ठरले. तसेच वाढीव गुण देण्याच्या या पध्दतीला शासनाची मान्यता घ्यावी व त्यानंतर भरती प्रक्रिया राबवावी असे ठरले, तसेच मे.वैभव प्लेसमेंट, नाशिक यांनी सादर केलेल्या संस्थानचे मनुष्यबळ अहवाल-भाग १ व भाग २ च्या प्रती सर्व.मा.सदस्यांना पुरविणेत याव्यात. सदर अहवालाबाबत फेर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करणेत यावा या अहवालावर अंतीम निर्णय झाल्यानंतर संस्थान सेवेबाबतचे सेवा प्रवेश नियम व बिंदू नामावली अंतीम करणेत यावी, असे ठरले. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग)**

---

३) निर्णय क्र.५८९- यावर सविस्तर चर्चा होऊन, शासनाचे अर्धशासकीय पत्र व आवाहन यांचे अवलोकन करण्यात येऊन "मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी" रक्कम रु.५० कोटी मात्र अनुदान देणेत यावे, असे ठरले. त्यापैकी रक्कम रु.३० कोटी मात्र अनुदान मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये व उर्वरीत रक्कम रु.२० कोटी मात्र अनुदान मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या Drought Mitigation Fund च्या माध्यमातुन Village Social Foundation यासाठी देण्यात यावे, असे ठरले. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

**याएवेजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, शासनाचे अर्धशासकीय पत्र व आवाहन यांचे अवलोकन करण्यात येऊन दुष्काळ निवारणासाठी " मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी " रक्कम रु.५० कोटी मात्र अनुदान देणेस मान्यता देण्यात आली. सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाचे विधी व न्याय विभागाकडे पाठविण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)**

---

४) निर्णय क्र.६१२- यावर सविस्तर चर्चा होऊन, शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या परिपत्रकाप्रमाणे शासकीय रुग्णालयामधुन देण्यात येणा-या तपासणी व त्याबाबतच्या रुग्णशुल्काबाबतचे सेवाआकारामध्ये आकारण्यात येणा-या शुल्क दरामध्ये दर दोन वर्षानी १५ ते २० टक्के वाढ करणेत येईल असे नमुद केलेले आहे. याअनुषंगाने श्री साईनाथ रुग्णालयातील दर निश्चीत झालेनंतर दर दोन वर्षानी १० टक्के वाढ करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकीय अधिक्षिका, श्री साईनाथ रुग्णालय)

**याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील सद्यस्थितीला लागू असणारे दर जसेच्या तसे श्री साईनाथ रुग्णालयात लागु करणेत यावेत, व जे उपचार, शस्त्रक्रिया श्री साईबाबा रुग्णालयात होत नाहीत परंतु शासकीय रुग्णालयात होत आहेत. अशा उपचारांचे दर शासनाच्या दराप्रमाणे घेण्यात यावे. तसेच शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या परिपत्रकाप्रमाणे शासकीय रुग्णालयामधुन देण्यात येणा-या तपासणी व त्याबाबतच्या रुग्णशुल्काबाबतचे सेवाआकारामध्ये आकारण्यात येणा-या शुल्क दरामध्ये दर दोन वर्षानी १५ ते २० टक्के वाढ करणेत येईल असे नमुद केलेले आहे. याअनुषंगाने श्री साईनाथ रुग्णालयातील दर निश्चीत झालेनंतर दर दोन वर्षानी १० टक्के वाढ करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- वैद्यकीय अधिक्षिका, श्री साईनाथ रुग्णालय)**

**विषय नं.०२** **मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे श्री साईबाबा समाधी शताब्दी समारोप निमीत्त दौऱ्यासाठी चारी क्र.११ वरुन हेलिपॅडकडे जाणारा रस्ता दुरुस्तीकरणे व हेलीपॅडचे डांबरीकरण व इतर अनुषंगीक कामे करणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांचे अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत व शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदरचा निधी त्यांचेकडे वर्ग करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतुद** :-(२००४ चा महा. १४) याच्या कलम २१ च्या पोट-कलम (१ क) अन्वये, भक्तांच्या सोयीसाठी बस, वाहनतळ, रेल्वे स्थानक व विमानतळ आणि तत्सम पायाभूत सुविधा यासारख्या पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकीय विभागांना, शासकीय महामंडळांना, शासकीय कंपन्यांना किंवा शासकीय उपक्रमांना सहायक अनुदान देता येईल.

अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे सभील निर्णय- दिनांक ०५/१०/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६२०.

प्रस्तावना:- श्री साईबाबांच्या समाधीस दिनांक १८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. या निमीत्त संस्थानमार्फत दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.३० ऑक्टोबर, २०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षे साजरे केले जात आहे. या निमीत्त श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप सभारंभ कार्यक्रम मा. पंतप्रधान, भारत सरकार यांचे उपस्थितीत संपन्न होणार आहे.

सदरहू कार्यक्रमाचे अनुषंगाने मा. ना. राम शिंदे, पालक मंत्री, अहमदनगर यांनी बैठक आयोजित केली होती. सदरचे बैठकीसाठी मा. पोलीस महानिरीक्षक, नाशिक, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर मा. पोलीस अधिक्षक, अहमदनगर तसेच इतर शासकिय अधिकारी उपस्थित होते. सदरचे बैठकीनंतर त्यांनी संस्थानचे हेलिपॅड येथे भेट दिली. त्यावेळी मा. पोलीस महानिरीक्षक, नाशिक यांनी सदरहू हेलिपॅडकडे जाणा-या रस्त्याचे व हेलिपॅडचे डांबरीकरण खराब झालेले असल्याने, डांबरीकरण करणेबाबत निर्देश दिले होते. त्यानुसार चारी क्र.११ वरुन हेलिपॅडकडे जाणारा रस्ता दुरुस्तीकामी व हेलिपॅडचे डांबरीकरण व इतर अनुषंगीक कामे करणेसाठी एकुण रु.६५ लक्ष मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे दौ-यानिमित्त कामे तातडीने पूर्ण करणे आवश्यक असलेने, सदरचे कामे सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांचेकडून करुन घेऊन, याकामी येणा-या खर्चाची रक्कम त्यांचेकडे वर्ग करता येईल. तसेच संस्थान अधिनियमातील तरतुदीनुसार शासन मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेस मान्यता मिळणेसाठी दि.०५/१०/२०१८ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र.६२० खालीलप्रमाणे झालेला आहे.

" यावर सविस्तर चर्चा होऊन, चारी क्र.११ वरुन हेलिपॅडकडे जाणारा रस्ता दुरुस्तीकामी व हेलिपॅडचे डांबरीकरण व इतर अनुषंगीक कामे करणेसाठी सा. बां. विभागाने कळविलेल्या अंदाजे रक्कम रु.६५ लक्ष खर्चास मान्यता देण्यात आली.

मा. पंतप्रधान, भारत सरकार यांचा नियोजित दौरा असल्याने उपरोक्त कामाकरीता ई-निविदा प्रक्रीया राबविणेस पुरेसा कालावधी शिल्लक नाही. मा. पंतप्रधान, भारत सरकार यांच्या नियोजित दौ-या निमीत्त सदरची कामे तातडीने पूर्ण करणे आवश्यक आहे.

उपरोक्त दोन्ही कामांसाठी कार्यकारी अभियंता, सा. बां., विभाग, संगमनेर यांचेकडून सविस्तर अंदाजपत्रके खर्च मागवून घेण्यात यावा व त्याप्रमाणे निधी कार्यकारी अभियंता, सा. बां., विभाग, संगमनेर यांचेकडे तातडीने वर्ग करण्यास मान्यता देण्यात आली. व तसा प्रस्ताव शासनाचे विधी व न्याय विभाग यांचेकडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावा, असे ठरले."

वरील निर्णयानुसार कार्यकारी अभियंता, सा. बां., विभाग, संगमनेर यांचेकडून सदरहू कामांसाठी येणारे खर्चाचा सविस्तर तपशिल मागविणेत आला असता, त्यांनी खालीलप्रमाणे खर्चाचा प्रस्ताव सादर केला आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| ०१. | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मालेकीचे निमगांव को-हाळे येथील हेलिपॅडचे डांबरी नुतनिकरण करणे. ता. राहाता जिल्हा अहमदनगर | रु.३७,३६,७८७/- |
| ०२. | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मालेकीचे निमगांव को-हाळे येथील हेलिपॅड ते नगर-मनमाड रस्ता पोहच मार्गाचे डांबरी नुतनिकरण करणे. ता. राहाता जिल्हा अहमदनगर | रु.४२,०९,०६४/- |
| | **एकुण अंदाजित रक्कम रुपये.** | **७९,४५,८५१/-** |

उपरोक्तप्रमाणे हेलिपॅडकडे जाणारा रस्ता दुरुस्तीकामी व हेलिपॅडचे डांबरीकरण व इतर अनुषंगीक कामे करणेसाठी कार्यकारी अभियंता, सा. बां., संगमनेर यांनी रु.७९,४५,८५१/- मात्र इतक्या खर्चाचे अंदाजपत्रक सादर केले असून, सदरचे अंदाजपत्रकानुसार निधी सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांचेकडे जमा करुन त्यांचेकडून सदरची कामे करुन घेणेस मान्यता मिळणेसाठी शासनाचे विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे दि.१३/१०/२०१८ रोजीचे पत्रान्वये सादर करणेत आला असून, सदरचे काम सा. बां. विभाग, संगमनेर यांचेकडून मा. पंतप्रधान, भारत सरकार यांचे नियोजित दौ-यापूर्वी करुन घेणेत आले आहे.

विभागाचा अभिप्राय:- हेलिपॅडकडे जाणारा रस्ता दुरुस्तीकामी व हेलिपॅडचे डांबरीकरण व इतर अनुषंगीक कामे करणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांचेकडून प्राप्त झालेल्या रु.७९,४५८५१/- मात्रचे अंदाजपत्रकास विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांची मान्यता प्राप्त झाल्यानंतर निधी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांचेकडे वर्ग करता येईल असे मत आहे.

प्रस्ताव:- तरी मा. पंतप्रधान, भारत सरकार यांचे श्री साईबाबा समाधी शताब्दी समारोप निमीत्त दौ-यासाठी चारी क्र.११ वरुन हेलिपॅडकडे जाणारा रस्ता दुरुस्ती करणे व हेलिपॅडचे डांबरीकरण व इतर अनुषंगीक कामे करणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांचे रु.७९,४५,८५१/- मात्रचे अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत व शासन मान्यता प्राप्त झालेनंतर सदरहू निधी सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांचेकडे वर्ग करता येईल. तरी सदरचा प्रस्ताव माहितीस्तव व मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.६३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे श्री साईबाबा समाधी शताब्दी समारोप निमीत्त दौऱ्यासाठी चारी क्र.११ वरुन हेलिपॅडकडे जाणारा रस्ता दुरुस्तीकरणे व हेलीपॅडचे डांबरीकरण व इतर अनुषंगीक कामे करणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांचे रक्कम रु.७९,४५,८५१/- मात्रचे अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली, तसेच सदरचा प्रस्ताव शासनाचे मान्यतेसाठी त्वरीत पाठविणेत यावा व शासन मान्यता प्राप्त झालेनंतर सदरहू निधी सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांचेकडे वर्ग करण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.०३** **मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे दौऱ्यानिमीत्त मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नं.८९ व ९० येथे उभारणेत आलेल्या मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थेचे ठिकाणी मुरुम भराई करुन सपाटीकरण करणेकामी आलेल्या अंदाजे रु.१,४९,९००/- चे खर्चाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूद:- अधिनियम कलम २१(१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

मा. व्यवस्थापन समिती निर्णय:- दि.०५/१०/२०१८ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील नि. क्र. ६१५."…. यावर सविस्तर चर्चा होवून, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रमांकरीता निमंत्रीत करण्यात आलेल्या मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे शिर्डी येथील दौ-याचे निमित्ताने करावयाच्या कार्यक्रमाचे नियोजनासाठी जमिन अधिग्रहित केलेनंतर मरुमीकरण व इतर अनुषंगीक कामासाठी अंदाजित खर्चासाठी रु.२४.५० लक्ष मात्रचे खर्चास मान्यता देणेत आलेली आहे. तसेच सदर कार्यक्रमाकरीता ऐनवेळी करावी लागणारी आवश्यक ती कामे करण्यास व त्याकामी येणा-या अंदाजे खर्चास मान्यता देण्यात आली ".

प्रस्तावना– श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे सांगता समारंभासाठी मा.पंतप्रधान, भारत सरकार उपस्थित राहिले होते. सदर कार्यक्रमासाठी मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं.८९ व ९० येथे मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थेची उभारणी करणेत येऊन कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला आहे.

सदर कार्यक्रमाचे वेळी अचानक पाऊस आल्यास चिखल होऊ नये याकरीता उपाययोजना म्हणून महाराष्ट्र विज वितरण कंपनीचे सबस्टेशनचे पश्चिमेकडील भागात व श्री. तुकाराम गोंदकर यांचे क्षेत्रात काही भागात मुरुमीकरण करुन सपाटीकरण व दबाईकरण करणेत आलेले आहे. त्याकामी संस्थानचे नविन साठवण तलावाचे कामातील निघालेला मुरुम मंडपाचे ठिकाणी वाहतूक करणे, जे.सी.बी मशिनव्दारे लेव्हल करणे व रोलिंग करणे इ. कामे जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/३३९३/२०१८ दि.१० ऑक्टोबर, २०१८ रोजीचे पत्राने

संबधीत ठेकेदार यांचेकडून विहीत पध्दतीने कोटेशन मागवून निम्नतम दरधारक यांचेकडून खालील तपशिलानुसार कामे करुन घेणेत आलेले आहे.

| अं.क्र | निम्नतम दरधारक ठेकेदाराचे नाव | कामाचा तपशिल | केलेले एकूण काम | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | परिमाण | एकक | दर | एकूण रक्कम |
| ०१ | श्री.नितीन रामदास मातेरे, मु.पो.सावळीविहीर | संस्थानचे नविन साठवण तलावाचे कामातील निघालेजा मुरुम सभेचे ठिकाणी वाहतुक करणे. | ५१० | ब्रास | रु.२४०/- (प्रती ब्रास) | रु.१,२२,४००/- |
| ०२ | | कार्यक्रमांचे ठिकाणी जे.सी.बी. मशिनव्दारे लेव्हल करणे. | २० | तास | रु.७७५/- (प्रती तास) | रु.१५,५००/- |
| ०३ | श्री.एस.के.येवले, संगमनेर | कार्यक्रमस्थळावर मंडपामध्ये व बाजूचे परिसरामध्ये रोलिंग करणे. | १० | तास | रु.१२००/- (प्रती तास) | रु.१२,०००/- |
| | | | | | **एकूण** | **रु.१,४९,९००/-** |

विभागाचा अभिप्राय– उपरोक्त कामासाठी संस्थानचे नविन साठवण तलावातील निघालेला अंदाजे २५० ब्रास मुरुम सभेच्या ठिकाणी वाहतूक करुन पसरविणेबाबत कोटेशन मागविणेत येऊन विहीत प्रक्रिया राबवून त्यानुसार निम्नतम दरधारक यांना कामाचा कार्यादेश देणेत आला होता. तथापी, काम करतेवेळी पोलीस विभागाचे निर्देशानुसार एकूण ५१० ब्रास मुरुम वाहतूक करुन पसरविणे व रोलींग करण्याचे काम पूर्ण करणेत आलेले आहे.

प्रस्ताव– मा. पंतप्रधान, भारत सरकार यांचे दौ-या निमीत्त मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं.८९ व ९० येथे उभारणेत आलेल्या मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थेचे ठिकाणी पोलीस विभागाचे निर्देशानुसार मुरुम भराई करुन सपाटीकरण करणेकामी आलेल्या अंदाजे रु.१,४९,९००/- मात्रचा खर्च माहितीस्तव व मान्यतेसाठी सविनय सादर.

निर्णय क्र.६४० **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे दौऱ्यानिमीत्त मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नं.८९ व ९० येथे उभारणेत आलेल्या मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थेचे ठिकाणी पोलीस विभागाचे निर्देशानुसार मुरुम भराई करुन सपाटीकरण करणेकामी आलेल्या अंदाजे रु.१,४९,९००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

विषय नं.०४ **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रमानिमीत्त मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे दि.१९.१०.२०१८ रोजीचे शिर्डी येथील दौरा व कार्यक्रमासाठी मंडप व इतर अनुषंगिक व्यवस्था करणेकामी ठेकेदार यांनी सादर केलेले अंदाजे रु.१.५४ कोटी मात्रचे देयकाचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूद:- अधिनियम कलम २१(१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

मा. व्यवस्थापन समिती निर्णय:-

१) दि.३०/०६/२०१८ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील नि. क्र. ४४८ "…. यावर सविस्तर चर्चा होवून, मा. पंतप्रधान यांचे संभाव्य दौ-याचे वेळी आवश्यकतेनुसार तातडीने करावयाचे उपाय योजना व त्यासाठी येणा-या अनुषंगिक खर्चास मान्यता देणेत आली आहे".

२) दि.०५/१०/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.६१३(०८) "…. यावर सविस्तर चर्चा होवून, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे निमित्ताने मान्यवरांचे भेटी कार्यक्रमाकरीता सुपरस्ट्रक्चर पत्रा मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था उभारणेसाठी निम्नतम निविदाधारक बी.एस.कातूरे, पुणे यांनी चर्चेअंती देऊ केलेले होणा-या एकूण बिलाच्या रक्कमेमधून रक्कम रु.१ लाख मात्र कमी हे दर स्विकारणेत येऊन त्यांना कायादेश देण्यात यावा. अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

३) दि.०५/१०/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.६२१ "…. यावर सविस्तर चर्चा होवून, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रमानिमित्त मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे दि.१९/१०/२०१८ रोजीचे शिर्डी येथील संभाव्य दौरा व कार्यक्रमासाठी वाढीव मंडप व इतर अनुषंगिक अतिरिक्त

व्यवस्था बी.एस.कातूरे, पुणे यांचेकडून मंजूर दराने करुन घेण्यास व याकामी येणा-या रु.४०.६३ लक्ष खर्चास मान्यता देण्यात आली.

प्रस्तावनाः- (अ) श्री साईबाबा यांच्या समाधीस ऑक्टोबर-२०१८ मध्ये १०० वर्ष पूर्ण होत असल्याने संस्थानतर्फे दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे करणेत आलेले आहे. याकरीता दि.१९ ऑक्टोबर, २०१८ रोजी मान्यवरांचे हस्ते शताब्दी सोहळयांचे सांगता समारंभ पार पाडणेसाठी सुपरस्ट्रक्चर मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था उभारणेसाठी दि.३०/०६/२०१८ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील नि. क्र. ४४८ अन्वये याकामी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर जाहीरात प्रसिध्द करुन ई निविदा मागविणेस मान्यता देणेत आली. मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार ठेकेदार बी.एस.कातुरे, पुणे यांची निम्नतम दराची निविदा रु.८५,०५,२५०/- मात्र इतक्या रकमेची स्विकारणेत आली. तसेच त्यांचे समवेत झालेल्या चर्चेनुसार त्यांचे होणारे बीलाचे रकमेतून रु.१ लक्ष मात्र इतकी रक्कम कमी करुन त्यांचे दर स्विकारणेत आले. त्यानुसार त्यांना दि.१४/१०/२०१८ रोजी रु.८५,०५,२५०/- मात्र रकमेचा खालील कामाचा कार्यादेश देणेत आलेला आहे.

**(तक्ता - अ - निविदे नुसार त्यांनी खालील प्रमाणे कामे केलेली आहे.)**

| अ.क्र. | कामाचा तपशिल | परीमाण | एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1.00 | सुपरस्ट्रक्चर पत्रा मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था:- पत्र्याचे वॉटरप्रुफ छत असलेला व आतील बाजूने सुशोभित कापड असलेल्या पत्रा मंडपाची उभारणी करणे. | 210000.00 | चौ. फुट | 22.50 | **4725000.00** |
| 2.00 | स्टेज व्यवस्था:- ६०'x४०' साईजचे स्टेज, जमिनीपासून ४' ते ५' फुटापर्यंत उंची असलेले भक्कम स्टेज तयार करणे. स्टेजवर लाल / हिरव्या / राखडी रंगाचे कारपेट टाकणे. | 2400.00 | चौ. फुट | 60.00 | **144000.00** |
| 3.00 | वेल्वेट / सिंथेटीक कारपेट:- बैठक व्यवस्थेसाठी संपूर्ण मंडपामध्ये वेल्वेट / सिंथेटीक कारपेट टाकणे. सदरहू कारपेटचे सॅम्पल सक्षम अधिका-यांकडून प्रमाणित करुन घेणे. | 210000.00 | चौ. फुट | 6.00 | **1260000.00** |
| 4.00 | बॉक्स टाईप स्वागत कमान:-मान्यवरांचे स्वागतासाठी आवश्यक त्याठिकाणी २'x२' बॉक्स टाईप आकाराची स्वागत कमानी उभारणे. कमानींची रुंदी २५ फुट व उंची १८ फुट. | 5.00 | नग | 10000.00 | **50000.00** |
| 5.00 | बॅरेकेडींग व्यवस्था करणे:- ४ फुट उंचीची बल्ली उभी करुन व ४ इंच बांबुची आडवी दोन ते तीन ठिकाणी बांधणी करणे आवश्यक आहे व त्याच्या वर पांढ-या कापडयाची बॅन्डेज करणे. | 300.00 | र. फुट | 45.00 | **13500.00** |
| 6.00 | मंडप बॅरेकेडींग व्यवस्था करणे:- ४ फुट उंचीची बल्ली उभी करुन व ४ इंच बांबुची आडवी दोन ते तीन ठिकाणी बांधणी करणे आवश्यक आहे व त्याच्या वर पांढ-या कापडयाची बॅन्डेज करणे. | 1200.00 | र. फुट | 45.00 | **54000.00** |
| 7.00 | स्वागत कक्ष व माहीती कक्ष:- एका युनिटमध्ये - प्रत्येकी ०४ खुर्च्या व ०२ टेबलसह मंडप व्यवस्था करणे, तसेच सदर कक्षामध्ये सिंथेटीक रेड कारपेट टाकणे. १५ फुट x १५ फुट x ०१ युनिट. | 2.00 | यूनीट | 15000.00 | **30000.00** |
| 8.00 | ग्रीन रूम:- १५'x१५' - ०१ नग ग्रीन रूम - प्रत्येकी ०४ खुर्च्या, ०१ टेबल व ०१ आरशासह बंदिस्त मंडप व्यवस्था करणे, तसेच सदर ग्रीन रूममध्ये सिंथेटीक रेड कारपेट टाकणे. | 2.00 | यूनीट | 15000.00 | **30000.00** |
| 9.00 | फायबर खुर्च्या:- उच्च दर्जाच्या हात असलेल्या फायबर खुर्च्यांची व्यवस्था करुन, त्यावर नवीन पांढरे कापड व सुशोभित कव्हर घालून व्यवस्था करणे. सर्व बैठक व्यवस्था वाहतूक करणे व लावून देणे आवश्यक आहे. | 20000.00 | नग | 27.00 | **540000.00** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 10.00 | व्यासपीठावरील व्ही. आय. पीं. करीता सिंगल सिटर लेदर डनलॉप प्रिमियम सोफे ठेवणे:- व्यासपीठावर महत्वाच्या / अतिमहत्वाच्या व्यक्तींकरीता उच्च प्रतीचे सिंगल सिटर लेदर डनलॉप प्रिमियम सोफे नविन कव्हर असलेले पुरविणे. | 20.00 | नग | 750.00 | **15000.00** |
| 11.00 | व्ही. आय. पीं. करीता टु सिटर लेदर डनलॉप प्रिमियम सोफे ठेवणे:- महत्वाच्या/ अतिमहत्वाच्या व्यक्तींकरीता उच्च प्रतीचे टु सिटर लेदर डनलॉप प्रिमियम सोफे नविन कव्हर असलेले पुरविणे | 100.00 | नग | 1000.00 | **100000.00** |
| 12.00 | व्यासपीठावर टी-पॉय व्यवस्था करणे:- मॉडयुलर फर्निचर मध्ये अथवा एस एस फ्रेम व त्यावर ग्लास अशा टी-पॉयची आकर्षक फुलांची फुलदानीसह व्यवस्था करणेत यावी. | 5.00 | नग | 750.00 | **3750.00** |
| 13.00 | थ्री सिटर सोफा:- थ्री-सिटर एस एस सोफा कुशनसह व त्यावर स्वच्छ पांढरे कव्हर व्यवस्था करणे. | 300.00 | नग | 500.00 | **150000.00** |
| 14.00 | पोलीसांकरीता चेकींग रुम:- १० फुट x १० फुट साईजचे काळ्या कापडाचे डबल अस्तर लावून एका बाजूस सरकता पडदा लावणे. आतमध्ये लाईटची व्यवस्था करणे. एका युनिटमध्ये प्रत्येकी ०४ खुर्च्या व खाली तळास सिथेंटीक कारपेट टाकणे. | 4.00 | युनिट | 10000.00 | **40000.00** |
| 15.00 | साऊंड सिस्टीम व्यवस्था करणे:- मंडपामध्ये व स्टेज साऊंड सिस्टीम व्यवस्था करणे. | 1.00 | युनिट | 450000.00 | **450000.00** |
| 16.00 | विद्युत व्यवस्था करणे:- मंडप व स्टेजची विद्यूत व्यवस्था जनरेटर बॅकअपसह करणे. | 1.00 | युनिट | 450000.00 | **450000.00** |
| 17.00 | व्हिडीओ शुटींग व फोटोग्राफी:- सदर कार्यक्रमाचे व्हिडीओ शुटींग व स्टिल फोटोग्राफी करणे. सदर व्हिडीओ शुटींग व फोटो हे प्रत्येकी स्वतंत्र डि. व्हि. डी. मध्ये संस्थानकडे जमा करणे. | 1.00 | युनिट | 125000.00 | **125000.00** |
| 18.00 | एल. ई. डी स्क्रिन / वॉल:- मंडपामध्ये आवश्यक त्याठिकाणी लोखंडी पाईपचे मजबूत स्टॅण्डसह व त्यावरती लेव्हलमध्ये प्लायवूड टाकूण एल. ई. डी. स्क्रिन जमिनीपासून किमान ४ ते ५ फुट उंचीवर लावणे. ८ x १२ साईज. | 10.00 | नग | 25000.00 | **250000.00** |
| 19.00 | तात्पुरत्या मुता-यांची व्यवस्था करणे:- कार्यस्थळावर पत्रा पार्टीशन मध्ये अथवा रेडीमेड फायबर कॅबीन पोर्टेबल मुता-यांची व्यवस्था करणे. त्याकरीता आवश्यक ड्रेनेज अथवा योग्यती व्यवस्था करणे, तसेच सदर ठिकाणी पाण्याच्या टाक्या ठेवून पाण्याची व्यवस्था करणे. | 30.00 | नग | 2500.00 | **75000.00** |
| | | | | Total Amount Rs.: | 8505250.00 |

**(ब)** दरम्यानचे काळात, दि.०२/१०/२०१८ रोजी मा. ना. श्री. राम शिंदे सो., मंत्री, जलसंधारण, राजशिष्टाचार तथा पालकमंत्री, अहमदनगर, मा. डॉ. दोरजे, आय. जी. पोलीस विभाग, नाशिक परीक्षेत्र, मा. जिल्हाधिकारी, मा. पोलीस अधिक्षक, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था व इतर शासकीय अधिकारी यांचे उपस्थित शिर्डी येथे झालेल्या आढावा बैठकीत त्यांनी सदरहू समारोप कार्यक्रमांसाठी ०१ लाख नागरिक व साईभक्त उपस्थित राहाणार असल्याची शक्यता वर्तविल्याने मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था वाढविण्याचे सुचना केलेल्या होत्या. त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५/१०/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६२१ अन्वये अतिरिक्त वाढीव मंडप ९४००० चौ.फूट व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु. ४०.३० चे खर्चास मान्यता देणेत आलेली होती.

यापूर्वी निविदेप्रमाणे २,१०,००० चौ.फूट अधिक वरील मान्यतेनुसार ९४००० चौ.फूट असा एकूण ३,०४,००० चौ.फूट मंडपाचे काम प्रगतीपथावर होते. दरम्यान उपविभागीय पोलीस अधिकारी, शिर्डी विभाग यांनी या व्यवस्थेत ४४,५०० लोकांची बैठक व्यवस्था होवू शकेल. सभेसाठी सुमारे ७०,००० जनसमुदाय

येण्याची शक्यता असल्याने अतिरिक्त होणा-या गर्दीच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवून सभेकरीता येणारे व्ही.व्ही.आयपी, व्ही.आय.पी व सर्व सामान्य नागरीक यांचे जिवितास धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याकरीता अतिरिक्त गर्दीचे काय नियोजन करणेत येणार आहे, असे दि.०९/१०/२०१८ रोजीचे पत्राने कळविले होते.

तसेच मा.पोलीस महानिरिक्षक, नाशिक परिक्षेत्र, मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर, मा.पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांचे समवेत बैठक झाली तसेच त्यांनी प्रत्यक्ष मंडपाचे चालू असलेल्या कामावर भेट दिली त्यावेळी दिलेल्या निर्देशानुसार उभारणेत आलेल्या स्टेजची जागा बदलणेत आली व मंडप ९४०' x ५००' असा एकूण ४,७०,००० चौ.फूटाचा मंडप व त्याअनुषंगाने इतर व्यवस्था प्रस्तावित करणेत आली. त्यानुसार खालीलप्रमाणे वाढीव व्यवस्था करणेत आली होती. याकामाचे ठेकेदार बी.एस.कातुरे, पुणे यांनी वाढीव कामासह एकत्रित रु.१५३,९७,४२३/- मात्र रकमेचे बील सादर केले आहे. यामध्ये खालीलप्रमाणे रु.६९,२७,१७३/- मात्र इतक्या रकमेचे अतिरिक्त वाढीव कामाचे बील सादर केले आहे.

(तक्ता-ब– पोलीस विभाग, एस.पी.जी, नवी दिल्ली व मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचे सुचनांनुसार केलेल्या वाढीव व्यवस्थेचा तपशिल )

| अ.क्र. | कामाचा तपशिल | परीमाण | एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1.00 | सुपरस्ट्रक्चर पत्रा मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था:- पत्र्याचे वॉटरप्रुफ छत असलेला व आतील बाजूने सुशोभित कापड असलेल्या पत्रा मंडपाची उभारणी करणे. | 100661.25 | चौ. फुट | 22.50 | **2264878.00** |
| 2.00 | स्टेज व्यवस्था:- ६०'x४०' साईजचे स्टेज, जमिनीपासून ४' ते ५' फुटापर्यंत उंची असलेले भक्कम स्टेज तयार करणे. स्टेजवर लाल / हिरव्या / राखडी रंगाचे कारपेट टाकणे. | 3168.00 | चौ. फुट | 60.00 | **190080.00** |
| 3.00 | वेल्वेट / सिंथेटीक कारपेट:- बैठक व्यवस्थेसाठी संपूर्ण मंडपामध्ये वेल्वेट / सिंथेटीक कारपेट टाकणे. | 88076.00 | चौ. फुट | 6.00 | **528456.00** |
| 4.00 | मंडप बॅरेकेडींग व्यवस्था करणे:- ४ फुट उंचीची बल्ली उभी करुन व ४ इंच बांबुची आडवी दोन ते तीन ठिकाणी बांधणी करणे आवश्क्क आहे व त्याच्या वर पांढ-या कापडयाची बॅन्डेज करणे. | 18137.00 | र. फुट | 45.00 | **816165.00** |
| 5.00 | ग्रीन रूम:- १५'x१५' - ०१ नग ग्रीन रूम - प्रत्येकी ०४ खुर्च्या, ०१ टेबल व ०१ आरशासह बंदिस्त मंडप व्यवस्था करणे, तसेच सदर ग्रीन रूममध्ये सिंथेटीक रेड कारपेट टाकणे. | 6.00 | यूनीट | 15000.00 | **90000.00** |
| 6.00 | फायबर खुर्च्या:- उच्च दर्जाच्या हात असलेल्या फायबर खुर्च्यांची व्यवस्था करुन, त्यावर नवीन पांढरे कापड व सुशोभित कव्हर घालून व्यवस्था करणे. सर्व बैठक व्यवस्था वाहतूक करणे व लावून देणे आवश्यक आहे. | 12769.00 | नग | 27.00 | **344763.00** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 7.00 | व्यासपीठावरील व्ही. आय. पीं. करीता सिंगल सिटर लेदर डनलॉप प्रिमियम सोफे ठेवणे:- व्यासपीठावर महत्वाच्या / अतिमहत्वाच्या व्यक्तींकरीता उच्च प्रतीचे सिंगल सिटर लेदर डनलॉप प्रिमियम सोफे नविन कव्हर असलेले पुरविणे. | 13.00 | नग | 750.00 | **9750.00** |
| 8.00 | टिपॉय- व्यासपिठावर टिपॉय व्यवस्था करणे. | 9.00 | नग | 750.00 | **6750.00** |
| 9.00 | व्ही. आय. पीं. करीता टु सिटर लेदर डनलॉप प्रिमियम सोफे ठेवणे:- महत्वाच्या / अतिमहत्वाच्या व्यक्तींकरीता उच्च प्रतीचे टु सिटर लेदर डनलॉप प्रिमियम सोफे नविन कव्हर असलेले पुरविणे. | 25.00 | नग | 1000.00 | **25000.00** |
| 10.00 | व्ही. आय. पीं. करीता थ्री सिटर एस.एस सोफे ठेवणे:- | 10.00 | नग | 500.00 | **5000.00** |
| 11.0 | साऊंड सिस्टीम व्यवस्था करणे:- मंडपामध्ये व स्टेज साऊंड सिस्टीम व्यवस्था करणे. | 1.00 | युनिट | 275000.00 | **275000.00** |
| 12.00 | विद्युत व्यवस्था करणे:- मंडप व स्टेजची विद्यूत व्यवस्था जनरेटर बॅकअपसह करणे. | 1.00 | युनिट | 275000.00 | **275000.00** |
| 13.00 | एल. ई. डी स्क्रिन / वॉल:- मंडपामध्ये आवश्यक त्याठिकाणी लोखंडी पाईपचे मजबूत स्टॅण्डसह व त्यावरती लेव्हलमध्ये प्लायवूड टाकूण एल. ई. डी. स्क्रिन जमिनीपासून किमान ४ ते ५ फुट उंचीवर लावणे. ८ x १२ साईज. | 6.00 | नग | 25000.00 | **150000.00** |
| i) | **निविदेत समाविष्ठ नसलेली कामे.** | | | | |
| 1.00 | Fireproof cloth for pandal | 9840.00 | चौ. फुट | 9.00 | **88560.00** |
| 2.00 | Tower AC for Stage and Green Rooms | 8.00 | नग | 20000 | **160000.00** |
| 3.00 | **साधा कापडी मंडप व्यवस्था**:- आतील बाजूने सुशोभित कापड असलेल्या मंडपाची उभारणी करणे. | 103532.55 | चौ. फुट | 16.00 | **1656521.00** |
| 4.00 | कुशन खर्ची कव्हरसह | 500.00 | नग | 75.00 | **37500.00** |
| 5.00 | सर्व्हिस टेबल कव्हरसह | 50.00 | नग | 75.00 | **3750.00** |
| | | Total Amount Rs.: | | | **6927173.00** |

विभागाचा अभिप्राय:- श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रमानिमित्त मा. पंतप्रधान, भारत सरकार यांचे दि.१९/१०/२०१८ रोजीचे शिर्डी येथिल दौरा व कार्यक्रमासाठी एस.पी.जी, नवी दिल्ली व इतर पोलीस यंत्रणा, मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी तसेच मा.पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांनी सुरक्षेच्या दृष्टीने उपरोक्त वाढीव सुविधा करणेबाबत सुचविले होते त्यानुसार मंजूर दराने वाढीव सुविधा करुन घेणेत आलेली आहे. याकामी वरील प्रमाणे निविदेनुसार रु.८५,०५,२५०/- व वाढीव कामांकरीता रु.६९,२७,१७३/-

असा एकूण रु.१,५४,३२,४२३/- मात्रचे बील ठेकेदार यांनी सादर केलेले आहे. मात्र प्रत्यक्ष वापरलेले साहित्य व केलेल्या कामाचे मोजमापानुसार ठेकेदार यांना अदा करावयाच्या बीलाची रक्कम निश्चित करण्यात येईल.

प्रस्ताव:– श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रमानिमित्त मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे दि.१९/१०/२०१८ रोजीचे शिर्डी येथील दौरा व कार्यक्रमासाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी ठेकेदार श्री.बी.एस.कातूरे, पुणे यांना मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णय क्र.६१३(०८) नुसार इकडील जा.क्र.एसएसएसटी/ बांधकाम/ ३५२०/२०१८ दि.१४/१०/२०१८ चे पत्रान्वये रु.८५,०५,२५०/- मात्र रकमेचा कार्यारंभ आदेश दिलेला आहे.

आता, कार्यक्रमाची व्याप्ती वाढल्यामुळे मूळ कार्यारंभ आदेशापेक्षा प्रस्तावात नमूद तपशिलाप्रमाणे मंजूर दराने वाढीव केलेले तक्ता ब मध्ये दर्शविलेले काम व दर मंजूर नसलेल्या मात्र काम केलेल्या बाबी तक्ता (i) नुसार दर्शविलेल्या आहेत. ठेकेदार श्री.बी.एस.कातूरे, पुणे यांनी सादर केलेल्या वाढीव कामाचे बील रु.६९,२७,१७३/- मात्रचे बील सादर केले आहे.

तरी ठेकेदार श्री.बी.एस.कातूरे, पुणे यांना वाढीव खर्चासह एकूण रु.१,५४,३२,४२३/- मात्र अदा करणेबाबत चर्चा होऊन निर्णय होणेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.६४१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रमानिमीत्त मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे दि.१९.१०.२०१८ रोजीचे शिर्डी येथील दौरा व कार्यक्रमासाठी मंडप व इतर अनुषंगिक व्यवस्था करणेकामी ठेकेदार श्री.बी.एस.कातूरे, पुणे यांनी सादर केलेल्या वाढीव कामाचे बील रक्कम रु.६९,२७,१७३/- मात्र यास मान्यता देण्यात आली. तसेच वाढीव खर्चासह एकूण रु.१,५४,३२,४२३/- मात्र ठेकेदार श्री.बी.एस.कातूरे, पुणे यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली. तथापी ठेकेदार श्री.बी.एस.कातूरे, पुणे यांनी प्रत्यक्ष केलेल्या कामाच्या मोजमापाप्रमाणे तपासणी करुन त्यानंतर प्रत्यक्ष केलेल्या कामानुसार बिलाची रक्कम आदा करणेत यावी, असे ठरले. (कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.०५** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रमानिमित्त मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे दि.१९.१०.२०१८ रोजीचे शिर्डी येथील कार्यक्रमासाठी स्टेज डेकोरेशन व इतर अनुषंगीक खर्चाचे देयक आदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः-

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालववयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे. तसेच अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ड) श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

शासन निर्णय- महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र. सासंवि २०१३/प्र.क्र.०१/ का.१६ दि.२२/१०/२०१३ अन्वये मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा समितीने शताब्दी महोत्सवाकरीता रु.३,०२३.१७ कोटी इतक्या रकमेच्या कृती आराखड्यास दि.३१/०३/२०१७ रोजी मान्यता दिली आहे. सदर आराखडयात संस्थानचे प्रथम व व्दितीय प्राधान्य गटात असे एकुण रु.१,८२८.३१ कोटी इतक्या रकमेचे प्रकल्प प्रस्तावीत असून वरीलपैकी व्दितीय प्राधान्य गटातील रु.१,२५२.८५ कोटी निधीची मागणी करणारा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडून केंद्र शासनास सादर करणेत आला आहे. तसेच प्रथम प्राधान्य गटातील अ.नं. १२ मध्ये विविध धार्मिकव सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजनासाठी रु.२५ कोटी मात्र अंदाजित खर्चास मान्यता मिळालेली आहे.

मा. व्यवस्थापन समिती निर्णयः-

१. मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३-२४/०५/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३५८.

२. मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४४८.

३. मा. व्यवस्थापन समितीचे दि.०५/१०/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ५८२.

४. मा. व्यवस्थापन समितीचे दि.०५/१०/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६१५.

प्रस्तावनाः- श्री साईबाबा यांच्या समाधीस ऑक्टोबर-२०१८ मध्ये १०० वर्ष पूर्ण होत असल्याने संस्थानतर्फे दि.०१ ऑक्टोबर,२०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे करण्यात आले. यासाठी शताब्दीचे संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणेत आले. श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षाची सांगता समारोप सभारंभ कार्यक्रम मा. श्री. नरेंद्र मोदी, पंतप्रधान, भारत सरकार, मा. राज्यपाल, महाराष्ट्र, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र व इतर मान्यवरांचे उपस्थितीत दि.१९/१०/२०१८ रोजी संपन्न झालेला आहे. सदर कार्यक्रमाचे स्टेज डेकोरेशन व इतर अनुषंगीक कामासाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि.०५/१०/२०१८ रोजीचे सभेत निर्णय क्र.५८२ खालीलप्रमाणे झालेला आहे.

"..यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोपाच्या आयोजित कार्यक्रमासाठी उभारण्यात येणा-या मंडप स्टेज सुविणेमधील स्टेज डेकोरेशनचे काम श्री. नितिन देसाई यांचे आयकॉनिक चंद्रकांत प्रॉडक्शन प्रा. लि., मुंबई या कंपनीकडून करुन घेणेस व याकामी येणा-या सुमारे रु.२० लक्ष पर्यंतच्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच या व्यतीरिक्त Screen साठी येणा-या अंदाजे रक्कम रु.१५ ते २० लाख पर्यंतचे खर्चास मान्यता देण्यात आली."

तसेच मा. व्यवस्थापन समितीचे दि.०५/१०/२०१८ रोजीचे सभेत निर्णय क्र.६१५ मधील प्रस्तावामध्ये अ. नं.०४ मध्ये नमूद केलेनुसार स्टेज डेकोरेशनसाठी होणारा अंदाजे खर्च रु.२० लक्ष मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

उपरोक्त निर्णयानुसार दि.१९/१०/२०१८ रोजी श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रमासाठी स्टेज डेकोरेशन व इतर अनुषंगीक कामे ND'S Art Worlds Private Limited, Mumbai यांचेकडून करुन घेणेत आली असून, याकामाचे त्यांनी खालीलप्रमाणे दरपत्रक सादर केले होते.

| Sr. No. | Item Description | Quantity | Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| A | Decoration, Execution of Work<br>**<u>Main stage Decoration, Model and Flex Work:</u>**<br>Providing & Installation of Decorative FRP Panel Arches, Panel Pillars, Panel Cornice, Panel Jalis, Panel Dado, All panel full framing work in G I metal, Platform Dado's on metal frame & Sai shrushti Model and Flex work it including painting, framing, labour & transportation. | 1 | Job | 19,50,000/- | 19,50,000/- |
| | | | | Total | 19,50,000/- |
| | | | | Add: CGST @9% | 1,75,500/- |
| | | | | Add: SGST @9% | 1,75,500/- |
| | | | | **Grand Total** | **23,01,000/-** |

आता, त्यांनी प्रत्यक्ष कामाच्या तपशिलानुसार रु.१७,७०,०००/- (सर्व करांसह) मात्रचे अंतिम देयक सादर केले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Item Description | Quantity | Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| A | Decoration, Execution of Work<br>**<u>Main stage Decoration, Model and Flex Work:</u>**<br>Providing & Installation of Decorative FRP Panel Arches, Panel Pillars, Panel Cornice, Panel Jalis, Panel Dado, All panel full framing work in G I metal, Platform Dado's on metal frame & Sai shrushti Model and Flex work it including painting, framing, labour & transportation. | 1 | Job | 15,00,000/- | 15,00,000/- |
| | | | | Total | 15,00,000/- |
| | | | | Add: CGST @9% | 1,35,500/- |
| | | | | Add: SGST @9% | 1,35,500/- |
| | | | | **Grand Total** | **17,70,000/-** |

विभागाचा अभिप्राय:- श्री साईबाबा समाधी शताब्दी समारोप कार्यक्रमासाठी उभारणेत आलेले स्टेजकरीता वर नमूद तपशिलानुसार स्टेज डेकोरेशन व इतर अनुषंगीक व्यवस्था ND'S Art Worlds Private Limited, Mumbai यांनी करुन दिलेली आहे.

प्रस्ताव:- तरी श्री साईबाबा समाधी शताब्दी समारोप कार्यक्रमासाठी स्टेज डेकोरेशन व इतर अनुषंगीक कामासाठी ND'S Art Worlds Private Limited, Mumbai यांनी प्रत्यक्ष झालेल्या कामाच्या तपशिलानुसार रु.१७,७०,०००/- मात्र (सर्व करांसह) अंतिम देयक सादर केले आहेत. सदर देयक मंजूर होऊन त्यांना अदा करणेसाठी निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.६४२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रमानिमित्त मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे दि.१९.१०.२०१८ रोजीचे शिर्डी येथील कार्यक्रमासाठी स्टेज डेकोरेशन व इतर अनुषंगीक कामासाठी ND'S Art Worlds Private Limited, Mumbai यांनी प्रत्यक्ष झालेल्या कामाच्या तपशिलानुसार सादर केलेल्या बीलाची रक्कम रु.१७,७०,०००/- मात्र (सर्व करांसह) त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

विषय नं.०६ **मा.पंतप्रधान,भारत सरकार यांचे दौऱ्यानिमीत्त मौजे निमगांव-कोऱ्हाळे येथील गट नं.१९५ पै.मधील संस्थानचे हेलीपॅडला रंगकाम करणेकामी आलेल्या रक्कम रु.१,३२,२४५/- मात्रचे खर्चास व ठेकेदार यांचे देयक आदा करणेस मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:**

अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्स्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम कलम २१ (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय** :मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५/१०/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय निर्णय क्र.६१५ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रमांकरीता निमंत्रीत करण्यात आलेल्या मा. पंतप्रधान, भारत सरकार यांचे शिर्डी येथील दौ-याचे निमित्ताने करावयाच्या कार्यक्रमाचे नियोजनासाठी उपरोक्त तपशिलात नमुद केल्याप्रमाणे संबधीत विभागाने करावयाचे कामास व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.२,४५,३०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

सदर कार्यक्रमाकरीता ऐनवेळी करावी लागणारी आवश्यक ती कामे करण्यास व त्याकामी येणाऱ्या अंदाजे खर्चास मान्यता देण्यात आली."

**प्रस्तावना**:- मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे दौ-या निमित्त मौजे निमगांव- को-हाळेयेथील गट नं १९५ पै. मधीलसंस्थानचेहेलिपोर्ट येथे असलेले वेटींग रुमचा सेफ हाऊस म्हणून वापर करण्यासाठीवेटींग रुमची दुरुस्ती करुन सुसज्ज स्थितीत तयार ठेवणेबाबत शिर्डी पोलीस विभागामार्फत दि.०२/१०/२०१८ रोजीचे पत्राने कळविणेत आले होते.

संस्थानचे समाधी मंदिर व लगतच्या इमारतींचे रंगकाम करणेसाठी ठेकेदार एस.व्ही.चंदन, मुंबई यांना दि.१५/०२/२०१८ रोजी कार्यादेश देण्यात आलेला आहे. मा.पंतप्रधान यांचे दौ-याच्या निमित्ताने सदरहू काम तातडीने पुर्ण करणे असल्याने ठेकेदार एस.व्ही.चंदन, मुंबई यांचे कार्यादेशातील मंजूर दराने सदरचे रंगकाम पुर्ण करुन घेण्यात आले आहे. त्याकरीता खालील तपशिलाप्रमाणे खर्च आलेला आहे.

| Sr.No. | Description | No. | Quantity | Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|---|
| 1) | Scraping to walls & ceiling | 1 | 608.42 | Sqm | 6.5/- | 3954.73 |
| 2) | Primer walls & ceiling | 1 | 608.42 | Sqm | 17/- | 10343.14 |
| 3) | Pearl Luster Finish Paint to walls | 1 | 294.39 | Sqm | 198/- | 58289.22 |
| 4) | Appex Paint external | 1 | 272.11 | Sqm | 210/- | 57143.10 |
| 5) | Synthetic enamel Paint walls | 1 | 41.92 | Sqm | 60/- | 2515.20 |
| | | | | | Total Amount - | **132245.00** |

विभागाचा अभिप्राय:- मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५/१०/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६१५ अन्वयेप्रासंगीक खर्चासाठी (ऐनवेळी उद्भवणारा खर्च) रु.२० लक्ष मात्रची तरतूद करणेत आलेली आहे. मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे दौ-या निमित्तहेलिपोर्ट येथे असलेले वेटींग रुमला तातडीने रंगकाम करणे गरजेचे

असल्याने, सदरचे रंगकाम ठेकेदार एस.व्ही.चंदन, मुंबई यांचे दि.१५/०२/२०१८ रोजीचेकार्यादेशातील मंजुर दराने करून घेण्यात आले आहे. याकामी आलेल्या खर्चास मान्यता असावी.

प्रस्ताव:- तरी मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे दौ-या निमित्त मौजे निमगांव- को-हाळे येथील गट नं १९५ पै. मधील संस्थानचे हेलिपॅडला रंगकाम करणेकामी आलेल्या रक्कम रु.१,३२,२४५/- मात्रचे खर्चास व ठेकेदार यांचे देयक अदा करणेस मान्यता असावी.

निर्णय क्र.६४३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.पंतप्रधान,भारत सरकार यांचे दौऱ्यानिमीत्त मौजे निमगांव-कोऱ्हाळे येथील गट नं.१९५ पै.मधील संस्थानचे हेलीपॅडला रंगकाम करणेकामी आलेल्या रक्कम रु.१,३२,२४५/- मात्रचे खर्चास व सदरहु रक्कम ठेकेदार एस.व्ही.चंदन, मुंबई यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

विषय नं.०७ **मा.पंतप्रधान,भारत सरकार यांचे शुभहस्ते दि.१९.१०.२०१८ रोजी झालेल्या कार्यक्रमासाठी कोनशिला तयार करणेस व श्रींचे समाधी मंदिरात टाकणेसाठी रेड कार्पेट खरेदीकामी अपेक्षित खर्चास व देयके अदा करणेस मान्यता देणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:- अधिनियमाचे कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

प्रस्तावना:- मा.व्यवस्थापन समितीने संस्थानचे नियोजित श्री साईबाबा मंदिर दर्शन रांग इमारत, शैक्षणिक संकुल प्रकल्प, साई नॉलेज पार्क व १० मेगावॅट क्षमतेच्या सौरऊर्जा प्रकल्पांना मान्यता दिलेली आहे. तसेच शासनाने प्रशासकिय मान्यता दिलेली आहे. दि.१९/१०/२०१८ रोजी श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे सांगता समारंभाचे कार्यक्रमावेळी मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे शुभहस्ते सदरहू प्रकल्पांचे भुमिपूजन झालेले आहे.

अ) सदरचे भूमिपूजन कार्यक्रमासाठी आवश्यक असणा-या कोनशिला ब्लॅक ग्रेनाईटवर गोल्डन अक्षरामध्ये तयार करुन घेणेकामी विहीत पध्दतीने कोटेशनची मागणी करुन निम्नतम दराचे पुरवठादार पोतदार मार्बल कलेक्शन, नाशिक यांना दि.१७/१०/२०१८ रोजी रु.५७,६००/- मात्रचा कार्यादेश देणेत आला आहे.

ब) तसेच समाधी मंदिरात टाकण्यासाठी १५०'x१०' साईजचे रेड कार्पेट लागण्याची शक्यता होती. अशा प्रकारचे रेड कार्पेट उपलब्धतेबाबत अहमदनगर, नाशिक येथे दुरध्वनीद्वारे चौकशी केली असता, सदरचे कार्पेट तातडीने उपलब्ध नसलेबाबत समजले. त्यानुसार शताब्दी वर्षाचे शुभारंभ कार्यक्रमासाठी मे. श्री एन्टरप्राईजेस्, वसई यांचेकडून रेड कार्पेट खरेदी केले होते. त्यांचेकडे सदरचे कार्पेट उपलब्धतेबाबत चौकशी केली असता, त्यांनी सदरहू कार्पेट उपलब्ध असलेबाबत सांगीतले. त्यानुसार त्यांचेकडून वाहतूक खर्चासह रु.२०,०००/- मात्र किमतीचे रेड कार्पेट खरेदी केले आहे.

विभागाचा अभिप्राय:- मा. पंतप्रधान, भारत सरकार यांचे शुभहस्ते दि.१९/१०/२०१८ रोजी झालेल्या कार्यक्रमासाठी कोनशिला तयार करणेसाठी रु.५७,६००/- व श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रमानिमित्त श्रींचे समाधी मंदिरात टाकणेकामी खरेदी केलेले कार्पेटसाठी रु.२०,०००/- याप्रमाणे एकुण रु.७७,६००/- इतके खर्चास व संबंधित पुरवठादारांची देयके अदा करणेस हरकत नाही असे मत आहे.

प्रस्ताव:- तरी मा. पंतप्रधान, भारत सरकार यांचे शुभहस्ते दि.१९/१०/२०१८ रोजी झालेल्या कार्यक्रमासाठी कोनशिला तयार करणे व श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रमानिमित्त श्रींचे समाधी मंदिरात टाकणेकामी रेड कार्पेट खरेदी करणे यासाठी एकुण रु.७७,६००/- इतके खर्चास व संबंधित पुरवठादारांची देयके अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.६४४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.पंतप्रधान,भारत सरकार यांचे शुभहस्ते दि.१९.१०.२०१८ रोजी झालेल्या कार्यक्रमासाठी कोनशिला तयार करणेसाठी आलेल्या रक्कम रु.५७,६००/- मात्रचे खर्चास व सदरहु रक्कम पोतदार मार्बल कलेक्शन, नाशिक यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली. तसेच श्रींचे समाधी मंदिरात टाकणेसाठी रेड कार्पेट खरेदीकामी आलेल्या रक्कम रु.२०,०००/- मात्रचे खर्चास व सदरहु रक्कम मे. श्री एन्टरप्राईजेस्, वसई यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच मा.पंतप्रधान,भारत सरकार यांचे शुभहस्ते उद्घाटन झालेल्या विविध प्रकल्पांच्या कोनशिला खालील प्रमाणे तयार करणेस मान्यता देण्यात आली.**

## Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi

This Foundation Stone of
Shri Saibaba Temple Shirdi Darshan Queue Complex
Laid By

**Shri Narendra Modi**
**Prime Minister**

On Friday, 19th October 2018

-: in the august presence of :-

**Shri Ch. Vidyasagar Rao**
Governor, Maharashtra

**Shri Devendra Fadnavis**
Chief Minister, Maharashtra

**Shri Subhash Bhamre**
Union MoS for Defence

**Smt. Pankaja Munde**
Minister of Rural Development Women and Child Development, Government of Mahahrashtra

**Prof. Ram Shankar Shinde**
Minister of water Conservation & Protocol & Guardian, Government of Mahahrashtra

**Shri Radhakrishna Vikhe Patil**
Leader of Opposition, Maharashtra Legislative Assembly

**Shri Dadaji Bhuse**
Minister of State for Rural Development, Government of Mahahrashtra

**Dr. Ranjit Patil**
Minister of State for Law & Judiciary,
Government of Mahahrashtra

**Shri Rao Saheb Danave**
Member of Parliament

**Shri Sadashiv Rao Lokhande**
Member of Parliament

**Shri Dilip Kumar Gandhi**
Member of Parliament

**Shri Saibaba Sansthan Trust- Management Committee**

**Dr. Suresh Haware**
**Chairman**

**Shri Chandrashekhar Kadam**
Vice Chairman

**Shri Bipindada Kolhe**
Member

**Adv. Mohan Jaikar**
Member

**Shri Rajendra Rajabali Sinh**
Member

**Shri Bhausaheb Wakchaure**
Member

**Dr. Manisha Kayande**
Member

**Shri Ravindra Mirlekar**
Member

**Shri Amol Kirtikar**
Member

**Smt. Yogitatai Shelke-Patil**
President, Shirdi Nagarpanchayat and Member

**Smt. Rubal Agarwal, I.A.S.**
**Chief Executive Officer**

**Dhananjay Nikam**
Deputy Collector

**Manoj Ghode Patil**
Deputy Collector

**Babasaheb Ghorpade**
Deputy Executive Officer

**Anand Bhoite**
Dy. Superintendent of Police

Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi

## Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi

This Foundation Stone of
Shri Saibaba Educational Complex
Laid By

**Shri Narendra Modi**
**Prime Minister**

On Friday, 19th October 2018

-: in the august presence of :-

| | |
|---|---|
| **Shri Ch. Vidyasagar Rao**<br>Governor, Maharashtra | **Shri Devendra Fadnavis**<br>Chief Minister, Maharashtra |

| | | |
|---|---|---|
| **Shri Subhash Bhamre**<br>Union MoS for Defence | **Smt. Pankaja Munde**<br>Minister of Rural Development Women and Child Development, Government of Mahahrashtra | **Prof. Ram Shankar Shinde**<br>Minister of water Conservation & Protocol & Guardian, Government of Mahahrashtra |
| **Shri Radhakrishna Vikhe Patil**<br>Leader of Opposition, Maharashtra Legislative Assembly | **Shri Dadaji Bhuse**<br>Minister of State for Rural Development, Government of Mahahrashtra | **Dr. Ranjit Patil**<br>Minister of State for Law & Judiciary,<br>Government of Mahahrashtra |
| **Shri Rao Saheb Danave**<br>Member of Parliament | **Shri Sadashiv Rao Lokhande**<br>Member of Parliament | **Shri Dilip Kumar Gandhi**<br>Member of Parliament |

### Shri Saibaba Sansthan Trust- Management Committee

**Dr. Suresh Haware**
**Chairman**

| | | |
|---|---|---|
| **Shri Chandrashekhar Kadam**<br>Vice Chairman | **Shri Bipindada Kolhe**<br>Member | **Adv. Mohan Jaikar**<br>Member |
| **Shri Rajendra Rajabali Sinh**<br>Member | **Shri Bhausaheb Wakchaure**<br>Member | **Dr. Manisha Kayande**<br>Member |
| **Shri Ravindra Mirlekar**<br>Member | **Shri Amol Kirtikar**<br>Member | **Smt. Yogitatai Shelke-Patil**<br>President, Shirdi Nagarpanchayat and Member |

**Smt. Rubal Agarwal, I.A.S.**
**Chief Executive Officer**

| | | | |
|---|---|---|---|
| **Dhananjay Nikam**<br>Deputy Collector | **Manoj Ghode Patil**<br>Deputy Collector | **Babasaheb Ghorpade**<br>Deputy Executive Officer | **Anand Bhoite**<br>Dy. Superintendent of Police |

Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi

## Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi

This Foundation Stone of
Sai Knowledge Park
Laid By

**Shri Narendra Modi**
**Prime Minister**

On Friday, 19th October 2018

-: in the august presence of :-

**Shri Ch. Vidyasagar Rao**
Governor, Maharashtra

**Shri Devendra Fadnavis**
Chief Minister, Maharashtra

**Shri Subhash Bhamre**
Union MoS for Defence

**Smt. Pankaja Munde**
Minister of Rural Development Women and Child Development, Government of Mahahrashtra

**Prof. Ram Shankar Shinde**
Minister of water Conservation & Protocol & Guardian, Government of Mahahrashtra

**Shri Radhakrishna Vikhe Patil**
Leader of Opposition, Maharashtra Legislative Assembly

**Shri Dadaji Bhuse**
Minister of State for Rural Development, Government of Mahahrashtra

**Dr. Ranjit Patil**
Minister of State for Law & Judiciary, Government of Mahahrashtra

**Shri Rao Saheb Danave**
Member of Parliament

**Shri Sadashiv Rao Lokhande**
Member of Parliament

**Shri Dilip Kumar Gandhi**
Member of Parliament

### Shri Saibaba Sansthan Trust- Management Committee

**Dr. Suresh Haware**
**Chairman**

**Shri Chandrashekhar Kadam**
Vice Chairman

**Shri Bipindada Kolhe**
Member

**Adv. Mohan Jaikar**
Member

**Shri Rajendra Rajabali Sinh**
Member

**Shri Bhausaheb Wakchaure**
Member

**Dr. Manisha Kayande**
Member

**Shri Ravindra Mirlekar**
Member

**Shri Amol Kirtikar**
Member

**Smt. Yogitatai Shelke-Patil**
President, Shirdi Nagarpanchayat and Member

**Smt. Rubal Agarwal, I.A.S.**
**Chief Executive Officer**

**Dhananjay Nikam**
Deputy Collector

**Manoj Ghode Patil**
Deputy Collector

**Babasaheb Ghorpade**
Deputy Executive Officer

**Anand Bhoite**
Dy. Superintendent of Police

Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi

## Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi

This Foundation Stone of
Installation of 10 MW Solar PV System Under Non-Conventional Energy Resources
Laid By

**Shri Narendra Modi**
**Prime Minister**

On Friday, 19th October 2018

-: in the august presence of :-

**Shri Ch. Vidyasagar Rao**
Governor, Maharashtra

**Shri Devendra Fadnavis**
Chief Minister, Maharashtra

**Shri Subhash Bhamre**
Union MoS for Defence

**Smt. Pankaja Munde**
Minister of Rural Development Women and Child Development, Government of Mahahrashtra

**Prof. Ram Shankar Shinde**
Minister of water Conservation & Protocol & Guardian, Government of Mahahrashtra

**Shri Radhakrishna Vikhe Patil**
Leader of Opposition, Maharashtra Legislative Assembly

**Shri Dadaji Bhuse**
Minister of State for Rural Development, Government of Mahahrashtra

**Dr. Ranjit Patil**
Minister of State for Law & Judiciary,
Government of Mahahrashtra

**Shri Rao Saheb Danave**
Member of Parliament

**Shri Sadashiv Rao Lokhande**
Member of Parliament

**Shri Dilip Kumar Gandhi**
Member of Parliament

### Shri Saibaba Sansthan Trust- Management Committee

**Dr. Suresh Haware**
**Chairman**

**Shri Chandrashekhar Kadam**
Vice Chairman

**Shri Bipindada Kolhe**
Member

**Adv. Mohan Jaikar**
Member

**Shri Rajendra Rajabali Sinh**
Member

**Shri Bhausaheb Wakchaure**
Member

**Dr. Manisha Kayande**
Member

**Shri Ravindra Mirlekar**
Member

**Shri Amol Kirtikar**
Member

**Smt. Yogitatai Shelke-Patil**
President, Shirdi Nagarpanchayat and Member

**Smt. Rubal Agarwal, I.A.S.**
**Chief Executive Officer**

**Dhananjay Nikam**
Deputy Collector

**Manoj Ghode Patil**
Deputy Collector

**Babasaheb Ghorpade**
Deputy Executive Officer

**Anand Bhoite**
Dy. Superintendent of Police

Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi

तसेच उपरोक्त प्रमाणे कोनशिला तयार करणेकामी येण्याऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)

---

**विषय नं.०८** **संस्थान परिसरामध्ये साईभक्ताचे मार्गदर्शनासाठी ए.सी.पी.शिटवर रेडियम लेटरींग मध्ये बोर्ड तयार करुन बसविणे कामाचे ठेकेदार मे.स्मिता इंडस्ट्रीज, नांदेड यांचे अंतिम देयक रक्कम रु.१७,११,२८३/- मात्र मंजूर करणेस व उर्वरीत शिल्लक देय रक्कम रु.१,८३,६८३/- मात्र आदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद-अधिनियमाचे कलम १७ मधील पोटकलम (१) मध्ये " भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देण्याची तरतुद आहे. तसेच अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये " मंदिराच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

प्रस्तावना -श्रींचे समाधी मंदिर परीसरात, दर्शन रांग, निवासस्थाने, रुग्णालये, व्दारावती भक्तनिवास, साईबाबा भक्तनिवास, साईआश्रम व इतर संस्थान परीसरामध्ये साईभक्तांचे मार्गदर्शनासाठी दिशादर्शक बोर्ड व माहितीचे विविध बोर्ड ए.सी.पी.शिटवर रेडीयम लेटरींगमध्ये तयार करुन बसविणेचे काम ठेकेदार मे.स्मिता इंडस्ट्रीज, नांदेड यांनी पुर्ण केले आहे. ठेकेदार यांनी सादर केलेल्या पहिले व अंतिम बिलाची इकडील विभागामार्फत सविस्तर तपासणी करणेत आली आहे. ठेकेदार यांना अंतिम बील अदा करणेकामी मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव तक्ता स्वरुपात खालीलप्रमाणे सादर करणेत येत आहे.

कामाचे नांव - संस्थान परीसरामध्ये साईभक्तांचे मागदर्शनासाठी ए.सी.पी.शिटवर रेडीअम लेटरींगमध्ये बोर्ड तयार करुन बसविणे.

| | | |
|---|---|---|
| ०१. | ठेकेदाराचे नांव | मे.स्मिता इंडस्ट्रीज, नांदेड |
| ०२. | मंजुर निविदा रक्कम | रु. १६,९५,२००/- |
| ०३. | मा.व्यवस्थापन समिती-निर्णय क्र. व दिनांक | नि.क्र.३२२(२८) दि.२८/०४/२०१७ |
| **०४.** | **अंतिम बीलाची रक्कम** | **रु. १७,११,२८३/-** |
| ०५. | आजपर्यंत अदा केलेली रक्कम | रु. १५,२७,६००/- |
| ०६. | उर्वरीत शिल्लक देय रक्कम | रु. १,८३,६८३/- |
| ०७. | मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | रु. १६,०८३/- (०.९४८७ %) जास्त |
| ०८. | करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | ०३ महिने – दि.३१/०८/२०१७ पर्यंत |
| ०९. | प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याचा दिनांक | दि.२८/०९/२०१७ |

विभागाचा अभिप्राय- ठेकेदार स्मिता इंडस्ट्रीज, नांदेड यांनी संस्थान परीसरात साईभक्तांचे मार्गदर्शनासाठी ए.सी.पी.शिटवर रेडीयम लेटरींगमध्ये बोर्ड तयार करुन बसविणेचे काम दि.२८/०९/२०१७ अखेर पूर्ण केले आहे. सदरचे काम २८ दिवस विलंब झाल्याने विलंबानुसार होणारी दंडाची रक्कम रु. १४,०००/- मात्र ठेकेदार यांचे बिलातून कपात करणेत येत आहे.

ठेकेदार यांनी सदर कामाचे दि.०४/११/२०१७ रोजीचे पत्रान्वये रु.१७,८७,३३७/- मात्र इतक्या रकमेचे व्हॅट व जीएसटी मधील फरकासह बील सादर केले आहे. ठेकेदार यांना प्रत्यक्ष झालेल्या कामाचे मोजमापानुसार व निविदा दरानुसार अंतिम बिलाची रक्कम रु. १६,९८,०१०/- मात्र होते. ठेकेदार यांना दि.१७/०५/२०१७ रोजी सदर कामाचा कार्यारंभ आदेश देण्यात आलेला होता. ठेकेदार यांना देण्यात आलेला कार्यादेश सर्व करांसह आहे. त्यावेळी VAT कर अंमलात होता. तदनंतर दि.०१/०७/२०१७ पासून GST लागु झालेला असल्याने निविदेतील पृष्ठ क्र.३२ अट क्र.८.३ Change in law नुसार VAT व GST मधील फरक रु. ८.२९ चौ.फुट नुसार जीएसटी पोटी रक्कम रु. ८८,०४४/- मात्र रकमेची मागणी केली आहे.

ठेकेदार यांचे सदर मागणीबाबत लेखाशाखा विभागाकडून अभिप्राय मागविणेत आला असता संस्थानचे टॅक्स सल्लागार एस.जी.अनदानी ॲण्ड कंपनी, अहमदनगर यांनी ठेकेदारमार्फत सादर केलेल्या व्हॅट व जी.एस.टी.चे कागदपत्राची तपासणी करुन Vat व GST मधील फरक १.२५ प्रती चौ. फुटानुसार रक्कम रु. १३,२७३/- मात्र देय होत असल्याचे प्रमाणित केले आहे. त्यानुसार ठेकेदार यांचे अंतिम बीलाची रक्कम रु. १७,११,२८३/- मात्र देय होते.

प्रस्ताव- तरी ठेकेदार स्मिता इंडस्ट्रीज, नांदेड यांना संस्थान परीसरामध्ये एसीपी शिटवर रेडीअम लेटरींगमध्ये बोर्ड तयार करुन बसविणे कामाचे पहिले व अंतिम देयक रु.१७,११,२८३/- (व्हॅट व जीएसटी मधील फरकासह) मात्र मंजुर होऊन उर्वरीत शिल्लक देय रक्कम रु. १,८३,६८३/- अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६४५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान परिसरामध्ये साईभक्ताचे मार्गदर्शनासाठी ए.सी.पी.शिटवर रेडियम लेटरींग मध्ये बोर्ड तयार करुन बसविणे कामी आलेल्या रक्कम रु.१७,११,२८३/- मात्र (व्हॅट व जीएसटी मधील फरकासह) मंजूर करुन त्यापैकी उर्वरीत शिल्लक देय रक्कम रु.१,८३,६८३/- स्मिता इंडस्ट्रीज, नांदेड यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली. तथापी संस्थान परीसरामध्ये एसीपी शिटवर रेडीअम लेटरींगमध्ये बसविण्यात आलेल्या बोर्डापैकी खराब झालेले व अक्षरे निघालेले बोर्डांची दुरुस्ती करुन त्यानंतर उर्वरीत शिल्लक देय रक्कम आदा करणेत यावी.** **(कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.०९** **मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे दौऱ्या निमीत्त मौजे निमगांव-कोऱ्हाळे येथील गट नं.८९ व ९० येथे उभारणेत आलेल्या मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थेचे ठिकाणी आवश्यकतेनुसार फ्लेक्स बोर्ड व माहिती फलक तयार करणेकामी आलेल्या अंदाजे रु.१७,८८९/- चे खर्चाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूद:- अधिनियम कलम २१(१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

मा.व्यवस्थापन समिती निर्णय:- दि.०५/१०/२०१८ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील नि. क्र. ६१५."…. यावर सविस्तर चर्चा होवून, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रमांकरीता निमंत्रीत करण्यात आलेल्या मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे शिर्डी येथील दौ-याचे निमित्ताने करावयाच्या कार्यक्रमाकरीता प्रांसगिक खर्चासाठी रु.२० लक्ष मात्रचे खर्चास मान्यता देणेत आलेली आहे. तसेच सदर कार्यक्रमाकरीता ऐनवेळी करावी लागणारी आवश्यक ती कामे करण्यास व त्याकामी येणा-या अंदाजे खर्चास मान्यता देण्यात आली ".

प्रस्तावना– श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे सांगता समारंभासाठी मा.पंतप्रधान, भारत सरकार उपस्थित राहिले होते. सदर कार्यक्रमासाठी मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं.८९ व ९० येथे मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थेची उभारणी करणेत येऊन कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला आहे.

सदर कार्यक्रमस्थळावर नियोजित दर्शन रांग प्रकल्प, नियोजित साईबाबा शैक्षणिक संकुल व नियोजित साईसृष्टीचे मॉडेल पहाणीसाठी ठेवणेत आले होते. सदर प्रकल्पांची थोडक्यात माहिती फ्लेक्स बॅनरवर तयार करुन कार्यस्थळी लावणेत आली होती. तसेच बैठक व्यवस्थेकरीता मा.विश्वस्त,आमदार, खासदार, निमंत्रीत, शासकीय अधिकारी, पत्रकार, नगरसेवक,महिला, पुरुष, महिला प्रसाधन गृह, पुरुष प्रसाधन गृह, मदतकेंद्र, ग्रामस्थ, व्हि.आय.पी प्रवेश अशा आशयाचे फोम शिटवर फलक तयार करणेत आले होते. सदरहू फलक आर.डी.आर्टस, शिर्डी यांचे वार्षिक मंजूर दराने तयार करुन घेणेत आलेले आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अं.क्र | पुरवठादाराचे नाव | कामाचा तपशिल | नग | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | आर.डी.आर्टस, शिर्डी | फोमशिट बोर्ड | १६७ | रु.१४,११३/- |
| ०२ | | फ्लेक्स बोर्ड – स्टार प्रिंट ८' x १0' | ०२ | रु.३,७७६/- |
| | | एकूण रक्कम रुपये | **१६९** | **रु.१७,८८९/-** |

विभागाचा अभिप्राय– उपरोक्त कामासाठी पुरवठादार आर.डी.आर्ट्स, शिर्डी यांचेकडून उपरोक्त बोर्ड वार्षिक मंजूर दराने तातडीने तयार करुन घेणेत आलेले असून त्याकामी रु.१७,७७९/- मात्र इतका खर्च आलेले आहे.

प्रस्ताव– मा. पंतप्रधान, भारत सरकार यांचे दौ-या निमीत्त मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं.८९ व ९० येथे उभारणेत आलेल्या मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थेचे ठिकाणी आवश्यकतेनुसार फ्लेक्स बोर्ड व माहिती फलक तयार करणेकामी आलेल्या अंदाजे रु.१७,८८९ /- मात्रचा खर्च माहितीस्तव व मान्यतेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.६४६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे दौऱ्या निमीत्त मौजे निमगांव-कोऱ्हाळे येथील गट नं.८९ व ९० येथे उभारणेत आलेल्या मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थेचे ठिकाणी आवश्यकतेनुसार फ्लेक्स बोर्ड व माहिती फलक तयार करणेकामी आलेल्या रक्कम रु.१७,७७९/- मात्रचे खर्चास व सदरहु रक्कम आर.डी.आर्ट्स, शिर्डी यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१०** **मौजे निमगांव-कोऱ्हाळे येथील गट नं.१९८,१९९,२०० व २०१ मधील जागेत साई नॉलेज पार्क प्रकल्प 'Design, Build, Finance, Operate & Transfer (DBFOT)'तत्वावर राबविणेकामी RFP (Request for Proposal) प्रस्तावास मान्यता देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद :-

अ) १७ कलम(समितीची कर्तव्ये व अधिकार)पोटकलम- (२) खंड (ठ)- समिती श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्यालीला व शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील;

ब) २१ समितीकडून कलम(विश्वस्त निधीचा विनियोग) -

१. पोटकलम(१) खंड(ङ) - श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे;

२. पोटकलम(१)खंड(झ)-विश्वस्तव्यवस्थेच्यामालमत्तांचा विकास करणे आणि विश्वस्तव्यवस्थेच्या प्रयोजनांसाठी स्थावर किंवा जंगम मालमत्तांचे संपादन करणे;

मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :

१. दिनांक ०७/०३/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२२२.

२. दिनांक ०४/०४/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२७१.

३. दिनांक ०१/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३५६.

प्रशासकिय मान्यता:- शासन निर्णय क्र. सासवि-१०१८/१०४७/प्र.क्र.११२/ का. १६ दि.१६/१०/२०१८ अन्वये मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं.१९८,१९९, २०० व २०१ मधिल जागेत साई नॉलेज पार्क DBFOT तत्वावर राबविणेस मान्यता देण्यात आली आहे.

प्रस्तावना:- मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं.१९८, १९९, २०० व २०१ मधिल जागेत साई नॉलेज पार्क प्रकल्प प्रस्तावित आहे. त्यासाठी प्रकल्प सल्लागार म्हणून संदीप शिक्रे ॲण्ड असोशिएटस्, मुंबई यांची इकडील दि.०९/१०/२०१७ अन्वये नियुक्ती करणेत आली आहे. सदर प्रकल्पासाठी सल्लागार यांनी दि.०९/०५/२०१८ रोजीचे पत्रान्वये प्रकल्पाचा रु.१६६.३९ कोटी मात्र रकमेचा DPR सादर केला आहे. त्यास मा. व्यवस्थापन समितीचे दि.०१/०६/२०१८ रोजीचे सभेत निर्णय क्र.३५६ अन्वये मान्यता देणेत आली आहे.

सदर मान्यतेनुसार साई नॉलज पार्क प्रकल्प "Design, Build, Finance, Operate& Transfer (DBFOT)" तत्वावर राबविणेकामी शासन मान्यता मिळणेसाठी दि.११/०६/२०१८ अन्वये प्रस्ताव करणेत आला होता. त्यास दि.१६/१०/२०१८ रोजीचे शासन आदेशान्वये मान्यता मिळालेली आहे.

सदर प्रकल्पासाठी सल्लागार संदीप शिक्रे ॲण्ड असोशिएटस्, मुंबई यांनी प्रकल्पासाठी ई-प्रस्ताव मसुदा सादर केला आहे. सदरहू मसुदा सोबत ई-मेलद्वारे पाठविण्यात आला आहे.

विभागाचा अभिप्राय:- सदरहू "Design, Build, Finance, Operate& Transfer (DBFOT)" प्रकल्पाचे Request for Proposal चे अवलोकन होवून प्रकल्पाचे सल्लागार यांचेशी चर्चा करुन अंतिम करता येईल असे मत आहे.

प्रस्ताव:- तरी मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं.१९८,१९९, २०० व २०१ मधिल जागेत साई नॉलज पार्क प्रकल्प "Design, Build, Finance, Operate& Transfer (DBFOT)" तत्वावर राबविणेकामी RFP (Request for Proposal ) प्रस्तावाचे अवलोकन होणेस तसेच निवदाकारांच्या मुल्यांकनांचे निकष निश्चित करणे इत्यादी बाबींवर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६४७** **साई नॉलेज पार्क प्रकल्प 'Design, Build, Finance, Operate & Transfer (DBFOT)'तत्वावर राबविणेकामीच्या प्रकल्पाचे सल्लागार संदीप शिक्रे ॲण्ड असोशिएटस्, मुंबई यांचे प्रतिनिधी आजचे सभेपुढे उपस्थित होते. सदस्यांनी सदरच्या प्रकल्पासंदर्भात विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे देता आली नाही. तरी साई नॉलेज पार्क प्रकल्पाचे सल्लागार संदीप शिक्रे ॲण्ड असोशिएटस्, मुंबई यांना चर्चेसाठी व्यवस्थापन समितीचे सभेसमोर बोलविण्यात यावे, असे ठरले. (कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.११** **संस्थान निधीतुन बांधण्यात आलेल्या राज्य परिवहन महामंडळाचे शिर्डी येथील सर्व्हे नं.१७१ मधील बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकाम ठेकेदार पाटील कन्सट्रक्शन ॲन्ड इन्फ्राट्रक्चर लि.पुणे यांचे अंतिम देयक रक्कम रु.६,६३,७९,९२६/-मात्र मंजुर करणेस व उर्वरीत शिल्लक देय रक्कम रु.२४,२०,७७०/- आदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद**-अधिनियमाचे कलम १७ मधील पोटकलम (१) मध्ये भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देण्याची तरतूद असल्याने महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग शासन निर्णय क्र. सासंवि २००६/६७/(८७) का. सोळा मंत्रालय, मुंबई -४०० ००३ दि. १३/०१/२००९ अन्वये शिर्डी येथील बसस्थानक अत्याधुनिक पध्दतीने बांधण्याकरीता रु. ७,६५,५०,८९८/- मात्र इतक्या खर्चास शासन मान्यता देण्यात आली आहे.

**प्रस्तावना**– शिर्डी येथील स.नं. १७१/१२ पै. मधील राज्य परिवहन महामंडळाचे जागेवर संस्थान निधीतून अद्ययावत बसस्थानक व त्यावर भक्तनिवास इमारतीचे बांधकाम करणेचे काम ठेकेदार पाटील कन्स्ट्रक्शन ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लि., पुणे यांनीदि.२८/०२/२०१७ रोजी पूर्ण केले आहे. ठेकेदर यांनी सादर केलेल्या बारावे व अंतिम बिलाची सविस्तर तपासणी इकडील विभागामार्फत व आर्किटेक्ट यांचेमार्फत करणेत आली आहे. ठेकेदार यांना अंतीम बील अदा करणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेकरीता प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

**कामाचे नांव –शिर्डी येथील स.नं. १७१/१२ पै. मधील राज्य परिवहन महामंडळाचे जागेवर संस्थान निधीतून बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकाम करणे.**

| | | |
|---|---|---|
| ०१. | ठेकेदाराचे नांव | पाटील कन्स्ट्रक्शन ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लि., पुणे |
| ०२. | मंजुर निविदा रक्कम | रु. ७,६०,९०,०८९/- |
| ०३. | ठेकेदार यांना काम बहाल करणेबाबत मा.व्यवस्थापन समिती-निर्णय क्र. व दिनांक | नि.क्र.३६२ दि.१८/०४/२०१० |
| ०४ | अंतिम बिलानुसार झालेल्या कामाची रक्कम | रु.६,०४,६५,१२५/- |
| ०५. | निविदा शर्तीनुसार ठेकेदार यांना यापूर्वी अदा करणेत आलेली भावफरक रक्कम | रु.५९,१४,८०१/- |
| **०६.** | **अंतिम बीलाची एकूण रक्कम** | **रु. ६,६३,७९,९२६/-** |
| ०७. | यापुर्वी अदा केलेली रक्कम | रु. ६,३९,५९,१५६/- |
| ०८. | उर्वरीत शिल्लक देय रक्कम | रु. २४,२०,७७०/- |
| ०९. | मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | रु. ९७,१०,१६३/- (१२.७६१४%) कमी |
| १०. | करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | १५ महिने – दि.१३/०८/२०११ पर्यंत |
| ११. | ठेकेदार यांना देण्यात आलेली प्रथम मूदतवाढ | मा. व्यवस्थापन समिती निर्णय क्र. ८१ दि. १४/०१/२०१२ अन्वये दि. ३१/०७/२०१२ पर्यंत प्रथम मूदतवाढ. |
| १२. | व्दितीय मूदतवाढ | मा. व्यवस्थापन समिती निर्णय क्र. ७४६ दि. १५/०९/२०१२ अन्वये दि. २८/०२/२०१३ पर्यंत व्दितीय मूदतवाढ. |
| १३. | तृतीय मूदतवाढ | मा. व्यवस्थापन समिती निर्णय क्र. ६१५ दि. १७/०९/२०१३ अन्वये दि. ३०/११/२०१३ पर्यंत तृतीय मूदतवाढ. |
| १४. | चतुर्थ मूदतवाढ | मा. व्यवस्थापन समिती निर्णय क्र. ८५८ दि. २७/१०/२०१३ अन्वये दि. ३१/०१/२०१४ पर्यंत चतुर्थ मूदतवाढ. |
| १५. | प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याचा दिनांक | दि.२८/०८/२०१७ |
| १६. | विलंबापोटी दंड आकारणीबाबत निविदा शर्तीमध्ये असलेली तरतूद | रु.२०,०००/- प्रती दिवस प्रमाणे निविदा रक्कमेच्या जास्तीत जास्त १०% पर्यंत. |
| १७ | निविदा शर्तीनुसार ठेकेदार यांचे बिलातून विलंबापोटी कपात करणेत आलेली दंड आकारणीची रक्कम. (मंजूर निविदा रक्कम रु.७,६०,९०,०८९/- मात्रचे १०%) | रु.७६,०९,००९/- मात्र |

**विभागाचा अभिप्राय** -ठेकेदार पाटील कन्स्ट्रक्शन ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लि., पुणे यांनी शिर्डी बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकाम दि. २८/०८/२०१७ अखेर पूर्ण केले आहे. सदरचे काम ठेकेदार यांनी दि.३१/०१/२०१४ अखेर दिलेल्या चतुर्थ मूदतवाढी नंतर ३१ महिने उशिराने पूर्ण केले आहे. त्यामूळे निविदा

शर्तीनुसार निविदा रक्कमेच्या १०% प्रमाणे होणारी रु.७६,०९,००९/- मात्र रक्कम विलंबापोटी ठेकेदार यांचे रंनिग बिलातून कपात करणेत आलेली आहे.

ठेकेदार यांना बसस्थानक इमारतीचे काम पूर्ण करणेसाठी दि. ३१/०१/२०१४ अखेर चौथी व अंतीम मूदतवाढ देण्यात आली होती. सदरचे वाढीव मुदतीत काम पूर्ण न झाल्याने ठेकेदार यांनी दि. ३१/१२/२०१४ पर्यंत मुदतवाढ मिळणेची विनंती केली होती. ठेकेदार यांचे मागणीबाबतचे प्रस्तावावर दि. २५/०९/२०१४ रोजी झालेल्या मा. त्रिसदस्य समिती सभेमध्ये निर्णय क्र. ८१५ अन्वये "सदरहु ठेकेदार यांना मुदतवाढ मिळणार नाही. दि. ३१/१२/२०१४ चे आत काम पूर्ण करुन द्यावे व दंड आकारणीचा हक्क राखून ठेवून काम पूर्ण झाल्यानंतर अंतीम बील देण्यात येईल असे लेखी कळविणेत यावे, असे ठरले." त्यानुसार ठेकेदार यांना जा.नं. ४११५/२०१४ दि. १९/०९/२०१४ रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले होते.

ठेकेदार यांनी सादर केलेल्या अंतिम बिलाची तपासणी केली असताप्रत्यक्ष झालेल्या मोजमापानुसार सदरहू अंतिम बिलाची एकूण रक्कम रु. ६,६३,७९,९२६/- मात्र इतकी होते. त्यापैकी ठेकेदार यांना यापुर्वी अदा केलेली रक्कम वजा जाता रु.२४,२०,७७०/- मात्र इतकी निव्वळ रक्कम देय होते.

प्रस्ताव– तरी ठेकेदार पाटील कन्स्ट्रक्शन ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लि., पुणे यांचे शिर्डी बसस्थानक व भक्तनिवास इमारत बांधकामाचे १२ वे व अंतिम देयक रक्कम रु.६,६३,७९,९२६/- मात्र मंजूर होऊन उर्वरीत निव्वळ देय रक्कम रु.२४,२०,७७०/- अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६४८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान निधीतुन बांधण्यात आलेल्या राज्य परिवहन महामंडळाचे शिर्डी येथील सर्व्हे नं.१७१ मधील बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे अंतिम बीलाची रक्कम रु.६,६३,७९,९२६/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच संस्थान निधीतुन बांधण्यात आलेल्या राज्य परिवहन महामंडळाचे शिर्डी येथील सर्व्हे नं.१७१ मधील बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे औपचारीक उदघाटन मान्यवरांचे हस्ते करण्यात यावे व त्यानंतर सदर कामाची उर्वरीत निव्वळ देय रक्कम रु.२४,२०,७७०/-मात्र पाटील कन्स्ट्रक्शन ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लि., पुणे यांना आदा करणेत यावी, असे ठरले. (कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१२** **शिर्डी नगरपंचायत हद्दीतील ६ रस्ते भूसंपादन (अंदाजे खर्च रु.१६३.५५ कोटी) करणेकामी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्यासाठी "जमीन खरेदी धोरण" निश्चीत करण्याबाबतचे शासन निर्णय दि.२५ जून २०१८ नुसार कार्यवाही करुन त्यानुसार सुधारीत प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद : श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था .खालील प्रमाणे तरतुद आहे (२) २१ चे कलम २००४ (शिर्डी)
क १) आणि (१) पोट कलम) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास, अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्याविवितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यापेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरता व खर्च करता येईल.

(दोन) स्थानिक नागरी सेवा सुविधा यांच्या मध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थातनच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करण्यासाठी.

मा .व्यवस्थापन समिती निर्णय : १.निर्णय क्र .६७६ दि.२००/८२०१/७.
२.निर्णय क्रमांक ७७ (ब)(७) दिनांक ०२/०२/२०१८

मा .छाननी समिती निर्णय : १. निर्णय क्र .१३ दि.३०/१०२०१/७.
२. निर्णय क्र .२५ दि.१९/०१२०१/८.
३. निर्णय क्र .२९ दि.०९/०४२०१/८.

प्रस्तावनाः- मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी दि.३०/०६/२०१६ रोजीचे पत्राने एकूण १४ रस्त्यांपैकीखालील०६ रस्ते भूसंपादनासाठीरु.१६३.५६ कोटीव विकसनासाठी रु.४३.७२ कोटी असा एकूण २०७.२८ कोटी तसेच अस्तित्वातील ०८ रस्ते विकसन खर्च रु. २२.७० कोटीअसा एकूण २२९.९८ कोटीखर्चाचा सुधारीत प्रस्ताव सादर केला होता.

०६ रस्ते भूसंपादन करणे (अंदाजे खर्च रु.१६३.५६ कोटी)-

| अ.नं . | रस्त्याचे नांव | लांबी (मी.) | रुंदी (मी.) | अस्तित्वातील रुंदी (मी.) | भूसंपादन करावयाची रुंदी (मी.) |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | विकास योजनेतील २४ मीटर रुंदवळण रस्ता (साई श्रध्दा हाउसिंग सोसायटी कॉर्नर ते सन एड सॅन हॉटेल रस्ता) | २६५० | २४ | - | २४.०० |
| ०२ | विकास योजनेतील १२ मिटर रुंदीचा हॉटेल गोराडीया समोरील रस्ता (पिंपळवाडी रस्ता ते निमगांव शिव रस्ता) | ५५० | १२ | ५५०. | ६५०. |
| ०३ | विकास योजनेतील १५ मीटर रुंदीचा बिरेगांव रस्ता (नविन पिंपळवाडी रस्ता - वराह चौक ते कालिकानगर-१५ मीटर व पुढे बिरोबा मंदिरापर्यंत वहिवाटीप्रमाणे) | ५०० | १५ | १० | ५.०० |
| ०४ | विकास योजनेतील १५ मीटर रुंदीचा रस्ता (जैन मंदिरालगत नगर-मनमाड ते १८ मीटर वळण रस्ता) | ३२० | १५ | - | १५.०० |
| ०५ | नगर-मनमाड ते १८ मीटर वळण रस्ता ) | १००० | १५ | १० | ५.०० |
| ०६ | विकास योजनेतील १५ मीटर रुंदीचा जुना पिंपळवाडी रस्ता (पुष्पांतजली हॉटेल चौक ते पिंपळवाडी शिव हद्दीपर्यंत) | ३०० | १५ | -- | १५.०० |
| | एकूण लांबी | ५३२० | | | |

सदरहु प्रस्तावावर मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.६७६ खालीलप्रमाणे झाला आहे.

"...त्याचप्रमाणे प्रस्तावातील क तक्त्यामध्येनमूद केलेले ०६ रस्ते भुसंपादन करून विकसीत करणेकामी बराचसा कालावधी लागणार असल्यामुळे, प्रथमत: सदरहु रस्ते भुसंपादन करणेकामी आवश्यक असणारा निधी संस्थानमार्फत उपलब्ध करून देण्यात यावा व भुसंपादन प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर ते रस्ते विकसीत करणेसाठीच्या निधीचा प्रस्ताव समितीसमोर सादर करणेत यावा. यासाठी अधिनियमातील तरतूदीनुसार छाननी समितीच्या पुर्वपरवानगीने, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा...."

याकामी मा. छाननी समितीचे दि.१९/०१/२०१८ रोजीचे सभेतील नि.क्र.२५ अन्वये ठरलेनुसार दि.२०/०१/२०१८ रोजी मा.छाननी समिती अध्यक्ष यांनी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मा. उपजिल्हाधिकारी, संस्थानचे कार्यकारी अभियंता तसेच शिर्डी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी व अभियंते यांचेसमवेत वरील रस्त्यांची पहाणी केली आहे. दरम्यान मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत यांनी दि.२१/०२/२०१८ रोजीचे पत्रान्वये ०६ रस्ते भूसंपादन करणेकामी येणारा संभाव्य मोबदला खर्च रु.१६३,५५,२६,२१०/-ऐवजी रु.१८७.०३ कोटी असुन सदर रक्कम मा. उपविभागीय अधिकारी शिर्डी भाग शिर्डी यांचेकडे जमा करणेस विनंती केली.

त्यानुसार सुधारीत भूसंपादन खर्चानुसार रु.२३,४७,७३,७९०/- इतक्या वाढीव खर्चास मा. व्यवस्थापन समिती व मा. छाननीसमितीची मान्यता घेणेबाबतची कार्यवाही मालमत्ता विभागामार्फत करणेबाबत सादर केलेल्या इकडील दि.०६/०३/२०१८ रोजीचे प्रस्तावावर खालीलप्रमाणे निर्देशित करण्यात आले आहे.

" अंदाजित कींमतचा प्रस्ताव already छाननी समिती पर्यत गेलेला आहे. आता शासनाची तत्वत: मंजुरीनंतर वाढीवचा प्रस्ताव करू."

मा. छाननी समितीचे दि.०९/०४/२०१८ रोजीचे सभेतील नि.क्र.२९ खालीलप्रमाणे झाला आहे.

"..छाननी समितीने असे सुचविले की, वरील ६ रस्त्यांचे भुसंपादनाबद्दल संबंधीत जमिनमालकांशी चर्चा करून जर आपसात रक्कम ठरत असेल तर संस्थानच्या अर्थिक हिताच्या दृष्टीने त्या लोकांशी आपसात तडजोड करून चर्चा करून, जमिनीची किंमत/मावेजा भूसंपादनाची प्रक्रिया न करता दिल्यास समर्पक राहील. याबाबत विशेष बाब म्हणून शासनाची मान्यता घेवूनच कार्यवाही करता येईल. नगरपंचायतीतर्फे रु.१६३.५५ कोटि एवढी रक्कम भूसंपादनास लागेल, अशी मागणी आहे. हि रक्कम सध्या तरी अंदाजे दिसते. प्रत्यक्ष मोजमाप, रेडिरेकनर प्रमाणे किंमत,अतिक्रमणे हटविणे यांचा विचार होवून शासन मान्यतेनंतरच भूसंपादनाच्या निर्णयास मुर्त रुप देण्यात यावे. तसेच समितीचे असे मत झाले कि, तडजोडीची बोलणी छाननी समिती व संस्थानचे संबंधित अधिकारी यांचे समक्ष शासन मान्यतेनंतर करावी. विकसनाचा खर्च सध्या विचारात घेण्यात आलेला नाही. भूसंपादनाची प्रक्रिया झाल्यानंतर विकसनाबाबत प्रस्ताव पुन्हा व्यवस्थापन समिती सभेसमोर ठेवून त्यांचे मान्यतेनंतर छाननी समिती सभेसमोर सादर करण्यात यावा..."

त्यानुसार सदर रस्ते भूसंपादन खर्चरु.१६३.५५ कोटीबाबत मा. व्यवस्थापन समिती व छाननी समितीचे निर्णयानुसार पुढील आदेश होणेकामी दि.१२/०५/२०१८ अन्वये शासनाचे विधी व न्याय विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला असता शासनाचे दि. ०४/०७/२०१८ रोजीच्या पत्राने खालीलप्रमाणे कळविणेत आले आहे.

"...शिर्डी शहरातील सार्वजनिक सोयीसुविधांचा विस्तार करण्याच्या दृष्टीने व ज्यांचा साईभक्तांना प्रामुख्याने उपयोग होईल,अशी विकासकामे हाती घेवून पूर्ण करण्यासाठी नगरपंचायतीला मदत करणे या योजनेअंतर्गत प्रस्तावीत केलेल्या ६ रस्त्यांची जमीन खेरदीसाठी जमीन मालकांशी खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खेरदीपद्धतीने जमिनी करण्यासाठी या विभागाच्या दि.२५/०६/२०१८ रोजीच्याशासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या जमीन धोरणाच्या अनुषंगाने कार्यवाही करून त्यानुसार सुधारीत प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात यावा."

विभागाचा अभिप्राय- संस्थानचे मालमत्ता विभागाचे जा. क्र. एसएसएसटी/मालमत्ता/३८२४/२०१७ दि. १७/१०/२०१७ अन्वये शासनाचे विधी व न्याय विभागाकडून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेसाठी विविध कारणांसाठी आरक्षीत असलेल्या जमीनी तसेच आरक्षीत जमीनी व्यतिरक्त इतर जमीनी खरेदी करण्यासाठी कोणते निकष असावेत याबाबत मागविलेले मार्गदर्शनाचे अनुषंगाने शासन निर्णय क्र. सासंवि१०१७/१८४४ /प्र.क्र.२०१ का.१६ दि.२५/०६/२०१८ मध्ये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकरीता खाजगी जमीन खरेदी करण्यासाठी जमीनींचे क्षेत्रफळ, अंतर, जमीनीची सलगता, भूधारकांची संमती, मुल्यांकन, खरेदीची कार्यपद्धती इत्यादी बाबीचा सर्वंकष विचार करून शासनाने खाजगी जमीन खरेदी करण्यासाठी धोरण निश्चित केले आहे. या शासन निर्णयामध्ये शिर्डी नगरपंचायतीसाठी करावयाचे कामांसाठी संस्थाननिधीतून खाजगी जमीन खरेदी व विकसनासाठी/ विकसन काम पुर्ण झाल्यानंतर शिर्डी नगरपंचायतीकडे जमिन हस्तांतरीत करणेबाबत तरतुद दिसुन येत नाही. त्यामुळे उपरोक्त दि.२५/०६/२०१८ मध्ये नमूद केलेनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्याकरीता खाजगी जमीन खरेदी करणेचे कार्यपद्धतीनुसार अथवा पुर्वीचे प्रचलित कार्यपद्धतीनुसार शिर्डी नगरपंचायतीमार्फत रस्त्यांसाठी भूसंपादन करणेबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे.

प्रस्ताव:- तरी उपरोक्त प्रस्तावाबाबत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६४९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी नगरपंचायत हद्दीतील ६ रस्ते भूसंपादन (अंदाजे खर्च रु.१६३.५५ कोटी) करणेकामी भुसंपादन कायद्यानुसार प्रक्रिया करणेत यावी, तसेच सदर जमीनीचे भूसंपादन संस्थानसाठी होणारे नसून नगर पंचायतीसाठी होणार आहे. त्यामुळे त्यासाठी दि. २५/०६/२०१८ च्या शासन निर्णयाव्दारे विहित करण्यात आलेले जमीन खरेदी धोरण सदर प्रस्तावास लागू होणार नाही, असे अभिप्राय छाननी समितीच्या मान्यतेने शासनास सादर करावे, असे ठरले. तसेच प्रस्तावातील अ.नं.४ विकास योजनेतील १५ मिटर रुंदीच्या रस्ता (जैन मंदिरालगत नगर-मनमाड ते १८ मीटर वळण रस्ता) या प्रस्तावीत रस्त्याच्या उत्तर व दक्षिण बाजुस अंदाजे ५०० मिटर अंतरावर दोन रस्ते अस्तित्वात आहेत. त्यामुळे या रस्त्याची आवश्यकता नाही. तसेच हा रस्ता लोकवस्तीमधुन जात असल्याने स्थानिक लोक त्यामुळे विस्थापीत होणार आहे. सदर रस्त्याकरीता जागा व घरांसाठीचा मोबदला यासाठी भुसंपादनाची रक्कम मोठया प्रमाणात द्यावी लागणार असल्याने, या रस्त्यासाठी निधी देण्यात येऊ नये, असे ठरले.**

**तसेच याकामी छाननी समितीची शिफारस घेऊन, प्रस्ताव शासनास सादर करणेत यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१३** **शिर्डी शहरातील प्रथम प्राधान्य गटातील रस्त्यांपैकी रस्ता क्र.०५ चे उर्वरीत डांबरीकरण व इतर अनुषंगीक कामे करणे कामाचे ठेकेदार मे.एस.के.येवले अ‍ॅन्ड कं. संगमनेर यांचे अंतिम बील रक्कम रु.१,४९,३९,७८३/- मंजुर करुन आदा करणेस मान्यता देणे.**

**प्रस्ताव-** शिर्डी शहरातील प्रथम प्राधान्य गटातील रस्त्यांपैकी रस्ता क्र.०५ चे उर्वरीत डांबरीकरण व इतर अनुषंगिक कामे ठेकेदार मे. एस. के. येवले अ‍ॅन्ड कं, संगमनेर यांनी पूर्ण केले असून ठेकेदार यांनी सादर केलेल्या दुसरे व अंतिम बिलाची सविस्तर तपासणी करणेत आली आहे. ठेकेदार यांना सदरचे बिल अदा करणेस मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळणेकामी खालीलप्रमाणे तक्त्याचे स्वरुपात सादर करण्यात येत आहे.

कामाचे नांव- शिर्डी शहरातील प्रथम प्राधान्य गटातील रस्त्यांपैकी रस्ता क्र.०५ चे उर्वरीत डांबरीकरण व इतर अनुषंगिक कामे करणे.

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | मे. एस. के. येवले ॲन्ड कं,संगमनेर |
| कार्यादेश क्रमांक व दिनांक | जा.क्र.एसएसएसटी/बांधकाम /५२७३/२०१७ दि.०१/०१/२०१८ |
| मंजूर निविदा रक्कम | रू.१,४८,४६,२८७,०००/- |
| मा.व्यवस्थापन समिती निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र.१०५१ (१०) दि.०८/१२/२०१७ |
| अंतिम बिलाची रक्कम | रु.१,४९,३९,७८३/- |
| आजपर्यंत अदा केलेली रक्कम | रु.७४,५८,४४०/- |
| उर्वरीत शिल्लक देय्य रक्कम | रु.७४,८१,३४३/- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | रु.९३,४९६/- (जास्त) |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | दि.०७/०७/२०१८ |
| प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याचा दिनांक | दि.०७/०७/२०१८ |

ठेकेदार मे. एस.के.येवले ॲन्ड कं, संगमनेर यांनी दि.०७/०७/२०१८ अखेर सदरचे काम पूर्ण केलेले आहे. सदरचे कामात वापरलेले खडी, डांबर, कॉक्रीट या मटेरियलची सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत असलेली जिल्हा प्रयोगशाळा, अहमदनगर व पेव्हींग ब्लॉकची संजीवनी अभियांत्रिकी महाविद्यालय, कोपरगाव यांचेकडून तपासणी करुन घेण्यात आली आहे. अहवाल मापदंडानुसार आहे. ठेकेदार यांनी दि. २६/०७/२०१८ रोजीचे पत्रान्वये रु.१,४९,४२,७८७/-मात्र इतक्या रकमेचे बील सादर केले आहे. ठेकेदार यांना प्रत्यक्ष झालेल्या कामाचे मोजमापानुसार अंतिम बिलापोटी एकूण रक्कम रु.१,४९,३९,७८३/- मात्र इतकी रक्कम देय आहे.

तरी ठेकेदार मे. एस. के. येवले ॲन्ड कं, संगमनेर यांचे कामाचे झालेले अंतिम बील रक्कम रु.१,४९,३९,७८३/- मात्रचे मान्यता मिळणेस तसेच या रकमेतुन यापुर्वी अदा केलेली रक्कम वजा जाता उर्वरीत रक्कम रु.७४,८१,३४३/- मात्र अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६५०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी शहरातील प्रथम प्राधान्य गटातील रस्त्यांपैकी रस्ता क्र.०५ चे उर्वरीत डांबरीकरण व इतर अनुषंगीक कामे करणेसाठी आलेल्या रक्कम रु.१,४९,३९,७८३/- मात्रचे खर्चास व उर्वरीत रक्कम रु.७४,८१,३४३/- मात्र ठेकेदार मे. एस. के. येवले ॲन्ड कं, संगमनेर यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१४** **नियोजीत शैक्षणिक संकुल बांधकामासाठी तयार करणेत आलेल्या ई-निविदा मसुद्यास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद- अधिनियमाच्या कलम १७ मधील पोट कलम (१) च्या खंड (ढ) अन्वये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना दईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच, शिर्डी येथे व अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील, अशी तरतूद आहे.

मा. व्यवस्थापन समिती निर्णय-

१) मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९५५

२) मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२/०२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७८

३) मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४४५

४) मा.व्यवस्थापन समिततीचे दि.०५/१०/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय

प्रस्तावना- श्री साईबाबा संस्थान संचलित श्री साईबाबा इंग्लिश मेडीअम स्कुल, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय या शैक्षणिक संस्थांकरीता एकत्रित शैक्षणिक संकूलाचे बांधकाम मौजे निमगांव-को-हाळे येथील संस्थान मालकीचे गट नं.१८३ मधील ५ हेक्टर ४० आर जागेत उभारणे प्रस्तावीत आहे.

मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचे शासन निर्णय क्र.सासंवि/१०१८/९६९/ प्र.क्र.११०/ का.१६ दि.०८/१०/२०१८ अन्वये सदरहू प्रकल्पास व याकामी येणा-या रु.१५८.७४कोटी इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ई-निविदा प्रकियेअंतर्गत निविदा प्रसिध्दी, निविदा लिफाफे उघडणे आणि निविदा तपासणी व स्विकृती याबाबत दि.१२ एप्रिल २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारीत सुचना निर्गमीत करण्यात आल्या आहेत. त्यानुसार रस्ते व इमारतीच्या कामासाठी यापुढे केंद्रशासनाने प्रसिध्द केलेले

स्टॅंडर्ड बिडींग डॉक्यूमेंट (SBD) वर आधारीत बाब निहाय (Item Rates) दर असलेल्या निविदा मागविण्यात याव्यात. तसेच पुलांच्या व विशिष्ट स्वरुपाच्या कामासाठी " C " स्वरुपाच्या Lump sum निविदा मसुद्याचा वापर करावा असे नमुद केले आहे.

सदरहू कामी आर्किटेक्ट डी.ओ.निकम, पुणे यांनी "C" स्वरुपाच्या (Lump sum) ई-निविदा मसुदा तयार केला आहे. सदरहू मसुदा सोबत मान्यतेसाठी ई-मेलव्दारे पाठविण्यात आला आहे.

**प्रस्ताव-** तरी श्री साईबाबा संस्थान संचलित शैक्षणिक संकूलाचे बांधकामासाठी तयार करण्यात आलेल्या ई निविदा मसुद्यावर चर्चा होऊन अटीवशर्ती, पुर्व पात्रतेच्या अटी, निविदेतील बाबींचे स्पेसीफिकेशन, मटेरीयलचे ब्रॅंड इ.निश्चित करणेकामी निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.६५१ **नियोजीत शैक्षणिक संकुल बांधकामासाठीचे आर्किटेक्ट डी.ओ.निकम, पुणे हे आजचे सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. त्यांचेशी नियोजीत शैक्षणिक संकुल बांधकामासाठीचे "C" स्वरुपाच्या (Lump sum) ई-निविदाबाबत समिती सदस्यांनी सविस्तर चर्चा केली. तसेच विचारलेल्या पश्नांना समर्पक उत्तरे दिली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान संचलित शैक्षणिक संकूलाचे बांधकामासाठी तयार करण्यात आलेल्या ई निविदेतील अटी व शर्ती, पुर्व पात्रतेच्या अटी, निविदेतील बाबींचे स्पेसीफिकेशन, मटेरीयलचे ब्रॅंड इत्यादी बाबी निश्चित करुन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

विषय नं.१५ **साई आश्रम भक्तनिवास येथील टेन्साईल फॅब्रीक शेड उभारणे कामाचे ठेकेदार मे.सुभाष कन्सट्रक्शन कंपनी, डोंबीवली यांचे २ रे व अंतिम देयक रु.१,०२,७७,४६८/- मात्र मंजूर करणेस व उर्वरीत शिल्लक देय रु.१३,९७,३२७/- मात्र आदा करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** साई आश्रम भक्तनिवास परिसरात कायम स्वरुपी टेन्साईल फॅब्रीक शेड उभारणेचे काम ठेकेदार मे.सुभाष कन्सट्रक्शन कंपनी, डोंबीवली यांनी पूर्ण केले असून, ठेकेदार यांनी सादर केलेले २ रे व अंतीम बीलाची सविस्तर तपासणी करणेत आलेली आहे. ठेकेदार यांना अंतीम बील अदा करणेसाठी मा.व्यवस्थापन समितीची मान्याता मिळणेसाठी खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

कामाचे नाव – साई आश्रम भक्तनिवास येथे टेन्साईल फॅब्रीक शेड उभारणे.

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नाव | मे. सुभाष कन्सट्रक्शन कंपनी, डोंबीवली. |
| कार्यादेश क्रमांक व दिनांक | जा.क्र.एसएसएसटी/बांधकाम/६२६८/२०१८ दि.२१/०२/२०१८. |
| मंजूर निविदा रक्कम | रु.१,०३,३५,०२६/- |
| मा.व्यवस्थापन समितीचा निर्णय व दिनांक | निर्णय क्र.८३१ (७), दि.२५/०९/२०१७. |
| २ रे व अंतीम बिलानुसार झालेल्या कामाची किंमत | रु.१,०२,७७,४६८/- |
| आजपर्यंत अदा केलेली रक्कम | रु.८८,८०,१४१/- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | रु.५७,५५८/- कमी (०.५५६९२१ % कमी). |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | तीन महिने. (दि.२१/०२/१८ ते दि.२१/०५/२०१८) |
| प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याची दिनांक | दि.२०/०५/२०१८. |

ठेकेदार मे.सुभाष कन्सट्रक्शन कंपनी, डोंबीवली यांनी दि.२०/०५/२०१८ अखेर सदरचे काम पूर्ण केलेले असून त्याबाबत काम पूर्णत्वाचा दाखला ठेकेदार यांना देणेत आलेला आहे. तसेच ठेकेदार यांनी सदर प्रकल्पाचे माहे मार्च २०१८ ते मे २०१८ अखेर भविष्य निर्वाह निधी संबधीत कागदपत्रांची पूर्तता केलेली आहे. सदर कामासाठी वापरलेल्या मटेरिअलची तपासणी व्हिजीलन्स अॅन्ड क्वॉलिटी कंट्रोल सर्कल (पी.डब्ल्यू.डी), नाशिक भाग व संजीवनी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, कोपरगाव येथे करण्यात आलेल्या आहेत. तसेच स्ट्रक्चरल स्टिलचे ड्रॉईंग प्रमाणे मोजमापे साईटवर प्रत्यक्ष घेणेत आलेले आहेत. विहीत मानकांनुसार प्राप्त झालेले निष्कर्ष योग्य आहेत.

ठेकेदार यांनी दि.०४ जुलै, २०१८ रोजीच्या पत्रान्वये निव्वळ रु.१४,४८,८०८/- मात्र इतक्या रकमेचे दुसरे व अंतीम देयक सादर केले आहे. ठेकेदार यांना प्रत्यक्ष झालेल्या कामाचे मोजमापानुसार अंतीम बिलापोटी

एकूण रक्कम रु.१,०२,७७,४६८/- मात्र इतकी रक्कम देय होत असून त्यामधून प्रथम आर.ए.बीलाची रक्कम रु.८८,८०,१४१/- वजा करुन निव्वळ रक्कम रु.१३,९७,३२७/- देय होत आहे.

तरी ठेकेदार मे.सुभाष कन्सट्रक्शन कंपनी, डोंबीवली यांना साईआश्रम भक्तनिवास येथे टेन्साईल फॅब्रीक शेड उभारणे कामाचे २ रे व अंतिम देयक एकूण रक्कम रु.१,०२,७७,४६८/- मात्र मंजूर करणेस व उर्वरीत शिल्लक देय रक्कम रु.१३,९७,३२७/-मात्र अदा करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.६५२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साई आश्रम भक्तनिवास येथील टेन्साईल फॅब्रीक शेड उभारणे कामी आलेल्या रक्कम रु.१,०२,७७,४६८/- मात्र खर्चास व उर्वरीत शिल्लक देय रक्कम रु.१३,९७,३२७/-मात्र ठेकेदार मे.सुभाष कन्सट्रक्शन कंपनी, डोंबीवली यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१६** **मे.के.आर.आर.इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.हैद्राबाद यांचे विरुध्द सिव्हील दावा दाखल करणेकामी येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधिल तरतुद:- अधिनियमाचे कलम २१(१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतुद आहे. त्यातिल पोटकलम (छ) अन्वये कोणत्याही न्यायालयाचा किंवा न्यायाधिकरणाचा किंवा कोणत्याही प्राधिकरणाचा कोणत्याही न्याय निर्णय, हुकुमनामा किंवा निवाडा याची पुर्ती करण्यासाठी आवश्यक असतील अशा कोणत्याही रक्कमांचे प्रदान करणे अशी तरतूद आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:- मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय संमत झाला आहे.

"मे.के.आर.आर.इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.हैद्राबाद यांचे व कंपनीचे संचालकांविरोधात मे.विव्हील जज्ज, सिनियर डिव्हीजन यांचे कोर्टात संस्थान वकीलांमार्फत दावा दाखल करणेत यावा व याकामी समिती सदस्य मा.ॲड.श्री.मोहन जयकर साहेब यांचे मार्गदर्शन घेणेत यावे असे ठरले तसेच सदर दाव्याची प्रोसेस फी रु.१०,०००/- व स्टॅम्प डयुटीसाठी रु.३,००,०००/- याप्रमाणे वकील फी साठी येणारे अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली."

प्रस्तावना:- मौजे निमगांव को-हाळे येथील संस्थान मालकीचे गट नं.१९८,१९९, २०० व २०१ मध्ये साईगार्डन प्रकल्प उभारणे कामाचे ठेकेदार मे.के.आर.आर.इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.हैद्राबाद यांचे विरुध्द दावा दाखल करणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१८ रोजीचे सभेत ठेकेदार मे.के.आर.आर.इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.हैद्राबाद यांचे विरोधात कोर्टात दावा दाखल करणेस मान्यता देण्यात आली आहे.

याबाबत विधी विभाग यांनी त्यांचे दि.०२/०३/२०१८ रोजीचे पत्राने संस्थान वकील ॲड.एस.डी.कुलकर्णी यांचेमार्फत दावा दाखल करण्याची पुढील कार्यवाही करण्यात यावी असे बांधकाम विभागास कळविले. त्यानुसार इकडील विभागामार्फत ॲड.एस.डी.कुलकर्णी यांचेकडून दाव्याचा मसुदा तयार करुन घेण्यात आला आहे.

प्रस्ताव:- मे.के.आर.आर.इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.हैद्राबाद यांचे विरुध्द सिव्हील दावा दाखल करणेकामी ॲड.एस.डी.कुलकर्णी यांनी दाव्याची रक्कम व वकील फी भरणेबाबत दि.१८/०७/२०१८ रोजीच्या पत्राने कळविले आहे. बांधकाम विभागाचे दि.३१/०७/२०१८ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये दावा दाखल करणेसाठी वकीलपत्र देणे व दाव्याची प्रोसेस फी, स्टॅम्प डयुटी इ.जमा करणेची कार्यवाही विधी विभागामार्फत करणेस तसेच या प्रकरणांच्या फाईल्स त्यांचेकडे वर्ग करणेस मान्यता घेण्यात आलेली होती. तथापी, विधी विभागामार्फत सदरहू टिपणी व पत्र स्विकारले नाही. उलट टपाली विधी विभागाअंतर्गत टिपणी सादर करुन त्यावर मान्यता घेऊन पुनश्च सदरचे प्रकरण बांधकाम विभागाकडे वर्ग करणेत आले आहे.

मे.के.आर.आर.इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.हैद्राबाद यांचे विरुध्द सिव्हील दावा दाखल करणेकामी बांधकाम विभागामार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करता येईल.

१. ॲड.एस.डी.कुलकर्णी यांना तांत्रिक माहीती पुरविणे व दाव्याचा मसुदा अंतिम करुन घेणे.

२. मा.न्यायालयात दावा दाखल करणेसाठी ॲडव्होकेट यांना लागणारी कागदपत्रे व माहीती देणे.

३. मा.न्यायालयात दावा दाखल झालेनंतर तारखेला उपस्थित रहाणे व तांत्रिक माहीती पुरविणे.

**तसेच विधी विभागामार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे .**

१. अॅड.एस.डी.कुलकर्णी यांना वकीलपत्र देणे

२. अॅड.एस.डी.कुलकर्णी यांनी सदरहू दाव्यासाठी रु.२० लक्ष मात्र फी कळविली असून, त्यांना देय एकूण फीची रक्कम ठरविणे व फी आदा करणेची कार्यवाही करणे.

३. अॅडव्होकेट यांनी तयार केलेल्या दाव्याचा मसुदा तपासून त्यास मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांची मान्यता घेणे व कोर्ट फी स्टॅम्प रु.३ लक्ष जमा करणे बाबत कार्यवाही करणे.

तरी मे.के.आर.आर.इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.हैद्राबाद यांचे विरुध्द व या कंपनीचे संचालकांविरुध्द मा.न्यायालयामध्ये सिव्हील दावा दाखल करणे बाबत बांधकाम विभाग व विधी विभागामार्फत वरील प्रमाणे कार्यवाही करणेस व याकामी येणारे दाव्याची प्रोसेस फी, स्टॅम्प डयुटी व वकील फी चे खर्चास मान्यता मिळणेस निर्णयार्थ सादर .

**निर्णय क्र.६५३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.के.आर.आर.इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.हैद्राबाद यांचे विरुध्द सिव्हील दावा दाखल करणेकामी मा.सदस्य अॅड मोहन जयकर यांनी अॅड.एस.डी.कुलकणी यांचेशी दाव्याचे फी बाबत चर्चा करुन अहवाल सादर करावा, असे ठरले. (कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१७** **मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे दि.१९.१०.२०१८ रोजीचे नियोजित कार्यक्रम व श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप निमंत्रण पत्रिका छपाईकामी प्रत्यक्ष आलेल्या खर्चाबाबत.**

**प्रस्ताव-** १) अधिनियमाचे कलम १७ मधील पोटकलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीनराहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालववायाचा आहे. ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे,ही समितीची कर्तव्य असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधीलपोट कलम १ (ग) अन्वये,भक्तांनादेवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवाकोणतेही धार्मिककार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय–

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०५.१०.२०१८ रोचीचे सभेतील निर्णय क्र.५८३.

श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रमाच्या १०,००० निमंत्रण पत्रिका छापणेकामी दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास , तसेच आवश्यकतेनुसार जादा निमंत्रण पत्रिका छपाई करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०५.१०.२०१८ रोचीचे सभेतील निर्णय क्र.६१३.

१. श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रमाच्या २५,००० निमंत्रण पत्रिका छापणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात यावी.

२. विशेष निमंत्रीतांसाठी वेगळया पत्रिका छापणेत याव्या.

३. शिर्डीमधील सर्व ग्रामस्थांना व पंचक्रोशीतील प्रमुख व्यक्तींना निमंत्रण पत्रिका देण्यात याव्या

प्रस्तावना- मा.पंतप्रधान भारत सरकार यांचे दि.१९.१०.२०१८ रोजीचे नियोजित कार्यक्रम व श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप पत्रिका छपाईकामी नामांकीत प्रेसधारकांकडुन सिलबंद दरपत्रके मागविणेत आले होते. याकामी ४ सिलबंद दरपत्रके प्राप्त झाले. सदरचे प्राप्त सिलबंद दरपत्रक मा. उपजिल्हाधिकारी यांचे समक्ष उघडण्यात येऊन, दरपत्रकातील निम्नतम प्रेसधारक प्रवरा ऑफसेट लोणी यांचा निमंत्रण पत्रिका छपाईकामी रु.४.८५ असा निम्नतम दर आलेला असल्याने त्यांना ५००० नग तातडीने छपाई करुन देणेबाबत दुरध्वनीवरुन कळविण्यात आले. त्याप्रमाणे त्यांनी निमंत्रण पत्रिका छपाई करुन पुरवठा केला आहे. सदर निमंत्रण पत्रिका छपाईकामी रु.२४,२५०/- इतका प्रत्यक्ष खर्च आलेला आहे.

प्रस्ताव– तरी मा. पंतप्रधान भारत सरकार यांचे दि.१९.१०.२०१८ रोजीचे नियोजित कार्यक्रम व श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप पत्रिका छपाईकामी आलेल्या प्रत्यक्ष रु.२४,२५० मात्र खर्च आलेला असुन सदरचा खर्च माहितीसाठी व मान्यतेसाठी प्रस्ताव सादर.

**निर्णय क्र.६५४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे दि.१९.१०.२०१८ रोजीचे नियोजित कार्यक्रम व श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप निमंत्रण पत्रिका छपाईकामी आलेल्या रक्कम रु.२४,२५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- शताब्दी कक्ष प्रमुख)**

---

**विषय नं.१८** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव सांगता निमित्त मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे दि.१९.१०.२०१८ रोजीचे कार्यक्रमासाठी मौजे निमगाव-को-हाळे येथील शेती महामंडळाच्या मालकीच्या तात्पुरत्या कालावधीसाठी अधिग्रहीत केलेल्या क्षेत्राचे वापरमुल्य रु.५,२७,०००/- इतक्या प्रत्यक्ष झालेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ट) मध्ये विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील,अशी तरतूद आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय –

१) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१६/०६/२०१७ निर्णय क्रं.४६३

२) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०५/१०/२०१८ निर्णय क्रं.६१५

प्रस्तावना– मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६/०६/२०१७ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्रं.४६३ प्रमाणे समाधी शताब्दी महोत्सवाचे नियोजनासाठी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाकडील किती जमीनीची आवश्यकता आहे,याची माहीती घ्यावी. कुंभमेळयाच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची जमीन कमीत कमी दराने आवश्यक दिवसांसाठीच भाडेतत्वावर/अधिग्रहीत करणेत यावी. तसेच समाधी शताब्दी महोत्सवामध्ये साईभक्तांना सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी प्रथमत: संस्थान मालकीच्या जमीनीचा वापर करणेत यावा,असा निर्णय झालेला आहे.

तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५/१०/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.६१५ प्रमाणे श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रमाकरीता निमंत्रित करण्यात आलेल्या मा.पंतप्रधान,भारत सरकार यांचे शिर्डी येथील दौ-याचे निमित्ताने करावयाच्या कार्यक्रमाचे नियोजनासाठी उपरोक्त तपशिलात नमूद केल्याप्रमाणे संबंधीत विभागाने करावयाचे कामास व त्यासाठी येणा-या अंदाजे रक्कम रु.२,४५,३०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. सदर कार्यक्रमाकरीता ऐनवेळी करावी लागणारी आवश्यक ती कामे करण्यास व त्याकामी येणा-या अंदाजे खर्चास मान्यता देण्यात आली, असा निर्णय झालेला आहे.

सदर निर्णयाचे संबंधीत प्रस्तावामध्ये महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ व श्री.तुकाराम शंकर गोंदकर आणि श्री.गणपत गोंदकर यांची जमीन अधिग्रहण करणे व जमीनीचे भाडे अदा करणेसाठी होणारा अंदाजित खर्च (दि.०४/१०/२०१८ ते दि.१९/१०/२०१८ या कालावधीकरीता) रक्कम रु.२० लाख इतकी दर्शविलेली आहे.

संस्थानचे बांधकाम विभागाने त्यांचेकडील दि.०२/१०/२०१८ रोजीच्या पत्रान्वये खालील नमूद केलेले क्षेत्र त्यासमोर दर्शविलेल्या कालावधीसाठी व प्रयोजनासाठी अधिग्रहीत करुन मिळणेकामी मालमत्ता विभागास कळविलेले आहे.

| अनं | गाव | गट नं./ सर्वे नं. | आवश्यक असलेले क्षेत्र | कालावधी | ठिकाण | जागा मालक | जागा वापराचे प्रयोजन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | निमगाव को-हाळे | ८४/२, ८५,८६ ८९,९०/२, १७४,१७५ ९७,९८, ९९ | २१ हेक्टर ०८ आर (५२ एकर २८ गुंठे) | दि.१०/१०/२०१८ ते दि.१९/१०/२०१८ या १० दिवसांचे कालावधीकरीता. | साई प्रसादालयाचे पश्चिम बाजूस शेती महामंडळाची जागा. | महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, लक्ष्मीवाडी मळा | श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव सांगता निमित्त होणारे गर्दीचे कालावधीत ईभक्तांकरीता वाहन तळे,निवारा शेड व इतर अनुषंगिक व्यवस्थेकरीता. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | साकुरी | ३५६/२ पै.३५६/३ पै. | ०२ हेक्टर (०५ एकर) | दि.१०/१०/२०१८ ते दि.१९/१०/२०१८ या १० दिवसांचे कालावधीकरीता. | नगर-मनमाड रोडचे पूर्व बाजूस कृषी उत्पन्न बाजार समितीचे लगत | श्रीमती कल्याणी रविश्री कंदुला | श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव सांगता निमित्त होणारे गर्दीचे कालावधीत साईभक्तांकरीता वाहन तळे,निवारा शेड व इतर अनुषंगिक व्यवस्थेकरीता. |

संस्थानचे बांधकाम विभागाकडील उपरोक्त पत्राचे अनुषंगाने उक्त क्षेत्र अधिग्रहण करुन मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तहसिलदार, राहाता यांचेकडेस इकडील पत्र क्रं.एसएसएसटी/ मालमत्ता/ ३३२३/ २०१८ दि.०८/१०/२०१८ अन्वये सादर करणेत आला. त्यास अनुसरुन तहसिलदार,राहाता यांनी त्यांचेकडील आदेश क्रं.कावि/जमीन/ १४४७/२०१८ दि.१०/१०/२०१८ अन्वये मौजे

निमगाव-को-हाळे येथील महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ,लक्ष्मीवाडी मळा यांचे मालकीचे गट नं.८४/२,८५,८६,८९,९०/२,१७४, १७५,९७,९८,९९ चे एकूण क्षेत्र २१.०८ आर (५२ एकर २८ गुंठे) इतके प्रति एकर प्रति दिन रक्कम रु.१,०००/- प्रमाणे वापरमुल्य शेती महामंडळास अदा करणेचे व श्रीमती कल्याणी रविश्री कंदुला यांचे मालकीचे मौजे साकुरी येथील गट नं.३५६/२ पै. ३५६/३ पै. एकूण ५ एकर क्षेत्र विनामुल्य वापरणेचे दि.१०/१०/२०१८ ते दि.१९/१०/२०१८ या दहा दिवसांचे कालावधीसाठी अधिग्रहीत करणेचे आदेश पारित केलेले आहेत.

सदर आदेशाच्या अनुषंगाने उक्त क्षेत्राचा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे वतीने बांधकाम विभागाचे ज्युनि.इंजिनियर श्री.स्वप्नील गायकवाड यांनी दि.१०/१०/२०१८ रोजी ताबा घेतला असून संस्थानने सदर क्षेत्राचा वापर मा.पंतप्रधान,भारत सरकार यांचे दि.१९/१०/२०१८ रोजीच्या कार्यक्रमासाठी केलेला आहे.

उक्त अधिग्रहण आदेशाप्रमाणे महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ,लक्ष्मीवाडी मळा तर्फे स्थावर व्यवस्थापक श्री.सुरेश दगडू अभंग यांचेबरोबर संस्थानचे वतीने प्रशासकीय अधिकारी डॉ.आकाश रामहरी किसवे यांनी दि.१०/१०/२०१८ रोजी समजुतीचा करारनामा केलेला आहे.

सदर क्षेत्र अधिग्रहणाची मुदत दि.१९/१०/२०१८ रोजी संपलेली असलेने मा.स्थावर व्यवस्थापक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,लक्ष्मीवाडी मळा यांनी त्यांचेकडील जा.नं.लक्ष्मी/प्रशा/ जमीन/वापरमुल्य/१८-१९/२९० दि.२२/१०/२०१८ अन्वये उपरोक्त अधिग्रहीत क्षेत्र ५२ एकर २८ गुंठे या क्षेत्राचे दि.१०/१०/२०१८ ते दि.१९/१०/२०१८ या १० दिवसांचे प्रति एकर प्रति दिन रु.१,०००/- प्रमाणे रक्कम रु.५,२७,०००/- इतके वापरमुल्य शेती महामंडळास मिळणेस विनंती केली असून सदरची रक्कम शेती महामंडळाचे सेंट्रल बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी येथील चालू खाते क्रं.००१५८८७६४१२९ आयएफएससी कोड सीबीआयएन-०२८१०३५ येथे जमा करणेकामी विनंती केलेली आहे.

विभागाचा अभिप्राय– मा.तहसिलदार,राहाता यांचेकडील दि.१०/१०/२०१८ रोजीच्या अधिग्रहीत आदेशान्वये महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, लक्ष्मीवाडी मळा यांचे मालकीचे मौजे निमगाव-को-हाळे येथील एकूण क्षेत्र ५२ एकर २८ गुंठे हे दि.१०/१०/२०१८ ते दि.१९/१०/२०१८ या १० दिवसांचे कालावधीसाठी श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव सांगता निमित्त मा.पंतप्रधान,भारत सरकार यांचे दि.१९/१०/२०१८ रोजीचे कार्यक्रमासाठी वापरण्यात आलेले आहे. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५/१०/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.६१५ चे संबंधातील प्रस्तावात उक्त क्षेत्र अधिग्रहण करुन वापरासाठी येणा-या अंदाजित रक्कम रु.२० लाख इतक्या खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. यास्तव उक्त अधिग्रहीत आदेशात नमूद केलेप्रमाणे उक्त जमीनीचे वापरमुल्य प्रति एकर प्रति दिन रक्कम रु.१,०००/- प्रमाणे क्षेत्र ५२ एकर २८ गुंठे या क्षेत्राचे एकूण वापरमुल्य रक्कम रु.५,२७,०००/- इतके महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ,लक्ष्मीवाडी मळा यांना अदा करता येईल.

प्रस्ताव– मा.पंतप्रधान,भारत सरकार यांचे दि.१९/१०/२०१८ चे श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव सांगता समारोप कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,लक्ष्मीवाडी मळा यांचे मालकीचे अधिग्रहीत केलेली मौजे निमगाव-को-हाळे येथील जमीन ५२ एकर २८ गुंठे चे भाडे रक्कम रु.५,२७,०००/- या प्रत्यक्ष झालेल्या खर्चास मान्यता मिळणेस व सदरचा खर्च अदा करणेस मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव सादर.

**निर्णय क्र.६५५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव सांगता निमित्त मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे दि.१९.१०.२०१८ रोजीचे कार्यक्रमासाठी मौजे निमगाव-कोऱ्हाळे येथील शेती महामंडळाच्या मालकीच्या तात्पुरत्या कालावधीसाठी अधिग्रहीत केलेल्या ५२ एकर २८ गुंठे क्षेत्राचे वापरमुल्य रक्कम रु.५,२७,०००/-मात्रचे खर्चास व सदरहु रक्कम महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,लक्ष्मीवाडी यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक,मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.१९** **प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडिया, मुंबई यांना भाडेपट्टयाने देणेत आलेल्या जागेस मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही,विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना- प्रसार भारती (भारतीय प्रसारण निगम) आकाशवाणी तथा दुरदर्शन मुंबई यांनी दि.२१/०४/२००३ रोजीचे पत्रान्वये शिर्डी येथे दुरदर्शन लघु प्रसारण केंद्र उभारणेसाठी संस्थानकडे मासिक भाडे तत्वावर २६६.२८ चौमी.मोकळी जागा व ११४.३२ चौमी बांधीव जागा अशी एकुण ३८०.६० चौमी जागा मिळणेस विनंती केलेली होती. सदर प्रस्तावाबाबत मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.११/०५/२००३ रोजीचे सभेत ठराव क्र.२०७ अन्वये मा.धर्मादाय आयुक्त,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांची पुर्व मान्यता घेवून जागा भाडे तत्वावर देण्यात यावी ठरले आहे. सदर ठरावास अनुसरुन दि.०९/०६/२००३ रोजीचे पत्रान्वये मा.धर्मादाय आयुक्त,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया यांना संस्थानची जागा भाडे तत्वावर देणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. मा.धर्मादाय आयुक्त,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दि.१०/०७/२००३ रोजीचे आदेशाने प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांना Low Power T.V.Center शिर्डी येथे उभारणेसाठी संस्थानचे अर्जात नमुद केलेप्रमाणे जागा भाडयाने देणेस परवानगी दिलेली आहे.

प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया,यांनी दि.०६/०८/२००३ रोजीचे पत्राने (१) पी.डब्ल्यु.डी.यांचेकडून निश्चित झालेले भाडे देण्यात येईल, (२) कमीत कमी १५ वर्षासाठी जागा दयावी लागेल, (३) करारनामा ३ वर्ष किंवा ५ वर्षासाठी करण्यात यावा त्यानंतर नुतनीकरण करण्यात यावे असा राहील, असे इकडील कार्यालयास कळविलेले आहे. प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, यांचे उपरोक्त पत्राबाबत मा. व्यवस्थापन मंडळाचे दि.०५/१०/२००३ रोजीचे सभेत विषय सादर करुन निर्णय क्र.४७३ अन्वये प्रसार भारती यांना १५ वर्षासाठी जागा भाडयाने देणेबाबतचा प्रस्ताव मंजुर झालेला आहे. त्यानुसार प्रसार भारती यांना दि.२२/०८/२००६ पासून स.नं.१४८ धर्मशाळा सध्या साईनाथ रुग्णालय येथील २६६.२८ चौमी. मोकळी जागा व ११४.३२ चौमी. बांधीव जागा अशी एकुण ३८०.६० चौमी.संस्थानची जागा व रुम वापरास देण्यात आलेली आहे.

यापुर्वी ठरावाप्रमाणे १५ वर्षासाठी (३-३ वर्षाचे टप्प्याने) लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर जागा दिली आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियमातील कलम १७(३) च्या तरतुदीप्रमाणे फक्त १ वर्ष कालावधीसाठी संस्थान मिळकत Lease वर देता येते. त्याप्रमाणे यापूर्वी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१८३ प्रमाणे दि.२१/०८/२०१६ ते दि.२०/०७/२०१७ या ११ महीन्यांचे कालावधीकरीता मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदरची मुदत दि.२०/०७/२०१७ रोजी संपुष्टात आली असल्याने प्रसार भारती,भारतीय प्रसारण निगम,लघु प्रक्षेपण केंद्र,शिर्डी यांनी दि.१५/०७/२०१७ रोजीचे पत्रान्वये पुढील कालावधी दि.२१/०७/२०१७ ते दि.२०/०६/२०१८ या ११ महीने कालावधीकरीता मुदतवाढ मिळणेकामी विनंती केली होती.

संस्थानचे मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.११/०५/२००३ व दि. ०५/१०/२००३ चे सभेतील निर्णयानुसार जागेचे भाडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रमाणपत्रानुसार घेणेचे ठरलेले आहे व प्रत्येक ३ वर्षाने सदर मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन खालीलप्रमाणे आकारणी करण्यात आलेली आहे.

१) पहिल्या टप्प्यातील ३ वर्षाचे दि.२१/०८/२००३ ते दि.२०/०८/२००६ अखेर रुपये ३३२५/- मासिक भाडे प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांनी संस्थानला दिलेले आहे.

२) दुस-या टप्प्यातील तीन वर्षाचे दि.२१/०८/२००६ ते दि.२०/०८/२००९ अखेर रु.३३२५/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.३६५७-५० मासिक भाडे प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांनी संस्थानला दिलेले आहे.

३) तिस-या टप्प्यातील तीन वर्षाचे दि.२१/०८/२००९ ते दि.२०/०८/२०१२ अखेर रु.३६५७-५० मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.४०२४/- मासिक भाडे प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांनी संस्थानला दिलेले आहे.

४) चौथ्या टप्प्यातील तीन वर्षाचे दि.२१/०८/२०१२ ते दि.२०/०८/२०१५ अखेर रु.४०२४/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.४४२७/- मासिक भाडे प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांनी संस्थानला दिलेले आहे.

५) पाचव्या टप्प्यातील तीन वर्षाचे कालावधीसाठी दि.२१/०८/२०१५ ते दि.२०/०८/२०१८ अखेर रु.४४२७/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.४८७०/- मासिक भाडे आकारुन प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया,मुंबई यांना पुढील दि.२१/०७/२०१७ ते दि.२०/०६/२०१८ या ११ महीन्यांचे कालावधीकरीता मुदतवाढ देण्याकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०९/२०१७ रोजीच्या सभेपूढे निर्णयार्थ सादर करणेत आलेला आहे. त्यात निर्णय क्रं.८१९ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"प्रसार भारती ब्रॉडकास्टीग कॉर्पोरेशन ऑफ इंडीया,मुंबई यांना दि.२१/०७/२०१७ ते २०/०६/२०१८ या ११ महिन्यांचे

कालावधीसाठी मासिक परवाना फी रु.४,८७०/- मात्र व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन शासनाचे विधी व न्याय विभागाचे पूर्वपरवानगीने लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर मुदतवाढ देणेस व त्यांचेबरोबर कायदेशीर करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात आली."

त्याप्रमाणे प्रस्तुतचा प्रस्ताव मान्यतेसाठी इकडील जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/४३४५/२०१७ दि.२०/११/२०१७ अन्वये

मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई यांचेकडेस सादर करणेत आलेला आहे. त्यास अनुसरुन त्यास अनुसरुन मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.सासंवि-१०१७/१९६८/ प्र.क्र.२२७/का.१६ दि.०१/०१/२०१८ अन्वये "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम १७(३) अन्वये एक वर्षापेक्षा कमी कालावधीसाठी संस्थानची स्थावर मालमत्ता भाडेतत्वाने देण्याचे अधिकार समितीस असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी शासनाच्या मान्यतेची आवश्यकता नाही. तथापि पुढील भाडेकरार करण्यापूर्वी सदर जागेचे भाडे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्रमाणित करुन घेवून त्यानुसार भाडयाचा दर निश्चित करण्यात यावा" असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

त्यास अनुसरुन प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कॉर्पोरेशन ऑफ इंडीया,मुंबई यांना भाडेपट्टयाने देण्यात आलेली जागा सन २००३ पासून एक- एक वर्षाच्या मुदतीने लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर वापरास दिलेली आहे. सदर वापरास दिलेली जागा जरी ११-११ महीन्याच्या कराराने वापरास दिली तरी त्याचा वापराचा कालावधी हा सलग एक वर्षापेक्षा जास्त होत असल्याची इकडील धारणा झाली असल्याने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) च्या अनुषंगाने प्रस्तुतचे प्रकरण शासनाचे विधी व न्याय विभागाकडे,प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कॉर्पोरेशन ऑफ इंडीया,मुंबई यांना संस्थान मालकीची शिर्डी येथील जमीन सर्वे नं.१४८ मधील ११४.३२ चौमी.बांधीव व २६६.२८ चौमी मोकळी जागा लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर दि.२१/०७/२०१७ ते दि.२०/०६/२०१८ या ११ महीन्यांचे कालावधीसाठी मासिक परवाना फी रु.४,८७०/- मात्र व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन वापरास देणेकामी मान्यता मिळणेसाठीचा प्रस्ताव इकडील जा.क्रं.एसएसएसटी/ मालमत्ता/५७५८/२०१८ दि.२७/०१/२०१८ अन्वये फेरसादर करणेत आलेले आहे. त्याबाबत शासनाकडून आदेश प्राप्त झालेले नाहीत.

सदरची प्रस्तावित लिव्ह ॲण्ड लायसन्स कराराची मुदत दि.२०/०६/२०१८ रोजी संपुष्टात आलेली असलेने मा.सहायक अभियंता,भारतीय प्रसारण निगम,लघु प्रक्षेपण केंद्र,शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र संख्या/लप्रकें/दुरदर्शन/शिर्डी/१४ दि.१२/०९/२०१८ अन्वये "प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कॉर्पोरेशन ऑफ इंडीया,मुंबई यांना संस्थान मालकीचे शिर्डी येथील सर्वे नं.१४८ मधील लघु प्रक्षेपण केंद्रासाठी मागील १५ वर्षांसाठी दरवर्षी लिव्ह ॲण्ड लायसन्स कराराने प्रत्येक तीन वर्षाने १०% भाडयात वाढ करुन जागा वापरास

दिलेली आहे. सदर १५ वर्षांची व ११ महिन्यांची लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनाम्याची मुदत दि.२०/०६/२०१८ रोजी संपलेली आहे. तरी यापूर्वीप्रमाणेच १५ वर्षे मुदतीसाठी दर ३ वर्षांनी १०% भाडेवाढ करुन दर ११ महिन्यांच्या लिव्ह ॲण्ड लायसन्स करारावर व विद्युत बील वेगळे आकारुन GST सह मासिक भाडे आकारुन दि.२१/०६/२०१८ ते दि.२०/०५/२०१९ या ११ महिन्यांच्या कालावधीसाठी मुदतवाढ मिळणेस विनंती आहे," असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

यापूर्वी इकडील उपरोक्त दि.२७/०१/२०१८ अन्वये शासनास फेरसादर करणेत आलेल्या प्रस्तावासंबंधात शासनाकडून आदेश प्राप्त झालेले नाहीत. तथापि त्यापूर्वी शासनाकडील उपरोक्त दि.०१/०१/२०१८ रोजीच्या पत्रान्वये "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम १७(३) अन्वये एक वर्षापेक्षा कमी कालावधीसाठी संस्थानची स्थावर मालमत्ता भाडेतत्वाने देण्याचे अधिकार समितीस असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी शासनाच्या मान्यतेची आवश्यकता नाही. तथापि पुढील भाडेकरार करण्यापूर्वी सदर जागेचे भाडे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्रमाणित करुन घेवून त्यानुसार भाडयाचा दर निश्चित करण्यात यावा" असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

विभागाचा अभिप्राय– यापूर्वीचे मुदतवाढी संदर्भात शासनाकडेस फेरसादर केलेल्या दि.२७/०१/२०१८ रोजीच्या प्रस्तावावर शासनाकडून प्राप्त होणा-या आदेशास अधीन राहून शासनाकडून यापूर्वी प्राप्त झालेल्या उपरोक्त दि.०१/०१/२०१८ रोजीच्या पत्राचे अनुषंगाने प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कॉर्पोरेशन ऑफ इंडीया,मुंबई यांना संस्थान मालकीची मौजे शिर्डी येथील जमीन सर्वे नं.१४८ मधील ११४.३२ चौमी.बांधीव व २६६.२८ चौमी. मोकळी जागा लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर दि.२१/०६/२०१८ ते दि.२०/०५/२०१९ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चित करील त्या भाडेदराने अथवा मागील मासिक भाडे दर रक्कम रु.४,८७०/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रक्कम रु.५,३५७/- इतके यापैकी जे जास्त असेल ते भाडे निश्चित करुन व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन पूर्वीप्रमाणेच सदर निश्चित केलेल्या भाडेदरामध्ये पुढील १५ वर्षापर्यंत दर ३ टर्मनंतर १०% भाडेवाढ करणेच्या अटीवर लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेता येईल.

प्रस्ताव– प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कॉर्पोरेशन ऑफ इंडीया,मुंबई यांना संस्थान मालकीची शिर्डी येथील जमीन सर्वे नं.१४८ मधील ११४.३२ चौमी.बांधीव व २६६.२८ चौमी. मोकळी जागा शासनाकडेस यापूर्वीच्या मुदतवाढी संदर्भात पाठविलेल्या फेरप्रस्तावाचे अनुषंगाने प्राप्त होणा-या आदेशास अधीन राहून लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर दि.२१/०६/२०१८ ते दि.२०/०५/२०१९ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चित करील त्या भाडेदराने अथवा मागील मासिक भाडे दर रक्कम रु.४,८७०/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रक्कम रु.५,३५७/- इतके यापैकी जे जास्त असेल ते भाडे निश्चित करुन व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन पूर्वीप्रमाणेच सदर निश्चित केलेल्या भाडेदरामध्ये पुढील १५ वर्षापर्यंत दर ३ टर्मनंतर १०% भाडेवाढ करणेच्या अटीवर लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेणेच्या निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.६५६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडिया, मुंबई यांना भाडेपट्टयाने देणेत आलेल्या जागेस लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर दि.२१/०६/२०१८ ते दि.२०/०५/२०१९ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी मागील मासिक भाडे दर रक्कम रु.४,८७०/- मध्ये १०% वाढ करुन व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- प्र.अधिक्षक,मालमत्ता विभाग)**

---

विषय नं.२० **श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप, सोसायटी लि.शिर्डी यांना चालविणेस दिलेल्या १४ कियॉस्क / गाळे यांचे मुदतवाढ व भाडे निश्चीतीबाबत.**

प्रस्ताव- अधिनियमातील तरतूद- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना- श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.१४/११/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.९२८ अन्वये संस्थान परिसरात एकूण १४ ठिकाणी खालीलप्रमाणे संस्थानच्या मालकीचे जागेत विविध प्रयोजनार्थ कियॉस्क/गाळे भाडेकरारावर दिलेले आहे.

त्यानंतर वेळोवेळी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना जागा वापरास मुदतवाढ देणेत आलेली आहे.

| अ.नं. | ठिकाण | कियॉस्क संख्या |
|---|---|---|
| १ | साईआश्रम भाग-१ परिसर | ०४ |
| २ | साईआश्रम भाग-२ परिसर | ०१ |
| ३ | साईप्रसादालय परिसर | ०१ |
| ४ | द्वारावती निवासस्थान परिसर | ०२ |
| ५ | साईउद्यान परिसर | ०२ |
| ६ | साईप्रसाद निवासस्थान परिसर | ०१ |
| ७ | साईबाबा भक्तनिवासस्थान परिसर | ०३ |
| | एकूण | १४ |

उक्त सोसायटीस वापरास दिलेल्या जागेची मुदत दि.०६/१२/२०१६ रोजी संपुष्टात आल्याने सदर उक्त सोसायटीस वापराची पुढील मुदत दि.०७/१२/२०१६ ते दि.०६/११/२०१७ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी प्रति कियॉस्कचे मागील मासिक भाडे रु.३,६३०/- मध्ये १०% वाढ करुन (रु.३,६३०/- +१०% रक्कम रु.३६३/- = रु.३,९९३/-) रु.३,९९३/- (अक्षरी रक्कम रु.तीन हजार नऊशे त्र्याण्णव मात्र) व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन तसेच दि.०७/११/२०१७ ते दि.०६/१०/२०१८ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी मागील मासिक भाडे रु.३,९९३/- मध्ये १०% वाढ करुन (रु.३,९९३/- +१०% रक्कम रु.३९९/-= रु.४,३९२/-) रु.४,३९२/- (अक्षरी रक्कम रु.चार हजार तीनशे ब्याण्णव मात्र) व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन पूर्वीचेच अटी व शर्तीवर मुदतवाढ देणेबाबतचा व त्याप्रमाणे करारनामा करुन घेणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२/०५/२०१८ रोजीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्रं.३०९ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना चालविण्यास दिलेल्या कियॉस्क/गाळे यांचे मुदतवाढ व भाडे आकारणीबाबत प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे ११ महिन्यांचे कालावधीसाठी मागील मासिक भाडे रु.३,९९३/- मध्ये १०% वाढ करुन (रु.३,९९३/- +१०% रक्कम रु.३९९/-= रु.४,३९२/-) रु.४,३९२/- (अक्षरी रक्कम रु.चार हजार तीनशे ब्याण्णव मात्र) व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन पूर्वीचेच अटी व शर्तीवर मुदतवाढ देणेत यावी" असे ठरले.

उपरोक्त निर्णयाप्रमाणे उपरोक्त कालावधी साठीचे करारनामे दि.११/०७/२०१८ रोजी नोटराईज करुन घेणेत आलेले आहेत.

सदर करारनाम्यानुसार उपरोक्त १४ कियॉस्क वापराची मुदत दि.०६/१०/२०१८ रोजी संपुष्टात येत असल्याने पुढील ११ महिन्यांसाठीची मुदत वाढवून मिळणेकामी मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांनी त्यांचेकडील जा.नं.श्रीसासंएक्रेसो/८२/२०१८ दि.०५/०७/२०१८ व जा.नं.श्रीसासंएक्रेसा/१४२/२०१८ दि.१२/०९/२०१८ अन्वये इकडेस विनंती केलेली असून त्यात त्यांनी "संस्थेस साईभक्तांच्या सेवेसाठी व सोयीसाठी संस्थानचे साईआश्रम भाग१ परिसरात-४, साईआश्रम भाग २ परिसरात-१, साईप्रसादालय परिसरात-१, द्वारावती निवासस्थान परिसरात-२, साईबाबा भक्तनिवासस्थान परिसरात -३, साईउद्यान परिसरात-२ व साईप्रसाद निवासस्थान परिसरात-१ असे एकूण १४ कियॉस्क/गाळे दिले असून सदर कियॉस्क/गाळे यांची मुदत दि.०६/१०/२०१८ रोजी पूर्ण होत असल्याने संस्थेमार्फत सदर कियॉस्क/गाळे चालविण्यास पुढील ११ महिन्यांची मुदतवाढ मिळणेबाबत संदर्भीय प्रस्ताव आपणाकडे सादर केला आहे. परंतु साईप्रसाद इमारत परिसरात नवीन इमारतीचे बांधकाम सुरु होत असल्याचे समजले असून त्यासाठी सदर परिसरात असलेल्या कियॉस्क/स्टॉल चालविण्यास सध्या मुदतवाढ देण्यात यावी. इमारतीचे कामाचे वेळेस सदर स्टॉल साईभक्तांचे सेवेसाठी संस्थानचे नियमानुसार संस्थेच्या स्वखर्चाने स्थलांतरीत करणेत येईल. तरी संस्थेस वरील १४ कियॉस्क/स्टॉल पुढील ११ महिने कालावधीकरीता चालविण्यास मुदतवाढ मिळावी,ही विनंती " असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील उपरोक्त विनंतीच्या अनुषंगाने उक्त सोसायटीस संस्थान मालकीची उपरोक्त १४ ठिकाणचे जागेतील कियॉस्क वापरासाठीची पुढील

दि.०७/१०/२०१८ ते दि.०६/०९/२०१९ या ११ महिन्यांच्या कालावधीसाठी प्रति कियॉस्क मागील मासिक भाडे रु.४,३९२/- मध्ये १०% वाढ करुन (रु.४,३९२/- +१०% रक्कम रु.४३९/-= रु.४,८३१/-) रु.४,८३१/- (अक्षरी रक्कम रु.चार हजार आठशे एकतीस मात्र) इतकी व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन पूर्वीचेच अटी व शर्तीवर मुदतवाढ देता येईल व त्याप्रमाणे करारनामा नोटराईज करुन घेता येईल.

प्रस्ताव– श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि. शिर्डी यांना चालविणेस दिलेल्या उपरोक्त ठिकाणच्या १४ कियॉस्क/गाळे वापराची पुढील मुदत दि.०७/१०/२०१८ ते दि.०६/०९/२०१९ या ११ महिन्यांच्या कालावधीसाठी प्रति कियॉस्क मागील मासिक भाडे रु.४,३९२/- मध्ये १०% वाढ करुन (रु.४,३९२/- +१०% रक्कम रु.४३९/-= रु.४,८३१/-) रु.४,८३१/- (अक्षरी रक्कम रु.चार हजार आठशे एकतीस मात्र) इतकी व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन पूर्वीचेच अटी व शर्तीवर मुदतवाढ देणेच्या व त्याप्रमाणे करारनामा नोटराईज करुन घेणेच्या निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.६५७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप, सोसायटी लि.शिर्डी यांना चालविणेस दिलेल्या १४ कियॉस्क/गाळे वापरासाठी दि.०७/१०/२०१८ ते दि.०६/०९/२०१९ या ११ महिन्यांच्या कालावधीसाठी प्रति कियॉस्क मागील मासिक भाडे रु.४,३९२/- मध्ये १०% वाढ करुन (रु.४,३९२/- +१०% रक्कम रु.४३९/-= रु.४,८३१/-) रु.४,८३१/- (अक्षरी रक्कम रु.चार हजार आठशे एकतीस मात्र) इतकी व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन पूर्वीचेच अटी व शर्तीवर मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक,मालमत्ता विभाग)**

---

विषय नं.२१ **मा.पंतप्रधान भारत सरकार यांचे दि.१९.१०.२०१८ रोजीचे शिर्डी भेटीनिमीत्त शेती महामंडळ मैदान, निमगाव येथे तसेच हेलीपॅड व इतर ठिकाणी भाडेतत्वावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेबाबत तसेच याकामी झालेला रक्कम रु.४९,५०० /-मात्र खर्च माहितीस्तव व मान्यतेस्तव सादर करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्ताचे काम किंवा उपयायोजना हाती घेणे. मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.–दि.०५/१०/२०१८ रोजीचा मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.३, निर्णय क्र. ६१५.

प्रस्तावना– उपरोक्त संदर्भ क्र. १ चे दि.०५/१०/२०१८ मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.३, निर्णय क्र.६१५ अन्वये “श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रमाकरीता निमंत्रीत करण्यात आलेल्या मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे शिर्डी येथील दौ-याचे निमीत्ताने करावयाच्या कार्यक्रमाचे नियोजनासाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे संबंधीत विभागांनी करावयाचे कामास व त्यासाठी येणा-या अंदाजे रक्कम रु.२,४५,३०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. सदर कार्यक्रमाकरीता ऐनवेळी करावी लागणारी आवश्यक ती कामे करण्यास व त्याकामी येणा-या अंदाजे खर्चास मान्यता देण्यात आली” उपरोक्त मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयास अनुसरुन, प्रस्तावातील नमुद तपशीलातील अ.नं.६(३) मध्ये नमुद केलेनुसार सुरक्षेसाठी सीसीटीव्ही यंत्रणा बसविणेकामी होणा-या अंदाजे रक्कम रु.६०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार, मा. पंतप्रधान महोदय, भारत सरकार यांची मुख्य सभा शेतकी महामंडळ मैदान, निमगाव येथे होणार असल्याने तेथे तसेच हेलिपॅड व इतर ठिकाणी सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेबाबत शिर्डी पोलिस स्टेशन, शिर्डी व उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, शिर्डी यानी दि.०३/१०/२०१८ व दि.०५/१०/२०१८ रोजीचे पत्रान्वये कळविलेले होते. त्यास अनसुरुन, मा. पंतप्रधान महोदय, भारत सरकार यांचे सभेच्या ठिकाणी तातडीने भाडेतत्वावर सिसिटीव्ही कॅमेरे बसविणेबाबत संस्थानचे www.sai.org.in या अधिकृत संकेतस्थळावर दि.०८/१०/२०१८ ते दि.१३/१०/२०१८ या कालावधीत जाहिरात प्रसिद्ध करुन विविध पुरवठा धारकांकडुन कोटेशन मागविणेत आलेले असुन प्राप्त कोटेशन मा. उपजिल्हाधिकारी यांचे समक्ष उघडुन त्यातील निम्नत्तम पुरवठाधारक श्री मंदार मुळे, अहमदनगर यांना याकामी जा.नं.एसएसएस/सीसीटीव्हीसेल/३५४२/२०१८, दि.१५/१०/२०१८ अन्वये कार्यादेश देणेत येवुन त्यांचेमार्फत शिर्डी पोलीस उप अधिक्षक, संस्थान पोलीस उप अधिक्षक यांनी सुचविलेनुसार सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेत आलेले असुन सदरकामी रक्कम रु.४९,५००/- मात्र (सर्व करांसहीत) इतका झालेला खर्च माहितीस्तव व मान्यतेस्तव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल.

विभागाचा अभिप्राय– उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयास अनुसरुन, प्रस्तावनेत नमुद केलेप्रमाणे मा.प्रंतप्रधान, भारत सरकार यांचे दि.१९/१०/२०१८ रोजीचे शिर्डी भेटीनिमीत्त शेतकी महामंडळ

मैदान, निमगाव येथे तसेच हेलीपॅड व इतर ठिकाणी भाडेतत्वावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेकामी संस्थानचे **www.sai.org.in** या अधिकृत संकेतस्थळावर दि.०८/१०/२०१८ ते दि.१३/१०/२०१८ या कालावधीत जाहिरात प्रसिद्ध करुन निम्नत्तम पुरवठाधारक श्री मंदार मुळे, अहमदनगर यांना याकामी दि.१५/१०/२०१८ अन्वये कार्यादेश देणेत येवुन त्यांचेमार्फत शिर्डी पोलीस उप अधिक्षक, संस्थान पोलीस उप अधिक्षक यांनी सुचविले नुसार सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेत आलेले असुन सदरकामी रक्कम रु.४९,५००/- मात्र (सर्व करांसहीत) इतका झालेला खर्च माहितीस्तव व मान्यतेस्तव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करत आहे.

विभागाचा प्रस्ताव– उपरोक्त विभागाचे अभिप्रायात नमुद केलेनुसार पोलिस विभागाचे मागणीनुसार विषयांकीत प्रकरणी भाडेतत्वावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेकामी रक्कम रु.४९,५००/- मात्र (सर्व करांसहीत) इतका झालेला खर्च माहितीस्तव व मान्यतेस्तव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.६५८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.पंतप्रधान भारत सरकार यांचे दि.१९.१०.२०१८ रोजीचे शिर्डी भेटीनिमीत्त शेती महामंडळ मैदान, निमगाव येथे तसेच हेलीपॅड व इतर ठिकाणी भाडेतत्वावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे कामी आलेल्या रक्कम रु. ४९,५००/- मात्र (सर्व करांसहीत) खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेलप्रमुख)**

---

**विषय नं.२२** **उशिरा पुरवठा केलेल्या ५ नग LED TVची दंडाचे रकमेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद – सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र. १४ मधील ३५६(घ) साईभक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्ताचे काम किंवा उपयायोजना हाती घेणे.

मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.–

१) दि.२५/०२/२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.४१, निर्णय क्र. ४१.

२) दि.२५/०७/२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.०३, निर्णय क्र. ५२४(८).

प्रस्तावना– संस्थान परिसरात श्रीं चे लाईव्ह दर्शन सुलभतेने होणेकरीता संस्थानचे विविध ठिकाणी आवश्यकतेप्रमाणे वेगवेगळया साईजचे एकुण २३३ नग LED TV खरेदीकरीता व खराब झालेले CRT TV व LED/LCD/PLAZMA टिव्ही बायबॅक करणे करणेकामी येणारे खर्चास व निम्नतमदरधारक R.D.Data Systems, Nasik यांना पुरवठा आदेश देण्यास दि.२५/०२/२०१७ व दि.२५/०७/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यास अनुसरुन, सदरकामी दि.०५/०८/२०१८ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. सदर पुरवठा आदेशास अनुसरुन त्यांनी एकुण २३३ नग LED TV पुरवठा केलेले आहे. तसेच R.D.Data Systems, Nasik यांनी पुरवठा केलेल्या LED TV साठी त्यांचेशी दि.१८/०४/२०१८ रोजी करारनामा करण्यात आलेला आहे. नविन LED TV खरेदीचे एकुण रक्कम रु.२,५१,७७,७०५/- मात्र मधुन बायबॅक टिव्हीची रक्कम रु.६,२३,५००/- मात्र वजा करुन नविन LED TV खरेदीची राहीलेली रक्कम रु.२,४५,५४,२०५/- मात्र इतकी होत आहे.

तथापी, R.D.Data Systems, Nasik यांना दि.०५/०८/२०१७ रोजीचे देण्यात आलेल्या पुरवठा आदेशात अ.नं. ४ मध्ये "Supply of the Item should be done within four weeks from the date of placement of the purchase order" असे नमुद केलेले आहे. सदर अटीस अनुसरुन, R.D.Data Systems, Nasik एकुण २२८ टिव्ही मुदतीत पुरवठा केलेले आहेत. परंतु, सदर पुरवठा आदेशातील ०५ टिव्ही हे त्यांनी कार्यादेश दिल्याचे चार आठवडयानंतर म्हणजे दि.०२ डिसेंबर २०१७ रोजी १२ आठवडे उशीराने पुरवठा केलेले आहे. सदरचे उशीरा पुरवठा केलेल्या टिव्हीचा तपशील खालीलप्रमाणे –

| Sr. No | Description of Goods | Qty | Rate | per | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1. | LED TV, Screen Size 98" Model No-98LS95A | 1 | 13,30,078.13 | No | 13,30,078.13 |
| 2. | LED TV, Screen Size 86" Model No-86UH5C | 1 | 4,34,492.19 | No | 4,34,492.19 |
| 3. | LED TV, Screen Size 75" Model No-75UM3C | 3 | 7,84,746.09 | No | 7,84,746.09 |
| | | | | Total | 25,49,316.41 |
| | | | | GST- 14% | 3,56,904.30 |
| | | | | CST- 14% | 3,56,904.30 |
| | | | | Total Amount | 32,63,125.01 |

तथापी, R.D.Data Systems, Nasik यांचेबरोबर करण्यात आलेल्या करारनाम्यातील अट क्र.५- Penalty Clause –"Time is the essence and the Bidder shall have to stick to the prescribed schedule. In case of late delivery of product or delay, supplier shall be liable to pay penalty @ 0.5% of the order value per week of delay or part thereof, up to a maximum amount of 5% of order value and same shall nat be refundable" सदर अटीस अनुसरुन, पुरवठा आदेशातील ०५ टिव्ही हे त्यांनी दि.०२ डिसेंबर २०१७ रोजी १२ आठवडे उशीराने पुरवठा केलेले असल्याने पुरवठा आदेशातील एकुण रक्कम रु.२,५१,७७,७०५/- मात्र रक्कमेवर ५% दंडाची रक्कम रु.१२,५८,८८५/- मात्र इतकी होत आहे. परंतु, R.D.Data Systems, Nasik यांनी उपरोक्त संदर्भ क्र.५ चे पत्रान्वये, "जाणीवपुर्वक कुठलेही टि.व्ही.उशीराने पुरवठा केलेले नाहीत. सदरचे टि.व्ही. आम्हाला L.G. कंपनीकडुन उशीरा मिळाल्याने आम्ही वेळेत पुरवठा करु शकल्याने आमची विनंती मान्य करुन कृपया आपण LD आकारु नये व LD पोटी रोखुन ठेवलेली रक्कम त्वरीत परत मिळावी" अशी विनंती केली आहे.

तरी, उपरोक्त करारानाम्यातील अटी/शर्तीस अनुसरुन R.D.Data Systems, Nasik यांना उशीरा पुरवठा केलेल्या रक्कम रु.१२,५८,८८५/- मात्र इतकी दंडाची रक्कम आकारण्यात आलेली आहे. तसेच उपरोक्त करारनाम्यातील अटी/शर्तीस अनुसरुन, दंडाची रक्कम आकारावयाची किंवा उशीराने पुरवठा केलेल्या उपरोक्त ०५ टिव्हीचे एकुण रक्कमेवर ५% दंडाची रक्कम रु.१,६३,१५६.२५ आकारावयाची किंवा कसे? याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर करता येईल.

विभागाचा अभिप्राय– उपरोक्त प्रस्तावनेत नमुद केले नुसार, उपरोक्त करारानाम्यातील अटी/शर्तीस अनुसरुन R.D.Data Systems, Nasik यांना उशीरा पुरवठा केलेल्या रक्कम रु.१२,५८,८८५/- मात्र इतकी दंडाची रक्कम आकारण्यात आलेली आहे. तसेच उपरोक्त नमुद करारनाम्यातील अटी/शर्तीस अनुसरुन, दंडाची रक्कम आकारावयाची किंवा उशीराने पुरवठा केलेल्या उपरोक्त ०५ टिव्हीचे एकुण रक्कमेवर ५% दंडाची रक्कम रु.१,६३,१५६.२५ आकारावयाची किंवा कसे? याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर करत आहे.

विभागाचा प्रस्ताव– उपरोक्त विभागाचे अभिप्रायात नमुद केलेनुसार उपरोक्त करारानाम्यातील अटी/शर्तीस अनुसरुन R.D.Data Systems, Nasik यांना उशीरा पुरवठा केलेल्या रक्कम रु.१२,५८,८८५/- मात्र इतकी दंडाची रक्कम आकारण्यात आलेली आहे. तसेच उपरोक्त नमुद करारनाम्यातील अटी/शर्तीस अनुसरुन, दंडाची रक्कम आकारावयाची किंवा उशीराने पुरवठा केलेल्या उपरोक्त ०५ टिव्हीचे एकुण रक्कमेवर ५% दंडाची रक्कम रु.१,६३,१५६.२५ आकारावयाची किंवा कसे? याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.६५९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, R.D.Data Systems, Nasik यांनी उशीराने पुरवठा केलेल्या ०५ टिव्हीचे एकुण रक्कमेवर ५% दंडाची रक्कम रु.१,६३,१५६.२५ मात्र त्यांचेकडून वसुल करण्यात यावी.**

**(कार्यवाही- सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेलप्रमुख)**

---

**विषय नं.२३** **मा.पंतप्रधान भारत सरकार यांचे दौऱ्यासाठी तातडीने केलेल्या साहित्य खरेदीस व खर्चाला मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.पंतप्रधान,भारत सरकार यांचे शिर्डी दौ-यासाठी वेळोवेळी झालेले सभेमध्ये ठरल्याप्रमाणे तसेच मा.उप विभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांनी दिलेले पत्राप्रमाणे तसेच विशेष सुरक्षा दल व संबंधित शासकीय यंत्रणेने मा.उपजिल्हाधिकारी यांचेकडे केलेले मागणीप्रमाणे खालील साहित्य तातडीने उपलब्ध होईल तेथून तातडीने खरेदी करण्यात आलेले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं | दुकानदाराचे नांव | साहित्याचा तपशिल | बील नं | खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | साई अविष्कार एजन्सी, शिर्डी | किनले पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर ५०० मिली | १९९/१५.१०.१८ | ४,४००/- |
| २ | श्रध्दा मेडिकल अॅण्ड जनरल स्टोअर्स, शिर्डी | हॅण्ड सॅनिटायझर बॉटल | २६/१७.१०.१८ | १२०/- |
| ३ | बाफना जनरल स्टोअर्स,शिर्डी | टिशु पेपर | ३८०२/१७.१०.१८ | ८५०/- |
| ४ | बाफना जनरल स्टोअर्स,शिर्डी | डेटॉल हॅण्डवॉश, डेटॉल सोप | ३८०९/१७.१०.१८ | १४०/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | बाफना जनरल स्टोअर्स,शिर्डी | सोप केस | ३४/१७.१०.१८ | ६०/- |
| ६ | प्रसाद क्रॉकरीज,श्रीरामपूर | काचेचे ग्लास,चहा झाकण वगैरे. | ९४९/१६.१०.१८ | १३,५७९/- |
| ७ | विजय प्रोव्हिजन स्टेअर्स,नाशिक रोड | ड्राय फ्रुट्स बॉक्स–(काजू,मनुका,बदाम, पिस्ता- प्रत्येकी ५० ग्रॅम) | बील येणे बाकी | ३,४८०/- |
| ८ | स्वप्निल ट्रेडिंग कंपनी,नाशिक | हिमालया मिनरल वॉटर- १ लिटर | ८४४०/१६.१०.१८ | ३,०७८/- |
| ९ | पुष्कर ट्रेडर्स, शिर्डी | साई झिल वॉटर-३०० मिली | बील येणे बाकी | ४६०/- |
| १० | व्ही.एन्टरप्रायजेस,नाशिक | खुर्च्या (कार्यक्रम स्टेज वर आवश्यक असल्यामुळे) | बील येणे बाकी | २९,४५३/- |
| | | | एकुण खर्च रक्कम रूपये- | ५५,६२०/- |

वरीलप्रमाणे एकुण खर्च रक्कम रूपये ५५,६२०/- (अक्षरी रू.पंच्चावन्न हजार सहाशे वीस) मात्रचे साहित्य मा.पंतप्रधान,भारत सरकार यांचे दौ-यासाठी खरेदी करण्यात आलेले आहे. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५.१०.२०१८ सभेतील निर्णय क्रं.६१५ अन्वये रक्कम रूपये २ कोटी ४५ लाख ३० हजार मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. यामध्ये प्रासंगिक खर्चासाठी २० लाख खर्चाचा समावेश आहे.

प्रस्ताव- तरी वरीलप्रमाणे केलेले तातडीने साहित्य खरेदीस व झालेले एकुण रक्कम रूपये ५५,६२०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

निर्णय क्र.६६० **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.पंतप्रधान भारत सरकार यांचे दौऱ्यासाठी तातडीने केलेल्या साहित्य खरेदीस व त्यासाठी आलेल्या रक्कम रु.५५,६२०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक,खरेदी विभाग)**

---

विषय नं.२४ **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे सांगता कार्यक्रमाकरीता निमंत्रीत अतिमहत्वाचे मान्यवरांचे सत्कार कार्यक्रमाकरीता खरेदी करण्यात आलेल्या श्रींची चांदीच्या मुर्तीचे व इतर साहित्याचे एकूण रक्कम रु.१,८५,६४४/- मात्रचा खर्च माहितीस्तव व मान्यतेसाठी सादर करणेबाबत.**

प्रस्ताव- अधिनियम-२००४मधील तरतूद:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम-२००४ क्रं.२१ (१) ग मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे. भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

ठराव:- खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले. त्यामध्ये अ.क्र.१२ नुसार- उपरोक्त समारंभात मान्यवरांना स्मृतीचिन्ह म्हणुन श्रींची चांदीची मुर्ती देण्याचे ठरले, तसेच स्मृतीचिन्ह म्हणून द्यावयाच्या श्रींचे चांदीचे मुर्तीची संख्या, वजन, आकार, याबाबत मा.स्थानिक उपसमितीचे सभेमध्ये निर्णय घेण्यास तसेच त्यासाठी विहीत पद्धतीने प्रक्रीया राबवून खरेदी करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली.

प्रास्ताविक:- ठरावानुसार श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सव सांगता कार्यक्रमानिमित्त निमंत्रीत मा.पंतप्रधान, भारत सरकार, यांचे सत्काराकरिता मूर्ती देणेकामी पुरवठादारांकडुन विहीत पद्धतीने दि.२८.०९.२०१८ अखेर दरपत्रके मागविण्यात आली होती. त्यानुसार मुदतीमध्ये एकूण ०५ दरपत्रके जमा झाली व दि.०१.१०.२०१८ रोजी उघडण्यात आली होती. त्यापैकी मे.बाफना ज्वेलर्स, नाशिक यांचे दर न्युनतम दरधारक क्र.१ हे होते. परंतु, दि.१२.१०.२०१८रोजीचे ई-मेलने त्यांनी श्रींची चांदीची मूर्ती विहीत वेळेत पुरविणेस असमर्थता दर्शविल्याने न्युनतम दरधारक क्र.२ श्रीराम कोटींग्स (कांदीवली, मुंबई)शाखा-शिर्डी यांना जा.क्र.एसएसएस/मंदिर/३४८१/२०१८, दि.१३.१०.२०१८चे पुरवठा आदेशान्वये मान्यवरांचे सत्काराकरिता श्रींची चांदीची मूर्ती पुरवीणेबाबत पत्र देण्यात आले आहे.

विभागाचा अभिप्राय:- दि.१९/१०/२०१८ रोजी मा.पंतप्रधान, भारत सरकार, तसेच मा.महामहिम राज्यपाल, महाराष्ट्र राज्य व मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे सत्काराकरीता झालेला खर्च तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | नग | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्रीसाईबाबा चांदीची मुर्ती | ०३ नग | १,८२,८१४/- | - |
| ०२ | ०५ नंबर पावडर मुर्ती (लाकडी बॉक्ससह) | ०१ नग | ५५५/- | लाकडी बॉक्स-बांधकाम विभागामार्फत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०३ | शताब्दी शॉल (देणगी) | ०१ नग | २५०/- | - |
| ०४ | श्रींचे महावस्त्र (ड्रेस) देणगी पावती नं. १७१८२ | ०२ नग | १४००/- | श्रींना अपर्ण केलेले आरतीचे वस्त्र मान्यवरांना दिले. |
| ०५ | लाडूसाठी लाकडी बॉक्स | ०१ नग | १५०/- | - |
| ०६ | उदी ,लिंबाची पानेसाठी बॉक्स | ०१ नग | १५०/- | - |
| ०७ | श्रींचा फोटो १२x१६ साईजचा | ०१ नग | ३२५/- | - |
| | | **एकूण रुपये** | १,८५,६४४/- | - |

तरी श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव-२०१८चे सांगता दिवशी दि.१९/१०/२०१८ रोजी मा.पंतप्रधान, भारत सरकार, तसेच मा.महामहिम राज्यपाल, महाराष्ट्र राज्य व मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे सत्काराकरीता मे.श्रीराम कोटींग्स, (कांदीवली, मुंबई) शाखा- शिर्डी यांचेकडुन चांदीची मुर्ती ०३ नग खरेदी केली आहे व इतर साहित्य कार्यक्रमाचे ठिकाणी मान्यवरांना सत्काराकरिता देण्यात आली आहे. तरी याकामी झालेला खर्च रक्कम रु.**१,८५,६४४**/-(अक्षरी रक्कम रुपये एकलाख पंच्याऐंशीहजार सहाशे चौव्वेचाळीस मात्र) माहितीस्तव व मान्यता मिळणेस विनंती.

प्रस्ताव:- श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाकरिता निमंत्रीत मा.पंतप्रधान, भारत सरकार व त्यांचे समवेत मा.महामहिम राज्यपाल, महाराष्ट्र राज्य व मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचाही सत्कार करणेकामी ठरावाप्रमाणे श्रींची चांदीची मूर्ती खरेदी करण्यात आली आहे. त्याकरीता मे.श्रीराम कोटींग्स (कांदीवली, मुंबई) शाखा-शिर्डी यांचेकडुन श्रींसाईबाबांच्या चांदीच्या मूर्ती खरेदी करणेत आलेल्या आहेत. व इतर वस्तूही देण्यात आलेल्या असुन त्याकामी एकूण रक्कम रु. १,८५,६४४/-(अक्षरी रक्कम रुपये एकलाख पंच्याऐंशी हजार सहाशे चाव्वेचाळीस मात्र) खर्च झाला आहे. तरी सदरचा विषय प्रस्ताव माहितीस्तव व मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.६६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे सांगता कार्यक्रमाकरीता निमंत्रीत अतिमहत्वाचे मान्यवरांचे सत्कार कार्यक्रमाकरीता श्रींची चांदीच्या मुर्तीचे व इतर साहित्य खरेदीकामी आलेल्या रक्कम रु. १,८५,६४४/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)**

---

**विषय नं.२५** **मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे सभास्थळी असलेली ३३ के.व्ही.ओव्हरहेड लाईन शिफ्ट करणेकामी आलेल्या खर्चाची रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि., अहमदनगर यांना आदा करणेकामी चर्चा होऊन निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्त श्री साई प्रसादालयाचे पश्चिम बाजूस असलेल्या शेती महामंडळाच्या जागेत मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचा दिनांक १९-१०-२०१८ रोजी संस्थानमार्फत कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला होता. याच मैदानावरुन महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीची ३३ के.व्ही.ओव्हरहेड लाईन गेलेली होती. सदरील ओव्हरहेड लाईन आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमानिमित्त सुरक्षिततेच्या दृष्टीने सदरची ३३ के.व्ही.लाईन तातडीने काढून शिफ्ट करण्यात यावी. जेणेकरुन सदर कार्यक्रमासाठी उभारण्यात येणा-या मंडपामध्ये अडचण निर्माण होणार नसल्याबाबत मा.पालक मंत्री यांनी मिटींगमध्ये दिलेल्या निर्देशानुसार तसेच गुप्तचर विभाग वार्ता व दिल्ली येथील वरिष्ठ पोलीस अधिका-यांनी समक्ष सुचना दिलेल्या होत्या. यामुळे सदरची लाईन शिफ्ट करणेकरीता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे राहाता येथील उपकार्यकारी अभियंता,राहाता यांना पत्र पाठवून कळविण्यात आलेले होते. त्यानुसार महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीने ओव्हरहेड लाईन काढून त्याठिकाणी सदरची ३३ के.व्ही.लाईन भूमिगत टाकलेली असून याकामाकरीता त्यांनी रुपये २१,२०,२८०/- + रु.३,८१,६५०/- (१८ % जीएसटी) = रु. २५,०१,९३०/- इतका खर्च कळविलेला आहे.

विभागाचा अभिप्राय:- मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे दौ-यानिमित्ताने करावयाची कामे ज्या त्या विभागाने करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरचे काम महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने करणे गरजेचे असल्याने हा खर्च त्यांच्या आकस्मित खर्चातून करणे अपेक्षित आहे. परंतू महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी वारंवार सदर खर्चापोटी झालेल्या रकमेची मागणी संस्थानकडे करत आहे. ज्या जमिनीमध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीची ३३ के.व्ही.ओव्हरहेड लाईन आहे ती जमिन संस्थानच्या मालकीची नसल्यामुळे उपरोक्त खर्च संस्थानने करणे योग्य ठरणार नाही असे मत आहे.

**प्रस्ताव:-** तरी मा.पंतप्रधान,भारत सरकार यांचे सभास्थळी असलेली ३३ के.व्ही.ओव्हरहेड लाईन शिफ्ट करणेकामी आलेल्या महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.,अहमदनगर यांनी केलेल्या खर्चापोटी रक्कम रु. २५,०१,९३०/- अदा करावी किंवा कसे ? याबाबत चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६६२ उपरोक्त प्रस्ताव अमान्य करण्यात आला. (कार्यवाही- उपकार्यकारी अभियंता,विद्युत विभाग)**

---

**विषय नं.२६ शिर्डी येथील सर्व्हे नं.१७१/१२ मधील बसस्थानक व त्यावरील भक्तनिवास इमारतीचे विद्युतीकरण कामाचे अंतीम बील आदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा नियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एक प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

प्रस्ताव:- बांधकाम विभागामार्फत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०७-०७-२००८ रोजीचे सभेतील विषय नं.१८ निर्णय क्र.५७६ अन्वये शिर्डी येथील सर्व्हे नंबर-१७१/१२ मधील बसस्थानक व त्यावरील भक्तनिवास इमारतीचे बांधकाम व विद्युतीकरण संस्थान निधीतून विकासित करणेबाबत निविदा मागविणेस बांधकाम विभागास मान्यता मिळालेली होती. त्यानुसार शिर्डी येथे अद्ययावत सेवासुविधांनी युक्त असे बसस्थानक व त्यावरील भक्तनिवास बांधकाम करणेकरीता ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात येऊन ठेकेदार मे.पाटील कन्स्ट्रक्शन, पुणे यांना बांधकाम विभागामार्फत कार्यादेश देण्यात आलेला होता. मे.पाटील कन्स्ट्रक्शन, पुणे यांना दिलेल्या कामामध्ये इलेक्ट्रीकल कामाचा समावेश केलेला नसल्याने सदर कामाचे आर्कीटेक्ट, मे.काबरे चौधरी, नाशिक यांचेकडून इलेक्ट्रीकल कामाचे स्वतंत्र टेंडर तयार करण्यात आले. आर्कीटेक्ट, मे.काबरे चौधरी, नाशिक यांचेकडून सदर कामाचे टेंडर प्राप्त झाल्यानंतर विद्युत विभागामार्फत ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली होती.

ई-निविदा प्रक्रिया राबविल्यानंतर प्राप्त झालेल्या ई-निविदा उघडण्यात येऊन मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २४-०७-२०११ रोजीचे सभेतील विषय नं.१२ निर्णय क्र.५०३ अन्वये शिर्डी येथील सर्व्हे नंबर-१७१/१२ मधील बसस्थानक व त्यावरील भक्तनिवास इमारतीचे बांधकाम व विद्युतीकरण करणेकामी मे.आदिति इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांचे ई-निविदेतील दिलेले न्युनतम दर रु. ६६,९६,३६०/- मात्र मान्य करण्यात आलेले होते. त्यानुसार मे.आदिति इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांना जा.नं.एसएसएसटी / विद्युत / २४४० / २०११ दि.१२-०८-२०११ अन्वये देण्यात आलेला कार्यादेश देण्यात आलेला होता.

मे.आदिति इलेक्ट्रीकल्स्, नाशिक याना सदरचे काम पुर्ण करण्याचा कालावधी सहा महिन्याचा म्हणजेच दि.११-०२-२०१२ पर्यंत अथवा सिव्हील काम १०० टक्के पुर्ण झाल्यानंतर दोन महिने अशी देण्यात आलेली होती. परंतू बसस्थानकाचे बांधकाम संथगतीने सुरु असल्याने विद्युत विभागामार्फत दिनांक १०-०९-२०१३ रोजीचे टिपणी अन्वये विद्युतीकरणाच्या कामास मुदतवाढीसाठी मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणेकरीता प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. विद्युत विभागामार्फत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०८-१०-२०१३ रोजीच्या सभेतील विषय क्र.३५ निर्णय क्र.७३७ अन्वये सहा महिन्याची मुदतवाढ दिलेली होती. परंतू विद्युतीकरणाच्या कामास मुदतवाढ दिल्यानंतरही बसस्थानकाचे बांधकाम फक्त ३५ टक्केच पुर्ण झालेले असल्याने विद्युतीकरणाच्या कामास पुन्हा एकदा मुदतवाढीसाठी दिनांक ०८-०३-२०१४ रोजीच्या टिपणी अन्वये मा.व्यवस्थापन समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. विद्युत विभागामार्फत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०५-०६-२०१४ रोजीचे सभेतील विषय नं.७३ निर्णय क्र.३६१अन्वये पुन्हा एकदा सहा महिन्याची मुदतवाढ दिलेली होती. परंतू दोन्ही वेळेच्या मुदतवाढीनंतरही बसस्थानकाचे बांधकाम फक्त ४५ टक्केच पुर्ण झालेले असल्याने विद्युतीकरणाच्या कामास पुन्हा तिस-यांदा मुदतवाढीसाठी दिनांक ३०-०९-२०१४ रोजीच्या टिपणी अन्वये मा.व्यवस्थापन समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. यावेळी विद्युत विभागामार्फत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९-१०-२०१४ रोजीचे सभेतील विषय नं.२८ निर्णय क्र.९१३ अन्वये सविस्तर चर्चा होऊन विद्युतीकरणाचे ठेकेदार मे.आदिति इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांना मुदतवाढ न देता त्यांनी विद्युतीकरणाचे काम बांधकामाच्या बरोबरीने चालू ठेवून पुर्ण करावे, असे कळविणेत यावे, असे ठरले.

त्यानुसार मे.आदिति इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांनी सादर केलेले विद्युतीकरणाचे फायनल बील संस्थानला दि.१९-०८-२०१७ रोजी प्राप्त झाले होते. परंतू दरम्यानच्या काळात बसस्थानक व भक्तनिवास इमारत

सुरु करण्यात आलेली नसल्याने वायरींग काम पुर्ण करण्यात आलेले असले तरी बसस्थानकाव्यतिरिक्त इमारतीमधील रुम्स व हॉल सुरु करण्यात आलेले नसल्याने याठिकाणचे सिलींग फॅन व टयुब लाईट फिटींग खराब होऊ नये तसेच चोरीला जाऊ नये याकरीता सिलींग फॅन व टयुबलाईट फिटींग बसविण्यात आलेले नव्हते. त्यामुळे मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांच्या फायनल बीलावर पुढील कार्यवाही करण्यात आलेली नव्हती.

त्यानंतर साईप्रसाद निवासस्थान विभाग यांचे जा.नं.एसएसएस/वशी-साप्रनि/०२/२०१८ दिनांक ०२-०४-२०१८ रोजीच्या आदेशानुसार बसस्थानक भक्तनिवास इमारतीमधील रुम्स व हॉल दिनांक २४-०३-२०१८ पासून कायमस्वरुपी साईभक्तांचे निवासव्यवस्थेकरीता सुरु करण्यात येणार असल्याने कळविण्यात आल्यानंतर बसस्थानक व भक्तनिवास इमारतीमधील रुम्स व हॉलमध्ये तसेच पॅसेजमध्ये सिलींग फॅन व टयुबलाईट फिटींग बसविण्यात येऊन सर्व ठिकाणची विद्युत व्यवस्था सुरु करण्यात आलेली आहे.

त्यानंतर मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांनी सादर केलेले फायनल बीलाबाबत पुढील कार्यवाही सुरु करण्यात येऊन आर्किटेक्ट समवेत कामाची एकत्रित पाहणी व तपासणी करण्यात आली आहे.

सदर फायनल बील आर्किटेक्ट मे.काबरे चौधरी, नाशिक यांनी चेक केलेले असून मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांना रक्कम रु. ९,५०,५००/- अदा करणेबाबत सर्टीफिकेट दिलेले आहे. मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांना टेंडर व करारनाम्यानुसार यापुर्वीच्या रनिंग बीलापोटी ८०% बीलाची रक्कम रु. ४४,८८,७५८.८५ अदा करणेत आलेली आहे. परंतू आर्किटेक्ट मे.काबरे चौधरी, नाशिक यांनी यापुर्वीच्या रनिंग बीलापोटी १००% रक्कम रु. ५१,०४,९५६/- अदा केल्याचे गृहीत धरलेले असल्याने अदा करावयाची कळविलेली रक्कम ही रु. ९,५०,५००/- इतकी येत आहे. परंतू प्रत्यक्षात मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांना अदा करावयाची रक्कम ही रु. १९,७१,६९२/- इतकी होत असल्याने आर्किटेक्ट मे.काबरे चौधरी, नाशिक यांनी दिलेले Certificate of Payment मध्ये दुरुस्ती करुन आणलेले आहे. मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांनी सादर केलेल्या फायनल बीलाचा तपशील पुढीलप्रमाणे.

| अ.क. | तपशील | रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१) | कामाची मूळ मंजूर रक्कम | ६६,९६,३६०.०० |
| ०२) | सादर केल्या अंतिम बीलाची रक्कम<br>(रु. ७४,३८,६०१.०२ – १०% = रु. ६६,९४,७४०.९२) | ६६,९४,७४०.९२ |
| ०३) | विद्युत विभागामार्फत दुरुस्त केलेल्या अंतिम बीलाची रक्कम<br>(रु. ७३,९४,९४७.८२ – १०% = रु. ६६,५५,४५३.०४) | ६६,५५,४५३.०४ |
| ०४) | वजा सिक्युरिटी डिपॉझिट ५% | ०३,३२,७७२.६५ |
| ०५) | यापुर्वी अदा केलेल्या सिक्युरिटी डिपॉझिटची रक्कम | ०२,२४,४३८.२४ |
| ०६) | आता अदा करावयाची सिक्युरिटी डिपॉझिटची रक्कम (०४-०५) | ०१,०८,३३४.४१ |
| ०७) | वजा इन्कम टॅक्स २ % | ०१,३३,१०९.०६ |
| ०८) | यापुर्वी अदा केलेल्या इन्कम टॅक्सची रक्कम | ००,८९,७७५.३० |
| ०९) | आता अदा करावयाची इन्कम टॅक्सची रक्कम (०७-०८) | ००,४३,३३४.०० |
| १०) | वजा वॅट २% | ०१,३३,१०९.०६ |
| ११) | यापुर्वी अदा केलेल्या वॅटची रक्कम | ००,८९,७७५.३० |
| १२) | आता अदा करावयाची वॅटची रक्कम (१०-११) | ००,४४,३३४.०० |
| १३) | यापुर्वी अदा केलेल्या रनिंग बीलाची रक्कम | ४४,८८,७५८.८५ |
| १४) | एकुण वजावट (०६ + ०९ + १२ + १३) | ४६,८३,७६१.२६ |
| १५) | निव्वळ देय रक्कम (०३ – १५) | १९,७१,६९१.७८ |
| १६) | राऊंड अप | १९,७१,६९२.०० |

**मागणी:-** उपरोक्तप्रमाणे मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांचे शिर्डी येथील सर्व्हे नंबर-१७१/१२ मधील बसस्थानक व त्यावरील भक्तनिवास इमारतीचे विद्युतीकरण कामाची फायनल बीलाची रक्कम रु.६६,५५,४५३.०४ होत असून त्यामधून टॅक्सेस, सिक्युरिटी डिपॉझिट तसेच मागील रनिंग बीलाची वजावट होऊन राहिलेली उर्वरीत रक्कम रुपये १९,७१,६९२/- मात्र मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांना लेखाशाखा विभागामार्फत अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६६३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी येथील सर्व्हे नं.१७१/१२ मधील बसस्थानक व त्यावरील भक्तनिवास इमारतीचे विद्युतीकरण करणेकामी आलेल्या रक्कम रु.६६,५५,४५३.०४ मात्रचे खर्चास तसेच त्यामधून टॅक्सेस, सिक्युरिटी डिपॉझिट तसेच मागील रनिंग बीलाची वजावट होऊन उर्वरीत रक्कम रुपये १९,७१,६९२/- मात्र मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- उपकार्यकारी अभियंता,विद्युत विभाग)**

---

**विषय नं.२७** **श्री साई प्रसादालयातील डिश वॉशिंग (ताटे धुणे) मशिन करीता व भांडी धुणेसाठी लिक्विड सोप खरेदी करुन मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद :- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमंक १४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तवित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील २१ (१ घ) नुसार भक्तांना जेवण पुरविणे व अन्नछत्र चालवणे.

प्रस्ताविक :- श्री साई प्रसादालयात दररोज सरासरी ४० ते ४५ हजार साईभक्त प्रसाद- भोजनाचा लाभ घेतात. श्री साईबाबांचे उत्सव तसेच गर्दीचे कालावधीमध्ये प्रसाद- भोजन घेणा-या साईभक्तांची संख्या ७० ते ८५ हजारापर्यंत जाते. प्रसाद- भोजन घेणा-या साईभक्तांना जेवण देणेसाठी स्टिल ताटांचा वापर करणेत येतो. सदर पदार्थ बनविणेसाठी तेलाचा व तुपाचा वापर करण्यात येत असल्यामुळे पदार्थ बनवण्यासाठी लागणारे कढया, पातेले, प्रसाद भोजनाची ताटे व जेवण वाढण्यासाठी हॉलमध्ये वापरण्यात येणा-या स्टेनलीस स्टीलच्या फुड सर्व्हिस ट्रॉलीज, चमचे, भातवाढ्या व इतर भांडे तेलकट व तुपकट होतात परिणामी त्यांचा खराब वास येतो त्यामुळे सदर ताटे व डिशेस फक्त पाण्याने धुतल्याने स्वच्छ होत नसल्याने लिक्विड सोपचा वापर करावा लागतो.

प्रसादालयातील भांडी धुणेसाठी प्रतिदिन अंदाजे ५० लिटर याप्रमाणे एका वर्षासाठी १८२५० लिटर व भांडे मशिनकरीता अंदाजे प्रतिदिन १० लिटर प्रमाणे ३६५० लिटर लिक्विड सोप असे एकुण २१९०० लिटर लिक्विड सोपची गरज लागणार आहे.

सध्या प्रसादालयामध्ये दि.०७/१०/२०१८ अखेर ८२४ लिटर लिक्विड सोप शिल्लक आहे. पुरवठा आदेशानुसार ५१२० लिटर लिक्विड सोप व्यापा-याकडून येणे बाकी आहे. प्रसादालयाकडील शिल्लक ८२४ लिटर लिक्विड सोप व खरेदी विभागामार्फत व्यापा-याकडून येणे बाकी असलेले ५१२० लिटर असे एकुण ५९४४ लिटर लिक्विड सोप प्रसादालयाकडे शिल्लक आहे. सदर लिक्विड सोप प्रसादालयास १०० दिवस पुरेल इतके शिल्लक आहे. गरज भासल्यास पुरवठा आदेशाचे २५% म्हणजेच वार्षिक पुरवठा २१९०० लिटर X २५% = ५४७५ लिटर लिक्विड सोप खरेदी विभागामार्फत व्यापा-याकडून घेता येईल.

सन २०१७-१८ करीता मे.साईकेम एन्टरप्रायझेस, रामपूर यांचेकडील लिक्विड सोपचा सध्याचा दर रु.१७.०० प्रती लिटर इतका आहे. पुढील कालावधीकरीता प्रसादालयासाठी आवश्यक असणारे लिक्विड सोपचे दराबाबत लिक्विड सोप पुरवठा करणा-या व्यापा-यांना दुरध्वनीव्दारे विचारणा केली असता, त्यांनी ई-मेलव्दारे तसेच काही कंपन्यांचे ऑनलाइन दर घेणेत आले असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.नं. | लिक्विड सोप पुरवठा करणारे व्यापारी | लिक्विड सोपचा प्रती लिटर दर |
|---|---|---|
| १ | मे.साईकेम एन्टरप्रायझेस, रामपूर (दि.२७.०९.२०१८ रोजीचा ई-मेल) | रु.२९.५० |
| २ | साईनाथ कॉर्पोरेशन, इचलकरंजी (दि.०९.१०.२०१८ रोजीचा ई-मेल) | रु.३५.४० |
| ३ | श्री हायजेनिक, नासिक (ऑनलाइनव्दारे) (Ezzy Clean-Brand) | रु.२७.०० |
| ४ | भावना एन्टरप्रायझेस, पुणे (ऑनलाइनव्दारे) (Dolphin-Brand) | रु.४५.०० |
| | **सरासरी दर =** | रु.३४.२२ |

उपरोक्त दरांचा विचार करता, सदर लिक्विड सोप खरेदीसाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | लिक्विड सोपचा वापर | मागणी (लिटरमध्ये) | अंदाजे दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | हाताने भांडी धुणेसाठी | १८२५० लिटर | रु.३४.२२ | रु.६,२४,५१५.०० |
| २ | डिश वॉशिंग मशिनसाठी | ३६५० लिटर | रु.३४.२२ | रु.१,२४,९०३.०० |
| | | | **एकुण अंदाजे रक्कम =** | रु.७,४९,४१८.०० |
| | | **पुर्णांकित रक्कम रुपये =** | | रु.७,५०,०००.०० |

उपरोक्त दिलेल्या दरामध्ये भविष्यात चढ-उतार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी प्रसादालयास उपरोक्तप्रमाणे लिक्विड सोप खरेदीस अंदाजे रु.७,५०,०००/- (अक्षरी रुपये सात लाख पन्नास हजार मात्र) खर्च अपेक्षित आहे.

सदरचा खर्च अंदाजपत्रकीय तरतूद सन २०१८-२०१९ मधील प्रसादालय खर्च या सदराखालील मंजूर असलेल्या रकमेतून करता येईल.

मागणी :- श्री साई प्रसादालयातील डिश वॉशिंग मशिनसाठी व प्रसाद भोजनाची भांडी, कढया, पातेले, फुड सर्व्हिस ट्रॉलीज, चमचे, वाट्या व इतर तेलकट उपकरणे धुणेसाठी लिक्विड सोप खरेदी करणे आवश्यक आहे.

संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमान:- आर्थिक

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- तरी प्रसादालयाकरीता पुढील ०१ वर्ष कालावधीसाठी हाताने भांडी धुणेसाठी लागणारे १८२५० लिटर + भांडी मशिनकरीता लागणारे ३६५० लिटर लिक्विड सोप असे एकुण २१९०० लिटर लिक्विड सोपकरीता अंदाजे दर रु.३४.२२ नुसार अंदाजित रक्कम रु.७,५०,०००/- चे न्युट्रल व चांगल्या दर्जाचे २१९०० लिटर लिक्विड सोप खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजित रक्कम रु.७,५०,०००/- (अक्षरी रुपये सात लाख पन्नास हजार मात्र) चे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६६४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयातील डिश वॉशिंग (ताटे धुणे) मशिन करीता व भांडी धुणेसाठी लिक्विड सोप खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.७,५०,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- प्र.अधिक्षक, श्री साई प्रसादालय)**

---

**विषय नं.२८** **मा.पंतप्रधान, भारत सरकार व त्यांच्या समवेतील वरिष्ठ अधिकारी यांचेकरीता श्री साईबाबा समाधी शताब्दी समारोह प्रसंगी शिर्डी दौऱ्या दरम्यान चहापान, नाष्टा व भोजन करीता झालेला खर्च रक्कम रु. ३३,०७५/- मात्र मान्यतेस्तव सादर.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद– २१मधील पोट कलम (१) (ग) भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

मा.व्यवस्थापन समिती सभेतील ठराव क्र. – दि.०५/१०/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.०३ व निर्णय क्र.६१५

प्रस्तावना–दि.०५/१०/२०१८ चे मा.व्यवस्थान समिती सभेतील विषय क्र.०३ व निर्णय क्र.६१५ अन्वये "श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रमाकरीता निमंत्रित करण्यात आलेल्या मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे शिर्डी येथील दौ-याचे निमित्ताने करावयाच्या कार्यक्रमाचे नियोजनासाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे संबंधीत विभागांनी करावयाचे कामास व त्यासाठी येणा-या अंदाजे रक्कम रुपये २,४५,३०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता प्राप्त आहे. तसेच सदर कार्यक्रमाकरीता ऐनवेळी करावी लागणारी आवश्यक ती कामे करण्यास व त्याकामी येणा-या अंदाजे खर्चास मान्यता देण्यात आली" उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयास अनुसरुन, प्रस्तावातील नमुद तपशीलातील अ.नं.१० मध्ये नमुद केलेनुसार चहापाणी, नाष्टा व भोजन व्यवस्थेसाठी अंदाजे रक्कम रुपये १,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार मा.पंतप्रधान,भारत सरकार यांचे शिर्डी दौ-या दरम्यान विमानतळ, हेलिपॅड, मंदिर परिसर व कार्यक्रमाचे मुख्य ठिकाण या जागी मान्यवरांना चहा, नाष्टा, पाणी व भोजन व्यवस्थे करणे बाबत जा.नं.एसएसएस/वशी-प्रसादा/४९२५/२०१७ दि.१८/१२/२०१७ व जा.नं.एसएसएस/वशी-प्रसादा/ ३९०४/ २०१८ दि.२२/१०/२०१८ अन्वये साई मधुबन हॉस्पीटॅलिटी,शिर्डी यांना आदेशीत करण्यात आले होते. त्यानुसार

त्यांनी दि.१९/१०/२०१८ रोजी मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे दौ-या दरम्यान सदर ठिकाणी चहा, पाणी, नाष्टा व भोजन व्यवस्था पुरविली आहे. त्यासाठीचे एकूण रक्कम रुपये ३३,०७५/- मात्रचे बील (GST सह) कळविले असून झालेला खर्च माहितीस्तव व मान्यतेस्तव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल.

विभागाचा अभिप्राय– उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयास अनुसरुन, प्रस्तावणेत नमुद केलेप्रमाणे मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे दि.१९/१०/२०१८ रोजचे भेटी समयी साई मधुबन हॉस्पीटॅलिटी, शिर्डी यांना कळविले प्रमाणे त्यांनी चहा, पाणी, नाष्टा व भोजन व्यवस्था पुरविली असून त्यासाठीचा रक्कम रुपये ३३,०७५/- मात्र (GST सह) बील इकडील विभागात सादर केलेले आहे. सदर झालेला खर्च माहितीस्तव व मान्यतेस्तव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल असे नम्र मत आहे.

विभागाचा प्रस्ताव– उपरोक्त विभागाचे अभिप्रायात नमुद केलेनुसार साई मधुबन हॉस्पीटॅलिटी, शिर्डी यांचे रक्कम रुपये ३३,०७५/- मात्र (GST सह) झालेला खर्च माहितीस्तव व मान्यतेस्तव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६६५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.पंतप्रधान, भारत सरकार व त्यांच्या समवेतील वरिष्ठ अधिकारी यांचेकरीता श्री साईबाबा समाधी शताब्दी समारोह प्रसंगी शिर्डी दौऱ्या दरम्यान चहापान, नाष्टा व भोजन करीता झालेला रक्कम रु. ३३,०७५/- मात्र (GST सह) खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-प्र.अधिक्षक,साईप्रसाद निवासस्थान)**

---

**विषय नं.२९** **राष्ट्रीयकृत बँकामध्ये संस्थान निधीचे मुदतठेवीच्या स्वरुपात करावयाच्या गुंतवणूकीबाबत निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), अधिनियम २००४ कलम २०(३) अन्वये "विश्वस्तव्यवस्था निधीच्या मालकीचा सर्व पैसा व इतर मौल्यवान वस्तू केवळ राष्ट्रीयकृत बॅकेत किंवा बॅकामध्ये ठेव म्हणुन ठेवण्यात येतील किंवा जमा करण्यात येतील किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम १९५० च्या कलम २ च्या खंड (१२) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे सार्वजनिक राख्यांमध्ये गुंतविण्यात येतील", अशी तरतुद आहे.

मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय क्र.९५२, दि.०६.११.२०१४ अन्वये बचत खाते असलेल्या राष्ट्रीयकृत बॅकांची आर्थिक स्थिती विचारात घेऊन, त्यांचेकडून व्याजदर मागवून, जास्तीत जास्त व्याजदर देणा-या बॅकांकडे टप्प्याटप्प्याने गुंतवणूक करण्यास मा.मुख्यकार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेऊन गुंतवणूक करावी व त्याचा वार्षीक अहवाल वर्षाच्या शेवटी मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्यात यावा असा निर्णय संमत झाला आहे.

त्यास अनुसरुन गुंतवणूकांची मुदतपूर्ती झाल्यानंतर, उपलब्ध होणारा निधी व बचत खात्यांमध्ये दैनंदिन खर्च वजा जाता उपलब्ध होणारा निधी यांची संस्थानचे बचतखाते असलेल्या विविध राष्ट्रीयकृत बॅकाकडून स्पर्धात्मक दर मागवून जास्तीत जास्त व्याजदर देणा-या राष्ट्रीयकृत बॅकामध्ये मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने गुंतवणूक करण्यात आली आहे.

आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये केलेल्या गुंतवणूकीचा अहवाल व आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये कमाल व्याजदर देणा-या राष्ट्रीकृत बॅकांमध्ये १ वर्षाच्या मुदतठेवीच्या स्वरुपात गुंतवणुकीस मान्यता मिळणेबाबत व राष्ट्रीयकृत बॅकांची एनपीए बाबतची स्थिती दि.०१.०६.२०१८ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेपूढे अवलोकनार्थ सादर करण्यात आली होती. त्यावर मा. व्यवस्थापन समितीने क्र. ३६४, दि. ०१.०६.२०१८ नुसार पुढीलप्रमाणे निर्णय झाला आहे.

मा.व्यवस्थापन समितीचा निर्णय –"यावर सविस्तर चर्चा होऊन,दि.३१ मार्च २०१८ अखेर आर्थिक वर्षात केलेल्या गुंतवणुकीचा अहवाल व एनपीए स्थितीचे अवलोकन करणेत येऊन, त्याची नोंद घेण्यात आली. तसेच जास्तीत जास्त एनपीए असलेल्या राष्ट्रीयकृत बॅकांमध्ये गुंतवणूक करावी किंवा कसे, याबाबत विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मार्गदर्शन घेण्यात यावे, असे ठरले".

त्यानुसार मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना दि.१९.०६.२०१८ रोजी पत्र पाठविण्यात आले आहे.

दि.०५.१०.२०१८ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेमध्ये राष्ट्रीयकृत बॅकांमध्ये सुरक्षित गुंतवणूक करणेकामी अनौपचारीक चर्चा झालेली होती यामध्ये मा. विश्वस्त डॉ. राजेंद्र राजा बाली सिंग यांनी Crisil व Fitch India या एजन्सीचा राष्ट्रीकृत बॅकांची Credit Rating चा तक्ता सादर केलेला आहे. सदरचा तक्ता खालीलप्रमाणे –

| Sr.No. | Bank Name | Investment As on 11.10.2018 | Crisil Rating | | Fitch India Rating | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | Crisil-Rating | Crisil Outlook | Fitch India Rating | Fitch India Outlook |
| 1 | Andhra Bank | 1,50,84,86,624 | AA- | Stable to Negative | IND AA | Stable |
| 2 | Bank of Baroda | 1,93,01,00,000 | AA+ | Stable | IND AAA | Affirmed-Stable |
| 3 | Central Bank of India | 17,67,650 | A+ | Stable | Rating Withdraw | |
| 4 | Corporation Bank | 69,00,00,000 | Data not available | | | |
| 5 | Dena Bank | 1,17,00,00,000 | A- | Negative | IND AA- | Stable |
| 6 | Indian Bank | 35,00,00,000 | AA+ | Stable | IND AA+ | Affirmed-Stable |
| 7 | Oriental Bank of Commerce | 2,75,00,00,000 | A+ | Stable | IND A | Negative |
| 8 | Punjab National Bank | 3,17,00,00,000 | AA | Under Watch | IND AAA | Under Watch Negative |
| 9 | Syndicate Bank | 1,91,00,00,000 | AA | Stable | IND A+ | Stable |
| 10 | Uco Bank | 17,00,00,000 | A | Stable | IND A- | Stable |
| 11 | Union Bank of India | 51,07,00,000 | AA+ | Stable | IND AA+ | Affirmed - Stable |
| 12 | Vijaya Bank | 7,69,00,00,000 | Rating not assign | | AA- | Stable |
| 13 | State Bank ofIndia | - | AAA | Stable | AAA | Affirmed-Stable |
| 14 | Bank o f India | - | Data not available | | | |
| 15 | Bank of Maharashtra | - | Data not available | | | |
| 16 | Canara Bank | - | AA | Stable to Negative | IND AA | Stable |
| | Total | 21,85,10,54,274 | | | | |

संस्थानची ठेवीची राष्ट्रीयकृत बॅंकामध्ये मुदतठेवीच्या स्वरुपात गुंतवणूक करण्यात येते उपरोक्त बॅंकांनी मागील चार गुंतवणूकीच्या बैठकांमध्ये रक्कम रु. १० कोटींच्या पुढील रकमेसाठी देऊ केलेल्या व्याजदराचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे –

| Sr. No | Bank Name | Investment As on 11.10.2018 | Investment Meeting Date-Interest Rate | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 10.09.2018 | 19.09.2018 | 28.09.2018 | 05.10.2018 |
| 1 | Andhra Bank | 1,50,84,86,624 | 7.15% | - | 7.05% | 7.15% |
| 2 | Bank of Baroda | 1,93,01,00,000 | 6.75% | 6.75% | 6.75% | 7.00% |
| 3 | Bank of Maharashtra | - | - | 4.25% | 5.00% | 5.00% |
| 4 | Bank of India | - | - | - | - | - |
| 5 | Central Bank of India | 17,67,650 | Interest Rate Not received | | | |
| 6 | Canara Bank | - | 7.10% | - | 7.15% | 7.10% |
| 7 | Corporation Bank | 69,00,00,000 | - | - | **7.26%** | **7.31%** |
| 8 | Dena Bank | 1,17,00,00,000 | - | - | 6.65% | - |
| 9 | Indian Bank | 35,00,00,000 | 6.50% | 7.12% | 7.12% | 7.12% |
| 10 | Punjab National Bank | 3,17,00,00,000 | 7.15% | - | - | - |
| 11 | State Bank of India | - | Interest Rate Not received | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 12 | Syndicate Bank | 1,91,00,00,000 | 7.17% | 7.05% | 7.10% | - |
| 13 | Oriental Bank of Commerce | 2,75,00,00,000 | 7.15% | 7.15% | 7.25% | 7.25% |
| 14 | Uco Bank | 17,00,00,000 | 7.00% | 7.00% | 7.00% | 7.00% |
| 15 | Union Bank of India | 51,07,00,000 | - | - | 7.00% | 7.00% |
| 16 | Vijaya Bank | 7,69,00,00,000 | **7.17%** | **7.20%** | 7.25% | 7.27% |

विभागाचा अभिप्राय –

१. संस्थानची गुंतवणूक रक्कम ही मोठी असल्याने संस्थानने जर Crisil किंवा Fitch India हया खाजगी संस्थाव्दारे केलेल्या रेटींगनुसार एखाद्या बॅंकेस प्राधान्य दिल्यास संस्थानला मिळणारा व्याजदर कमी होऊन त्याव्दारे संस्थानला मोठया प्रमाणात आर्थिक तोटा होणार आहे.

२. Crisil किंवा Fitch India या खाजगी संस्थानी प्रकाशीत केलेले रेटींगसंबंधी सदर एजन्सी जबाबदारी घेत नसून तशी नोंद त्यांनी आपल्या संकेतस्थळावर कलेली आहे.

३. खाजगी मानांकन एजन्सी जसे Crisil किंवा Fitch India यांचे मानांकनानूसार संस्थानचा निधी गुंतवणूकीसाठी काही बॅंकांना कमाल गुंतवणुक मर्यादा घातली व काही बॅंकामध्ये गुंतवणुकीचा निर्णय घेतल्यास, ज्या बॅंकामध्ये कमाल मर्यादा संपल्यामुळे गुंतवणूक करता येणार नाही व त्यांचे व्याजदर जर जास्त असतील तर त्याचा फायदा संस्थानला घेता येणार नाही. पर्यायाने संस्थानचा आर्थिक तोटा होईल. संस्थानच्या सध्याच्या ठेवींचा विचार करता ०.१० % व्याजदर कमी मिळाला तरी वार्षिक २.२ कोटी व्याज कमी होऊ शकते.

४. संस्थानने जर Crisil किंवा Fitch India रेटींगप्रमाणे एखाद्याबॅंकेस प्राधान्य दिल्यास व ती बॅंक भविष्यात अडचणीत आल्यास सदर बॅंकेतील गुंतवणूकीबाबत संस्थानवर जबाबदारी निश्चित होऊ शकते.

५. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१.०६.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३६४ नुसार राष्ट्रीयकृत बॅंकामधील गुंतवणूक त्यांचे मानंकनानूसार करणेबाबत मार्गदर्शन मिळण्यासाठी जा.नं.एसएसएसटी/वशी–लेखा/१३६४/२०१८, दि.१९.०६.२०१८ नुसार शासनाला प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावावर शासनाचे मार्गदर्शन प्राप्त झाल्यावर पुढील निर्णय घेणे योग्य राहील.

प्रस्ताव- संस्थानची राष्ट्रीयकृत बॅंकामध्ये दि.११.१०.२०१८ अखेर रक्कम रु.२१,८५,१०,५४,२७४/- मुदतठेवीच्या स्वरुपात ठेवलेली असून जास्तीत जास्त व्याजदर देणा-या राष्ट्रीयकृत बॅंकांमध्ये मुदतठेवीच्या स्वरुपात गुंवतणूक करण्यात येत आहे. राष्ट्रीयकृत बॅंकांमध्ये मुदतठेवीच्या स्वरुपात गुंतवणुकीबाबत निर्णय होणेस मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.६६६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानच्या ठेवीच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्व राष्ट्रीयकृत बॅंकांचे विविध रेटींग संस्थांनी केलेले रेटींग विचारात घेऊन ज्या बॅंकेचे रेटींग "स्थिर" (Stable) दर्जाचे आहेत त्याबॅंकामध्ये गुंतवणूक करावी, तसेच कोणत्याही एका राष्ट्रीयकृत बॅंकेमध्ये ५०० कोटीच्या मर्यादेपर्यंत संस्थानचा निधी मुदतठेवीच्या स्वरुपात गुंतवणूक करण्यात यावा. तसेच याकामी शासनाचे विधी व न्याय विभागाची मान्यता घेण्यात यावी, तो पर्यंत सध्या अवलंबित येणाऱ्या पध्दतीनुसार गुंतवणूक करावी, असे ठरले. (कार्यवाही- लेखाशाखा विभाग)**

---

**विषय नं.३० IRCTC चे E-Ticket या पोर्टलव्दारे रेल्वे तिकीट आरक्षीत करुन साईबाबांचे दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांसाठी online.sai.org.in या वेबसाईटव्दारे आरती/दर्शन पास आरक्षीत करणेची सुविध उपलब्ध करुन देणेबाबत.**

**प्रस्ताव-** उपरोक्त संदर्भ क्रं.०१ ते ०४ अन्वये प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार IRCTC व विभागीय रेल्वे व्यवस्थापक,वाणिज्य विभाग,सोलापूर यांनी शिर्डी येथे रेल्वेने येणा-या साईभक्तांसाठी रेल्वे तिकीट आरक्षीत करतेवेळी श्रींचे आरती/दर्शन पास आरक्षीत करण्याची सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत विनंती केलेली आहे.

उपरोक्त प्रस्तावामध्ये त्यांनी त्यांचे कार्यप्रणालीव्दारे १२० दिवस अगोदर रेल्वे तिकीट आरक्षीत करण्याची सुविधा उपलब्ध असल्याने, संस्थानचे online.sai.org.in या वेबसाईटव्दारे ६० दिवस अगोदर आरती/दर्शन पास आरक्षीत करणेची असलेली सुविधा रेल्वे प्रवाश्यांसाठी १२० दिवसांची करणेत यावी, असेही नमूद केलेले आहे.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार करावयाच्या संभाव्य कार्यवाहीबाबत दि. ११.०९.२०१८ रोजी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांचे कक्षामध्ये झालेल्या बैठकीमध्ये सविस्तर चर्चा करण्यात

आली. सदरच्या बैठकीस M/s Tata Consultancy Services यांचे अधिकारी श्री भिमा शेखर, श्री. राजीव गुप्ता व आयटी विभाग हे उपस्थित होते. तसेच दि. ०३.१०.२०१८ रोजी यासंदर्भात IRCTC यांचे व्यवस्थापक श्री पद्ममोहन व त्यांचे सहकारी यांनी शिर्डी येथे येऊन आयटी विभाग व M/s Tata Consultancy Services यांचेबरोबर अनुषंगिक तांत्रिक बाबींवर चर्चा केलेली आहे. तद्नंतर IRCTC चे प्रतिनिधी, टिसीएस व आयटी विभाग यांची संयुक्त बैठक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांचे उपस्थितीत पार पडली. सदरचे बैठकी मध्ये IRCTC चे कार्यप्रणालीद्वारे रेल्वे तिकीट आरक्षीत करणारे साईभक्तांस श्रींचे आरती/दर्शन पास आरक्षीत करणेची प्रक्रियेसंबंधी सविस्तर चर्चा करणेत आली, त्यानुसार सदरची प्रक्रिया साधारणपणे पुढीलप्रमाणे असेल.

१. सुरवातीचे काळात भारतातील विविध शहरातून शिर्डी (साईनगर), कोपरगांव, नगरसुल, मनमाड, नाशिक इ. रेल्वेस्टेशन पर्यंत रेल्वे तिकीट आरक्षीत करणारे साईभक्तांस IRCTC यांचे कार्यप्रणालीव्दारे रेल्वे तिकीट आरक्षीत केलेनंतर श्रींचे आरती/दर्शन पास आरक्षीत करणेकामी संस्थानचे online.sai.org.in या वेबसाईटची लिंक IRCTC यांचे वेबसाईटवर उपलब्ध करुन देता येईल.
२. IRCTC यांचे कार्यप्रणालीव्दारे रेल्वे तिकीट आरक्षीत केलेनंतर साईभक्तांस श्रींचे आरती/दर्शन पास आरक्षीत करणेबाबत कार्यप्रणालीव्दारा विचारणा करणेत येईल. साईभक्ताव्दारे सकारात्मक प्रतिसाद मिळाल्यास साईबाबा संस्थानची online.sai.org.in ही वेबसाईट लिंकद्वारे ओपन होईल व रेल्वे तिकीट आरक्षीत करणेसाठी संकलीत करणेत आलेली माहीती आरती/दर्शन पास आरक्षीत करणेसाठी आवश्यक संदर्भीय रकान्यांमध्ये भरली जाईल.
३. आरती/दर्शन पास आरक्षीत करणेकामी आवश्यक असलेली इतर आवश्यक माहीती साईभक्तास online.sai.org.in या वेबसाईटवर भरावी लागेल. तद्नंतर साईभक्तास संबंधीत रेल्वे स्टेशनवर पोहचले पासूनचे पुढील दोन दिवसांचे आरती/दर्शन पास उपलब्धतेनुसार आरक्षीत करता येतील.
४. सदरचे सुविधेद्वारे दर्शन पास आरक्षीत करणारे साईभक्तांना रेल्वेचे वेळेत होणा-या बदलांचा विचार करता, दर्शन पासवरील तारखेस आरतीचे वेळेव्यतिरीक्त दर्शनासाठी संदर्भीय प्रवेशद्वारातून प्रवेश देता येईल.
५. IRCTC यांचे कार्यप्रणालीव्दारे आरती/दर्शन पास आरक्षीत करणारे साईभक्तांना रेल्वे तिकीटाप्रमाणे पुढील १२० दिवसापर्यंतचे आरती/दर्शन पास आरक्षित करणेची सुविधा उपलब्ध करुन द्यावी लागेल.

उपरोक्तप्रमाणेची कार्यवाही होणेकरीता पुढीलप्रमाणे निर्णय होणे आवश्यक आहे.

१) संस्थानचे online.sai.org.in या वेबसाईटची लिंक IRCTC यांचे वेबसाईटवर उपलब्ध करुन देणेकामी मान्यता मिळणे.
२) IRCTC यांचे वेबसाईटद्वारे संस्थानचे online.sai.org.in वर आरती/दर्शन पास आरक्षीत करणारे साईभक्तांना पुढील १२० दिवसांचे आरती/दर्शन पास उपलब्धतेनुसार आरक्षीत करणेस मान्यता मिळणे.
३) सदरचे सुविधेद्वारे दर्शन पास आरक्षीत करणारे साईभक्तांना रेल्वेचे वेळेत होणा-या बदलांचा विचार करता, दर्शन पासवरील तारखेस आरतीचे वेळेव्यतिरीक्त दर्शनासाठी संदर्भीय प्रवेशद्वारातून प्रवेश देणेस मान्यता मिळणे.

नमुद केलेप्रमाणे IRCTC व विभागीय रेल्वे व्यवस्थापक, वाणिज्य विभाग, सोलापूर यांनी श्री साईबाबांचे दर्शनासाठी रेल्वेने येणा-या साईभक्तांसाठी रेल्वे तिकीट आरक्षीत करतेवेळी श्रींचे आरती/दर्शन पास आरक्षीत करण्याची सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत केलेल्या विनंतीनुसार आवश्यक कार्यवाही करणेस मान्यता मिळणेस्तव व याबाबत निर्णय होणेस्तव सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करता येईल.

मागणी:- प्रास्ताविकेमध्ये नमुद केलेप्रमाणे, IRCTC व विभागीय रेल्वे व्यवस्थापक, वाणिज्य विभाग, सोलापूर यांनी श्री साईबाबांचे दर्शनासाठी रेल्वेने येणा-या साईभक्तांसाठी रेल्वे तिकीट आरक्षीत करतेवेळी श्रींचे आरती/दर्शन पास आरक्षीत करण्याची सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत केलेल्या विनंतीनुसार आवश्यक कार्यवाही करणेस मान्यता मिळणेस व पुढीलप्रमाणे-

१. संस्थानचे online.sai.org.in या वेबसाईटची लिंक IRCTC यांचे वेबसाईटवर उपलब्ध करुन देणेकामी मान्यता मिळणे.
२. IRCTC यांचे वेबसाईटद्वारे संस्थानचे online.sai.org.in वर आरती/दर्शनपास आरक्षीत करणारे साईभक्तांना पुढील १२० दिवसांचे आरती/दर्शन पास उपलब्धतेनुसार आरक्षीत करणेस मान्यता मिळणे.
३. सदरचे सुविधेद्वारे दर्शन पास आरक्षीत करणारे साईभक्तांना रेल्वेचे वेळेत होणा-या बदलांचा विचार करता, दर्शन पासवरील तारखेस आरतीचे वेळेव्यतिरीक्त दर्शनासाठी संदर्भीय प्रवेशद्वारातून प्रवेश देणेस मान्यता मिळणे.

याप्रमाणे निर्णय होणेस्तव सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :- तांत्रिक व प्रशासकीय

विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत :- IRCTC व विभागीय रेल्वे व्यवस्थापक, वाणिज्य विभाग, सोलापूर यांनी श्री साईबाबांचे दर्शनासाठी रेल्वेने येणा-या साईभक्तांसाठी रेल्वे तिकीट आरक्षीत करतेवेळी श्रींचे आरती/दर्शन पास आरक्षीत करण्याची सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत केलेल्या विनंतीनुसार आवश्यक कार्यवाही करणेस मान्यता मिळणेस्तव व पुढीलप्रमाणे -

१. संस्थानचे online.sai.org.in या वेबसाईटची लिंक IRCTC यांचे वेबसाईटवर उपलब्ध करुन देणेकामी मान्यता मिळणे.
२. IRCTC यांचे वेबसाईटद्वारे संस्थानचे online.sai.org.in वर आरती/दर्शनपास आरक्षीत करणारे साईभक्तांना पुढील १२० दिवसांचे आरती/दर्शन पास उपलब्धतेनुसार आरक्षीत करणेस मान्यता मिळणे.
३. सदरचे सुविधेद्वारे दर्शन पास आरक्षीत करणारे साईभक्तांना रेल्वेचे वेळेत होणा-या बदलांचा विचार करता, दर्शन पासवरील तारखेस आरतीचे वेळेव्यतिरीक्त दर्शनासाठी संदर्भीय प्रवेशद्वारातून प्रवेश देणेस मान्यता मिळणे.

याप्रमाणे निर्णय होणेस्तव सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.६६७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, IRCTC चे E-Ticket या पोर्टलव्दारे रेल्वे तिकीट आरक्षीत करुन साईबाबांचे दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांसाठी online.sai.org.in या वेबसाईटव्दारे आरती/दर्शन पास आरक्षीत करणेची सुविध उपलब्ध करुन देणेकामी खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

**१. संस्थानचे online.sai.org.in या वेबसाईटची लिंक IRCTC यांचे वेबसाईटवर उपलब्ध करुन देणेस मान्यता देण्यात आली.**
**२. IRCTC यांचे वेबसाईटद्वारे संस्थानचे online.sai.org.in वर आरती/दर्शनपास आरक्षीत करणारे साईभक्तांना पुढील १२० दिवसांचे आरती/दर्शन पास उपलब्धतेनुसार आरक्षीत करणेस मान्यता देण्यात आली.**
**३. सदरचे सुविधेद्वारे दर्शन पास आरक्षीत करणारे साईभक्तांना रेल्वेचे वेळेत होणा-या बदलांचा विचार करता, दर्शन पासवरील तारखेस आरतीचे वेळेव्यतिरीक्त दर्शनासाठी दर्शन पासवर नमुद केलेल्याप्रवेशद्वारातून प्रवेश देणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच आरतीची वेळ निश्चीत करुन प्रायोगिक तत्वावर १००० साईभक्तांसाठी कोटा राखीव ठेवण्यात यावा, असे ठरले.** **(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञानविभागप्रमुख)**

---

**विषय नं.३१** **श्री साईबाबा महाविद्यालय- विद्यापीठाचे मार्गदर्शक तत्वानुसार राबवावयाच्या योजना व बँक खाते उघडणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद क्र.१७ (१) व १७ (२) (ढ) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील. तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक – मा.व्य.समितीचे दि.०२.०२.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.१११

प्रस्ताविकः- शासन आदेश क्रमांक एनजीसी २०१८/(१००/१८)/ मशि-४, दि.१५ जून, २०१८ अन्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा महाविद्यालय या नावाने नवीन महाविद्यालय सुरु करण्यास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/९४४/२०१८ दि.०२ जुलै, २०१८ अन्वये श्री साईबाबा महाविद्यालय हा स्वतंत्र विभाग सुरु करण्यात आलेला असून, त्याचा शुभारंभ दि.१७.०७.२०१८ रोजी पासून झालेला आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत महाविद्यालयात विविध योजना व उपक्रम राबविण्यात येत असतात, तसेच सदरच्या योजना व उपक्रम महाविद्यालयात राबविणे महाविद्यालयासाठी बंधनकारक आहे. सदर योजना सहभागी विद्यार्थ्यांना विद्यापीठामार्फत जादा गुण दिले जातात. सदर योजना व उपक्रमांबाबत विद्यापीठामार्फत नियमावली पुस्तिका प्रसिद्ध करण्यात येते. त्यानुसार संस्थानचे श्री साईबाबा महाविद्यालयामध्येही सदरच्या योजना व उपक्रम सुरु करणे क्रम प्राप्त आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

अ) विद्यार्थी विकास मंडळ– सदर योजनेचे अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी कल्याणकारी विविध उपक्रमांचे विद्यापीठ व महाविद्यालयीन स्तराव आयोजन करणे, विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या आंतर-विद्यापीठीय स्पर्धांमध्ये सहभागी होण्याची संधी उपलब्ध करुन देणे, वकृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम/ युवक महोत्सव इ. उपक्रमांचे माध्यमातून त्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी गुणवंत विद्यार्थ्यांची / विद्यार्थी संघांची निवड करणे या बरोबरच विविध उपक्रम राबविणे. पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळाद्वारे खालील योजना उपक्रम कार्यान्वित करण्यात येत असतात.

१. रॅगिंग प्रतिबंधात्मक उपाययोजना
२. विद्यार्थी विकास मंडळाकडे जमा करावयाचे निधी
३. विद्यार्थी सुरक्षा विमायोजना
४. आपत्कालीन साहाय्य
५. कर्मवारी भाऊराव पाटील कमवा व शिका योजना
६. विशेष मार्गदर्शन योजना
७. विद्यार्थीनी व्यक्तिमत्व विकास योजना
८. निर्भय कन्या अभियान
९. स्वच्छ व समर्थ भारत अभियान
१०. आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण
११. विद्यार्थी प्रतिनिधी निवडणुक
१२. विद्यापीठ प्रतिनिधी शिबीर
१३. युवक महोत्सव
१४. रोजगार/स्वयंरोजगार आणि कौशल्य विकास योजना
१५. डॉ.पी.सी.अलेक्झांडर आंतरविद्यापीठीय मराठी व इंग्रजी वकृत्व स्पर्धा
१६. अभिरुप नयायालय स्पर्धा
१७. महाविद्यालयीन नियतकालिका स्पर्धा
१८. विद्यार्थी वार्ता (चेतना) प्रकाशन
१९. शैक्षणिक उपक्रम, कार्याशाळा, चर्चासत्र, उजाळणी वर्ग
२०.राष्ट्रीय छात्रसेना सत्कार समारंभ
२१. वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ
२२. विद्यापीठ स्तरीय एकांकीका स्पर्धा
२३.विद्यापीठ कार्यक्षेत्रातील प्रवेशीत परराज्यातील विद्यार्थी सांस्कृतिक / शैक्षणिक
२४. विद्यापीठस्तरीय सुगम, शास्त्रीय व नाटयगायन स्पर्धा
२५. आदान प्रदान कार्यशाळा
२६. विद्यार्थी प्रोत्साहन योजना
२७. विद्यार्थी प्रोत्साहन योजना
२८. सामाजिक सलोखा आणि युवा सक्षमीकरण

सदर उपक्रम व योजनांमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी सक्रिय सहभाग नोंदवत असतात. त्यासाठी महाविद्यालयीन स्तरावर एक समिती गठीत करणे क्रमप्राप्त आहे. तीचे स्वरप खालीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्राचार्य | - | अध्यक्ष |
| २. | संस्थाचालकांचे प्रतिनिधी (१) | - | सदस्य |
| ३. | विद्यार्थी कल्याण अधिकारी (S.D.O.) | - | सचिव |
| ४. | प्राध्यापिका प्रतिनिधी | - | सदस्य |
| ५. | विद्यार्थी प्रतिनिधी | - | सदस्य |
| ६. | महाविद्यालयीन शिक्षकेतर सेवक | - | सदस्य |
| ७. | स्थानिक समाजसेवक | - | सदस्य |

वरील प्रमाणे समिती गठीत करुन, त्यांचेद्वारे वरील उपक्रम व योजनांची अमंलबजावणी करावी लागते. विद्यार्थी कल्याण अधिकारी (S.D.O.) यांनी विद्यार्थी विकास मंडळाच्या विविधि योजना महाविद्यालयात प्रभावीपणे राबविणे व त्याबाबतचे अहवाल वेळोवेळी विद्यार्थी विकास मंडळास पाठविणे आवश्यक आहे. सदरचा विद्यार्थी कल्याण अधिकारी म्हणून महाविद्यालयातील एका व्याख्यात्याची/प्राध्यापकाची नियुक्ती करावी लागते. विद्यार्थी कल्याण अधिकारी म्हणून नामनिर्देशन केलेल्या व्याख्याता / प्राध्यापक यांना व्यक्तिगत खर्चाची परिपूर्ती म्हणून (Pocket Allowance) विद्यापीठाकडून दरवर्षी रु.६,०००/- अदा करण्यात येत असते.

महाविद्यालय / संस्थेत खालील दिलेले गटनिहाय योजना व शैक्षणिक उपक्रम राबविणे अनिवार्य आहे.

| **अ गट (आवश्यक) सर्व बाबींची पुर्तता करणे आवश्यक** | **ब गट (एकत्रित योजना) या गटातील कोणतीही एक योजना राबविणे आवश्यक** | **क गट (इतर योजना) या गटातील कोणतीही एक योजना राबविणे आवश्यक** | **ड गट (विशेष योजना)** |
|---|---|---|---|
| १. रॅगिंग अहवाल | १. निर्भय कन्या | १. विशेष मार्गदर्शन योजना | १. कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना |
| २. विद्यार्थी कल्याण निधी | २. आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण | २. विद्यार्थीनी व्यक्तिमत्व विकास योजना | - |
| ३. विद्यार्थी परिषद स्थापना | ३. राष्ट्रीय छात्र सेना (N.C.C.) कार्यशाळा | ३. युवक महोत्सवात सहभाग | - |
| ४. नियतकालिका स्पर्धेतील सहभाग | ४. साहस शिबीरे | ४. विद्यार्थी सुरक्षा विमा योजना | - |
| ५. विद्यार्थी विकास | ५. विद्यार्थी प्रतिनिधी शिबीर | ५. माजी कुलपती डॉ.पी.सी. | - |

| | | | |
|---|---|---|---|
| मंडळामार्फत निर्गमित करण्यात येणा-या परिपत्रकांची कार्यवाही व अहवाल | | अलेक्झांडर वक्तृत्व स्पर्धा | |
| - | ६. नियतकालिक कार्यशाळा | ६. आप्तकालिन सहाय्य | - |
| - | ७. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील प्रवेशीत परराज्यातील विद्यार्थी सांस्कृतिक व आदान प्रदान कार्यशाळा | ७. विद्यार्थी वार्ता प्रकाशन | - |
| - | ८. विशेष विद्यार्थी कार्यशाळा (अंध, अपंग, शारीरिक विकलांग इ.) | ८. कन्यारत्न वाचवा अभियान | - |
| - | ९. रोजगार / स्वयंरोजगार आणि कौशल्य विकास योजना | ९. इतर शैक्षणिक / सांस्कृतिक उपक्रम/ कार्यशाळा / परिषद / चर्चासत्र / उजाळणी वर्ग | - |
| - | १०. अभिरुप न्यायालय स्पर्धा | - | - |
| - | ११. स्वच्छ / समर्थ भारत अभियान | - | - |

वरील योजना राबविण्यासाठी विद्यापीठाकडून विविध योजनेंसाठी अनुदान देण्यात येत असते. सदर अनुदानाचा लेखा-जोखा ठेवण्याची जबाबदारी विद्यार्थी कल्याण अधिकारी (S.W.O.) यांचेवर असते. तसेच विद्यापीठाकडून सदर अनुदानाचे लेखापरिक्षण करण्यात येत असते.

विद्यापीठाचे नियमाप्रमाणे वरील योजनांकरिता विद्यापीठाकडून प्राप्त अनुदान जमा होण्यासाठी तसेच सदर योजनेच्या अंतर्गत खर्च करण्यासाठी मा.प्राचार्यांचे नावाने एक स्वतंत्र बँक खाते आवश्यक असते. मात्र संस्थानचा सर्व आर्थिक व्यवहार हा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नावे चालतो, त्यामुळे वरील योजनांसाठी “मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी (विद्यार्थी विकास मंडळ - S.W.O.)” या नावाने नवीन बँक खाते उघडता येईल.

ब) शिष्यवृत्ती - तसेच विद्यापीठाकडून अनुसुचित जाती / जमाती, इतर मागसवर्गीय विद्यार्थ्यांकरिता विविध शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत असतात. सदर योजनेअंतर्गत विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांसाठी तसेच त्यांचेसाठी राबविण्यात येणा-या उपक्रमांसाठी अनुदान प्राप्त होत असते. विद्यापीठाकडून सदर अनुदानाचे लेखापरिक्षण करण्यात येत असते..

विद्यापीठाचे नियमाप्रमाणे शिष्यवृत्ती योजनेकरिता विद्यापीठाकडून प्राप्त अनुदान जमा होण्यासाठी तसेच सदर योजनेच्या अंतर्गत खर्च करण्यासाठी मा.प्राचार्यांचे नावाने एक स्वतंत्र बँक खाते आवश्यक असते. मात्र संस्थानचा सर्व आर्थिक व्यवहार हा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नावे चालतो, त्यामुळे वरील योजनांसाठी “मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी (शिष्यवृत्ती)” या नावाने नवीन बँक खाते उघडता येईल.

क) राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.) – विद्यापीठाचे मार्गदर्शक तत्वानुसार महाविद्यालयांनी राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत नियमित उपक्रम कार्यक्रम पार पाडणे अनिवार्य असते, त्यामध्ये वृक्षी दिंडी, जलसंधारण उपक्रम, निर्मल ग्राम योजना, आपत्कालीन व्यवस्थापन योजना, एडस जाणीव जागृती उपक्रम (Red Reabon Club), युवा दिन, स्वच्छता अभियान, दत्तक गाव योजना या बरोबरच विशेष शिबीर- सात दिवशीय निवासी शिबीर अयोजित करणे असे उपक्रम राबवावे लागते.

सदर कार्यक्रमांचे नियोजन व प्रभावीपणे अमंलबजावणी करण्यासाठी महाविद्यालयातील एका प्राध्यपक / व्याख्याता यांची कार्यक्रम अधिकारी म्हणून नियुक्ती करावी लागते. तसेच सदर योजनेअंतर्गत राबविण्यात येणा-या उपक्रमांसाठी विद्यापीठाकडून अनुदान प्राप्त होत असते. विद्यापीठाकडून सदर अनुदानाचे लेखापरिक्षण करण्यात येत असते.

विद्यापीठाचे नियमाप्रमाणे राष्ट्रीय सेवा योजनेकरिता विद्यापीठाकडून प्राप्त अनुदान जमा होण्यासाठी तसेच सदर योजनेच्या अंतर्गत खर्च करण्यासाठी मा.प्राचार्यांचे नावाने एक स्वतंत्र बँक खाते आवश्यक असते. मात्र संस्थानचा सर्व आर्थिक व्यवहार हा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नावे चालतो, त्यामुळे वरील

योजनांसाठी "मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी (राष्ट्रीय सेवा योजना - N.S.S.)" या नावाने नवीन बॅक खाते उघडता येईल.

ड) महाविद्यालय / विद्यापीठ परिक्षा विभाग – महाविद्यालयातंर्गत तसेच विद्यापीठीय स्तरावरील परिक्षांसाठी प्रत्येक महाविद्यालयामध्ये महाविद्यालय/ विद्यापीठ परिक्षा विभाग असणे अनिवार्य आहे. सदर विभागामार्फत विद्यापीठाकडून राबविण्यात येणा-या प्रत्येक परिक्षेचे नियोजन करणे, विद्यार्थ्यांकडून वसुल केलेली परिक्षा फी विहित वेळेत विद्यापीठाकडे सुपुर्द करणे, तसेच परिक्षेसाठी उपस्थित असणा-या परिक्षकांचे मानधन, महाविद्यालय प्राध्यपकांचे व इतर कर्मचारी यांचे विद्यापीठामार्फत प्राप्त होणारे परिक्षा विषयक मानधनाबाबत नियोजन करणे. विद्यापीठाकडून सदर मानधनाचे लेखापरिक्षण करण्यात येत असते. तसेच सदरचे कामकाज पाहण्यासाठी महाविद्यालयातील एका प्राध्यपक / व्याख्याता यांची मुख्य परिक्षा अधिकारी म्हणून नियुक्ती करावी लागते.

विद्यापीठाचे नियमाप्रमाणे विद्यापीठ / महाविद्यालय परिक्षा विभागाकरिता विद्यापीठाकडून प्राप्त मानधन जमा होण्यासाठी तसेच सदर योजनेच्या अंतर्गत खर्च करण्यासाठी मा.प्राचार्यांचे नावाने एक स्वतंत्र बॅंक खाते आवश्यक असते. मात्र संस्थानचा सर्व आर्थिक व्यवहार हा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नावे चालतो, त्यामुळे वरील योजनांसाठी "मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी (परिक्षा विभाग )" या नावाने नवीन बॅक खाते उघडता येईल.

इ) राष्ट्रीय छात्र सेना (N.C.C.) – विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्वाचा अष्टपैलू विकास, विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती, राष्ट्रप्रेम भावना निर्माण करणे. तसेच सदर योजनेमध्ये सक्रिय सहभाग नोंदवून सी प्रमाणपत्र प्राप्त विद्यार्थ्यांना विद्यापीठामार्फत १० गुण देण्यात येतात. तसेच सैनिक, पोलीस, CRPF, ITBP, BSF वगैरे भरतींमध्ये सदर विद्यार्थ्यांना विशेष सवलत देण्यात येते तसेच इतर विद्यार्थ्यांच्या तुलनेने रोजगाराच्या संधी लवकर निर्माण होतात. N.C.C.च्या माध्यमातून विद्यार्थी भारतीय प्रजासत्ताक दिन (SRD & NRD परेड) सोहळयातील मुख्य परेडमध्ये सहभागी होऊ शकतो. सदर योजनेच्या अमंलबजावणीसाठी तसेच विद्यार्थी भत्ते, गणेवष साहित्य यासाठी विद्यापीठामार्फत अनुदान देण्यात येते. विद्यापीठाकडून सदर अनुदानाचे लेखापरिक्षण करण्यात येत असते.

विद्यापीठाचे नियमाप्रमाणे राष्ट्रीय छात्र सेना (N.C.C.) करिता विद्यापीठाकडून प्राप्त मानधन जमा होण्यासाठी तसेच सदर योजनेच्या अंतर्गत खर्च करण्यासाठी मा.प्राचार्यांचे नावाने एक स्वतंत्र बॅंक खाते आवश्यक असते. मात्र संस्थानचा सर्व आर्थिक व्यवहार हा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नावे चालतो, त्यामुळे वरील योजनांसाठी "मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी (N.C.C.)" या नावाने नवीन बॅक खाते उघडता येईल.

मागणी -तरी उपरोक्त प्रस्ताविकातील परिच्छेद अ ते इ मध्ये नमुद केलेल्या योजना संस्थानचे श्री साईबाबा महाविद्यालयामध्ये राबविण्यास व सदर योजनेंसाठी महाविद्यालयातील वेगवेगळ्या प्राध्यपकांकडे अनुभवानुसार काम विभागून देणेस, तसेच सदर योजनेंसाठी नमुद केलेनुसार वेगवेगळे ०५ बॅंक खाते नव्याने उघडण्यास मान्यता मिळणेस विनंती.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार अनुमान – प्रशासकीय मान्यतेअंती कार्यवाही करता येईल.

विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत– मागणी परिच्छेदात नमुद केलेप्रमाणे कार्यवाहीस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६६८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाबाबत खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

**अ) विद्यापीठाचे नियमाप्रमाणे विद्यार्थी विकास योजनांकरीता विद्यापीठाकडून प्राप्त अनुदान जमा होण्यासाठी तसेच सदर योजनेच्या अंतर्गत खर्च करण्यासाठी "मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी (विद्यार्थी विकास मंडळ-S.W.O.)" या नावाने नवीन बॅक खाते उघडण्यास मान्यता देण्यात आली.**

**ब) विद्यापीठाचे नियमाप्रमाणे शिष्यवृत्ती योजनेकरिता विद्यापीठाकडून प्राप्त अनुदान जमा होण्यासाठी तसेच सदर योजनेच्या अंतर्गत खर्च करण्यासाठी "मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी (शिष्यवृत्ती)" या नावाने नवीन बॅक खाते उघडण्यास मान्यता देण्यात आली.**

**क) विद्यापीठाचे नियमाप्रमाणे राष्ट्रीय सेवा योजनेकरिता विद्यापीठाकडून प्राप्त अनुदान जमा होण्यासाठी तसेच सदर योजनेच्या अंतर्गत खर्च करण्यासाठी "मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी (राष्ट्रीय सेवा योजना - N.S.S.)" या नावाने नवीन बॅक खाते उघडण्यास मान्यता देण्यात आली.**

ड) विद्यापीठाचे नियमाप्रमाणे विद्यापीठ / महाविद्यालय परिक्षा विभागाकरिता विद्यापीठाकडून प्राप्त मानधन जमा होण्यासाठी तसेच सदर योजनेच्या अंतर्गत खर्च करण्यासाठी "मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी (परिक्षा विभाग )" या नावाने नवीन बॅक खाते उघडणेस मान्यता देण्यात आली.

इ) विद्यापीठाचे नियमाप्रमाणे राष्ट्रीय छात्र सेना (N.C.C.) करिता विद्यापीठाकडून प्राप्त मानधन जमा होण्यासाठी तसेच सदर योजनेच्या अंतर्गत खर्च करण्यासाठी "मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी (N.C.C.)" या नावाने नवीन बॅक खाते उघडणेस मान्यता देण्यात आली.

तसेच आवश्यकता असेल तरच उपरोक्त ५ नविन बँक खाते मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे नावानेच राष्ट्रीयकृत बँकेत उघडण्यात यावेत. तसेच विद्यापीठाचे नियमानुसार "प्राचार्य, श्री साईबाबा महाविद्यालय, शिर्डी " या नावाने खाते उघडणे बंधनकारक असल्यास त्याप्रमाणे खाती उघडण्यास मान्यता देण्यात आली. तथापी या खात्यावरील सर्व व्यवहार हाताळण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील, असे ठरले. तसेच महाविद्यालयाचे प्रवेशव्दार व महत्वाचे ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावणेत यावे.

(कार्यवाही-प्र.अधिक्षक,सामान्य प्रशासन विभाग / श्री साईबाबा महाविद्यालय/ सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेलप्रमुख)

---

**विषय नं.३२** **संस्थानचे चेन्नई व बंगळूरु येथील माहिती केंद्रावर कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मुदतवाढीचे अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबांचे जिवन-कार्याचा प्रचार-प्रसार व्हावा तसेच साईभक्तांसाठी सोई-सुविधा उपलब्ध व्हाव्यात या उदात्त हेतुने चेन्नई व बंगळूर येथे संस्थानमार्फत सन २०११ सालापासून माहिती केंद्र सुरु करण्यात आलेले आहेत. सदरहू ठिकाणी संस्थानमार्फत प्रकाशीत होणारे पुस्तके व फोटोंची विक्री तसेच रोख देणगी, ऑनलाईन दर्शन-आरती पास वितरण व रुम बुकींग इ. कामे केली जातात. सदरहू ठिकाणी प्रकाशने विभागाचे नियंत्रणाखाली कंत्राटदारामार्फत एकत्रित मानधनावर खालील कंत्राटी कर्मचा-याची नेमणूक करण्यात आलेली आहे.

| अं.क्र | कंत्राटी कर्मचा-याचे नाव व पदनाम | माहिती केंद्र ठिकाण | नेमणूक केल्याचे वर्ष | एकत्रित मानधन रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.व्ही.कन्नन, कार्यालय प्रमुख | चेन्नई | दि.०३/११/२०११ ते दि.०२/११/२०१२ | रु.८,०००/- |
| | | | दि.०३/११/२०१२ ते दि.०२/११/२०१३ | रु.८,०००/- |
| | | | दि.०३/११/२०१३ ते दि. ०२/११/२०१४ | रु.१०,०००/- |
| | | | दि.०३/११/२०१४ ते दि.०२/११/२०१५ | रु.१२,०००/- |
| | | | दि.०३/११/२०१५ ते दि.०२/११/२०१६ | रु.१२,०००/- |
| | | | दि.०३/११/२०१६ ते दि.०२/११/२०१७ | रु.१५,०००/- |
| | | | दि.०३/११/२०१७ ते दि.०२/११/२०१८ | रु.१५,०००/- |
| ०२ | श्री.एस.कृष्णमूर्ती, कार्यालय प्रमुख | बंगळूरु | दि.०३/११/२०११ ते दि.०२/११/२०१२ | रु.८,०००/- |
| | | | दि.०३/११/२०१२ ते दि.०२/११/२०१३ | रु.८,०००/- |
| | | | दि.०३/११/२०१३ ते दि.०२/११/२०१४ | रु.१०,०००/- |
| | | | दि.०३/११/२०१४ ते दि.०२/११/२०१५ | रु.१२,०००/- |
| | | | दि.०३/११/२०१५ ते दि.०२/११/२०१६ | रु.१२,०००/- |
| | | | दि.०३/११/२०१६ ते दि.०२/११/२०१७ | रु.१५,०००/- |
| | | | दि.०३/११/२०१७ ते दि.०२/११/२०१८ | रु.१५,०००/- |

उपरोक्त कर्मचा-यांना वेळोवेळी प्रत्येकी एका वर्षासाठी मुदतवाढ देणेत आलेली आहे. सदरहू कर्मचा-यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा-आस्था/४१४२/२०१८ दि.२६ जानेवारी, २०१८ रोजीचे आदेशाने देणेत आलेली मूदतवाढ दि.०२/११/२०१८ रोजी संपत असल्याने त्यांनी दि.०४/१०/२०१८ रोजीचे विनंती अर्जाने संस्थान नियमाप्रमाणे मुदतवाढ मिळणेची विनंती केलेली आहे. संबधीतांचे अर्जावर, प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग यांनी संबधीतांचे काम समाधानकारक असून, त्यांची मुदत दि.०२/११/२०१८ अखेर संपत असून, संबधीतांचे मागणी अर्जाचा विचार करता त्यांना संस्थान नियमानुसार मुदतवाढ देणेस हरकत नाही, असा अभिप्राय नोंदविलेला आहे.

तरी संस्थानचे चेन्नई व बंगलोर येथील माहिती केंद्रावर कार्यरत असलेले उपरोक्त कंत्राटी कर्मचा-यांना मुदतवाढ संपत असलेल्या तारखेपासून पुढे एक वर्षासाठी मुदतवाढ देणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६६९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे चेन्नई व बंगलोर येथील माहिती केंद्रावर कार्यरत असलेले कंत्राटी कर्मचारी श्री.व्ही.कन्नन, कार्यालय प्रमुख,चेन्नई व श्री.एस.कृष्णमूर्ती, कार्यालय प्रमुख,बंगळूरु यांची मुदत दि.०२.११.२०१८ रोजी संपत असल्याने त्यांना सध्या देण्यात येत असलेल्या मानधनावर दि.०३.११.२०१८ पासुन पुढे एक वर्ष कालावधीसाठी संस्थान नियमानुसार मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-प्र.अधिक्षक,सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३३** **अनुकंपा तत्वावर नेमणूक करणेत आलेल्या लिपीक-टंकलेखक या पदावरील ०४ कर्मचाऱ्यांना संस्थान सेवेत कायम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** (अ) मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक२५ जुलै, २०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ५५७ अन्वये, खालील परिशिष्टातनमूद केलेल्या लिपीक-टंकलेखक पदावरील कर्मचा-यांना अनुकंपा तत्वावर नेमणूका देणेत आलेल्या आहेत. संबंधित कर्मचारी यांचे नेमणूक आदेशातील अट क्र.०१ नुसार एक वर्षाचा परिवीक्षाधिन कालावधी दिनांक ११ ऑक्टोबर, २०१८ रोजी संपुष्टात येत आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे -

| अ. क्र. | कर्मचा-याचे नांव | कर्मचा-यांची शैक्षणिक अर्हता | नेमणूक आदेश क्रमांकव दिनांक | नेमणूकीचा विभाग | हजर तारीख | परिवीक्षाधीन संपुष्टात आल्याची तारीख | वैद्यकीय पात्रता प्रमाणपत्र | संस्थान सेवेत कायम करणेची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| ०१ | श्री.विशाल इंद्रभान देशमुख | १. बी.ए. (मुक्त विद्यापीठ, नाशिक)<br>२. एमएस- सीआयटी<br>३. टायपींग इंग्लिश ४०प्र.श.प्र.मि. मराठी ३० प्र.श.प्र.मि. | जा.नं.एसएसएस/ साप्रशा-आस्था/ ३७५३/२०१७ दि.१२/१०/२०१७ | लेखाशाखा विभाग | १२/१०/२०१७ | ११/१०/२०१८ | दि.२४/१०/२०१७ रोजीचे वैद्यकीय प्रमाणपत्रानुसार पात्र | १२/१०/२०१८ |
| ०२ | श्रीमती रुपाली सोमनाथ मराठे | १. बी.ए. (पुणे विद्यापीठ)<br>२. एमएस- सीआयटी<br>३. टायपींग इंग्लिश ४०प्र.श.प्र.मि. मराठी ३० प्र.श.प्र.मि.<br>४. मॉन्टेसरी टिचर्स कोर्स | जा.नं.एसएसएस/ साप्रशा-आस्था/३७५४ /२०१७ दि.१२/१०/२०१७ | श्री साईबाबा हॉस्पीटल | १२/१०/२०१७ | ११/१०/२०१८ | दि.१२/१०/२०१७ रोजीचे वैद्यकीय प्रमाणपत्रानुसार पात्र | १२/१०/२०१८ |
| ०३ | श्री.विजय काशिनाथ दाभाडे | १. बी.कॉम (पुणे विद्यापीठ)<br>२. एमएस- सीआयटी<br>३. टायपींग इंग्लिश ४०प्र.श.प्र.मि. मराठी ३० प्र.श.प्र.मि.<br>४. Tally | जा.नं.एसएसएस/ साप्रशा-आस्था/ ३७५५/२०१७ दि.१२/१०/२०१७ | लेखाशाखा विभाग | १२/१०/२०१७ | ११/१०/२०१८ | दि.२४/१०/२०१७ रोजीचे वैद्यकीय प्रमाणपत्रानुसार पात्र | १२/१०/२०१८ |
| ०४ | श्री.राहुल अशोक गोडगे | १. बी.ए. (मुक्त विद्यापीठ, नाशिक)<br>२. एमएस-सीआयटी<br>३. टायपींग इंग्लिश ४०प्र.श.प्र.मि. मराठी ३० प्र.श.प्र.मि.<br>४. Tally | जा.नं.एसएसएस/ साप्रशा-आस्था/३७६० /२०१७ दि.१२/१०/२०१७ | श्री साईनाथ रुग्णालय | १२/१०/२०१७ | ११/१०/२०१८ | दि.२४/१०/२०१७ रोजीचे वैद्यकीय प्रमाणपत्रानुसार पात्र | १२/१०/२०१८ |

उपरोक्त कर्मचा-यांचे एक वर्षाचे परिवीक्षाधीनकालावधीमध्ये काम व वर्तणूक कशी आहे ? ते हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात किंवा कसे ? त्यांचे बाबतीत काही प्रकरणे चालू अथवा प्रस्तावीत आहेत काय ? त्यांना सेवेत कायम करावे अगर कसे ? याबाबत संबंधित विभागाचे प्रशासकीय अधिकारीयांचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये अभिप्राय मागविणेत आलेले होते.

(ब) त्यानुसार उपरोक्त कर्मचारी सध्या विभागांमध्ये कार्यरत आहेत, त्या विभागांचे प्र. वैद्यकीय अधिक्षिका, श्री साईनाथ रुग्णालय, मुख्य लेखाधिकारी, लेखाशाखा व प्र. प्रशासकीय अधिकारी, रुग्णालये विभाग यांनी संबंधित कर्मचा-यांचे काम, वर्तणूक व इतर बाबींबाबत दिलेले सर्वसाधारणअभिप्राय खालीलप्रमाणे आहे -

" .. ..परिवीक्षाधिन कालावधीमध्ये सदर कर्मचा-यांची कामे व वर्तणूक उत्तम आहे. ते नेमून दिलेली कामे योग्य रितीने करत आहेत. त्यांचे विरुध्द कुठलीही प्रकरणे चालू नाहीत अथवा प्रस्तावीत नाहीत. त्यांची लिपीक - टंकलेखक या पदावर सेवा चालू ठेवणेस हरकत नाही."

तसेच दिनांक ०१ जानेवारी, २०१५ रोजी लागू करणेत आलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी (सर्वसाधारण सेवा अटी) विनियम, २०१३ मध्ये प्रकरण ०४ (०२) परिवीक्षा यामध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे -

".. .. १५. परिवीक्षा कालावधी – प्रतिनियुक्तीवरनियुक्त केलेल्या कर्मचा-याचा अपवाद वगळतां, संस्थानाच्या प्रत्येक  कर्मचा-याला संस्थानाच्या सेवेत प्रथम नियुक्ती झाल्यानंतर नियुक्तीच्या तारखेपासुन सुरु होणारा आणि एक वर्षापेक्षा कमी नाही एवढा परिवीक्षा कालावधी पुर्ण करावा लागेल. जो पर्यन्त नियुक्ती प्राधिकारी लेखी स्वरुपात कळवत नाहीत तो पर्यन्त परिवीक्षा कालावधी चालू राहिल आणि तो समाप्त झाला असे मानले जाणार नाही. "

उपरोक्त बाबींचा विचार करतां, वरील परिशिष्टात नमुद केलेल्या व अनुकंपा तत्वावर नेमणूक करणेत आलेल्या लिपीक-टंकलेखक पदावरील ०४ कर्मचा-यांना संस्थान सेवेत कायम करता येईल, असे मत आहे.

**(क) प्रस्ताव-** उपरोक्त**परिच्छेद अ** व **ब** मध्ये नमुद केलेप्रमाणे, अनुकंपा तत्वावर नेमणूका देणेत आलेल्या परिशिष्टात नमुद केलेल्या लिपीक -टंकलेखक पदावरील ०४ कर्मचा-यांविषयी प्र. वैद्यकीय अधिक्षिका, श्री साईनाथ रुग्णालय, मुख्य लेखाधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, लेखाशाखा व प्र. प्रशासकीय अधिकारी, रुग्णालये विभाग यांनी दिलेले अभिप्राय व सर्वसाधारण सेवा अटी विनियमातील तरतुद विचारात घेऊन, वरील अ.नं.०१ ते ०४ चे अनुकंपा तत्वावर नेमणूका देणेत आलेल्या कर्मचा-यांना स्तंभ क्र.०९ मध्ये नमूद केलेप्रमाणे दिनांक १२ ऑक्टोबर, २०१८ पासून लिपीक - टंकलेखक या पदावर वेतन बॅन्ड रुपये ५२००-२०२०० + ग्रेड वेतन रु.१९०० या वेतनश्रेणीत संस्थान सेवेत कायम करणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.६७० **यावर सविस्तर चर्चा होऊन, अनुकंपा तत्वावर नेमणूका देण्यात आलेल्या लिपीक -टंकलेखक पदावरील ०४ कर्मचारी श्री.विशाल इंद्रभान देशमुख, श्रीमती रुपाली सोमनाथ मराठे, श्री.विजय काशिनाथ दाभाडे व श्री.राहुल अशोक गोडगे यांना प्र. वैद्यकीय अधिक्षिका व प्रशासकीय अधिकारी यांनी दिलेले अभिप्राय व सर्वसाधारण सेवा अटी विनियमातील तरतुद विचारात घेऊन दिनांक १२ ऑक्टोबर, २०१८ पासून लिपीक-टंकलेखक या पदावर वेतन बॅन्ड रुपये ५२००-२०२००+ ग्रेड वेतन रु.१९०० या वेतनश्रेणीत संस्थान सेवेत कायम करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्र.अधिक्षक,सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३४ सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागातील कडधान्य व किराणा मालाचे घट-तुटीबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद- २१(१) (घ) - सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनियममधील २१ (१)घ नुसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद आहे.

प्रस्तावना– लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागांतर्गत श्रीं चे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांचे गर्दीनुसार दररोज सरासरी अंदाजे ४० ते ५० हजार मोफत बुंदी प्रसाद पाकीटे तसेच सरासरी २५ ते ३० हजार लाडु प्रसाद पाकीटांची निर्मिती विक्री केली जाते. श्रींचे उत्सवामध्ये ही संख्या वाढुन अंदाजे ६५ ते ७० हजार मोफत बुंदी प्रसाद पाकीटांचे वाटप केले जाते व अंदाजे ४० ते ५० हजार लाडु प्रसाद पाकीटांची विक्री केली जाते. याकामी लागणारे कडधान्य (हरभरा दाळ) मशिनव्दारे व मनुष्यबळाव्दारे दाळीमध्ये निघणा-या काडया ,खडे काढुन स्वच्छ करण्यात येते व त्यानंतर पीठ गिरणीवर सदरची  हरभरा दाळ दळुन घ्यावी लागते, दाळ दळल्यानंतर तिच्या वजनामध्ये घट-तुट येते.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७.०७.२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५६० (३१) अन्वये, सन २००७-०८ या आर्थिक वर्षात आलेली प्रत्यक्ष घट/तुट खर्ची टाकण्यात आली होती. मात्र सदरील घट-तुटीस मान्यता देतांना अंतर्गत लेखापरीक्षक - मा.श्री ए.जी.लोंगाणी व मुख्यलेखाधिकारी यांनी पुढील कालावधीसाठी खालीलप्रमाणे

सुचना (नियमावली) सुचविलेली होती त्यास मा.व्यवस्थापन समितीने दि.०७/०७/२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५६० (३१) नुसार मान्यता मिळालेली आहे.

१. सन २००७-०८ मध्ये प्रसादालयात प्रत्यक्ष आलेली घट-तुट इतर देवस्थान व संस्था यांचेकडील प्रचलित घट-तुटीचे प्रमाण पाहता आपलेकडील आलेली सरासरी घट-तुट योग्य असुन इतरांचे तुलनेने कमी असल्याने प्रस्तावित प्रमाणानुसार घट-तुट जमा-नांवे टाकणेत यावी.
२. दर ६ महिन्यांनी प्रत्यक्ष मालाचा साठा व रजिष्टरप्रमाणे दिसणारा साठा याची पडताळणी करावी.
३. दर ६ महिन्यानंतर प्रत्यक्ष शिल्लक माल व रजिष्टरप्रमाणे दिसणारा साठा याची तपासणी केल्यानंतर तपासणी अंती आलेली घट-तुट प्रस्तावित सरासरी पेक्षा कमी आढळल्यास त्याबाबतचा अहवाल मा.व्यवस्थापन समितीसमोर अवलोकनार्थ सादर करावा, मात्र प्रस्तावित सरासरीपेक्षा आलेली घट-तुट जादा असेल तर त्यास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी.

उपरोक्तप्रमाणे नियमावलीनुसार दरवर्षी लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागातील एकुण खर्ची पडलेल्या किराणा मालातील प्रत्यक्ष आलेली घट-तुटीस मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणेत आलेली आहे.

**सन २०१७-१८ मध्ये कडधान्य व किराणा मालामध्ये आलेल्या घट-तुटीचा तपशिल**
**(कालावधी दिनांक -०१/०४/२०१७ ते दिनांक -३१/०३/२०१८)**

| दिनांक | किराणा मालाचा तपशिल | आवक किराणा माल | खर्च झालेला किराणा माल | प्रत्यक्ष आलेली घट-तुट | घट-तुटीचे प्रमाण (प्रती क्विंटल) | मान्य घट-तुटीचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | किलो ग्रॅम | किलो ग्रॅम | किलो ग्रॅम | किलो ग्रॅम | किलो ग्रॅम |
| दि.०१/०४/२०१७ ते दि.३१/०३/२०१८ | हरभरा दाळ | ६२४१५९.५०० | ६२१६७५.५०० | २०८४.०० | ०.३३४ ग्रॅम | ०२ .०० |
| दि.०१/०४/२०१७ ते दि.३१/०३/२०१८ | हिरवी विलायची | २५४२.०५० | २५०५.०५० | ११.०० | ०.४३३ ग्रॅम | ०१.०० |

मागणी- सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये प्रत्यक्ष शिल्लक किराणा मालाचा साठा व रजिस्टरप्रमाणे खर्ची पडलेला किराणा माल याची तपासणी करण्यात आली होती.

उपरोक्त तक्त्यातील घट-तुटीचे अवलोकन करता प्रत्यक्ष आलेंली घट-तुट ही मान्य असलेल्या घट-तुटीच्या प्रमाणापेक्षा कमी आलेली आहे. त्यामुळे सदरील घट-तुट नांवे टाकण्याच्या नियमावली क्र.०३ नुसार घट-तुटीचा वस्तुनिष्ठ अहवाल मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ सादर करावा लागणार आहे.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय व मत– लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडील दि.०१/०४/२०१७ ते दि.३१/०३/२०१८ या कालावधीत कडधान्य व किराणा मालात झालेल्या घट-तुट ही मा.मुख्यलेखाधिकारी तसेच अंतर्गत लेखापरीक्षक यांनी सुचविलेल्या सुचनास (नियमावली अधीन राहुन) आहे, तसेच मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार मान्य घट-तुटीचे प्रमाणापेक्षा कमी आहे. तरी सदरच्या अहवालाची मान्यता घेणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे योग्यत्या निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.६७१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडील दि.०१/०४/२०१७ ते दि.३१/०३/२०१८ या कालावधीत कडधान्य व किराणा मालात झालेल्या घट-तुटीच्या तपशिलाचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली.** **(कार्यवाही-प्र.अधिक्षक,लाडू प्रसाद निर्मिती विभाग)**

---

**विषय नं.३५** **मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे शिर्डी दौऱ्याकामी संस्थानचे हेलिपॅडवर स्मोक निर्मितीसाठी स्मोक कॅन्डल खरेदी बाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद – सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रं.१४ मधील ३५५ (घ) साईभक्तांच्या सुरतिक्षततेसाठी किंवा सोसायटी आवश्यक ते तातडीचे दुरुस्ताचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे.

मा.पंतप्रधान ,भारत सरकार ,नवी दिल्ली हे दि १९.१०.२०१८ रोजी शिर्डी ता राहाता येथे दौ-यावर येणार आहेत.त्यांचे समवेत मा.राज्यपाल म.रा.मुंबई व मा.मुख्यमंत्री म.रा.मुंबई हे उपस्थीत राहाणार असुन त्यांचे सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन सर्व मान्यवर यांना " झेड प्लस " वर्गवारीची सुरक्षा असल्याने दि.१२.१०.२०१८

रोजीचे मा.पोलिस महासंचालक श्री कृष्ण प्रकाश व मा.जिल्हाधिकारी सो यांचे समवेत झालेल्या सभेमध्ये मा.पंतप्रधान यांचे हेलिकॉप्टर लॅण्डींगकरीता स्मोक जनरेटरची / स्मोक कॅन्डलची व्यवस्था करणेबाबत फायर ॲण्ड सेफ्टी विभागास सुचित करण्यात आलेले आहे. तसेच दि.१५.१०.२०१८ रोजीचे मा.जिल्हाधिकारी यांचे कार्यालयाचे पत्र प्राप्त झाले असून सदर पत्रामध्ये स्मोक जनरेटर / स्मोक कॅन्डल व्यवस्था करणेबाबत नमुद केलेले होते. मा.मु. का.अ.महोदया यांनी तातडीने स्मोक जनरेटर / स्मोक कॅन्डल खरेदी करणेबाबत फायर ॲण्ड सेफ्टी विभागास सुचना देण्यात आलेली होती.

त्यानुसार फायर ॲण्ड सेफ्टी विभागामार्फत स्मोक जनरेटरबाबत चौकशी केली असता सदर उपकरण अहमदनगर मुंबई , नाशिक येथे तातडीने उपलब्ध होत नसल्याने यापुर्वी संस्थानकरीता फायर साहित्य पुरविलेले इंटरगल सेफ्टी इंजि.डोंबिवली या कंपनीस ०२ नग स्मोक कॅन्डल तातडीने उपलब्ध करुन देणेबाबत विचारले असता त्यांनी ०१ स्मोक कॅन्डलची किंमत ५०००/- याप्रमाणे ०२ नग स्मोक कॅन्डलचे बील १०,०००/- व त्यावर १८% GST याप्रमाणे ( ११,८००/-) इतकी होईल असे सांगितले होते. मा.पंतप्रधान महोदय यांचे शिर्डी दौ-याकामी मा.पोलिस महासंचालक , मा.जिल्हाधिकारी व मा.मु.का.अ.महोदय यांनी सुचित केलेप्रमाणे सदरचे उपकरणे तातडीने घेणे आवश्यक असल्याने इंटरगल सेफ्टी इंजि. यांचे तातडीने कुरिअर व्दारे संस्थानचे फायर ॲण्ड सेफ्टी विभागाने मागवून घेतलेले आहे. सदर उपकरणांपैकी दि.१८.१०.२०१८ रोजी ०१ स्मोक कॅन्डलची भारतीय वायूदल अधिकारी यांचेमार्फत चाचणी घेण्यात आली व उर्वरीत ०१ नग स्मोक कॅन्डल मा.पंतप्रधान महोदय यांचे हेलिकॉप्टर लॅण्डींगकरीता वापरण्याचे वायुदल अधिकारी यांनी सुचित केले होते. परंतु दि.१९.१०.२०१८ रोजी भारतीय वायूदल कमांडट यांनी MIRC नगर यांचे कडील स्मोक कॅन्डल वापरले असलेमुळे ०१ नग स्मोक कॅन्डल फायर ॲण्ड सेफ्टी विभागाकडे शिल्लक आहे. इंटरगल सेफ्टी इंजि. डोंबिवली यांचे आवक क्रं ०१४३९८ दि.२०.१०.२०१८ रोजीचे बील इकडील कार्यालयांस प्राप्त झालेले आहे.

आता दि.०५.१०.२०१८ रोजीचा मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्रं.०३ निर्णय क्रं.६१५ नुसार मा.पंतप्रधान भारत सरकार यांचे शिर्डी येथील दौ-याचे निमित्ताने करावयाच्या कार्यक्रमाचे नियोजनासाठी उपरोक्त तपशिलात नमुद केल्याप्रमाणे संबधीत विभागाने करावयाचे कामास व त्यासाठी येणा-या अंदाजे रक्कम रु.२,४५,३०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली तसेच सदर कार्यक्रमाकरीता ऐनवेळी करावी लागणारी आवश्यक ती कामे करण्यासव त्याकामी येणा-या अंदाजे खर्चास मान्यता देण्यात आली.

विभागाचा अभिप्राय- मा.पंतप्रधान ,भारत सरकार यांचे शिर्डी दौ-याकामी मा.पोलिस महासंचालक , मा.जिल्हाधिकारी व मा.मु.का.अ.महोदया यांनी मा.पंतप्रधान,भारत सरकार यांचे हेलिकॉप्टर लॅण्डींग तातडीने स्मोक निर्मितीसाठी स्मोक कॅन्डलचे खरेदी करणेबाबत फायर विभागास आदेश करण्यात आलेला होता त्यानुसार फायर विभागाने यापुर्वी संस्थानकरीता फायर साहित्य पुरविलेले इंटरगल सेफ्टी इंजि.डोंबिवली यांचेकडून सदरचे उपकरणे खरेदी केलेले आहे. मा.व्य.समितीचे निर्णयानुसार मा.पंतप्रधान भारत सरकार यांचे शिर्डी दौ-याकामी ०२ नग स्मोक कॅन्डल ऐनवेळी फायर विभागाने खरेदी केलेले असून सदरकामी रक्कम रु.११,८००/- इतका खर्च माहितीस्तव व मान्यतेस्तव मा.व्यवस्थापन समितीचे सभुपढे सादर करणे आवश्यक आहे असे नम्र मत आहे.

करीता....

अ. मा.पंतप्रधान ,भारत सरकार यांचे शिर्डी दौ-याकामी ०२ नग स्मोक कॅन्डलचे खरेदीकामी आलेला ११,८००/- इतका खर्च माहितीस्तव व मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.६७२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे शिर्डी दौऱ्याकामी संस्थानचे हेलिपॅडवर स्मोक निर्मितीसाठी स्मोक कॅन्डल खरेदीसाठी आलेल्या रक्कम रु.११,८००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- फायर ॲन्ड सेफ्टी विभागप्रमुख)**

---

**विषय नं.३६** **अग्निशमन वाहन (वॉटर बाऊझर) बॉडी बांधणी कामी री टेंडर प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या वाढीव खर्चास शासन मान्यता घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** **कायदयातील तरतुदी** - अधिनियम २००४ मधील तरतुद – १७ सर्वसाधारणपणे , विश्वस्त व्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन , देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील. असे नमूद आहे.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये संस्थानकरीता अदयावत अग्निशमन वाहन खरेदी व वाहनातील साहित्य खरेदीकामी मा व्यवस्थापन समितीचे दि २०.०८.२०१७ चे सभेतील आयत्या वेळचा विषय क्र ३८ व निर्णय क्र ७२२ नुसार ९५,०२,४९६/- खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार संस्थानचे वाहन विभागामार्फत भारत

बेंझ कंपनीची चेसी रु.२३,५९,०००/- खरेदी करणेत आलेली असून एकूण मंजुर रकमेपैकी रु. ७१,४३,४९६/- रक्कम बॉडी बांधणी व इतर आवश्यक साहित्य खरेदीकामी शिल्लक आहे.

संस्थानचे खेरदी करण्यात आलेल्या भारत बेंझ चेसीवर बॉडी बांधणी व इतर साहित्य खरेदी करणेकामी महाराष्ट्र शासनाचे अधिकृत वेबसाईट www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर ई निविदा प्रसिध्द करण्यात आलेली होती. अग्निशमन वाहन बॉडी बांधणी व वाहनांतील साहित्याबाबत कमर्शिअल बीड दि.२९.०६.२०१८ रोजी उघडण्यात आले. त्यानुसार खालील तिन पुरवठाधारकांचे दर प्राप्त झालेले आहे.

| अ.नं. | पुरवठाधारकांचे नाव | निविदा रक्कम |
|---|---|---|
| ०१ | HI TECH SERVICES | १,७६,१८,६००/- |
| ०२ | WADIA BODY BUILDERS | २०४,५६,५००/- |
| ०३ | N K FIRE & SAFETY | १,९६,२३,८३०/- |

उपरोक्त तीन बॉडी बांधणीधारकांनी दिलेल्या दरापैकी अ.नं. ०१ हायटेक सर्व्हीसेस,पुणे यांचे दर न्युनतम दर आहे. परंतू संदर्भ क्र. १ मधील मंजुर रकमेपेक्षा न्युनतम दरधारक यांचे दर खुपच जास्त असलेकारणाने मा.उपजिल्हाधिकारी यांनी महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, सातांक्रुज मुंबई यांचेमार्फत अग्निशमन वाहन खरेदीबाबत माहिती घ्यावी असे सुचित केलेप्रमाणे उपरोक्त संदर्भ क्रं ०४ नुसार अग्निशमन सेवा संचालनालय,सातांक्रुझ मुंबई यांचेशी पत्रव्यवहार करण्यात आलेला होता.

महाराष्ट्र राज्य अग्निशमन सेवा संचालनालय , सातांक्रुझ मुंबई यांचा मेल इकडील कार्यालयास प्राप्त झाला असुन सदर पत्रामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करणेबाबत सुचित केलेले आहे.

| अ.नं. | तपशिल | अंदाजे (GST सह ) रक्कम |
|---|---|---|
| ०१ | वॉटर टॅकची बांधणी SS304 या धातुपासुन करण्याचे नमुद केलेल असून या वाहनाचा सेवा कालावधी ( कमीत कमी १५ वर्षे ) लक्षात घेता पाण्याची टाकी MS या धातुपासून बनविल्यास ती किफायतशीर होईल व त्यानुसार तांत्रिक तपशीलामध्ये योग्य तो बदल करण्यात यावा. | ४५,००,०००/- |
| ०२ | शिर्डी संस्थान यांच्या येथे असलेले आगीचे धोके लक्षात घेता या वाहनाबरोबर १५ मीटर उंचीचे बुम आर्मची आवश्यकता नाही. परंतु या बाबतीत स्थानिक अग्निशमन अधिकारी यांनी याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा व त्याबाबत तांत्रिक तपशिलामध्ये योग्य तो बदल करावा. | |
| ०३ | या वाहनाचा होणार उपयोग लक्षात घेतात ॲटो रिवाईड होजरील ऐवजी साध्या होजरील घ्याव्या ज्यामुळे वाहनाची किमंत व परिक्षण खर्च यामध्ये बचत होईल. | |
| ०४ | या वाहनाच्या तांत्रिक तपशिलामध्ये कंट्रोल पॅनल दोन ठिकाणी नमुद करण्यात आले असून त्यामध्ये योग्य तो ती दुरुस्ती करण्यात यावी. | |
| ०५ | तांत्रिक तपशिलमध्ये लाईट मास्ट या उपकरणाचे सविस्तर तांत्रिक तपशिल देण्यात यावा व या मास्टरकरीता हॅलोजनऐवजी LED लाईट वापरण्यात यावे. | |
| ०६ | तांत्रिक तपशिलामध्ये नमुद केल्याप्रमाणेसर्व कॅमेरा व थर्मल इमेजिंग कॅमेरा या दोन वेगवेगळया वस्तू असून या वस्तुंची आवश्यकता आहे किंवा कसे याबाबत स्थानिक अग्निशमन अधिकारी यांनी निर्णय घ्यावा व त्यानुसार त्या वस्तुंचे सविस्तर तांत्रिक तपशिल नमुद करावे. | |
| ०७ | Annexure – II उपकरणांच्या यादीमध्ये Asbestos Gauntlets हे साहित्य वगळण्यात यावे. | |
| | **एकुण रक्कम** | ४५,००,०००/- |

उपरोक्त अ.नं. ०१ ते ०७ प्रमाणे अग्निशमन सेवा संचालनालय यांचेकडुन प्राप्त झालेल्या पत्रामध्ये नमुद करण्यात आलेले आहे. अग्निशमन सेवा संचालनालय यांचे कार्यायलयाने सुचित केलेप्रमाणे अग्निशमन

वाहनाची बॉडी बांधणी केल्यास अंदाजे रक्कम रु ४५ लाख (GST सह ) किमंत कमी होवून सदरचे अग्निशमन वाहनाचे बॉडी बांधणीस १ कोटी ३० लाख पर्यत खर्च अपेक्षित आहे.

विभागाचा अभिप्राय– अग्निशमन सेवा संचालनालय, सातांक्रुझ मुंबई यांनी सुचित केलेप्रमाणे अग्निशमन वाहनाची बॉडी बांधणी केल्यास पुर्वीचे टेंडरमध्ये बदल केल्यास अग्निशमन वाहनाचे बॉडी बांधणीचा खर्च ४५ लाख पेक्षा कमी होवून नवीन स्पेशिफिकेशन प्रमाणे बॉडी बांधणीचा खर्च अंदाजे १ कोटी ३० लाख इतका अपेक्षित आहे. मा.व्यवस्थापन समितीचे मंजुर रक्कमेपेक्षा अंदाजे ३५ लाख इतकी वाढीव रक्कम अपेक्षित असल्याने सदर अग्निशमन वाहनाचे रि.टेंडर करणेस व वाढीव खर्चाची रक्कम १ कोटी पेक्षा जास्त होत असले मुळे सदर खर्चास शासनाची मान्यता घेणेकामी सदर प्रस्तावास मा.व्य.समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. तसेच शासनाची वाढीव खर्चास मान्यता मिळेपर्यत संस्थानमार्फत अग्निशमन वाहनाची बॉडी बांधणी करीता रि टेंडर प्रक्रिया राबविता येईल असे नम्र मत आहे.

करीता...

अ. अग्निशमन वाहन बॉडी बांधणीचे वाढीव खर्चाची रक्कमेसह अंदाजे १ कोटी ३० लाख खर्चास शासनाची मान्यता घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्य.समितीपुढे सादर.

ब. वाढीव रकमेस शासनाची मान्यता मिळेपर्यत अग्निशमन सेवा संचालनालय,मुंबई यांनी सुचित केलेप्रमाणे सदर साहित्य कमी करुन अग्निशमन वाहन बॉडी बांधणीकरीता रि टेंडर प्रक्रिया राबविणेस तसेच प्रस्ताव मा.व्य.समितीपुढे सादर..

उपरोक्त **अ** आणि **ब** प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता असावी.

निर्णय क्र.६७३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, अग्निशमन सेवा संचालनालय, सातांक्रुझ मुंबई यांनी सुचित केल्यानुसार नवीन स्पेशिफिकेशन प्रमाणे बॉडी बांधणीसाठी वाढीव खर्चाचे रकमेसह येणाऱ्या अंदाजे १ कोटी ३० लाख खर्चास मान्यता देण्यात आली. याकामी शासनाचे मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविण्यात यावा, असे ठरले. तसेच शासनाची मान्यता मिळेपर्यत अग्निशमन सेवा संचालनालय,मुंबई यांनी सुचित केल्याप्रमाणे सदर साहित्य कमी करुन अग्निशमन वाहन बॉडी बांधणीकरीता फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- फायर ॲन्ड सेफ्टी विभागप्रमुख)**

---

विषय नं.३७ **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये ऑगस्ट २०१८ महिन्यात वैद्यकीय बीलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.९७,१८,२४४/- ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकिय बिलात सवलत देण्या संबंधित मा.व्य.स.निर्णय क्र.५१९/दि.२४.०७.२०११ संमत झाला आहे. वैद्यकिय बिलात सवलत देण्याचे अधिकार उप.वै.संचालक/वै.संचालक यांना देण्यात आलेले आहेत त्यांचे गैर हजेरीत वै.प्रशासक/जनसंपर्क अधिकारी यांना अधिकार सुपुर्त् करण्यात येऊन रुग्णांना मासिक वैद्यकिय बिलात सवलत देण्यात येते.

सोशल वर्कर हे रुग्णांची आर्थिक परिस्थीती जाणून घेतात व आवश्यक कागदपत्रांसह सवलत मंजुरी करीता प्रस्तावीत करतात. अशा प्रकारे हॉस्पिटलमध्ये वैद्यकिय बिलात सवलत देण्याकरीता स्वतंत्र विभाग कार्यरत आहे. निर्णय क्र.५६४/२६.०६.२०१४ अन्वये प्रत्येक महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मा.कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेण्यात येऊन आर्थिक वर्षाच्या शेवटी एकत्रित अहवाल मा.व्य.स.चे सभे समोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावा असे ठरले आहे. माहे सप्टेंबर २०१७ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मान्यतेचे प्रस्तावावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दर महा मा.व्य.समिती सभेसमोर सादर करण्यास शेरा दिला आहे. त्याप्रमाणे माहे **ऑगस्ट २०१८** मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलला ओपीडी रुग्ण **१५,४६०** व **१,१०३** आयपीडी रुग्णांपैकी **३,६५३** ओपीडी व ६५६ आयपीडी रुग्णांना वैद्यकिय बिलात एकुण**रु.९१,०३,८४४/-** इतकी सवलत देण्यात आली व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकीय बिलात सवलत देण्या संबंधीत मा.व्य.स.निर्णय क्रं.३४६/दि.१८-१९.०८.२००१ संमत झाला आहे, जा.नं.एसएसएस/एसएसएच/३३१/२०१७ दि.३०.०३.२०१७ आदेश. दि.०६.०३.२०१० ची सिकल सेल आजाराच्या रुग्णांना मोफत रक्त देणेबाबत टिपणी प्रमाणे एकुण **३७४** रुग्णाना रक्कम **रु.६,१४,४००/-** इतकी मोफत/सवलत देण्यात आली आहे. सवलत/मोफतचे विवरण खालील प्रमाणे–

### (अ) श्री साईबाबा हॉस्पिटल

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | गरीब/दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १८१ | १८,६१,०७४/- | - | १८,६१,०७४/- |
| २ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ३२५ | ३०,७४,०२२/- | १३,४९,६८४/- | १७,२४,३३८/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १० | ११,१६१/- | - | ११,१६१/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्य योजना इ. | ७०५ | ४८,३८,०३१/- | ३०,०६,८३६/- | १८,३१,१९५/- |
| ५ | महात्मा फुले आरोग्या योजना आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३२७ | १,४६,४२,०४६/- | १,२४,७८,४६०/- | २१,६३,५८६/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २,७६१ | १५,१२,४९०/- | - | १५,१२,४९०/- |
| | **एकुण** | ४,३०९ | २,५९,३८,८२४/- | १,६८,३४,९८०/- | ९१,०३,८४४/- |

### (ब) श्री साईनाथ रक्तपेढी

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | थॅलॅसिमिया | ४५ | ५५,४००/- | - | ५५,४००/- |
| २ | हिमोफिलीया | ० | - | - | - |
| ३ | सिकल सेल अॅनेमीया फ्रि | ० | - | - | - |
| ४ | फ्रि डन बाय एमएडी/एमएस | ९ | ११,४००/- | - | ११,४००/- |
| ५ | व्हॉलंटरीब्लड डोनेशन फ्रि | २५ | ३,६००/- | - | ३,६००/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना | १४५ | ३,५८,०००/- | - | ३,५८,०००/- |
| ७ | संस्थान एम्प्लॉयी फ्रि | ७ | ८,०००/- | - | ८,०००/- |
| ८ | कॉन्ट्रक्ट एम्प्लॉयी फ्रि | २ | १,२००/- | - | १,२००/- |
| ९ | श्री साईनाथ हॉस्पिटल फ्रि | १४१ | १,७६,८००/- | - | १,७६,८००/- |
| | **एकुण** | ३७४ | ६,१४,४००/- | - | ६,१४,४००/- |
| | **एकुण अ+ब** | ४,६८३ | २,६५,५३,२२४/- | १,६८,३४,९८०/- | ९७,१८,२४४/- |

प्रस्ताव - उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये **ऑगस्ट २०१८** मध्ये वैद्यकिय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहित पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम **रु.९७,१८,२४४/-** ची नोंद घेऊन दिलेल्या सवलतीस मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.६७४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये ऑगस्ट २०१८ महिन्यात वैद्यकीय बीलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.९७,१८,२४४/- मात्र तपशिलाचे अवलोकन करुन त्यास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३८** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये सप्टेंबर २०१८ महिन्यात वैद्यकीय बीलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.८०,६८,९४३/- ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकिय बिलात सवलत देण्या संबंधित मा.व्य.स.निर्णय क्र.५१९/दि.२४.०७.२०११ संमत झाला आहे. वैद्यकिय बिलात सवलत देण्याचे अधिकार उप.वै.संचालक/ वै.संचालक यांना देण्यात आलेले आहेत त्यांचे गैर हजेरीत वै.प्रशासक/जनसंपर्क अधिकारी यांना अधिकार सुपुर्त करण्यात येऊन रुग्णांना मासिक वैद्यकिय बिलात सवलत देण्यात येते.

सोशल वर्कर हे रुग्णांची आर्थिक परिस्थीती जाणून घेतात व आवश्यक कागदपत्रांसह सवलत मंजुरी करीता प्रस्तावीत करतात. अशा प्रकारे हॉस्पिटलमध्ये वैद्यकिय बिलात सवलत देण्याकरीता स्वतंत्र विभाग कार्यरत आहे. निर्णय क्र.५६४/२६.०६.२०१४ अन्वये प्रत्येक महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मा.कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेण्यात येऊन आर्थिक वर्षाच्या शेवटी एकत्रित अहवाल मा.व्य.स.चे सभे समोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावा असे ठरले आहे. माहे सप्टेंबर २०१७ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मान्यतेचे प्रस्तावावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दर महा मा.व्य.समिती सभेसमोर सादर करण्यास शेरा दिला आहे. त्याप्रमाणे माहे **सप्टेंबर २०१८** मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलला ओपीडी रुग्ण **१४,६३८** व ९७९ आयपीडी रुग्णांपैकी **२,७२३** ओपीडी व ५९७ आयपीडी रुग्णांना वैद्यकिय बिलात एकुण**रु.७५,०४,१४३/-** इतकी सवलत देण्यात आली व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकीय बिलात सवलत देण्या संबंधीत मा.व्य.स.निर्णय क्रं.३४६/दि.१८-१९.०८.२००१ संमत झाला आहे, जा.नं.एसएसएस/एसएसएच/३३१/२०१७ दि.३०.०३.२०१७ आदेश. दि.०६.०३.२०१० ची सिकल सेल आजाराच्या रुग्णांना मोफत रक्त देणेबाबत टिपणी प्रमाणे एकुण **३८९** रुग्णाना रक्कम **रु.५,६४,८००/-** इतकी मोफत/सवलत देण्यात आली आहे. सवलत/मोफतचे विवरण खालील प्रमाणे–

**(अ) श्री साईबाबा हॉस्पिटल**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | गरीब/दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ७५ | ११,२७,८५३/- | - | ११,२७,८५३/- |
| २ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ११० | २६,९६,९७३/- | ११,२७,१४१/- | १५,६९,८३२/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ०६ | १३,२६१/- | ३५०/- | १२,९११/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्ययोजना इ. | ४७९ | ४१,१०,३८७/- | २,३५,५४,९७६/- | १७,५५,४११/- |
| ५ | महात्मा फुले आरोग्या योजना आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २८५ | १,२८,६३,६५६/- | १,१०,५५,५००/- | १८,०८,१५६/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २,३६५ | १२,२९,९८०/- | - | १२,२९,९८०/- |
| | **एकुण** | **३,३२०** | **२,२०,४२,११०/-** | **१,४५,३७,९६७/-** | **७५,०४,१४३/-** |

**(ब) श्री साईनाथ रक्तपेढी**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | थॅलॅसिमिया | ३७ | ४०,२००/- | - | ४०,२००/- |
| २ | हिमोफिलीया | ० | - | - | - |
| ३ | सिकल सेल ॲनेमीया फ्रि | ० | - | - | - |
| ४ | फ्रि डन बाय एमएडी/एमएस | ८ | १०,४००/- | - | १०,४००/- |
| ५ | व्हॉलंटरीब्लड डोनेशन फ्रि | ५१ | ६,२००/- | - | ६,२००/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना | १२६ | २,८०,४००/- | - | २,८०,४००/- |
| ७ | संस्थान एम्प्लॉयी फ्रि | ७ | १३,०००/- | - | १३,०००/- |
| ८ | कॉन्ट्रक्ट एम्प्लॉयी फ्रि | १ | ६००/- | - | ६००/- |
| ९ | श्री साईनाथ हॉस्पिटल फ्रि | १५९ | २,१४,०००/- | - | २,१४,०००/- |
| | **एकुण** | ३८९ | ५,६४,८००/- | - | ५,६४,८००/- |
| | **एकुण अ+ब** | **३,७०९** | **२,२६,०६,९१०/-** | **१,४५,३७,९६७/-** | **८०,६८,९४३/-** |

प्रस्ताव- उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये सप्टेंबर २०१८ मध्ये वैद्यकिय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहित पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम **रु.८०,६८,९४३/-** ची नोंद घेऊन दिलेल्या सवलतीस मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.६७५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये सप्टेंबर २०१८ मध्ये वैद्यकिय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहित पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम रु.८०,६८,९४३/- ची नोंद घेऊन सदर खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३९** **दि.१३.०६.२००७ रोजीच्या मंजूर आकृतीबंधानुसार वेतनश्रेणी मिळणेबाबत डॉ.संतोष सुरवसे यांचे अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** मा व्यवस्थापन समितीचा ठराव क्र-

१) मा व्यवस्थापन समिती दि. ११/०८/२००७ रोजीच्या सभेतील निर्णय क्र ६८०(अ) उपरोक्त नेमणूकीस मान्यता देण्यात आली. तसेच याबाबत शासनाने उपरोक्त दि. १३/०६/२००७ चे पत्रान्वये मान्यता दिलेल्या आकृतीबंधानुसार संबंधितांना वेतनश्रेणीवर नेमणूका देण्यात याव्यात व त्यामधील त्रुटींबाबत शासनाकडून मार्गदर्शन घेण्यात यावे असे ठरले.

२) मा व्यवस्थापन समिती दि. १९/०७/२००९ रोजीचे सभेतील निर्णय ६३३. प्रस्तावित केलेप्रमाणे नियमानूसार नेमणूका करण्यास मान्यता देण्यात आली.

३) मा व्यवस्थापन समिती दि. ०६/०३/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र ३२३.शासन नियमानुसार सर्व कन्सल्टंट व वैद्यकिय अधिकारी यांना दि. ०१/०४/२०१० पासून वेतनश्रेणी देणेत यावी, असे ठरले.

४) मा व्यवस्थापन समिती दि. ३०/११/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्र ८७८ निर्णय क्र ८०७ मध्ये झालेल्या चर्चेप्रमाणे श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयाकडील प्रस्तावित श्री अनिल गायकवाड व इतर ९ कर्मचारी यांनाही आकृतीबंध मंजुर झालेल्या तारखेपासुन वेतनश्रेणी लागु करण्यात यावी, असे समितीचे मत झाले.

याबाबत विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मार्गदर्शन घेण्यात येऊन मा उच्च न्यायालयामध्ये वस्तुस्थिती मांडण्यात यावी, असे ठरले.

प्रस्तावनाः- दि. १३/०६/२००७ रोजी मंजुर झालेल्या श्री साईबाबा हॉस्पिटलच्या आकृतीबंधानुसार वेतनश्रेणी मिळणेविषयीचा डॉ सुरवसे यांचा दि. १६/०६/२०१७ रोजीचा अर्ज इकडील कार्यालयास प्राप्त झाला असुन त्यामध्ये त्यांनी खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

"मी विनंतीपुर्वक अर्ज करतो की, आपण ०१ जून २०१७ ला एच आर विभाग रूग्णालये तर्फे जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/९५/२०१७ नुसार हजर तारखेपासुन वेतनश्रेणी मिळणेबाबत केलेला विनंतीपुर्वक अर्ज निकाली काढण्यात आलेले आहे असे कळविले आहे. परंतु त्या पदामध्ये मान्य करता की, श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचा आकृतीबंध दि. १३/०६/२००७ रोजी मंजूर आहे. म्हणजेच माझे पद ही दि. १३/०६/२००७ च्या आकृतीबंधानुसार मंजूर होते. त्या आकृतीबंधात माझे ज्यु इंटेसिव्हीस्ट हे पद क्र ५ ला तर आरएमओचे पद क्र ७५ असा आहे. परंतु पुर्वी मला वेतनश्रेणी देण्यात आलेली आहे. त्या वेतनश्रेणी मधील ऑर्डर मध्ये शासन निर्णय क्र सासंवि २००९/४३३/३७/०९/क्र/१६ मंत्रालय मुंबई दि.०७/०८/२००९ चा व दि. ०६/०३/२०१० रोजीच्या मा व्यवस्थापन सभेतील निर्णयानुसार वेतनश्रेणी लागु करत आहोत असे निदर्शनास येते म्हणजेआपण १० एप्रिल २०१० च्या प्रशासन शाखेचे जा.नं.एसएसएस/वशी-०१/२०५/२०१० चे पत्र चुकीचे आहे असे मला वाटते. कारण यामध्ये दि. १३/०६/२००७ रोजी मंजूर झालेल्या आकृतीबंधाचा आजिबात उल्लेख केलेला नाही. हे हेतू पुरस्कर केलेले दिसत आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटलच्या २००७ आकृतीबंधानुसार इतर सर्व आरएमओ व स्टाफनर्स यांना दि. ११/०८/२००७ च्या सभेतील निर्णय क्र ६८० नुसार वेतनश्रेणी दिलेली आहे. परंतु अद्याप मला तशी वेतनश्रेणी दिलेली नाही. तरी हा माझ्यावर आजपर्यंत अन्यायच झालेला आहे.

तरी मला २००७ च्या आकृतीबंधात मंजूर असलेल्या पदांनुसार व दि. ११/०८/२००७ च्या सभेतील निर्णय क्र ६८० नुसार दि. १३/०६/२००७ पासून वेतनश्रेणी मिळावी, ही नम्र विनंती."

डॉ सुरवसे यांनी दि. १३/०६/२००७ रोजी मंजुर झालेल्या श्री साईबाबा हॉस्पिटलच्या आकृतीबंधानुसार वेतनश्रेणी मिळणेबाबत दि. १४/०८/२०१७ रोजी स्मरणपत्र दिलेले आहे.

डॉ संतोष बब्रुवान सुरवसे यांची जा.नं.एसएसएस/वशी१/७६४३/२००६ दि. १०/०६/२००६ अन्वये मेडीकल ऑफीसर (आरएमओ) या पदावर मासिक रू.१८,०००/- मानधनवर एक वर्ष कालावधीसाठी श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये नेमणूक करणेत आली होती. त्यानुसार ते दि.१०/०६/२००६ रोजी कामावर हजर झालेले

आहेत. तदनंतर जा.नं.एसएसएस/वशी१/१३२४२/२००६ दि. २५/०९/२००६ अन्वये क्लिनीकल असिस्टंट (ॲनेस्थेसिआ) या पदावर मासिक रू.२५,०००/- मानधनवर एक वर्ष कालावधीसाठी श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये नेमणूक करणेत आली होती. त्यानुसार ते दि.०१/१०/२००६ रोजी कामावर हजर झालेले आहेत. तदनंतर मा व्यवस्थापन समिती दि. २८/०७/२००७ रोजीच्या सभेतील निर्णय क्र ५७६(ब) नुसार जा.नं.एसएसएस/वशी०१/२३२२/२००७ दि. ३०/०८/२००७ अन्वये डॉ सुरवसे यांना दि. १०/०६/२००८ अखेर मुदतवाढ देणेत आली. तदनंतर मा व्यवस्थापन समिती दि. ०३/०१/२००९ रोजीच्या सभेतील निर्णय नुसार जा.नं.एसएसएस/वशी०१/१७९५/२००९ दि. ०३/०६/२००९ अन्वये डॉ सुरवसे यांची दि. ०८/०६/२००८ पासून पुढे सेवा चालू ठेवणेत आली आहे. तदनंतर मा व्यवस्थापन समिती दि. १९/०७/२००९ रोजीचे सभेतील निर्णय व मा विश्वस्त डॉ तिवारी यांचे मान्यतेस अनुसरून जा.नं.एसएसएस/वशी०१/४०७६/२००९ दि. २०/११/२००९ अन्वये डॉ सुरवसे यांचे पदनामात क्लिनीकल असिस्टंट (ॲनेस्थेसिआ) ऐवजी ज्यु इंटेसिवीस्ट असा बदल करण्यात आला आहे.

मा व्यवस्थापन समिती दि. ०६/०३/२०१० रोजीचे सभेतील निर्णयानुसार जा.नं.एसएसएस/वशी०१/ १२०५/२०१० दि. १०/०४/२०१० अन्वये याआधी देण्यात आलेल्या नेमणूक आदेशातील अटी-शर्तीस अधीन राहून ६ व्या वेतन आयोगातील मंजूर शिफारसी व वेतनबॅंड रू १५६००-३९१०० मध्ये मूळ वेतन १८७५०/- व ग्रेड वेतन रू.६६००/- दि. ०१/०४/२०१० पासून मंजूर करण्यात आले आहे. डॉ सुरवसे यांना सध्या रू. ३०,०००/- वेतन देण्यात येत होते मात्र उपरोक्त वेतनश्रेणीनुसार एकूण रू २८,२१०/- इतके वेतन देय होत असल्याने रू १७९०/- वैयक्तीक वेतन धरून रू. ३०,०००/- देण्यात येऊन यापुढील वार्षीक वेतवाढी देणेत आलेल्या आहेत.

डॉ. संतोष सुरवसे यांनी हजर तारखेपासून वेतनश्रेणी मिळणेकामी मा मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन नं ६८८४/२०१६ दाखल केले होते. डॉ सुरवसे यांचे सिव्हिल ॲप्लकेशनमधील मागणी व मा न्यायालयाचे दि. ०१/०८/२०१६ रोजीचे आदेशानुसार मा व्यवस्थापन समिती दि. ३०/११/२०१६ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला त्यावर निर्णय क्र ८७८ नुसार श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयाकडील प्रस्तावीत श्री अनिल गायकवाड व इतर ९ कर्मचारी यांनाही आकृतीबंध मंजूर झालेल्या तारखेपासून वेतनश्रेणी लागु करण्यात यावीअसे समितीचे मत झाले याबाबत विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांचे मार्गदशन घेण्यात येऊन मा उच्च न्यायालयामाध्ये वस्तुस्थिती मांडण्यात यावी असे ठरले.

उपरोक्त निर्णयानुसार मा विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांचे दि. १२/०१/२०१७ रोजीचे पत्रान्वये अभिप्राय मागविणेत आले असता मा विधी व न्याय विभाग यांनी शासन निर्णय क्र सासंवि१०१७/१६७/ प्रक्र१६/का१६ दि. १५/०४/२०१७ अन्वये दि. ०५/११/२००५ रोजी घेतलेला निर्णय क्र ६६७ (ब) हा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ च्या कलम ३० मधील तरतुदीनुसार रद्द करण्यात येत असुन सदर शासननिर्णयाच्या प्रभावाने आवश्यक असणारी कार्यवाही कार्यकारी अधिकारी यांचेद्वारे करणेबाबत कळविले आहे.

उपरोक्त शासननिर्णयानुसार एच आर विभाग दि. २०/०५/२०१७ रोजीचे मंजुर टिपणीअन्वये दि.०१/०६/२०१७ रोजीचे पत्रान्वये डॉ संतोष सुरवसे यांना त्यांचे हजर तारखेपासून वेतनश्रेणी मिळणेबाबतचे अर्ज निकाली काढलेबाबत कळविले आहे.

मा. व्यवस्थापन समिती दि. ०६/०३/२०१० रोजीचे सभेतील निर्णयानुसार जा.नं.एसएसएस /वशी०१/ १२०५/२०१० दि.१०/०४/२०१० अन्वये याआधी देण्यात आलेल्या नेमणूक आदेशातील अटी शर्तीस अधीन राहून ६ व्या वेतन आयोगातील मंजूर शिफारसी व वेतनबॅंड रू १५६००-३९१०० मध्ये मूळ वेतन १८,७५०/- व ग्रेड वेतन रू.६,६००/- दि. ०१/०४/२०१० पासून खालील वैद्यकीय अधिका-यांना मंजूर करण्यात आले आहे.

| अ.क्र. | नाव | नेमणूकीचे पद | नेमणूक दिनांक | वेतनश्रेणी लागु केल्याची दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ सचिन रामदास उंडे | मेडीकल ऑफीसर ऑप्थलमोलॉजी | ०१/११/२००६ | ०१/०४/२०१० | राजीनामा |
| २ | डॉ विजय शुक्लेश्वर नरोडे | पुर्ण वेळ मेडीकल ऑफीसर इंटेंसिव्हीस्ट | ११/०२/२००६ | ०१/०४/२०१० | सध्या कार्यरत आहेत |
| ३ | डॉ अशोक अनंत न्यायाधीश | मेडीकल ऑफीसर पॅथॉलॉजी | २२/०३/२००६ | ०१/०४/२०१० | दि. ३१/०५/२०१८ मध्यान्नोत्तर |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | सेवानिवृत्त झाले आहेत. |
| ४ | डॉ काशिनाथ नरसोबा टिंगरे | मेडीकल डायरेक्टर | ०३/०५/२००६ | ०१/०४/२०१० | दि. ३१/०५/२०१२ पासून सेवानिवृत्त. |
| ५ | डॉ प्रकाश सत्ताप्पा रेठे | फुल टाईम ॲनेस्थेसियालॉजीस्ट | १६/०६/२००६ | ०१/०४/२०१० | राजीनामा |
| ६ | डॉ विद्युतकुमार सिन्हा | कार्डीयाक सर्जन | १६/०५/२००६ | ०१/०४/२०१० | राजीनामा |
| ७ | डॉ संजय महेंद्रलाल खुराणा | पुर्ण वेळ आर्थोसर्जन | १९/०४/२००६ | ०१/०४/२०१० | सध्या कार्यरत आहेत |
| ८ | डॉ किरण रामकृष्ण गोरे | क्लिनीकल असिस्टंट जनरल सर्जरी | १८/०९/२००६ | ०१/०४/२०१० | सध्या सेवानिलबित |
| ९ | डॉ नंदा राजपाल | ज्यु ॲनेस्थेसियालॉजीस्ट | २२/०९/२००६ | ०१/०४/२०१० | राजीनामा |
| १० | डॉ हेतल नविनचंद्र शहा | ऑप्थलमोलॉजीस्ट | २३/०१/२००७ | ०१/०४/२०१० | राजीनामा |
| ११ | डॉ राजेंद्र सदाशिव गवाञे | सिनी ॲनेस्थसियालॉजीस्ट | २२/१२/२००६ | ०१/०४/२०१० | दि. ३१/०३/२०१६ पासून सेवानिवृत्त. |
| १२ | डॉ योगिनी हेतल शहा | असो कन्सल्टंट रेडीओलॉजी | ०९/०४/२००७ | ०१/०४/२०१० | राजीनामा |
| १३ | डॉ किरण चंद्रकांत खांदे | मॅक्सीलोफेसियल सर्जन | ०५/०४/२००७ | ०१/०४/२०१० | सध्या कार्यरत आहेत |
| १४ | डॉ हरिष हुकूमचंद बजाज | इंटरव्हेंश्नल कार्डीओलॉजीस्ट | ०९/०४/२००७ | ०१/०४/२०१० | सध्या सेवानिलबित |
| १५ | डॉ प्रितम बाळासाहेब जपे | आर्थेपेडीक सर्जन | १८/०५/२००७ | ०१/०४/२०१० | राजीनामा |
| १६ | डॉ कृष्णा मधुकर गिरी | फिजिशियन | २९/१२/२००६ | ०१/०४/२०१० | हजेरी पटावरून नाव कमी करण्यात आले. |
| १७ | डॉ चैतन्य गोपाल शेटे | कार्डीयाक सर्जन | १६/०४/२००८ | ०१/०४/२०१० | राजीनामा |
| १८ | डॉ आशिष राधेश्याम | कार्डीयाक सर्जन | २१/०८/२००८ | ०१/०४/२०१० | राजीनामा |
| १९ | डॉ योगेश बाळकृष्ण गेठे | ईएनटी सर्जन | ०५/०८/२००८ | ०१/०४/२०१० | सेवा संपुष्टात आणणेत आली. |
| २० | डॉ सचिन दिलीप खोचीकर | कनिष्ठ भुलतज्ञ | १०/१०/२००६ | ०१/०४/२०१० | राजीनामा |
| २१ | डॉ संतोषकुमार न मराठे | ज्यु ॲनेस्थेसियालॉजीस्ट | २०/०२/२००७ | ०१/०४/२०१० | सध्या कार्यरत आहेत |
| २२ | डॉ संतोष ब सुरवसे | मेडीकल ऑफीसर (आरएमओ) | १०/०६/२००६ | | सध्या कार्यरत आहेत |
| | | क्लिनीकल असिस्टंट (ॲनेस्थेसिया) | २५/०९/२००६ | | |
| | | ज्यु इंटेंसिव्हीस्ट | २०/११/२००९ | ०१/०४/२०१० | ०८-०९/०७/२००९ रोजी मुलाखत व दि. १९/०७/२००९ रोजीचे सभेतील निर्णयानुसार पदनामात बदल |

डॉ संतोष सुरवसे व त्यावेळी कार्यरत वैद्यकीय अधिका-यांना दि. ०१/०४/२०१० पासून वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. सध्या डॉ सुरवसे यांना पे बॅन्ड १५६००-३९१०० ग्रेड पे ५४०० मध्ये मुळ वेतन २०४४० + ग्रेड पे ५४०० नुसार वेतन व प्रोत्साहन भत्ता देण्यात येत आहे. आता डॉ सुरवसे यांनी दि. १३/०६/२००७ रोजीच्या मंजुर आकृतीबंधानुसार २००७ पासून वेतनश्रेणी देणेबाबत मागणी केली आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत– दि. ११/०८/२००७ रोजीच्या मा व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र ६८० नुसार डॉ सुरवसे यांना दि. ०१/०८/२००७ पासून ज्यु इंटेसिव्हीट या पदाची मंजुर वेतनश्रेणी लागु करता येईल.तसेच उपरोक्त तक्त्यातील सध्या कार्यरत वैद्यकीय अधिका-यांनाही संबंधीत पदांची मंजुर आकृतीबंधातील वेतनश्रेणी आकृतीबंध मंजुर झालेचे दिनांकापासून म्हणजेच दि. ०१/०८/२००७ पासून लागु करून त्यांचे हजर तारखेनुसार फरक अदा करावा लागेल निर्णयास्तव सादर.

निर्णय क्र.६७६ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान सेवेत सध्या कार्यरत असलेल्या खालील वैद्यकीय अधिका-यांना संबंधीत पदाची मंजुर आकृतीबंधातील वेतनश्रेणी आकृतीबंध मंजुर झालेचे दिनांकापासून म्हणजेच दि.०१/०८/२००७ किंवा त्यांची हजर तारखी यापैकी जे नंतर असेल त्या दिनांकापासून वेतननिश्चीती करुन फरक आदा करणेस मान्यता देण्यात आली.

| अ.क्र. | नाव | नेमणूकीचे पद | नेमणूक दिनांक | वेतनश्रेणी लागु केल्याची दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ विजय शुक्लेश्वर नरोडे | पुर्ण वेळ मेडीकल ऑफीसर इंटेंसिव्हीस्ट | ११/०२/२००६ | ०१/०४/२०१० | सध्या कार्यरत आहेत |
| २ | डॉ संजय महेंद्रलाल खुराणा | पुर्ण वेळ आर्थोसर्जन | १९/०४/२००६ | ०१/०४/२०१० | सध्या कार्यरत आहेत |
| ३ | डॉ किरण चंद्रकांत खांदे | मॅक्सीलोफेसियल सर्जन | ०५/०४/२००७ | ०१/०४/२०१० | सध्या कार्यरत आहेत |
| ४ | डॉ संतोषकुमार न मराठे | ज्यु ॲनेस्थेसियालॉजीस्ट | २०/०२/२००७ | ०१/०४/२०१० | सध्या कार्यरत आहेत |
| ५ | डॉ संतोष ब सुरवसे | मेडीकल ऑफीसर (आरएमओ) | १०/०६/२००६ | | सध्या कार्यरत आहेत |
| | | क्लिनीकल असिस्टंट (ॲनेस्थेसिया) | २५/०९/२००६ | | |
| | | ज्यु इंन्टेंसिव्हीस्ट | २०/११/२००९ | ०१/०४/२०१० | ०८-०९/०७/२००९ रोजी मुलाखत व दि. १९/०७/२००९ रोजीचे सभेतील निर्णयानुसार पदनामात बदल |

तसेच डॉ.सुरवसे यांना क्लिनीकल असिटंट (अनेस्थेशिया) या पदाची वेतनश्रेणी दि.०१.०८.२००७ पासून देण्यात यावी. मात्र त्यांची ज्यु.इंटेसिव्हीस्ट या पदावर दि.२०.११.२००९ पासून नविन नियुक्ती झालेली असल्याने त्यांना त्या पदाची वेतनश्रेणी दि.२०.११.२००९ पासून देण्यात यावी, असे ठरले.

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.४० डॉ.योगेश बाळकृष्ण गेठे, माजी कान-नाक-घसा तज्ञ, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे रिट पिटीशन ११८३२/२०१४ चे निकालाबाबत.

प्रस्ताव- डॉ. गेठे यांनी सेवा समाप्ती आदेशाविरुद्ध मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर रीट पिटीशन क्र. ११८३२/२०१४ दाखल केले असुन त्यामध्ये त्यांनी विनंती केली होती की, दि. ०४/१२/२०१० रोजीचा सेवा समाप्तीचा आदेश रद्द करावा. दरम्यानचे काळात या आदेशास स्थगिती द्यावी.

सदरहू केस अनेकवेळा मा. कोर्टासमोर सुनावणीसाठी प्रस्तुत करण्यात आली होती. परंतु शेवटच्या सुनावणीचेवेळी दोन्ही पक्षाचे म्हणणे मा. कोर्टाने ऐकल्यानंतर केस निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे निकाल देण्यात आलेला आहे–

<u>ORAL JUDGEMENT (per : S. V. Gangapurwala, J.) :</u>

1. Rule. Rule returnable forthwith. With the consent of learned counsel for respective parties matter is taken up for final hearing.

2. The petitioner was appointed as E.N.T. Surgeon by the respondent under appointment order dated 05.08.2008. The petitioner was granted permanency on 01.04.2010.

3. Mr. Barde, learned counsel for the petitioner submits that the preliminary inquiry was conducted. In the said preliminary inquiry it was suggested that the serious charges are alleged against the petitioner and upon conducting the inquiry action be taken against him. On the basis of the said report show cause notice was issued to the petitioner thereafter was terminated from service under order dated 04.12.2010. Initially the petitioner the said order by filing complaint (ULP) No. 74 of 2010 before the Labour Court. However it was

withdrawn, as the petitioner is not a workman. The same is assailed in the present Writ Petition.

4. Mr. Barde, the learned Advocate for the petitioner for the petitioner submits that the petitioner was a permanent employee of the respondent. A permanent employee cannot be removed without conducting departmental inquiry. Only preliminary inquiry was conducted. On the basis of preliminary inquiry the show cause notice is issued and the petitioner is terminated. The learned advocate submits that such a procedure is not countenance in law. The learned advocate is substantiate his contention relies on the judgment of the Apex Court in a case of Champakal Chimanlal Shah Vs. The union of India report in AIR 1964 Supreme Court 1854 and another judgment of Apex Court in a case of Ratnesh Kumar Choudhary Vs. Indira Gandhi Institute of medical science, Patna, Bihar and others reported in 2015 ALL SCR 3681.

5. Mr. Barde, the learned counsel further submits that the petitioner that the petitioner may be granted bac wages and continuity in service.

6. Mr. Bhavar, learned advocate for the respondent submits that the petitioner was appointed initially on contractual basis under appointment order dated 05.05.2008. Clause No. 9 of the appointment order permitted the respondent to terminate the services of the petitioner anytime with one month’s or on payment of the month’s salary in lieu thereof. The petitioner was made permanent and all in terms and condition of the initial order of appointment dated 05.08.2008 were made applicable. In view of that, the respondent had right to terminate the services of the petitioner without inquiry. The learned Advocate submits that even otherwise the preliminary inquiry was conducted and decision was taken. Show cause notice was issued to the petitioner. Opportunity was given to the petitioner to file his say and thereafter the decision has been taken. The petitioner did not participate or cooperate in the preliminary inquiry.

7. We have considered the submissions canvassed by the learned counsel for respective parties.

8. The fact that the petitioner is advanced permanency by the respondent on 01.04.2010 is not disputed. The petitioner was appointed after following selection process as an E.N.T. Surgeon by the respondent. It is also not disputed that no departmental inquiry has been conducted against the petitioner. A preliminary inquiry was initiated and after conducting preliminary inquiry straightway show cause notice was issued to the petitioner as to why petitioner should not be terminated from service, and subsequently the petitioner is terminated.

9. A permanent employee cannot be removed without conducting departmental inquiry, more particularly, when it is a case of stigmatic termination. The preliminary inquiry is only fact finding inquiry to enable the disciplinary authority to conclude that a disciplinary inquiry is required to be initiated against the employee. The report of the preliminary inquiry cannot be considered at the time of departmental inquiry. The preliminary inquiry and the report therein would not have any legal status qua taking penal action against the employee.

10. Clause No. 9 relied by the respondent in the appointment order to the effect that the services of the petitioner may be terminated any time with one months notice or on payment of one month’s salary in lieu thereof would not apply to the case of stigmatic termination. The termination is stigmatic termination.

11. There is nothing on record to show that at the relevant time the petitioner was not gainfully employed elsewhere. In view of that, we are not inclined to grant back wages, however, the petitioner would be entitled for continuity in service.

12. The respondent – employer, if it is so chooses, is entitled to initiate proceedings including departmental proceeding as may be permissible in law.

13. In the light of above, the impugned order terminating the services of the petitioner is quashed and set aside. With the aforesaid observations, Rule is made absolute in terms of prayer clause 'A'.

**डॉ. योगेश गेठे यांचा पूर्व इतिहास पुढीलप्रमाणे आहे.**

डॉ. गेठे यांना दि. ०५/०८/२००८७ रोजीचे आदेशान्वये श्री साईबाबा हॉस्पिटल येथे नेमणुक देण्यात आली होती. त्यानुसार ते दि. ०६/०८/२००८ रोजी कामावर हजर झाले. डॉ. गेठे यांना दि. ०६/०८/२००८ पासुन प्रत्यक्ष श्री साईनाथ रुग्णालयात कामकाज करणेबाबत आदेश देण्यात आले. डॉ. गेठे हे प्रत्यक्ष श्री साईनाथ रुग्णालयात कार्यरत होते. डॉ. गेठे यांना वेतनबॅण्ड रु. १५६००-३९१०० मध्ये मुळ वेतन रु. १८,७५०/- व ग्रेड वेतन रु. ६,६००/- दि. ०१/०४/२०१० पासुन मंजूर करण्यात आले आहे.

डॉ. गेठे यांच्याविरुध्द अनेक रुग्णांच्या गंभीर तक्रारी आल्या होत्या. दि. १३/०७/२०१० रोजी डॉ. आर. के. कुलकर्णी ई.एन. टी. सर्जन श्री साईनाथ रुग्णालय यांनी श्री साईनाथ रोहोम रा. कोपरगाव (रुग्ण) यांच्या नाकाची शस्त्रक्रिया केली होती. डॉ. कुलकर्णी यांच्या अधिपत्याखाली असलेल्या वॉर्डमध्ये रुग्णाला ॲडमीट करण्यासाठी कॉट शिल्लक नसल्याने डॉ. गेठे यांच्या अधिपत्याखाली असलेल्या वॉर्डमध्ये कॉट शिल्लक असल्याने त्या ठिकाणी रुग्णास ॲडमीट करण्यात आले होते. यावरुन डॉ. गेठे यांनी रुग्णास व त्यांचे नातेवाईक श्री राजेंद्र कोते, नगरसेवक, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना अरेरावीची भाषा वापरुन अपशब्द वापरले. याप्रकरणी वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल यांनी संबंधितांना चौकशीकामी दि. २६/०७/२०१० रोजी दुपारी ३.०० वाजता त्यांच्या कक्षात बोलाविले होते. परंतू डॉ. गेठे चौकशीकामी हेतुपुरस्सरपणे याकामी गैरहजर राहीले. डॉ. गेठे यांची वर्तणूक अक्षेपार्ह व वादग्रस्त आहे. याबाबत दि. १२/०८/२०१० रोजी कारणे दाखवा नोटीस काढून डॉ गेठे यांचा लेखी खुलासा मागविण्यात आला होता. सदरची नोटीस प्राप्त होवून देखील डॉ.गेठे यांनी लेखी खुलासा सादर केलेला नाही.

दि. ०४/०९/२०१० रोजी सकाळी ११.३० ते १.०० वाजेच्या दरम्यान डॉ. गेठे श्री साईनाथ रुग्णालयातील बाहयरुग्ण विभागात कामास होते. बाहयरुग्ण विभागात अनेक रुग्णांची गर्दी असतानाही डॉ. गेठे वरिष्ठांच्या परवानगीशिवाय रुग्णालयातुन परस्पर निघून गेले व उर्वरीत रुग्णांना दुपारी ४.०० वाजता बोलावण्यात आले. परंतू दु. ४.४५ वाजेपर्यंत प्रतिक्षा करुनही डॉ. गेठे श्री साईनाथ रुग्णालयात आलेले नव्हते. म्हणून दुरध्वनीव्दारे चौकशी केली असता ऑपरेशन थिएटरमध्ये ऑपरेशन करत आहे असे सांगितले परंतू डॉ. गेठे ऑपरेशन थिएटर मध्ये हजर नव्हते ते साईनाथ रुग्णालयात आलेलेच नव्हते. डॉ. गेठे यांच्या अशा वागण्यामूळे रुग्णांची गैरसोय झाली व रुग्णांना त्रास झाला. डॉ गेठे यांचेविरुध्द रुग्णालय प्रशासन, रुग्ण व त्यांचे नातेवाईक यांच्या अनेक तक्रारी आलेल्या आहेत.

या प्रकरणी मा. व्यवस्थापन समितीचे दि. १०/१०/२०१० रोजीचे सभेत निर्णयासाठी प्रस्ताव सादर केला होता. निर्णय क्र. ७७६ अन्वये असा निर्णय देण्यात आला की, डॉ. गेठे हे पुढील महिण्यात ट्रेनिंगसाठी परदेशी जात आहेत. त्यामुळे त्यांचा राजीनामा तुर्त न घेता स्वत: ट्रेनिंगवरुन आल्यानंतर मा. कार्यकारी अधिकारी यांचकडे राजीनामा देतील असे मा. अध्यक्ष साहेब यांनी सांगितले. तदनंतर त्यांनी राजीनामा न दिल्यास डॉ. गेठे यांना संस्थान सेवेतुन मुक्त करण्यात यावे असे ठरले.त्यानंतर मा. व्यवस्थापन समितीच्या दि. २१/११/२०१० रोजीच्या सभेमध्ये वरिल निर्णयात पुढीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. डॉ. गेठे यांना राजीनामा देण्याचे सांगण्यात यावे त्यांनी राजीनामा न दिल्यास डॉ. गेठे यांना त्वरीत संस्थान सेवेतुन मुक्त करण्यात यावे.

सदर निर्णयानुसार वैद्यकीय संचालक श्री साईबाबा हॉस्पिटल यांनी डॉ. गेठे यांना दि. १२/१०/२०१० रोजी राजीनामा बाबत विचारले असता डॉ. गेठे यांनी राजीनामा देणेस नकार दिला आहे.

वरिल सर्व कागदपत्रे व घटना विचारात घेता कायदेशिर गुंतागुंत होवू नये म्हणून दि. २१/११/२०१० रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार इकडील जा. नं. एसएसएस/वशी-७बी/२८३/२०१० दि. ०४/१२/२०१० अन्वये त्यांचे नेमणूक आदेशातील अट क्र. ९ नुसार नोटीस पे म्हणून एक महिण्याचे वेतन रु. ३६,७५८/-(अक्षरी रुपये छत्तीस हजार सातशे अठ्ठावन्न रुपये मात्र) अदा करुन डॉ गेठे यांची संस्थान सेवा संपुष्टात

आणण्यात आली आहे. डॉ. गेठे यांचे वेतनबॅण्ड रु. १५६००-३९१०० मध्ये शेवटचे मुळ वेतन रु. १८,७५०/- + ग्रेड वेतन रु. ६,६००/- असे होते.

तरी, डॉ. गेठे यांनी दाखल केलेल्या रीट पिटीशन क्र. ११८३२/२०१४ मध्ये मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दि. १२/०९/२०१८ रोजी दिलेल्या आदेशानुसार डॉ. गेठे यांची सेवा ज्याप्रकारे संपुष्टात आणणेत आली ती पद्धत चुकीची असुन सेवेतुन कमी करणेपूर्वी कायम कर्मचा-याची खातेचौकशी होणे आवश्यक असल्याने दि.०४/१२/२०१० रोजीचा आदेश रद्द करण्यात आलेला आहे. संस्थानला वाटल्यास व त्यांनी ठरविल्यास डॉ. गेठे यांची कयदेशीर खातेचौकशी सुरु करु शकतात.

तरी, डॉ. योगेश बाळकृष्ण गेठे यांना नाक, कान व घसा या पदावर दरम्यानच्या काळातील वेतनाशिवाय दि. ०४/१२/२०१० पासून पुढे वेतनबॅण्ड रु. १५६००-३९१०० मुळ वेतन रु. १८,७५०/- + ग्रेड वेतन रु. ६,६००/- वर संस्थान सेवेत सलग सेवा धरुन त्यांना मिळत असलेल्या शेवटचे जे वेतन होते त्या वेतनावर पूर्ववत कामावर हजर करुन घेणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६७७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ. योगेश बाळकृष्ण गेठे यांना नाक, कान व घसा या पदावर दरम्यानच्या काळातील वेतनाशिवाय दि.०४/१२/२०१० पासून पुढे वेतनबॅण्ड रु.१५६००-३९१०० मुळ वेतन रु. १८,७५०/- + ग्रेड वेतन रु.६,६००/- वर संस्थान सेवेत सलग सेवा धरुन त्यांना मिळत असलेल्या शेवटचे जे वेतन होते त्या वेतनावर पूर्ववत कामावर हजर करुन घेण्यास मान्यता देण्यात आली. तसेच हजर झाल्यांनतर त्यांचेवरील दोषारोपांच्या अनुषंगाने त्वरीत खाते चौकशी करुन चौकशी अहवाल व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात यावा,असे ठरले.** **(कार्यवाही- वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करणेत आली**

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०१** **दिनांक २९.१०.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.६७८** **दिनांक २९.१०.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.**

१. **साईप्रसाद निवासस्थान विभागाकरीता क्वायर फोम मॅट्रेस (प्रोटेक्टरसह) खरेदी करणेकामी ई-निविदेतील न्युनतम दरांबाबत निर्णय होणेबाबत.**

संस्थानचे साई प्रसाद निवासस्थान विभागाकरीता क्वॅायर फोम मॅट्रेस खरेदीकामी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| ०१ | खरेदी करावयाचे साहित्य/वस्तुचा तपशिल | क्वॅायर फोम मॅट्रेस (प्रोटेक्टरसह) |
| ०२ | मागणी | अ.नं.१२ मध्ये नमूद केलेप्रमाणे ०६ प्रकारच्या क्वॅायर फोम मॅट्रेस |
| ०३ | ई-निविदा प्रसिद्धी | ०५.०९.२०१८ ते २४.०९.२०१८ |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसूचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते? | www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट, ई-मेल व पुरवठाधारकांना दुरध्वनीव्दारे. |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले? | संस्थानकडे उपलब्ध असलेल्या ई-मेल आय डी वर |
| ०६ | निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ | दिनांक – ०५.०९.२०१८<br>टेक्निकल बीड – २६.०९.२०१८<br>कमर्शियल बीड – २२.१०.२०१८ |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या | ०७ (सात) |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या | ०७ (सात) |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का. | नाही. |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का. | सात पैकी ०२ निविदाधारकांनी फी व बयाणा रक्कम भरलेली आहे. व ०५ निविदाधारक खरेदी नियमावलीप्रमाणे एक्झमशन आहे. |
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का. | नमुने मागविण्यात आलेले नाहीत. |

१२ निविदाकारांनी सादर केलेले दर –

| Sl. No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | Kontak Comforts Pvt Ltd | PRAVIN AND CO | Aerocom Cushions Pvt Ltd | Emergency Electronic Security India Pvt Ltd | VICTORY MATTRESSES PVT LTD | Sri Venkateswara Coir Products Pvt Ltd | SURYA CORPORA |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Rate | Rate | Rate | Rate | Rate | Rate | Rate |
| 1.00 | क्वायर फोम मॅट्रेस वॉटरप्रुफ प्रोटेक्टरसह -(चारबाजु) - साईज - 6 फुट x 3 फुट, जाडी- ४ इंच As per Technical Specifications noted on page No.2 | 360 | Num | 2950 | 3930 | 4037 | 5321 | **2,916** | 2918 | 3100 |
| 2.00 | क्वायर फोम मॅट्रेस वॉटरप्रुफ प्रोटेक्टरसह (चार बाजु) - साईज - 6 फुट x 5 फुट, जाडी- ४ इंच As perTechnical Specifications noted on page No.2 | 2 | Num | 4917 | 7700 | 6040 | 8690 | 4860 | **4,844** | 5250 |
| 3.00 | क्वायर फोम मॅट्रेस वॉटरप्रुफ प्रोटेक्टरसह (चार बाजु) - साईज - 6 फुट 6 इंच x 3 फुट, जाडी- ४ इंच As per Technical Specifications noted on page No.2 | 12 | Num | 3196 | 4500 | 4287 | 5556 | **3,159** | 3162 | 3412 |
| 4.00 | क्वायर फोम मॅट्रेस प्रोटेक्टरसह (चार बाजु) - साईज - 6 फुट 6 इंच x 5 फुट 6 इंच, जाडी- ४ इंच As per Technical Specifications noted on page No.2 | 7 | Num | 5860 | 9000 | 7000 | 10206 | 6003 | **5,781** | 6256 |
| 5.00 | क्वायर फोम मॅट्रेस वॉटरप्रुफ प्रोटेक्टरसह (चार बाजु) - साईज - 3 फुट x 6 फुट 6 इंच, जाडी- ६ इंच As per Technical Specifications noted on page No.2 | 20 | Num | 4650 | 7000 | 5451 | **3,540** | 4716 | 4350 | 5031 |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 6.00 | क्वायर फोम मॅट्रेस वॉटरप्रुफ प्रोटेक्टरसह (चार बाजु) - साईज - 5 फुट 6 इंच x 6 फुट 6 इंच, जाडी- ६ इंच As per Technical Specifications noted on page No.2 | 14 | Num | 9235 | 11800 | 9134 | 10206 | 9433 | 7,941 | 9223 |

| | | |
|---|---|---|
| १३ | यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर – माहे फेब्रुवारी-२०१८ मध्ये 6'x3'x4" या साईजच्या २,१७४ क्वॉयर फोम मॅट्रेस प्रती नग २,८२६/- या दराने मे.कॉन्टॅक कम्फर्टस प्रा.लि., अहमदनगर यांचेकडून खरेदी करण्यात आलेल्या होत्या. | |
| १४ | मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल – ------------------------------------ | |
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | ---------- |
| १६ | मागील खरेदी दर | वरील अ.नं.१३ मध्ये नमुद केलेप्रमाणे |
| १७ | मागील पुरवठादार | वरील अ.नं.१३ मध्ये नमुद केलेप्रमाणे |
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर | वरील अ.नं.१२ मध्ये नमुद केलेप्रमाणे |
| १९ | सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव | अ.नं.१ व ३ मे.व्हीक्ट्री मॅट्रेसेस प्रा.लि., हैद्राबाद<br>अ.नं.२,४ व ६ मे.व्यंकटेश्वरा क्वॉयर प्रॉ.प्रा.लि., सिकंदराबाद<br>अ.नं.५ मे.इमरजन्सी इलेक्ट्रॉनिक सेक्यु.इं.प्रा.लि., मुंबई |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला आहे का. | होय. |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नावे. | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उपजिल्हाधिकारी, मा. उपकार्यकारी अधिकारी, मा.मुख्यलेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी, प्र.अधिक्षक, खरेदी |
| २२ | घाऊक आणि किरकोळ दर यांचे तपशील - | |
| २३ | मागील खरेदी सध्याचे प्राप्त दर फरक % ने कमी/जास्त | |
| | रु. -- रु. -- रु. -- -- | |
| २४ | क्वॉयर फोम मेट्रेस खरेदीसाठी विभागाने निश्चित केलेला अंदाजे दर ------------------------ | |

२५. संक्षिप्त टीप – संस्थानचे साईप्रसाद निवासस्थान विभागाकरीता विविध सहा प्रकारच्या साईजच्या क्वॉयर फोम मेट्रेस खरेदी कामी आनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. याकामी विभागाने दिलेले टेक्नीकल स्पेसीस्फीकेशन निविदेमध्ये देण्यात आले होते.

सदर ई–निविदेमध्ये अ.नं.१ व ३ साठी मे.व्हीक्ट्री मॅट्रेसेस प्रा.लि., हैद्राबाद, अ.नं.२,४ व ६ साठी मे.व्यंकटेश्वरा क्वॉयर प्रॉ.प्रा.लि.,सिकंदराबाद व अ.नं.५ साठी मे.इमरजन्सी इलेक्ट्रॉनिक सेक्यु.इं.प्रा.लि.,मुंबई यांचे दर न्युनतम आले आहेत.

**प्रस्ताव-** तरी मे.व्हीक्ट्री मॅट्रेसेस प्रा.लि.,हैद्राबाद, व्यंकटेश्वरा क्वॉयर प्रॉ.प्रा.लि.,सिकंदराबाद व मे.इमरजन्सी इलेक्ट्रॉनिक सेक्यु.इं.प्रा.लि.,मुंबई यांचे न्युनतम दराबाबत चर्चा वाटाघाटी होऊन निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.उपसमितीचे सभेत शिफारशीसाठी सादर.

**प्रस्तुत प्रकरणी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील अ.नं.१ व ३ साठीचे निम्नतम निविदाधारक मे.व्हीक्ट्री मॅट्रेसेस प्रा.लि.,हैद्राबाद हे आजचे स्थानिक उपसमितीसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. उपसमितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी क्वायर फोम मॅट्रेस वॉटरप्रुफ प्रोटेक्टरसह -(चारबाजु) साईज- 6 फुट x 3 फुट , जाडी- ४इंच करीता रक्कम रु.२९००/- प्रती नग व क्वायर फोम मॅट्रेस वॉटरप्रुफ प्रोटेक्टरसह (चारबाजु) साईज-6 फुट 6 इंच x 3 फुट, जाडी- ४ इंच करीता रक्कम रु.३१००/- प्रती नग दर देऊ केले. अ.नं.२, ४, ६ साठीचे निम्नतम निविदाधारक व्यंकटेश्वरा क्वॉयर प्रॉ.प्रा.लि.,सिकंदराबाद व अ.नं.५ साठीचे निम्नतम निविदाधारक मे. इमरजन्सी इलेक्ट्रॉनिक सेक्यु.इं.प्रा.लि.,मुंबई हे चर्चेसाठी अनुपस्थित होते.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईप्रसाद निवासस्थान विभागाकरीता क्वायर फोम मॅट्रेस (प्रोटेक्टरसह) खरेदी करणेकामी निम्नतम निविदाधारक यांचे खालील प्रमाणे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

| अ.नं. | तपशिल | मागणी | दर (प्रती नग) |
|---|---|---|---|
| मे. व्हीक्ट्री मॅट्रेसेस प्रा.लि.,हैद्राबाद | | | |
| ०१ | क्वायर फोम मॅट्रेस वॉटरप्रुफ प्रोटेक्टरसह -(चारबाजु) - साईज- 6 फुट x 3 फुट , जाडी- ४इंच | ३६० | २९००/- (प्रती नग) |
| ०२ | क्वायर फोम मॅट्रेस वॉटरप्रुफ प्रोटेक्टरसह (चार बाजु) - साईज - 6 फुट 6 इंच x 3 फुट, जाडी- ४ इंच | १२ | ३१००/- (प्रती नग) |
| व्यंकटेश्वरा क्वॉयर प्रॉ.प्रा.लि.,सिकंदराबाद | | | |
| ०१ | क्वायर फोम मॅट्रेस वॉटरप्रुफ प्रोटेक्टरसह (चार बाजु)- साईज - 6 फुट x 5 फुट, जाडी- ४ इंच | ०२ | ४८४४/- (प्रती नग) |
| ०२ | क्वायर फोम मॅट्रेस प्रोटेक्टरसह (चार बाजु) - साईज - 6 फुट 6 इंच x 5 फुट 6 इंच, जाडी- ४ इंच | ०७ | ५७८१/- (प्रती नग) |
| ०३ | क्वायर फोम मॅट्रेस वॉटरप्रुफ प्रोटेक्टरसह (चार बाजु) - साईज- 5 फुट 6 इंच x 6 फुट 6 इंच, जाडी- ६ इंच | १४ | ७९४१/- (प्रती नग) |
| मे. इमरजन्सी इलेक्ट्रॉनिक सेक्यु.इं.प्रा.लि.,मुंबई | | | |
| ०१ | क्वायर फोम मॅट्रेस वॉटरप्रुफ प्रोटेक्टरसह (चार बाजु) - साईज - 3 फुट x 6 फुट 6 इंच, जाडी- ६ इंच | २० | ३५४०/- (प्रती नग) |

(कार्यवाही-प्र.अधिक्षक,खरेदी विभाग)

---

२. **सेवाधाम इमारतीतील स्विचबोर्ड, स्विचेस, फॅन रेग्युलेटर तसेच प्लग खरेदी करुन बसविणे कामाचे उघडण्यात आलेल्या निविदांमधील न्युनतम दर निविदाधारकांशी वाटाघाटी/चर्चा होऊन निर्णय होणेबाबत.**

संस्थानचे विद्युत विभागाकरीता सेवाधाम इमारतीमधील स्वीचबोर्ड, स्वीचेस, फॅन रेग्युलेटर तसेच प्लग खरेदी करुन बसविणे कामासाठी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| ०१ | खरेदी करावयाचे साहित्य / वस्तुचा तपशिल | सेवाधाम इमारतीमधील स्वीचबोर्ड, स्वीचेस, फॅन रेग्युलेटर तसेच प्लग खरेदी करुन बसविणे. |
| ०२ | मागणी | - |
| ०३ | ई-निविदा प्रसिध्दी | ०१). दि.१०-०९-२०१८ ते दि.२४-०९-२०१८ |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसुचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते ? | दि.०९-०९-२०१८ रोजी दै.लोकसत्ता, पुणे व दै.इंडियन एक्सप्रेस, मुंबई www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट व पुरवठाधारकांना ई-मेल व्दारे. |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले ? | ०१). दि.१०-०९-२०१८ रोजी ४७ पुरवठाधारकांना ई-मेलव्दारे कळविले. |
| ०६ | निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ | दि.१०-०९-२०१८, वेळ सकाळी १०.०० वाजेपासून<br>टेक्निकल बीड दि.२६-०९-२०१८<br>कमर्शियल बीड दि.२२-१०-२०१८ |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या. | ०६ |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या. | ०४ |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का. | नमुने मागविण्यात आले नाही. |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का. | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम भरलेली आहे. |
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का. | ई-निविदेत नमूद केले आहे. |
| १२ | निविदाकारांनी सादर केलेले दर- | |

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | ई-निविदा रक्कम रुपये |
|---|---|---|
| **१** | **मे.अंबर इलेक्ट्रिकल्स् ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, निर्मळ पिंप्री** | **रु. २,७४,७५०.००** |
| २ | मे.डि.के.इलेक्ट्रिकल्स्, औरंगाबाद | रु. २,९७,७४०.०० |
| ३ | मे.इर्मजन्सी इलेक्ट्रॉनिक सिक्युरिटी इंडिया प्रा.लि., मुंबई | रु. ३,००,९८९.९० |
| ४ | मे.साईसिध्दी एन्टरप्राईजेस, राहाता | रु. ३,००,७५०.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३ | यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर | | | |
| | अ.क्र. | वर्ष | परिमाण | दर प्रती सेट रु. |
| | - | - | - | - |
| १४ | मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल- | | | |
| | अ.क्र. | तपशिल | वर्ष | खर्च परिमाण |
| | - | - | - | - |
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | - | | |
| १६ | मागील खरेदी दर | - | | |
| १७ | मागील पुरवठादार | - | | |
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर | उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखील केलेले मे.अंबर इलेक्ट्रिकल्स् ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, निर्मळ पिंप्री यांचे न्युनतम दर रक्कम रु. २,७४,७५०/- इतके येतात. | | |
| १९ | सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव | मे.अंबर इलेक्ट्रिकल्स् ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, निर्मळ पिंप्री | | |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला आहे का. | होय. | | |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितींची नावे. | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उपजिल्हाधिकारी, मा.उपकार्यकारीअधिकारी, मा.मुख्य लेखाधिकारी, मा.कार्यकारी अभियंता आणि उपकार्यकारी अभियंता (विद्युत) | | |
| २२ | इस्टिमेट कॉस्ट | ०१). रु. ३,१३,८२२/- | | |
| २३ | घाऊक आणि किरकोळ दर यांचे तपशील अदांजे रु. ----- प्रति सेट मार्केट रेट रु. ---- | | | |
| २४ | मागील खरेदी | सध्याचे प्राप्त दर | फरक | % ने कमी / जास्त |
| | - | - | - | - |

२५) **संक्षिप्त टिप:-** विद्युत विभागाचे मागणीप्रमाणे सेवाधाम इमारतीमधील स्वीचबोर्ड, स्वीचेस, फॅन रेग्युलेटर तसेच प्लग खरेदी करुन बसविणे कामाकरीता ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या.

सदर ई-निविदेमध्ये ०६ निविदाकारांनी भाग घेतला होता. त्यात चार निविदाधारक पात्र झालेले आहे. मे.अस्मिता इलेक्ट्रिक एन्टरप्राईजेस, पुणे व मे.गुरु इंजिनिअरींग ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, नाशिक या निविदाधारकांनी सन २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ या मागील तीन वर्षाचे वार्षिक टर्न ओव्हर रु.पाच लाख असलेबाबत चार्टर्ड अकाऊंटट यांचेकडून प्रमाणित केलेले सर्टीफिकेट जोडलेले नसल्यामुळे ते अपात्र झाले आहे. याकामी तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या चार निविदाधारकांच्या कमर्शियल निविदा दि.२२-१०-२०१८ रोजी मा.खरेदी समितीचे सभेत उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडण्यात आल्या. यामध्ये उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखील केलेले मे.अंबर इलेक्ट्रिकल्स् ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, निर्मळ पिंप्री यांचे न्युनतम दर रक्कम रु.२,७४,७५०/- इतके येत आहे.

तरी न्युनतम दरधारक मे.अंबर इलेक्ट्रिकल्स् ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, निर्मळ पिंप्री यांचेशी ई-निविदेत दिलेल्या न्यनतम दराबाबत चर्चा / वाटाघाटी होऊन निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.उपसमितीचे सभेत शिफारशीसाठी सादर.

**प्रस्तुत प्रकरणी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे.अंबर इलेक्ट्रिकल्स् ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, निर्मळ पिंप्री हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. उपसमितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सेवाधाम इमारतीतील स्विचबोर्ड, स्विचेस, फॅन रेग्युलेटर तसेच प्लग खरेदी करुन बसविणेकामी निम्नतम निविदाधारक मे.अंबर इलेक्ट्रिकल्स् ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, निर्मळ पिंप्री यांचे रक्कम रु.२,७४,७५०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**(कार्यवाही-उपकार्यकारी अभियंता,विद्युत विभाग)**

---

**३. श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलकरीता ETP प्लॅन्ट उभारणीकामी प्राप्त ई-निविदेतील निम्नत्तम दरधारकाशी चर्चा वाटाघाटी करणेबाबत.**

| | | |
|---|---|---|
| ०१ | **कामाचे नाव** | श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पीटल करीता ETP प्लॅन्ट उभारणी कामी प्राप्त ई निविदेतील निम्नत्तम दर धारकासी चर्चा वाटाघाटी करणेबाबत |
| ०२ | **प्रशासकीय मान्यता** | मा. व्यवस्थापन समिती दिनांक २५ जुलै, २०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. - ६१५ |
| ०३ | **अंदाजे खर्च** | ३८,४५,०००/- |
| ०४ | **प्रस्तावाची थोडक्यात माहिती.** | मा. व्यवस्थापन समिती दिनांक २५.७.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं ६१५ अन्वये श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल लॉन्ड्री व व पॅथोलॉजी लॅबकरीता स्वतंत्र ETP प्लॅन्ट उभारणी करणेस व त्याकामी येणा-या रक्कम रु. ३८,४५,०००/-पर्यंतच्या खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सल्लागार व मेकॅनिकल विभागामार्फत ई निविदेचा मसुदा तयार करुन प्रसिद्ध करणेत आलेला आहे. |
| ०५ | **ई-निविदा तपशिल.** | महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ई-निविदा जाहीरात अपलोड करण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करून ई-निविदा प्रसिध्द करून ई-निविदा मागविणेत आली होती. ई-निविदा भरण्याची मुदत दिनांक १७/५/२०१८ते दिनांक३१/०५/२०१८ अखेर होती. |
| | **अ) कामाची मुदत.** | ९० दिवस |
| | **ब) तांत्रिक निविदा उघडणेची दिनांक व वेळ** | २५/०६/२०१८ वेळ सकाळी ११.०० |
| | **क) प्राप्त ई-निविदा.** | ३ |
| | **ड) प्राप्त ई-निविदा धारकांनी सर्व आवश्यक कागदपत्रे ऑनलाईन जमा केले आहेत का ?** | होय, जमा केले आहे. |
| | **इ) सर्व निविदा धारकांनी EMD भरलेली कागदपत्रे ऑनलाईन जमा केलेली आहेत का ?** | होय |
| ०६ | **अ) मागील वर्षाकरीता निम्नत्तम दर रूपये** | -- |
| | **ब) मागील निम्नत्तम दर धारक** | -- |

ई-निविदा प्रक्रियातील तांत्रिक दृष्टया पात्र निविदा धारकांनी दिलेल्या दराचा तपशिल खालीलप्रमाणे ...

| अ.नं. | निविदाधारकांचे नाव | ई-निविदेतील प्राप्त दर रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १. | मे. ग्रीन साईटिफिक डेवलपमेंट (इं.) प्रा.लि., मुंबई | २५,४८,५९०/- | एल - १ |
| २. | मे. एचटुओ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नोलॉजिस, चेन्नई | ४२,५८,९४०/- | एल - ३ |
| ३. | मे. ॲक्वा फ्लो सिस्टम, हैंदराबाद | ३४,५५,७८०/- | एल - २ |

श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल लॉन्ड्री व पॅथोलॉजी लॅबकरीता स्वतंत्र ETP प्लॅन्ट उभारणीकामी मे. ग्रीन साईटिफिक डेवलपमेंट (इं.) प्रा.लि., मुंबई यांचे दर रक्कम रूपये – २५,४८,८९०/- मात्र निम्नत्तम आहे. परंतु ई-निविदा मागवितेवेळी सिव्हिल कामाकरीता PCC व RCC या कामाचे प्रती क्युबीक मीटरचेच दर मागविणेत आले होते. सदरचे दर प्राप्त झालेनंतर प्रकल्प सल्लागार यांनी प्रत्यक्ष होणा-या सिव्हिल कामाच्या खर्चाचा तपशिल तयार केला असून त्यानुसार दोन्ही ETP उभारणीकरीता मे. ग्रीन साईटिफिक डेवलपमेंट (इं.) प्रा.लि., मुंबई यांचे होणारे दर खालीलप्रमाणे.

| **अ.नं.** | **निविदाधारकांचे नाव** | **ई-निविदेतील प्राप्त दर रक्कम** |
|---|---|---|
| १. | मे. ग्रीन साईटिफिक डेवलपमेंट (इं.) प्रा.लि., मुंबई | २८,४३,९७३/- |

प्रस्ताव :- तरी श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल लॉन्ड्री व पॅथोलॉजी लॅबकरीता स्वतंत्र ETP प्लॅन्ट उभारणीकामी मे. ग्रीन साईटिफिक डेवलपमेंट (इं.) प्रा.लि., मुंबई यांचे दर रक्कम रूपये- २८,४३,९७३/- मात्र निम्नत्तम असुन त्यांचेशी प्राप्त दराबाबत चर्चा/वाटाघाटी करून पुढील कार्यवाही करणेकरीता प्रस्ताव मा. उप-समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे.ग्रीन साईटिफिक डेव्हलपमेंट (इं.) प्रा.लि., मुंबई हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चसाठी उपस्थित होते. उपसमितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता चर्चेअंती त्यांनी रक्कम रु.२८,२५,०००/- मात्र दर देऊ केले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलकरीता ETP प्लॅन्ट उभारणीकामी निम्नतम निविदाधारक मे.ग्रीन साईटिफिक डेव्हलपमेंट (इं.) प्रा.लि., मुंबई यांनी चर्चेअंती देऊ केलेले रक्कम रु. २८,२५,०००/- मात्र अंतिम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)**

---

४ **आयकर कायद्यातील तरतुदीन्वये सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील अखर्चीत उत्पन्नाच्या विनियोगाबाबत.**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यास शिर्डी यास सर्व माध्यमाव्दारे मिळणारे उत्पन्न हे आयकर कायदा १९६१ चे कलम १०(२३) (C) (V) अन्वये संपूर्ण करमूक्त आहे. या कलमांतर्गत सन २००२ मध्ये सुधारणा झालेल्या असून, सुधारीत तरतूद पुढीलप्रमाणे आहे.

"Provided also that the fund of trust or institution [or any university or other educational institution or any hospital or other medical institution] referred to in sub-clause (IV) or sub-clause (v) [or sub-clause (vi) or sub-clause (VIA)] d) applied its income, or accumulates it for application, wholly and exclusively to the objects for which it is established and in a case where more than fifteen percent of its income is accumulated on or after the 1st day of April-2002, the period of the accumulation of the amount exceeding fifteen percent of its income shall in no case exceed five years."

उपरोक्त सुधारीत तरतुदीनुसार एका आर्थिक वर्षात मिळालेल्या एकूण उत्पन्नापैकी ८५% उत्पन्न् हे त्याच आर्थिक वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे. तथापि ते खर्च न झाल्यास या ८५% उत्पन्नापैकी अखर्चित राहिलेली रक्कम त्यापुढील ५ आर्थिक वर्षामध्ये खर्च करता येईल व दरम्यान या रकमेची आयकर कलम ११ अन्वये विहित पध्दतीने गुंतवणूक करावी लागेल. पुढील ५ वर्षाच्या मुदतीत ही अखर्चित रक्कम पुर्णपणे खर्च न झाल्यास सहाव्या आर्थिक वर्षात ती करपात्र म्हणून हिशोबात धरली जाईल व त्या रकमेवर आयकर कायद्यातील तरतूदीनुसार त्या आर्थिक वर्षासाठी लागु असलेल्या महत्तम आकारणी दराने आयकर आकारणी केली जाईल.

संस्थानचे सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाचे आयकर विवरण आयकर कार्यालयाकडे दाखल करावयाचे आहे. सदर आयकर विवरणासोबत सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षातील अखर्चित उत्पन्नाची रक्कम कशी व कोणत्या उद्दीष्टांसाठी खर्च करण्यात येईल या बाबतचा मा.व्यवस्थापन समितीचा निर्णय सोबत जोडणे बंधनकारक असते. पुढील पाच वर्षात संस्थानचे उद्दीष्टांवर होणा-या खर्चाचा ढोबळ मसुदा खालीलप्रमाणे आहे. त्यामध्ये रू.२७५ कोटी आर्थिक वर्ष २०१७-१८ चे अखर्चित उत्पन्न खर्चाच्या नियोजनाचा ढोबळ मसुदा खालीलप्रमाणे –

| अ.नं. | तपशील |
|---|---|
| १ | मंदिराची विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांचा विकास करणे, स्थावर किंवा जंगम मालमत्तांचे संपादन करणे, देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे. |
| २ | भक्तांना प्रसाद भोजन देणे, आणि अन्नछत्र चालविणे, पाणी योजनेकरिता |
| ३ | भक्तांना दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोई व सुविधा पुरविणे. दर्शनरांग प्रकल्प |
| ४ | भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी भक्तनिवास, विश्रामगृहे बांधणे, त्याची दुरुस्ती देखभाल करणे, भक्तांकरिता साईसिटी प्रकल्प निर्मिती . |
| ५ | शासन मान्यतेने नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, सोसायटी यांचे शैक्षणिक संस्था, क्रिडा , संस्था वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रित अथवा शारीरीक दृष्टया विकलांग व्यक्तींसाठी आधारगृह किंवा इतर |

| | |
|---|---|
| | धर्मदाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला व साहित्य क्षेत्राशी संबधीत असलेली संस्था, कोणत्याही बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करवून घेणे. शैक्षणिक संकुल |
| ६ | स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी, संस्थानच्या सोईमंध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगर पंचायतीला सहाय्य करणे. |

तरी संस्थानचे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे आयकर विवरणपत्र आयकर विभागाकडे दाखल करण्याकरीता सन २०१७-१८ चे अखर्चित उत्पन्न रक्कम पुढील पाच वर्षांत खर्च करण्याच्या नियोजनाचा मसुदा जोडून संस्थानचे आर्थिक वर्ष २०१७-१८ चे आयकर विवरणपत्र आयकर विभागाकडे दाखल करण्यास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे उपसमितीचे सभेसमोर सादर.

**संस्थानचे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे आयकर विवरणपत्र आयकर कार्यालयाकडे दाखल करणेकामी सदर आयकर विवरणासोबत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील अखर्चित उत्पन्नाची रक्कम कशी व कोणत्या उद्दीष्टांसाठी खर्च करण्यात येईल याबाबतचा मा.व्यवस्थापन समितीचा निर्णय सोबत जोडणे बंधनकारक असल्याने पुढील पाच वर्षात संस्थानचे उद्दीष्टांवर होणाऱ्या आर्थिक वर्ष २०१७-१८ चे अखर्चित उत्पन्न रक्कम रु.२७५ कोटी संस्थान वा संस्थानच्या संयुक्त विद्यमाने खर्चाच्या नियोजनाचा ढोबळ मसुदा सन २०१७-१८ या वर्षाचे आयकर विवरणपत्रासोबत आयकर विभागाकडे दाखल करणेस मान्यता देण्यात यावी, अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

| अ.नं. | तपशिल |
|---|---|
| ०१ | **मंदिराची विश्वस्तव्यवसथेच्या मालमत्तांचा विकास करणे, स्थावर किंवा जंगम मालमत्तांचे संपादन करणे, देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे.** |
| ०२ | **भक्तांना प्रसाद भोजन देणे आणि अन्नछत्र चालविणे, पाणी योजनेकरीता.** |
| ०३ | **भक्तांना दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोई व सुविधा पुरविणे, दर्शनरांग प्रकल्प.** |
| ०४ | **भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी भक्तनिवास, विश्रामगृह बांधणे, त्याची दुरुस्ती देखभाल करणे, भक्तांकरीता साईसिटी प्रकल्प निर्मिती.** |
| ०५ | **शासन मान्यतेने नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, सोसायटी यांचे शैक्षणिक संस्था, क्रिडा, संस्था वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रीत अथवा शरिरीक दृष्टया विकलांग व्यक्तींसाठी आधारगृह किंवा इतर धर्मदाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला व साहित्य क्षेत्राशी संबधीत असलेली संस्था, कोणत्याही बिगर वाणिज्यीक सांस्कृतीक संघटनेची स्थापना व देखभाल करवून घेणे, शैक्षणिक संकुल.** |
| ०६ | **शिर्डी नगरपंचायतीस स्थानिक नागरी सेवा व सुविधा व वाढ होण्यासाठी, शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करणे.** |
| ०७ | **भक्तांच्या / जनतेच्या सोईसाठी संस्थानच्या २५ कि.मी.परिसरातील रस्त्यांची कामे करणे.** |

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

५ **संस्थानचे टेलिफोन विभागातील दुरध्वनी यंत्रणा अद्यावत करणेकामी ई-निविदा प्रक्रिये अंतर्गत उघडणेत आलेल्या वाणिज्यीक ई-निविदांमधील निम्नत्तम दरधारक यांना चर्चा व वाटाघाटीसाठी बोलविणेबाबत.**

संस्थानचे टेलिफोन विभागातील दुरध्वनी यंत्रणा(EPBAX)अद्यावत करणेकामीई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| ०१ | खरेदी करावयाचे साहित्य/ वस्तूचा तपशिल. | **संस्थानचे टेलिफोन विभागातील दुरध्वनी यंत्रणा (EPBAX System)अद्यावत करणे.** |
| ०२ | मागणी | दुरध्वनी यंत्रणा(EPBAXSystem)अद्यावत करणे |
| ०३ | ई-निविदा प्रसिद्धी | दि.२४.०७.२०१८ ते दि.२३.०८.२०१८ |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसुचनेच्या | www.mahatenders.gov.in,संस्थान वेबसाईटतसेच सदर क्षेत्रात काम करणा-या |

<table>
<tr><td></td><td>व्यतिरिक्त चौकशी कशी पाठविली जाते ?</td><td>विविध पुरवठाधारकांना ई-मेलद्वारे.</td></tr>
<tr><td>०५</td><td>तर तसे, कोणाला पाठविले ?</td><td>विविध पुरवठाधारकांना ई-मेलद्वारे कळविले आहे.</td></tr>
<tr><td>०६</td><td>निविदा सुरू झालेची दिनांक व वेळ</td><td>दि.२४.०७.२०१८ सकाळी ११:०० वा.<br>तांत्रिक निविदा- दि.२८.०८.२०१८<br>व्यावसायीक निविदा- दि.२२.१०.२०१८</td></tr>
<tr><td>०७</td><td>प्राप्त निविदाकारांची संख्या</td><td>०३ (तीन)</td></tr>
<tr><td>०८</td><td>पात्र निविदाकारांची संख्या</td><td>०३ (तीन)</td></tr>
<tr><td>०९</td><td>सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का ?</td><td>--</td></tr>
<tr><td>१०</td><td>सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम अदा केली आहे का ?</td><td>पात्र ०३ निविदाकारांनी बयाणा रक्कम भरलेली आहे.</td></tr>
<tr><td>११</td><td>जर नमुने दिले नाही, तर का ?</td><td>--</td></tr>
<tr><td>१२</td><td colspan="2">निविदाकारांनी सादर केलेले दर –
<table>
<tr><th>अ. नं.</th><th>निविदाकाराचे नाव</th><th>सादर केलेले दर</th><th>जुनी यंत्रणा बायबॅक किंमत</th><th>बायबॅक किंमत वजा जाता अंतीम निम्नत्तम दर</th><th>स्थिती</th></tr>
<tr><td>1</td><td>Datacom Products (India) Pvt.Ltd.,Pune</td><td>1,35,90,913.00</td><td>8,04,600.70</td><td>1,27,86,312.30</td><td>L1</td></tr>
<tr><td>2</td><td>Arvind Ltd.(Telecom Division) Mumbai</td><td>1,62,11,340.32</td><td>8,04,600.70</td><td>1,54,06,739.62</td><td>L2</td></tr>
**मौजे रुई,ता.राहाता,जि.अहमदनगर येथील जमीन गट नं.२८८/अ,२८८/ब,२८८/क व गट नं.२९४ पै. एकूण क्षेत्र १०.२३ हेक्टर क्षेत्र श्री साईबाबा संस्थानला कायम खरेदी करण्यास मान्यता देणेबाबतचा महाराष्ट्र शासन,विधी व न्याय विभागाकडील शासन निर्णय क्रं.सासंवि-१०१८/४४२/प्र.क्र.५४/का.१६ दि.२४/१०/२०१८ चे वाचन करणेत आले. त्यातील अट क्रं.१ मध्ये मा.दिवाणी न्यायाधीश,व.स्तर,कोपरगाव यांचे कोर्टात दाखल असलेल्या स्पे.मु.नं.५९ /२०१२ निकाली काढण्यात यावे,असेबाबत नमूद आहे. प्रस्तुत दाव्यात श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना प्रतिवादीपणात सामील केलेले आहे. यास्तव वादातील मौजे रुई,ता.राहाता येथील जमीन गट नं.२८८/अ, २८८/ब,२८८/क व गट नं.२९४ पै. एकूण क्षेत्र १०.२३ हेक्टर इतके संस्थानला कायमस्वरुपी खरेदी करणेकामी महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाकडील उपरोक्त दि.२४/१०/२०१८ रोजीच्या पत्रान्वये परवानगी प्राप्त झाली असलेबाबत व त्याप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी सदर जमीन खरेदी करणेस तयार असलेबाबत मे.दिवाणी न्यायाधीश,व.स्तर,कोपरगाव यांचे कोर्टात संस्थानचे वतीने पुरसीस सादर करणेत यावी व तदनंतर यातील वादी,प्रतिवादी यांचेकडून तडजोड पुरसीस रजिस्टर्ड झालेनंतर व उक्त स्पे.मु.नं.५९/२०१२ चा मे.कोर्टाने निकाली काढल्यानंतर उपरोक्त दि.२४/१०/२०१८ रोजीच्या शासन निर्णयात नमूद केलेप्रमाणे व कोर्टाचे आदेशाप्रमाणे उक्त जमीन खरेदी करणेची प्रक्रिया करणेत यावी,असे ठरले.** **(कार्यवाही- मागास वर्ग कक्ष/प्र.अधिक्षक,मालमत्ता विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **मा.पंतप्रधान, भारत सरकार शिर्डी दौरा कार्यक्रमाकरीता मान्यवरांचे सत्कारासाठी साईंचे मुर्तीकरीता लाकडी बॉक्स तयार करणे व पॉलीश करणेसाठी अपेक्षित खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद - अधिनियमाचे कलम १७ (१) अन्वये राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वससाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहुन संस्थान विश्वस्त व्यवस्थेच्यामालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पुजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे,ही समितीची कर्तव्य असतील.

**प्रस्तावना** –श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव दि.०१/१०/२०१७ ते दि.१८/१०/२०१८ अखेर संस्थानतर्फे साजराकरण्यात आला आहे. मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे शुभहस्ते श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव सांगता समारंभ संपन्न झाला आहे. सदर कार्यक्रमानिमित्त मा.पंतप्रधान, भारत सरकार तसेच त्यांचे समवेत असलेले इतर मान्यवरांचा सत्कार शॉल व श्रींची मुर्ती देऊन करण्यात आला आहे. सदरच्या मुर्ती लाकडी बॉक्समध्ये देण्यात येणार असल्याने अंदाजे एकूण ३० नग लाकडी बॉक्स बनवून मिळणेबाबत मंदिर विभागाने दि.२०/०९/२०१८ रोजीचे पत्रान्वये विनंती केली होती.

सदरहू काम तातडीचे असल्याने लाकडी बॉक्सकामी लागणारे आवश्यक मटेरीयल खरेदी करुन इकडील विभागामार्फत बॉक्स तयार करणेत आले व सदर लाकडी बॉक्सला पॉलिश करण्याचे काम स्थानिक

ठेकेदार सफीउल्ला अमिरउल्ला अन्सारी, शिर्डी यांचेकडून थेट करुन घेण्यात आले आहे. याकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | मटेरियलचा तपशिल | परिमाण/एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०1 | 8mm Plywood (8x4) | 01 No. | 42.50 persqft. | 1,360.00 |
| 02 | 6mm Plywood (8x4) | 01 No. | 30/- per sqft. | 960.00 |
| 03 | Tekas – 1" x 17No. | 500 gm. | 120/- Per Kg. | 60.00 |
| 04 | Tekas – ¾ " x 17No. | 500 gm. | 120/- Per Kg. | 60.00 |
| 05 | Tekas – 1" x 19No. | 500 gm. | 120/- Per Kg. | 60.00 |
| 06 | Nail – 1½ " x 14 No. | 01 Kg. | 100/- Per Kg. | 100.00 |
| 07 | Nail – 2 " x 12 No. | 01 Kg. | 100/- Per Kg. | 100.00 |
| 08 | Plain Glass | 80 Sqft. | 45/- per sqft. | 3,600.00 |
| Material for Polish | | | | |
| 01 | Polish Paper (60 & 150 No.) | 24 No. | 10/- per paper | 240.00 |
| 02 | Polish | 05 Ltr. | 150/- per ltr. | 750.00 |
| 03 | Ravsena, Bamsena | 04 pkt. | 60/- per pkt. | 240.00 |
| 04 | Lambi | 02 Pkt. | 90/- per pkt. | 180.00 |
| 05 | Mela Mat | 02 ltd. | 330/- per ltr. | 660.00 |
| 06 | Thinner | 01 ltd. | 100/- per ltr. | 100.00 |
| 07 | Cotton | 05 mtr. | 80/- per mtr. | 400.00 |
| 08 | Chandows | 01 ltr. | 400/-per ltr. | 400.00 |
| 09 | Lakh | 01 | 400/- per | 400.00 |
| 10 | Mem | 01 kg. | 120/- per kg. | 120.00 |
| 11 | B.T.Umber 400gm pkt. | 06 Pkt. | 80/- per pkt. | 480.00 |
| 12 | Labour Charges for Polishing | 30 No. | 400/- per no. | 12,000.00 |
| | | | **Total -** | **22,270.00** |

**विभागाचा अभिप्राय** -उपरोक्तप्रमाणे मा.पंतप्रधान महोदय, भारत सरकार तसेच त्यांचे समवेत कार्यक्रमासाठी उपस्थित असलेले मान्यवरांचा श्रींची मुर्ती देऊन सत्कार करणेकामी लागणारे लाकडी बॉक्स तयार करणे व सदरहू लाकडी बॉक्सला पॉलीश करणे कामाची देयके अदा करणेसाठी एकूण रक्कम रु. २२,२७०/- मात्र खर्च अपेक्षित आहे. त्यास मान्यता देणेत यावी असे मत आहे.

**प्रस्ताव** - तरी वरीलप्रमाणे श्रींचे मुर्तीकरीता लाकडी बॉक्स विभागामार्फत तयार करुन त्यास स्थानिक ठेकेदार यांचेकडून पॉलीश करणेकामी अपेक्षित **रक्कम रु. २२,२७०/-** मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६८०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.पंतप्रधान, भारत सरकार शिर्डी दौरा कार्यक्रमाकरीता मान्यवरांचे सत्कारासाठी साईंचे मुर्तीकरीता लाकडी बॉक्स तयार करणे व पॉलीश करणेसाठी रक्कम रु.२२,२७०/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शन रांग इमारत बांधकामाचे ठेकेदार भानू कन्स्ट्रक्शन,मुंबई यांची काम सुरु करण्याची तारीख (Date of commencement) दि.१९/१०/२०१८ निश्चित करणेबाबत.**

**प्रस्ताव-.** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूद:- अधिनियम कलम २१(१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णय:- मा. व्यवस्थापन समितीचे दि.२२/०८/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५०६ नुसार श्री साईबाबा मंदिर दर्शन रांग इमारतींचे बांधकाम करणेकामी ठेकेदार भानू कंन्ट्रक्शन, मुंबई यांची

जा.नं.एसएसएसटी/बांधकाम /२५२०/२०१८ दि.२३/०८/२०१८ रोजीचे कार्यादेशाने नेमणूक करणेत आलेली आहे.

प्रस्तावना– श्री साईबाबा मंदिर दर्शन रांग इमारत बांधकामाचे ठेकेदार भानू कंन्ट्रक्शन, मुंबई यांचे समवेत करावयाच्या करारानामा मसुद्यास दि.११/०९/२०१८ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता देणेत आलेली आहे. सदरहू प्रकल्पाचा ठळक तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| **कामाचे नाव** | श्री साईबाबा मंदिर दर्शन रांग बांधकाम करणे. |
| **ठेकेदार** | भानू कन्ट्रक्शन, मुंबई |
| **कार्यादेश** | जा.नं.एसएसएसटी/बांधकाम / २५२० / २०१८ दि.२३/०८/२०१८. |
| **मंजूर निविदा रक्कम** | रु. १०९.५० कोटी |
| **कामाचा कालावधी** | १२ महिने. |
| **एकूण कामाचे बांधकाम क्षेत्रफळ** | एकूण क्षेत्रफळ – २२२१४ चौ.मीटर |
| **काम जलद गतीने पूर्ण केल्यास देण्यात येणारे प्रोत्साहन भत्ता.** | मंजूर निविदा रकमेच्या १ % रक्कम प्रती महा. (सदरहू रक्कम जास्तीत जास्त २ % असेल) |
| **विलंबापोटी दंड** | मंजूर निविदा रकमेच्या ०.०५ % प्रती दिवस. (दंड पोटी जास्तीजास्त मंजूर निविदा रकमेच्या १० % रक्कम कपात करणे) |

सद्यस्थिती– ठेकदार यांनी साईटवर बॅरेकेडींग करणे, साईट ले आऊट मार्किंग करणे, बॅचिंग प्लॅन्ट टाकणे, लेबर कॅम्प इ. कामे पूर्ण केलेली आहेत.

ठेकेदार यांची मागणी- ठेकेदार यांनी यापूर्वी दि.२६/०९/२०१८ रोजीचे पत्राने काही मुद्दे कळवून सदरहू कामास सुरुवात करण्याची तारीख दि.१० ऑक्टोबर, २०१८ धरुन करारनामा करणेत यावा असे कळविले होते. ठेकेदार यांचे सदरहू पत्राची प्रत सोबत अवलोकनार्थ जोडली आहे.

दरम्यान, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे समोरील जनहित याचिका क्र.१२५/२०१८ अन्वये सदरहू प्रकल्पाचे बांधकाम जानेवारी – फेब्रुवारी २०१९ पर्यंत सुरु करणेत येऊ नये अशी जनहित याचिका मा.उच्च न्यायालय यांचे समोर दाखल झाली होती. याबाबत श्री साईबाबा संस्थान व इतर शासकीय विभाग यांनी गर्दीचे व्यवस्थापन करणेसाठी उभारणेत आलेल्या सुविधा विचारात घेऊन मा.उच्च न्यायालयाकडून दि.१५/१०/२०१८ रोजीचे आदेशान्वये उपरोक्त जनहित याचिका फेटाळण्यात आली आहे.

त्यानंतर आता ठेकेदार यांनी दि.२२/१०/२०१८ रोजीचे पत्राव्दारे मा.पंतप्रधान,भारत सरकार यांचे शुभहस्ते प्रकल्पाचे भूमिपूजन करण्याचे दि.१९/१०/२०१८ रोजी निश्चित झाल्याने साईटवर खोद कामास सुरुवात करणेत आलेली नाही. त्यामुळे करारनाम्यामध्ये काम सुरु करण्याची तारीख दि.२२/१०/२०१८ अशी नमूद करुन त्यानुसार करारनामा करणेत यावा, अशी विनंती ठेकेदार यांनी केली आहे.

विभागाचा अभिप्राय– कार्यादेशातील अट क्र.०३ पुढील प्रमाणे आहे, “The date of commencement shall be 15 days from the date of this work order.” त्यानुसार काम सुरु करणेची तारीख दि.०७/०९/२०१८ असून काम पूर्ण करणेचा कालावधी १२ महिने आहे. त्यानुसार काम पूर्ण करणेची अंतीम तारीख दि.०६/०९/२०१९ ही येत आहे. तथापी, ठेकेदार यांना उपरोक्त कारणास्तव प्रत्यक्ष कामास सुरुवात करता आलेली नाही. तसेच त्यानंतर या प्रकल्पाचे भूमीपूजन मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे शुभहस्ते करण्याचे निश्चित झाले. त्यामुळे पोलीस विभाग, आय.जी. व स्पेशल प्रोटेक्शन ग्रुप, दिल्ली यांचे सुचनेनुसार व सुरक्षेच्या कारणास्तव खोदाई कामास सुरुवात करता आलेली नाही. तसेच या प्रकल्पाबाबत वर नमूद केलेप्रमाणे मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे जनहित याचिका दाखल झालेली होती. दि.१५/१०/२०१८ रोजीचे मा.न्यायालयाचे आदेशान्वये सदरहू याचिका फेटाळणेत आली. आता, दि.१९/१०/२०१८ रोजी मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे शुभहस्ते सदरहू प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात आले आहे. तरी करारनाम्यामध्ये सदरहू काम सुरु करण्याची तारीख (Date of commencement) दि.१९/१०/२०१८ नमूद करणेस हरकत नाही, असे मत आहे. तसेच प्रकल्पाचे आर्किटेक्ट श्री.उदय काप्रे यांनी दि.२२/१०/२०१८ रोजीचे पत्राव्दारे ठेकेदार यांचे उपरोक्त विनंतीबाबत काम सुरु करणेची तारीख दि.१९/१०/२०१८ अशी नमूद करणेची शिफारस केली आहे.

**प्रस्ताव-** श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शन रांग इमारत बांधकामाचे ठेकेदार भानू कन्स्ट्रक्शन, मुंबई यांचे समवेत वरील प्रकल्पाचे बांधकामासाठी करावयाचे करारनाम्यामध्ये काम सुरु करणेची तारीख (Date of commencement) दि.१९/१०/२०१८ अशी नमूद करुन दि.२२/१०/२०१८ रोजी ठेकेदार यांचेसमवेत करारनामा करणेत आला आहे. तरी अवलोकनार्थ व नोंद घेणेस विनंती.

**निर्णय क्र.६८१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शन रांग इमारत या कामास दसरा महोत्सवाचे वेळी होणारी गर्दी विचारात घेऊन काम उशीरा सुरु करण्यास सांगीतले होते. तसेच याकामाबाबत उद्भवलेले न्यायालयीन प्रकरण यामुळे काम सुरु करणेस विलंब झाला आहे, ही बाब विचारात घेऊन बांधकामाचे ठेकेदार भानू कन्स्ट्रक्शन,मुंबई यांची काम सुरु करण्याची तारीख (Date of commencement) दि.१९/१०/२०१८ निश्चित करणेस मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०५ **हैद्राबाद येथे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे माहिती व मार्गदर्शन केंद्राचे जागेचे भाडे निश्चित करणेबाबत..**

प्रस्ताव- **अधिनियमातील तरतुद**– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ट) मध्ये विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादित करील किंवा खरेदी करील,अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना-** श्री.के.शिवकुमार,अध्यक्ष,श्री त्रिशक्ती हनुमान देवस्थान ट्रस्ट,मिंट कंपांऊड,खैरताबाद, हैद्राबाद यांनी त्यांचे ट्रस्टचे मंदिर हैद्राबाद शहरात मंत्रालयाच्या शेजारी असलेल्या मध्यवर्ती ठिकाणी आहे. हैद्राबाद शहरातून हजारो साईभक्त दररोज शिर्डी येथे साई दर्शनासाठी येत असतात. त्यासाठी त्यांना श्री साईबाबा संस्थानची माहिती मिळणेकामी तसेच निवास व्यवस्था,दर्शन व्यवस्था,अति महत्वाच्या व्यक्तींचे दर्शनासंबंधीत माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. आमचे ट्रस्टचे मंदिर हे मोठया पर्यटनस्थळाजवळ आहे. (उदा.हुसेन सागर लेक,नेकलेस रोड,बिर्ला मंदिर इ.) सदर मंदिराजवळ नेहमीच वर्दळ असून त्या ठिकाणी नागरीकांची मोठया प्रमाणात ये-जा चालू असते. त्यामुळे सदर ठिकाणी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे माहिती व मार्गदर्शन केंद्र सुरु केल्यास उपयुक्त ठरेल. शिवाय चालू वर्ष हे श्री साई समाधी शताब्दी वर्ष असल्याने सदर माहिती व मार्गदर्शन केंद्राचा साईभक्तांना लाभ होईल. त्यासाठी आम्ही आमचे उक्त मंदिर परिसरात श्री साईबाबा संस्थानला माहिती व मार्गदर्शन केंद्र सुरु करणेसाठी अल्प भाडेदरात पुरेशी जागा उपलब्ध करुन देण्यास तयार आहोत. तरी सदर ठिकाणी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे माहिती व मार्गदर्शन केंद्र सुरु करणेकामी पुढील कार्यवाही होणेस विनंती आहे,असेबाबत दि.०४/०७/२०१७ रोजीचे व दि.११/०५/२०१८ रोजीचे पत्रान्वये विनंती केली आहे.

उपरोक्त श्री.के.शिवकुमार यांचे दि.०४/०७/२०१७ रोजीचे पत्र मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे,विश्वस्त,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी त्यांचेकडील जा.नं.४७७२/२०१७ दि.१५/०७/२०१७ अन्वये संस्थानकडे पाठवून त्यात याबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन मंडळाचे पूढे ठेवण्यात येवून नियमानुसार कार्यवाही करुन संबंधीतास तसे कळविणेत यावे,असेबाबत नमूद केलेले आहे.

तदनुषंगाने मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१/०६/२०१८ रोजीच्या सभेपूढे सदरचा प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. त्यात निर्णय क्रं.३८६ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

“सिकंदराबाद येथील संस्थानचे माहिती केंद्र बंद करण्यात येऊन,त्याऐवजी श्री त्रिशक्ती हनुमान देवस्थान ट्रस्ट, मिंट कंपांऊड, खैरताबाद,हैद्राबाद यांची हैद्राबाद परिसरातील जागा लिव्ह ॲण्ड लायसन्स कराराने संस्थानचे माहिती व मार्गदर्शन केंद्रासाठी घेण्यात यावी,”असे ठरले.

उपरोक्त निर्णयाच्या अनुषंगाने प्रस्तावक श्री.के.शिवकुमार,अध्यक्ष,श्री त्रिशक्ती हनुमान देवस्थान ट्रस्ट,मिंट कंपांऊड, खैरताबाद,हैद्राबादयांना उपरोक्त निर्णय इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/११७९/२०१८ दि.०६/०२/२०१८ अन्वये अवगत करण्यात आला व प्रस्तावित मिळकतीचे प्रॉपर्टी कार्डचे उतारे,मंजूर बांधकाम आराखडा,प्रॉपर्टीचा सर्च रिपोर्ट इ.कागदपत्रे मागविण्यात आले.

त्यास अनुसरुन त्यांनी त्यांचेकडील दि.०४/०८/२०१८ रोजीच्या पत्रान्वये हैद्राबाद डिस्ट्रीक्ट टाऊन सर्वे ॲण्ड रजिस्टर वॉर्ड ८१ ई चा उतारा आणि खैरताबाद डिस्ट्रीक्ट हैद्राबाद येथील टाऊन सर्वे लॅण्ड रजिस्टरची

टीएस नं.१७ ब्लॉक बी वॉर्ड ८१ चा उतारा आणि जागेचा स्थळदर्शक नकाशाची छायांकित प्रती इकडेस सादर करुन प्रस्तावित लिव्ह ॲण्ड लायसन्स कराराचे प्रारुप तयार करुन त्यांचेकडेस पाठविणेस विनंती केलेली आहे. तदनुषंगाने संस्थान पॅनलवरील वकील ॲड.जे.के.गोंदकर यांचेकडून करारनामा मसुदा तयार करुन घेणेत आलेला आहे. सदर करारनामा मसुदा मा.अध्यक्ष,श्री त्रिशक्ती हनुमान देवस्थान ट्रस्ट,मिंट कंपांऊड,खैरताबाद,हैद्राबाद यांचेकडेस संमतीकामी पाठविणेत येत आहे.

तत्राप मा.अध्यक्ष,श्री त्रिशक्ती हनुमान देवस्थान ट्रस्ट,मिंट कंपांऊड, खैरताबाद,हैद्राबाद यांनी त्यांचेकडील दि.०६/०९/२०१८ रोजीच्या पत्रान्वये, त्यांचे ट्रस्टचा दि.१९/०५/२०१८ रोजीच्या निर्णय क्रं.१५ च्या निर्णयाची प्रत व प्रस्तावित मिळकतीच्या चतु:र्सिमा इकडेस सादर केलेल्या असून, सदर दि.१९/०५/२०१८ रोजीच्या निर्णयात प्रस्तावित तळमजल्यावरील जागा क्षेत्र सुमारे १००० चौ.फूट इतकी श्री साईबाबा संस्थानचे माहिती व मार्गदर्शन केंद्रासाठी भाडेतत्वावर १५ वर्षांसाठी दरमहा भाडे इलेक्ट्रीक चार्जेस व इतर टॅक्सेससह रक्कम रु.१५,०००/- इतके निश्चित करणेत आलेले असून करारनामा करुन देणेचे अधिकार श्री.के.शिवकुमार,चेअरमनयांना देणेत आलेले असलेचे नमुद केलेले आहे.

दरम्यानचे काळात श्री त्रिशक्ती हनुमान देवस्थान ट्रस्ट,मिंट कंपांऊड,खैरताबाद,हैद्राबाद यांचे उपरोक्त प्रस्तावित मिळकतीचा ताबा संस्थानचे प्रकाशने विभागामार्फत दि.२१/०९/२०१८ रोजी घेतला असून सदर जागेचा वापर संस्थानचे माहिती व मार्गदर्शन केंद्रासाठी सुरु केलेला असलेचे प्रकाशने विभागाने त्यांचेकडील दि.०६/१०/२०१८ रोजीचे परिपत्रकाअन्वये इकडेस कळविलेले आहे.

विभागाचा अभिप्राय- श्री त्रिशक्ती हनुमान देवस्थान ट्रस्ट,मिंट कंपांऊड,खैरताबाद,हैद्राबाद यांचे ट्रस्टचा दि.१९/०५/२०१८ रोजीच्या निर्णय क्रं.१५ मध्ये नमूद केलेप्रमाणे उक्त मिळकतीतील तळमजल्यावरील जागा क्षेत्र सुमारे १००० चौ. फूट इतकी श्री

साईबाबा संस्थानचे माहिती व मार्गदर्शन केंद्रासाठी भाडेतत्वावर १५ वर्षांसाठी इलेक्ट्रीक चार्जेस व इतर टॅक्सेससह दरमहा भाडे रक्कम रु.१५,०००/- इतके निश्चित करता येईल व त्याप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स करारानामा करुन घेता येईल.

प्रस्ताव- श्री त्रिशक्ती हनुमान देवस्थान ट्रस्ट,मिंट कंपांऊड,खैरताबाद,हैद्राबाद यांनी त्यांचे मालकीचे तेलंगाना राज्यातील खैरताबाद येथील श्री त्रिशक्ती हनुमान देवस्थान ट्रस्ट मंदिर,मिंट कंपांऊड जवळील प्रिमायसेस नं.६-१-४९ मधील टीएस नं.१७आणि १८ ब्लॉक डी व ई वॉर्ड नं.८१ बांधीव क्षेत्र सुमारे १००० चौ.फूट इतके श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे माहिती व मार्गदर्शन केंद्र सुरु करणेसाठी लिव्ह ॲण्ड लायसन्स करारावर देवू केलेली जागा १५ वर्षांसाठी इलेक्ट्रीक चार्जेस व इतर टॅक्सेससह दरमहा भाडे रक्कम रु.१५,०००/- इतके निश्चित करणेच्या व त्याप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेणेच्या निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.६८२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री त्रिशक्ती हनुमान देवस्थान ट्रस्ट,मिंट कंपाऊंड,खैरताबाद,हैद्राबाद यांनी त्यांचे मालकीचे तेलंगाना राज्यातील खैरताबाद येथील श्री त्रिशक्ती हनुमान देवस्थान ट्रस्ट मंदिर,मिंट कंपाऊंड जवळील प्रिमायसेस नं.६-१-४९ मधील टीएस नं.१७ आणि १८ ब्लॉक डी व ई वॉर्ड नं.८१ बांधीव क्षेत्र सुमारे १००० चौ.फूट श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे माहिती व मार्गदर्शन केंद्र सुरु करणेसाठी लिव्ह ॲण्ड लायसन्स करारावर देवू केलेली जागा १५ वर्षांसाठी इलेक्ट्रीक चार्जेस व इतर टॅक्सेससह दरमहा भाडे रक्कम रु.१५,०००/- इतके निश्चित करुन व त्याप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६** **तिरुमला तिरुपती देवस्थानप्रमाणे मुख्य ट्रस्टशी निगडीत उद्दीष्टनिहाय वेगवेगळे ट्रस्ट निर्माण करण्यास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम १९५० अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ची श्री साईबाबा शिर्डी संस्थान या नांवे रजि. नं. E-69 दि.२४.१०.१९५३ अन्वये नोंदणी झाली होती. संस्थानची सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था पुनर्घटीत करण्याकरिता, आणि विश्वस्तव्यवस्थेला जनतेसाठी अधिक व्यापक कल्याणकार्य हाती घेणे शक्य व्हावे म्हणून तीचे अधिक चांगल्याप्रकारे व्यवस्थापन, प्रशासन, नियंत्रण करण्यासाठी २००४ मध्ये महाराष्ट्र शासनाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी ) अधिनियम २००४ अंमलात आणला. सध्या या अधिनियमांतर्गत संस्थानचे कामकाज चालते.

संस्थानचे दैनंदिन व्यवहार खुप मोठया प्रमाणावर वाढले असुन शासनाने याठिकाणी त्याप्रमाणे शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या नियुक्त्या केल्या आहेत. तसेच दिवसेंदिवस कायद्यांमध्ये बदल होत असुन संस्थानचे आर्थिक व्यवहार सक्षमपणे नियंत्रण करण्यास मोठया अडचणी निर्माण होत आहेत. संस्थानप्रमाणेच तिरुमला तिरुपती देवस्थान, आंध्र प्रदेश यांचे धार्मिक व धर्मादाय कार्य चालू आहे. संस्थानपेक्षा त्याची दैनंदिन व्यवहार व धार्मिक कार्याची व्याप्ती खुप मोठी आहे. या सर्वांवर नियंत्रण ठेवण्याकरीता याठिकाणी मुख्य ट्रस्टशी निगडीत इतर वेगवेगळे उद्दीष्टनिहाय ट्रस्ट कार्यरत असलेबाबत माहिती त्यांचे संकेतस्थळावर प्राप्त झाली आहे. तिरुपती देवस्थानचे मुख्य ट्रस्टशी निगडीत स्वतंत्र खालीलप्रमाणे उद्देशनिहाय वेगवेगळे ट्रस्ट आहेत.

| Sr.No. | Name of Trust |
|---|---|
| 1 | Sri Venkateswara Pranadana Trust |
| 2 | Sri Venkateswara Vidyadana Trust |
| 3 | Sri Srinivasa Sanakara Nethralaya Trust |
| 4 | BIRRD Trust |
| 5 | Sri Venkateswara Anna Prasadam Trust |
| 6 | Sri Venkateswara Gosamrakshana Shala Trust, |
| 7 | Sri Venkateswara Sarva Sreyas Trust |
| 8 | Sri Venkateswara Heritage Preservation Trust |
| 9 | Sri Venkateswara Veda Parirakshana Trust, |
| 10 | Sri Balaji Arogyavaraprasadini Trust |

मुख्य ट्रस्टमध्ये आलेली आर्थिक रक्कम कायद्यातील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करुन कार्यक्षमपणे उद्दीष्टांकरिता इतर ट्रस्टकडे वर्ग केली जाते. त्यामध्ये कायदेशीर बाबींचे काटेकोरपणे पालन केले जाते. त्यामुळे दैनंदिन आर्थिक व्यवहारांवर, आयकर, जीएसटी, सेवाकर इ. करप्रणालीचा विपरीत प्रभाव दैनंदिन व्यवहारांवर होत नाही. तिरुपती देवस्थानप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे धार्मिक व धर्मादाय कार्य असुन याही ठिकाणी शैक्षणीक, वैद्यकिय, अन्नदान, प्रचार-प्रसार इ. प्रकारचे कार्य केले जाते. भविष्यात त्यामध्ये मोठया प्रमाणावर वाढ होणार आहे. आजरोजी सर्व कायद्यांचे काटेकोरपण पालन करुन आर्थिक व धर्मादाय कारभारांवर नियंत्रण ठेवणे जिकीरीचे झाले आहे. त्यामुळे अस्तित्वात असलेले सर्व कायदे यांचे पालन करुन आलेल्या आर्थिक रकमांचा प्रभाविपणे उद्दीष्टपुर्तीकरिता वापर होण्याच्या दृष्टीने तिरुमला तिरुपती देवस्थानप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अंतर्गत शैक्षणीक, वैद्यकिय, धार्मिक, धर्मादाय, प्रचार-प्रसार इ. उद्दीष्टनिहाय ट्रस्ट निर्माण करण्याबाबत विचार होणे आवश्यक आहे. मुख्य ट्रस्टकडे आलेली आर्थिक रक्कम या इतर ट्रस्टकडे वर्ग करुन संस्थानचे धार्मिक व धर्मादाय उद्दीष्ट पुर्ण करण्यास व दैनंदिन आर्थिक व्यवहारांवर नियंत्रण ठेवणे सोयीचे होईल.

**विभागाचा अभिप्राय :-**

१) तिरुमला तिरुपती देवस्थानमध्ये मुख्य ट्रस्टशी निगडीत उद्दीष्टनिहाय वेगवेगळे ट्रस्ट, त्यांचे दैनंदिन कामकाज, आर्थिक नियोजन, ट्रस्टची उद्दीष्टपुर्ती याबाबत सखोल माहिती घेता येईल.

२) अशाप्रकारे मुख्य ट्रस्टशी निगडीत इतर वेगवेगळे उद्दीष्टनिहाय ट्रस्ट निर्माण केल्यास कायदेशीर, आर्थिक, करविषयक इ. बाबींचा काय परिणाम होईल याचा कायदेशीर सल्ला घेणे व्यवहार्य होईल.

**प्रस्ताव:-** तिरुमला तिरुपती देवस्थानप्रमाणे मुख्य ट्रस्टशी निगडीत उद्दीष्टनिहाय वेगवेगळे ट्रस्ट निर्माण करण्यासंदर्भात चर्चा-विचारविनिमय करणेकरिता प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

निर्णय क्र.६८३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मुख्य ट्रस्टशी निगडीत इतर वेगवेगळे उद्दीष्टनिहाय ट्रस्ट निर्माण केल्यास कायदेशीर, आर्थिक, करविषयक इ. बाबींचा काय परिणाम होईल याबाबत आयकर क्षेत्रातील तज्ञांचा सल्ला घ्यावा, तसेच कायदेशीर बाबीबाबत समिती सदस्य ॲड मोहन जयकर यांनी अभ्यास करुन अहवाल व्यवस्थापन समितीसमोर सादर करावा, असे ठरले.** **(कार्यवाही- लेखाशाखा विभाग)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०७ **वित्तीय वर्ष २०१७-१८ चा वार्षिक लेखापरिक्षण व प्रशासकीय अहवाल विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात सादर करण्याऐवजी त्यानंतरच्या आगामी विधिमंडळाच्या अधिवेशनात सादर करणेबाबत मा.विधि व न्याय विभाग, मुंबई यांना कळविणेबाबत.**

प्रस्ताव- संस्थान अधिनियम-२००४ अन्वये विश्वस्तव्यवस्थेची आर्थिक स्थिती व जमा-खर्चाचा तपशिल दर्शविणारा लेखापरिक्षकांचा अहवाल तयार करुन त्याची एक प्रत राज्य शासनाला व एक प्रत धर्मादाय आयुक्ताला दि.३० सप्टेंबरचे आत सादर करणेबाबत तरतुद आहे. त्यास अनुसरुन जा.क्र.एसएसएसटी/वशी-लेखा-अंलेप/९२३/२०१८ दि.२४.०५.२०१८ अन्वये लेखापरिक्षक नेमणूकीकरीता प्रस्ताव मा. विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे सादर करण्यात आला होता. क्र.सांसवि-१०१८/१०२४/प्र.क्र.११८/का.१६ दि.२५.०९.२०१८ अन्वये मे.मुकुंद एम. चितळे ॲण्ड कं., चार्टर्ड अकौंटंट, मुंबई यांची नेमणूक करण्याचा आदेश प्राप्त झाला होता. त्यास अनुसरुन तात्काळ जा.क्र.एसएसएसटी/वशी-लेखा/अंलेप/३०६८/२०१८/ दि.२५.०९.२०१८ अन्वये वैधानिक लेखापरिक्षक नेमणुक आदेश देण्यात आला आहे.

मे.मुकुंद एम. चितळे ॲण्ड कं., चार्टर्ड अकौंटंट, मुंबई यांनी दि.२५.१०.२०१८ रोजी लेखापरिक्षण सुरु केले आहे. लेखापरिक्षण अहवाल मा.विधि व न्याय विभागस सादर करण्यात येऊन तो लगतच्या विधिमंडळाच्या अधिवेशनात पटलावर सादर करण्यात येतो. त्यापुर्वी किमान १५ दिवस अगोदर लेखापरिक्षण अहवाल पुर्ण झाल्यास त्याची छपाई करुन मा.विधि व न्याय विभागास सादर करणे आवश्यक असते. हिवाळी अधिवेशन दि.१९.११.२०१८ पासून सुरु होत असून त्याकरीता साधारणतः दि.०४.११.२०१८ पर्यंत लेखापरिक्षण पुर्ण होणे आवश्यक आहे. तथापि, वैधानिक लेखापरिक्षण पुर्ण करण्याकरिता साधारणतः एक ते दिड महिना कालावधी लागेल असे श्री.मुकुंद एम. चितळे यांनी कळविले आहे. साधारणतः डिसेंबरचे दुस-या आठवडयात वैधानिक लेखापरिक्षण अहवाल प्राप्त झाल्यास त्यानंतरच्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत त्याची मान्यता घेण्यात येऊन मा.विधि व न्याय विभागास सादर करण्यात येईल.

तरी वित्तीय वर्ष २०१७-१८ चा वार्षिक लेखापरिक्षण व प्रशासकीय अहवाल दि.१९.११.२०१८ रोजीपासून सुरु होणा-या हिवाळी अधिवेशनात सादर करण्याऐवजी त्यानंतरच्या आगामी विधिमंडळाच्या अधिवेशात सादर करणेबाबत मा. विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना कळविण्यास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर.

निर्णय क्र.६८४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, वित्तीय वर्ष २०१७-१८ चा वार्षिक लेखापरिक्षण व प्रशासकीय अहवाल निर्धारीत वेळेत पुर्ण होणार नसल्याने दि.१९.११.२०१८ रोजीपासून सुरु होणा-या हिवाळी अधिवेशनात सादर करण्याऐवजी त्यानंतरच्या आगामी विधिमंडळाच्या अधिवेशात सादर करणेबाबत मा. विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना कळविण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- लेखाशाखा विभाग)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०८ **Oracle India Pvt. Ltd. यांचेकडून त्यांचे बिलाची रक्कम मिळणेकामी प्राप्त झालेले पत्राबाबत व Oracle Licenses खरेदी करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत प्राप्त झालेल्या दरांबाबत.**

प्रस्ताव- अधिनियम २००४ मधील तरतुद :- कलम १७ (१) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

मा. व्य.समितीचा ठराव क्रं. :- ०१.दि.०४.०४.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.२७५.
०२. दि.०१.०६.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३६८.
०३. दि.३१.०६.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४५१.
०४. दि.२६.०७.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४६१.

प्रास्ताविक:- साईटेक प्रकल्प देखभालीचा मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचा कार्यकाल एप्रिल-२०१७ अखेर संपुष्टात आल्याने, मा. व्यवस्थापन समितीचे दि.०४.०४.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. २७५ अन्वये मे. टाटा सन्स यांनी तयारी दर्शविलेप्रमाणे प्रकल्पाअंतर्गत त्यांचेमार्फत Application बाबतची सर्व कार्यवाही तसेच Data Centre, Cloud Based Services, Hardware & Network बाबत सल्ला व व्यवस्थापनाबाबतची कार्यवाही विनामुल्य स्वरुपात करुन घेणेस मान्यता देणेत आली.

साईटेक प्रकल्पाअंतर्गत करण्यात आलेल्या करारनाम्यानुसार कार्यान्वीत Oracle Licenses चे Renewal प्रकल्प कालावधीकरीता (दि.३०.०४.२०१७ पर्यंत) मे. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी केलेले आहे.

प्रकल्प कालावधी दि.३०.०४.२०१७ अखेर संपुष्टात आल्याने Licenses Support Renewal करणे दि.०१.०५.२०१७ पासून प्रलंबीत आहे. Oracle यांनी दि.०९.०५.२०१८ रोजीचे ई-मेलद्वारे Oracle Licenses चे दि.०१.०५.२०१७ पासून नुतनीकरण करणेबाबत तसेच आवश्यकतेप्रमाणे काही नविन लायसन्सेस खरेदी करणेबाबत कळविलेले होते. सदर ई-मेलमध्ये त्यांनी Oracle कंपनीचे अर्थिक वर्ष मे अखेर असल्याने व सद्यस्थितीत डॉलरचे दर हे मार्चचे दर ग्राह्य धरण्यात येणार असल्याने संस्थानने दि.२०.०५.२०१८ पुर्वी पुरवठा आदेश दिल्यास संस्थानचा अधिकचा अर्थिक फायदा होईल असेही नमुद केलेले होते. तसेच याबाबत वेळोवेळी झालेल्या चर्चेचे दरम्यान मा.सदस्य श्री.प्रतापराव भोसले सो. यांनीही सदरचे Licenses चे नुतनीकरण व खरेदी हि मे २०१८ पुर्वी थेट Oracle Corporation यांचे मार्फत केल्याने संस्थानचा अर्थिक फायदा होणार असल्याने Licenses चे नुतनीकरण व खरेदीची कार्यवाही Oracle Corporation यांचे मार्फत त्वरीत करणेत यावी असे सुचित केलेले आहे.

Oracle Licenses चे नुतनीकरण व नव्याने घ्यावयाचे लायसन्सेस बाबत चर्चा करणेकामी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया, मा.उपजिल्हाधिकारी सो., मा.उपकार्यकारी अधिकारी सो. यांचे उपस्थितीत Oracle, Cognizant व TCS यांचे प्रतिनीधी तसेच आयटी विभाग यांची दि. १७.०५.२०१८ रोजी शिर्डी येथे बैठक आयोजीत करणेत आलेली होती. सदर बैठकीमध्ये Oracle Licenses चे नुतनीकरण व आवश्यक Oracle Licenses खरेदी करणेबाबत सविस्तर चर्चा करणेत आलेली आहे. त्यानुसार TCS यांनी दि.१८.०५.२०१८ रोजीचे ई-मेलव्दारे Oracle Database Enterprise Edition (10 Proc) व कार्यप्रणाली विकसित करणेकामी नव्याने Oracle Developer Suite Licenses-5 खरेदी करणे आवश्यक आहे, असे कळविलेले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२.०५.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ३४१ अन्वये पुढील प्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहेत. "ओरॅकल प्रणालीच्या ज्या लायसन्सचे नुतनीकरण करणे आवश्यक आहे, त्या सर्व लायसन्सचे त्वरीत नुतनीकरण करुन घेण्यात यावे. तसेच करारनाम्यानुसार मे. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी Oracle प्रणालीच्या ज्या Licenses चे नुतनीकरण करणे आवश्यक होते, त्या Licenses चे नुतनीकरण करण्यासाठी येणारा खर्च मे. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांच्या प्रलंबीत देयकातुन वसुल करण्यात यावेत".
सबब, सद्यस्थितीत कार्यान्वीत असलेल्या Oracle Licenses चे नुतनीकरण तसेच नव्याने Oracle Database Enterprise Edition (10 Proc) व Oracle Developer Suite Licenses-5 खरेदी करणे आवश्यक असल्याने, सदरचे दर कळविणेबाबत तसेच यासंदर्भात चर्चा करणेकरीता दि.२३.०५.२०१८ रोजी शिर्डी येथे उपस्थित राहणेबाबत Oracle Corporation यांना दि. १८.०५.२०१८ रोजीचे ई-मेलव्दारे कळविणेत आलेले होते.

त्यानुसार Oracle Corporation चे प्रतिनिधी श्री रोहन मेनन, सिनीयर सेल्स डायरेक्टर व श्री कौस्तुभ देशपांडे, बिझनेस मॅनेजर हे दि.२३.०५.२०१८ रोजी शिर्डी येथे चर्चेसाठी उपस्थित होते. यावेळी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया, मा.उपजिल्हाधिकारी, मा.मुख्यलेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी व माहिती तंत्रज्ञान विभाग यांचे समवेत झालेल्या चर्चेअंती Oracle Corporation यांनी लायसन्सेस नुतनीकरण व खरेदीकरीता पुढीलप्रमाणे दर देऊ केलेले होते.

| Sr. No | Item | List Price | Quotation Offer (20% Discount) | Quote offered during meeting held on 23.05.2018 | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Initial 52% Disc. On Sr.No. 1 & 2 | Revised 67% Disc. On Sr.No. 1 & 2 | Final 70% Disc. On Sr.No. 1 & 2 |
| 01 | Oracle Database Enterprise Edition – Processor Perpetual Qty-10 | 3,76,67,560 | 3,00,83,004 | 1,80,80,428.8 | 1,24,09,239 | 1,12,81,126.50 |
| 02 | Oracle Internet Developer Suite- Named User Plus Perpetual Qty-05 | 22,99,700 | 18,36,647 | 11,03,856 | 7,57,617 | 6,88,742.46 |
| 03 | Oracle Database licenses renewal | 30,50,997.26 | 30,50,997 | 22,25,485 | 22,25,485 | 22,25,485 |
| 04 | Oracle application licenses renewal | 16,42,752 | 16,42,752 | 11,93,696 | 11,93,696 | 11,93,696 |
| | **Total** | **4,46,61,009** | **3,66,13,400** | **2,26,03,465.8** | **1,65,86,037** | **1,53,89,049.96** |

उपरोक्त तक्त्याप्रमाणे Oracle Corporation यांनी नव्याने खरेदी करावयाचे अ.क्रं. ०१ व ०२ चे लायसन्सेससाठी ७०% पेक्षाही जास्त सुट देऊ केलेली होती. इतक्या प्रमाणात सुट त्यांचेमार्फत यापुर्वी इतर कुणासही देण्यात आलेली नाही असे त्यांनी नमुद केलेले होते. साईटेक प्रकल्पाअंतर्गत संगणक प्रणालींचे

अनुषंगिक कार्यवाही करणेकरीता उपरोक्तप्रमाणे Oracle Software Licenses Support Renewal करणे व आवश्यक Oracle Software Licenses खरेदी करणे अत्यावश्यक असल्याने याकामी Oracle Corporation यांचेबरोबर झालेली चर्चा व त्यांनी देऊ केलेल्या दराबाबत मा. अध्यक्ष महोदय यांना अवगत करुन त्यांचे मान्यतेने Oracle यांना माहिती तंत्रज्ञान विभागाचे दि.२३.०५.२०१८ रोजीचे मा. अध्यक्ष महोदय यांचे स्वाक्षरांकीत मंजुर टिपणी अन्वये जा.नं.एसएसएसटी/आयटी/९२५/२०१८ दि.२४.०५.२०१८ अन्वये एकूण रक्कम रुपये १,५३,८९,०४९.९६ मात्रचा पुरवठा आदेश देण्यात आलेला होता. Oracle Corporation यांना देण्यात आलेल्या पुरवठा आदेशाप्रमाणे त्यांनी सदर लायसन्सेस संस्थानला वितरीत केलेली असून, याकामीचे बिले संस्थान आ.क्र.४१५३/२०१८ दि.२९.०५.२०१८ व संस्थान आ.क्र.४५१४/२०१८ दि.०४.०६.२०१८ अन्वये इकडील विभागास प्राप्त झालेली आहेत.

Oracle Corporation यांना देण्यात आलेल्या पुरवठा आदेशाची नोंद घेऊन याकामी येणारे रक्कम रु.१,५३,८९,०४९.९६ मात्रचे खर्चास व सदरची रक्कम Oracle यांना अदा करण्यास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि.०१.०६.२०१८ रोजीचे सभेपुढे सादर करण्यात आलेला होता. त्यावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्रं. ३६८ नुसार पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहेत.

"या विषयावरील चर्चेच्या वेळी सदर सॉफ्टवेअर लायन्ससेस रु.१.२८ कोटी इतक्या कमी किंमतीपर्यंत मिळू शकतात, असे समिती सदस्य श्री. प्रताप भोसले यांचे मत असल्याचे मा.अध्यक्षांनी नमूद केले.

यावेळी Oracle Corporation चे प्रतिनिधी श्री.कौस्तुभ देशपांडे यांचेशी दर कमी करणेबाबत भ्रमणध्वनीद्वारे चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, Oracle Software Licenses Purchase & Support Renewal खरेदी करणेकामी Oracle Corp. यांना देण्यात आलेला पुरवठा आदेश रद्द करणेत यावा".

उपरोक्त निर्देशाप्रमाणे Oracle Corporation यांना यापुर्वी देण्यात आलेला जा.नं.एसएसएसटी /आयटी/९२५/२०१८, दि.२४.०५.२०१८ रोजीचा रक्कम रु.१,५३,८९,०४९.९६ मात्रचा पुरवठा आदेश रद्द करणेत येत असलेबाबत माहिती तंत्रज्ञान विभागाचे दि.१३ जुन २०१८ रोजीचे मंजुर टिपणीअन्वये जा.क्रं. SSST/IT/1276/2018, दि.१३.०६.२०१८ चे पत्राद्वारे कळविणेत आलेले आहे.

सदरचे पत्र प्राप्त झालेनंतर ओरॅकल कंपनीचे प्रतिनीधी श्री.कौस्तुभ देशपांडे यांनी प्रत्यक्ष भेटीअंती त्यांना देण्यात आलेला पुरवठा आदेश त्यांचे कंपनीचे नियमांनुसार रद्द करता येत नसलेबाबत कळविलेले आहे. तसेच त्यांनी अशाप्रकारची लायसन्सेस यापुर्वी श्री तिरुपती देवस्थान तसेच इतर शासकीय संस्थेस थेट विक्री केले असलेबाबत कळवून सदरचे पुरवठा आदेशांची प्रत सादर केलेली आहे. संस्थानला देण्यात आलेले दर हे सर्वोत्तम असून यापेक्षा जास्त सुट मिळणे शक्य नसल्याचेही त्यांनी यावेळी नमुद करुन, सदरचा पुरवठा आदेश रद्द करु नये अशी विनंती केलेली होती.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६.०७.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ४६१ अन्वये पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहेत. "यापुर्वी ऑरॅकल कंपनीकडून जे लायसन्सेस खरेदी केलेले आहे त्यांचे नुतनीकरण कंपनीकडूनच करणे आवश्यक आहे. त्यामुळे पुढील लायसन्सेसचे नुतनीकरण ऑरॅकल कंपनीकडूनच करुन घेण्यास व त्यासाठी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच, जे लायसन्सेस नव्याने घ्यावयाचे आहे ते खरेदी करणेस विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली".

उपरोक्त निर्देशाप्रमाणे इकडील विभागाचे दि.१४.०९.२०१८ रोजीचे मंजुर टिपणीअन्वये Oracle India Pvt. Ltd. यांना लायसन्सेसचे नुतनीकरण करणेकामी कार्यादेश देण्यात आलेला असून,दि.१४.०९.२०१८ रोजीचे मंजुर टिपणीअन्वये नव्याने घ्यावयाचे लायसन्सेस खरेदी करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेत येत आहे.

Oracle India Pvt. Ltd. यांचे संस्थान आ.क्रं.१२३९५, दि.२५.०९.२०१८ व संस्थान आ.क्रं. १३७३०, दि. ११.१०.२०१८ तसेच संस्थान आ.क्रं.१४५२४, दि.२३.१०.२०१८ रोजीचे पत्रे इकडील विभागास प्राप्त झालेली असून, सदरचे पत्रामध्ये त्यांनी संस्थानमार्फत त्यांना देण्यात आलेल्या पुरवठा आदेशाची त्यांनी संस्थानला सादर केलेल्या बीलांची रक्कम त्यांना अदा करणेबाबत कळविलेले आहे. सदरचे पत्रामध्ये त्यांनी सादर केलेल्या बीलाप्रमाणेची रक्कम दि.१९.१०.२०१८ पर्यंत भरणेबाबत कळविलेले आहे. सदरचे रकमेवर १८% प्रमाणे देय तारखेपासून व्याज आकारण्याचा अधिकार ते राखून ठेवीत असलेबाबत नमुद केलेले आहे. तसेच सदरचे पत्रामध्ये Oracle India Pvt. Ltd. यांनी सदरची रक्कम दि.१९.१०.२०१८ पर्यंत संस्थानने त्यांना अदा केली नाही तर रक्कम वसूल करणेकरीता कायदेशीर मार्गाचा अवलंब करणेस ते बांधील असतील व

याकामी येणा-या खर्चास संस्थान जबाबदार असेल, असे पत्रामध्ये नमुद केलेले आहे. Oracle India Pvt. Ltd. यांचेकडून दि.२३.१०.२०१८ रोजी प्राप्त झालेल्या पत्रामधील मजकुर पुढील प्रमाणे आहे.

"Dear Sir/Madam,

3. This is a demand letter sent on 12th October 2018 to inform you that you had placed certain orders on us, details of which are as follows.

4. Based on the orders placed, we had sold various products to you and raised invoices for the products sold in accordance with the terms of the said orders. By virtue of such sales, you are lawfully bound and liable for payment of the amount due on the invoices raised by us.

| Invoice | Invoice | Trx Type | Order No. | Purchase Order | Invoice Amt. | Outst-anding Amt. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1015827 | 24.05.18 | LicCustInv | 22263 | SSST/IT/925/2018 | 14124445 | 14124445 |
| 1015996 | 25.05.18 | Invoice-OKS | 4548124 | SSST/IT/925/2018 | 2626072 | 2626072 |
| 1016046 | 26.05.18 | Invoice-OKS | 4777984 | SSST/IT/925/2018 | 1408561 | 1408561 |

2. We have time and again requested you to make the payment of the amounts due to us and have been following up with you since 8th March 2018 for the payment of Invoice listed above.

c) You have failed to make the payment due on the invoices raised by us within the period agreed upon and the amount due for payment to us is **Rs 1,81,59,078 (One Crore Eighty One Lakhs Fifty Nine Thousand Hundred and Seventy Eight only)**We are lawfully entitled to receive payment of this amount and you are legally bound to pay the said amount to us. Without prejudice to its other rights, we reserve the right to interest at the rate of 18 % on this amount due and outstanding to us from the period the amount fell due for payment until the date of actual payment.

d) Please note that Oracle representative had introduced you to the financing team as per your request. We also further wish to inform that financing was never a pre-condition in the contract. Therefore you may please note that once signed the contact cannot be terminated.

5. We call upon your company to comply with the following before 19/10/2018.

6. Pay us the amount **Rs 1,81,59,078 (One Crore Eighty One Lakhs Fifty Nine Thousand Hundred and Seventy Eight only)**due to us. Without prejudice, we reserve our right to payment of 18 % interest on the amount due to us until the date of actual payment and the right to claim damages.

7. In the event you fit and appropriate in the circumstances holding you liable for all costs and consequences thereof.

If you have any questions, please contact the undersigned immediately.

मा.व्यवस्थापन समितीने दिलेल्या निर्देशानुसार इकडील विभागाचे दि.१४.०९.२०१८ रोजीचे मंजुर टिपणीअन्वये नव्याने घ्यावयाचे लायसन्सेस खरेदी करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत प्राप्त झालेल्या एकुण तीन ई-निविदांच्या तांत्रिक ई-निविदा दि.२२.१०.२०१८ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेसमोर उघडणेत आलेल्या आहेत. प्राप्त तीनही ई-निविदा तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरल्याने सदर ई-निविदांच्या वाणिज्यक ई-निविदा दि.२५.१०.२०१८ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेसमोर उघडणेत आलेल्या आहेत. उघडण्यात आलेल्या वाणिज्यक ई-निविदांचा तुलनात्मक तक्ता पुढीलप्रमाणे –

| S.N. | Description | Qty. | Sujata Computers | | Caritor Solutions | | Bias IT Solutions | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 01. | Oracle Database Ent.Edi. | 10 | 2709470 | 27094700 | 2632787 | 26327870 | 2683909.41 | 26839094.10 |
| 02. | Soft.Update for 1 Yr. Oracle Database Ent.Edi. | 10 | 406421 | 4064210 | 161738 | 1617380 | 402586.41 | 4025864.10 |
| 03. | Prod. Support for 1 Yr. Oracle Database Ent.Edi. | 10 | 189664 | 1896640 | 395918.60 | 3959186 | 187873.66 | 1878736.60 |
| 04. | Oracle Int.Dev.Suite | 5 | 330840 | 1654200 | 370590.00 | 1852950 | 327719.46 | 1638597.30 |
| 05. | Soft. Updates fo 1 Yr Oracle Int.Dev.Suite | 5 | 49626 | 248130 | 50221 | 251105 | 49157.92 | 245789.60 |
| 06. | Prod. Support for 1 YR Oracle Int.Dev.Suit | 5 | 23159 | 115795 | 24503 | 122515 | 22940.36 | 114701.80 |
| | **Total :** | | | **3,50,73,675** | | **3,41,31,006** | | **3,47,42,783.50** |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याप्रमाणे M/s. Caritor Solutions यांनी देऊ केलेल्या दराप्रमाणे येणारी एकत्रित रक्कम रु. ३,४१,३१,००६/- (करासह) हि निम्नतम आहे. परंतु सदरचे लायसन्सेस खरेदी करणेकरीता Oracle Corporation यांना देण्यात आलेल्या पुरवठा आदेशामधील सदरची रक्कम रु.१,४१,२४,४४५ (करासहित) इतकी आहे.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे Oracle India Pvt. Ltd. यांना देण्यात आलेल्या पुरवठा आदेशाची रक्कम त्यांना अदा न केल्यास ते कायदेशीर कार्यवाही करु शकतात, यासंदर्भात प्राप्त झालेल्या त्यांचे पत्राबाबत तसेच मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशान्वये आवश्यक Oracle Licenses खरेदी करणेकरीता राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत निम्नतम निविदाकाराने देऊ केलेल्या दराप्रमाणे येणारी एकूण रक्कम रु.३,४१,३१,००६/- (करासह) हि Oracle Corporation यांना याकामी देण्यात आलेल्या पुरवठा आदेशामधील रक्कम रु. १,४१,२४,४४५ (करासहित) पेक्षा रक्कम रु.२,००,०६,५६१/- ने जास्त असल्याने निविदा प्रक्रियेविषयी निर्देश होणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**मागणी** :- प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे

अ) Oracle India Pvt.Ltd. यांनी त्यांना देण्यात आलेला पुरवठा आदेश रद्द करता येत नसुन संस्थानने सदरचे पुरवठा आदेशाप्रमाणे देय असलेली एकुण रक्कम रु.१,८१,५९,०७८/- त्यांना वेळेत अदा न केल्यास त्यांचेमार्फत याबाबत कायदेशीर मार्गाचा अवलंब करणेत येईल व याकामी येणा-या खर्चास व परिणामास संस्थान जबाबदार राहील अशा आशयाचे प्राप्त झालेले पत्राबाबत.

आ) मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशान्वये आवश्यक Oracle Licenses खरेदी करणेकरीता राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत निम्नतम निविदाकाराने देऊ केलेल्या दराप्रमाणे येणारी एकुण रक्कम रु.३,४१,३१,००६/- (करासह) हि Oracle Corporation यांना देण्यात आलेल्या पुरवठा आदेशामधील रक्कम रु.१,४१,२४,४४५ (करासहित) पेक्षा रक्कम रु. २,००,०६,५६१/- ने जास्त आहे. सबब, ई-निविदा प्रक्रियेविषयी पुढील निर्देश होणेकामी.

उपरोक्त 'अ' व 'आ' बाबत निर्णयार्थ सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

**प्रस्ताव**:-

अ) Oracle India Pvt. Ltd. यांनी त्यांना देण्यात आलेला पुरवठा आदेश रद्द करता येत नसुन संस्थानने पुरवठा आदेशाप्रमाणे देय असलेली एकुण रक्कम रु.१,८१,५९,०७८/- त्यांना वेळेत अदा न केल्यास त्यांचेमार्फत याबाबत कायदेशीर मार्गाचा अवलंब करणेत येईल व याकामी येणा-या खर्चास व परिणामास संस्थान जबाबदार राहील अशा आशयाचे प्राप्त झालेले पत्राबाबत.

आ) मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशान्वये आवश्यक Oracle Licenses खरेदी करणेकरीता राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत निम्नतम निविदाकाराने देऊ केलेल्या दराप्रमाणे येणारी एकुण रक्कम रु.३,४१,३१,००६/- (करासह) हि Oracle Corporation यांना देण्यात आलेल्या पुरवठा आदेशामधील रक्कम रु.१,४१,२४,४४५ (करासहित) पेक्षा रक्कम रु.२,००,०६,५६१/- ने जास्त आहे. सबब, ई-निविदा प्रक्रियेविषयी पुढील निर्देश होणेकामी.

उपरोक्त 'अ' व 'आ' बाबत निर्णयार्थ सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.६८५** **यापुर्वी Oracle Licenses चे OEM यांचेकडून खरेदी करावयाच्या Licenses चे दर मागविले होते. सदरच्या दराबाबत खरेदी समितीमध्ये वाटाघाटी करुन खालील प्रमाणे दर निश्चीत करण्यात आले होते.**

| Sr. No | Item | List Price | Quotation Offer (20% Discount) | Quote offered during meeting held on 23.05.2018 | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Initial 52% Disc. On Sr.No. 1 & 2 | Revised 67% Disc. On Sr.No. 1 & 2 | Final 70% Disc. On Sr.No. 1 & 2 |
| 01 | Oracle Database Enterprise Edition – Processor Perpetual Qty-10 | 3,76,67,560 | 3,00,83,004 | 1,80,80,428.8 | 1,24,09,239 | 1,12,81,126.50 |
| 02 | Oracle Internet Developer Suite- Named User Plus Perpetual Qty-05 | 22,99,700 | 18,36,647 | 11,03,856 | 7,57,617 | 6,88,742.46 |
| 03 | Oracle Database licenses renewal | 30,50,997.26 | 30,50,997 | 22,25,485 | 22,25,485 | 22,25,485 |
| 04 | Oracle application licenses renewal | 16,42,752 | 16,42,752 | 11,93,696 | 11,93,696 | 11,93,696 |
| | **Total** | **4,46,61,009** | **3,66,13,400** | **2,26,03,465.8** | **1,65,86,037** | **1,53,89,049.96** |

**उपरोक्त खरेदी प्रक्रियेसाठी मे २०१८ पुर्वी पुरवठा आदेश देणे आवश्यक असल्याने मा.अध्यक्ष महोदय यांचे मान्यतेने दि. २४.०५.२०१८ चे आदेशान्वये पुरवठा आदेश देण्यात आला होता. पुरवठा आदेशाप्रमाणे**

Oracle India Pvt. Ltd. यांनी सदर लायन्ससेस संस्थानला वितरीत केलेली असुन याकामाची बिले सादर केलेली होती. मात्र व्यवस्थापन समितीच्या दि.०१.०६.२०१८ रोजीच्या बैठकीतील निर्णय क्र.३६८ नुसार Oracle Software Licenses & Support Renewal खरेदी कामी Oracle Corporation यांना देण्यात आलेला पुरवठा आदेश रद्द करण्यात येऊन ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी, असे ठरले.

मा.व्यवसथापन समितीच्या निर्णयानुसार Oracle Software Licenses & Support Renewal खरेदी कामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आली होती. त्यानुसार खालील प्रमाणे दर प्राप्त झालेले आहे.

| S.N. | Description | Qty. | Sujata Computers | | Caritor Solutions | | Bias IT Solutions | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 01. | Oracle Database Ent.Edi. | 10 | 2709470 | 27094700 | 2632787 | 26327870 | 2683909.41 | 26839094.10 |
| 02. | Soft.Update for 1 Yr. Oracle Database Ent.Edi. | 10 | 406421 | 4064210 | 161738 | 1617380 | 402586.41 | 4025864.10 |
| 03. | Prod. Support for 1 Yr. Oracle Database Ent.Edi. | 10 | 189664 | 1896640 | 395918.60 | 3959186 | 187873.66 | 1878736.60 |
| 04. | Oracle Int.Dev.Suite | 5 | 330840 | 1654200 | 370590.00 | 1852950 | 327719.46 | 1638597.30 |
| 05. | Soft. Updates fo 1 Yr Oracle Int.Dev.Suite | 5 | 49626 | 248130 | 50221 | 251105 | 49157.92 | 245789.60 |
| 06. | Prod. Support for 1 YR Oracle Int.Dev.Suit | 5 | 23159 | 115795 | 24503 | 122515 | 22940.36 | 114701.80 |
| | **Total :** | | | **3,50,73,675** | | **3,41,31,006** | | **3,47,42,783.50** |

उपरोक्त Licenses साठी आलेले Caritor Solutions यांचे निम्नतम दर रक्कम रु.३,४१,३१,००६/- मात्र (GST सह) इतके प्राप्त झाले. सदरचे दर हे Oracle Licenses चे OEM Oracle India Pvt. Ltd. यांना दिलेल्या पुरवठा आदेशातील रक्कम रु.१,४१,२४,४४५/-मात्र (GST सह) यापेक्षा रक्कम रु.२,००,६,५६१/- मात्र ने जास्त आहे.

Oracle India Pvt. Ltd. यांचे दि.२५.०९.२०१८, दि.११.१०.२०१८ व दि.२३.१०.२०१८ अन्वये संस्थानला सादर केलेल्या बिलाची रक्कम त्यांना दि.१९.१०.२०१८ पर्यंत आदा करणेबाबत कळविलेले आहे. तसचे सदरचे रकमेवर १८% प्रमाणे देय तारखेपासुन व्याज आकारण्याचा अधिकार राखून ठेऊन सदरची रक्कम आदा केली नाही तर, रक्कम वसुल करणेकरीता कायदेशीर मार्गाचा अवलंब करणेस ते बांधील असतील व याकामी येणाऱ्या खर्चास संस्थान जबाबदार असेल, असे कळविलेले आहे.

Oracle India Pvt. Ltd. ने दिलेल्या कायदेशीर नोटीशीबाबत चर्चा करणेसाठी कंपनीचे प्रतिनिधी श्री.देशपांडे हे आजचे सभेत उपस्थित होते. त्यांनी शिर्डी संस्थानने दि २४.०५.२०१८ रोजी दिलेल्या रक्कम रु. १,४१,२४,४४५/-मात्र (GST सह) या पुरवठा आदेशानुसार अंमलबजावणी करणेची विनंती केली. व याबाबत Oracle India Pvt. Ltd. ने दिलेली नोटीस रद्द करण्यास सहमती दर्शविली. तसेच श्री.देशपांडे यांनी Oracle India Pvt. Ltd. चे OEM कडून थेट खरेदी केलेल्या तिरुपती तिरुमल्ला देवस्थान व गुजरात मिनरल डेव्हलपमेंट कार्पोरेशन लि. यांचे पुरवठा आदेश नमुन्यादाखल सादर केले.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे हिताचे दृष्टीने Oracle Licenses हे ई-निविदेतील निम्नतम दरधारकाकडून खरेदी न करता OEM यांचेकडून त्यांना देण्यात आलेल्या पुरवठा आदेशाप्रमाणे खरेदी करण्यास व रक्कम आदा करणेस मान्यता देण्यात आली. याकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी.

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०९ — अंबा वेलफेअर फाऊंडेशन यांचे साईआश्रम भक्तनिवास विभागातील स्थायी शताब्दी मंडपामध्ये सत्संग शिबीर आयोजनाबाबत.

प्रस्ताव- अधिनियमः- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४:-२१(१) (ग) " भक्तांना मंदिरात देवतेच्यादर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धर्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे." व (२) पोट-कलम (१) (ख) " भक्तांना राहण्याकरिता व वापर करण्याकरिता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे."

मा.व्यवस्थापन समिती ठरावः- निरंक.

प्रस्ताविकः- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनस्त साईआश्रम भक्तनिवास विभागामध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष-२०१८ निमित्त साईभक्तांच्या अतिरिक्त निवासव्यवस्था व संस्थान तर्फे आयोजित विविध धार्मिक कार्यक्रमांसाठी कायमस्वरुपी टेन्साईल फेब्रीक शेड (साईआश्रम शताब्दी

मंडप) उभारण्यात आला असुन गर्दीच्याकाळात निवासव्यवस्था पुर्ण क्षमतेने भरल्यानंतर येथील मंडपामध्ये साईभक्तांची अतिरिक्त निवासव्यवस्था नियमाप्रमाणे करण्यात येते.

**प्रस्ताव**:- दि.०३/१०/२०१८ रोजीच्या पत्रान्वये अंबा वेलफेअर फाऊंडेशन यांनी साईआश्रम भक्तनिवास विभागामध्ये दि.१०/०१/२०१९ ते दि.१३/०१/२०१९ अखेर दादाभगवान निवासी सत्संग शिबीर आयोजनाबाबत पत्र पाठविले असुन त्यासाठी खालील सुविधा पुरविणे बाबत विनंती केली आहे.

१) साईआश्रम भक्तनिवास मधील सत्संग हॉल (मंडप).

२) संपुर्ण महाराष्ट्रातुन येणा-या १५०० किंवा त्यापेक्षा जास्त साधकांसाठी सत्संग हॉलच्या जवळ निवासव्यवस्था.

३) ॲम्फीथीएटर परिसरात शेड तयार करुन त्यामध्ये जेवण तयार करण्याची परवाणगी मिळावी. आम्ही सदर जेवण बाहेरील केटरर्स कर्मचा-यांकडुन तयार करुन घेऊ.

४) सदर सत्संग कार्यक्रमाचे व्हि.डी.ओ रेकॉर्डीग करणेस, त्याकामी लाईट, साऊंड रेकॉर्डीग सिस्टीम लावणेसाठी व याकामी विज वापराबाबत परवाणगी मिळावी.

५) दादा भगवान सत्संगाचे बॅनर गेट व परिसरात लावणेबाबत परवानगी.

६) सदर सत्संगासाठी आलेल्या साधकांना त्यांच्या आय.डी वर साईबाबा मंदिरामध्ये सुलभ दर्शनाची सुविधा उपलब्ध करुन द्यावी.

उपरोक्त कामी लागणार विहीत आकार देण्यास आम्ही तयार असुन, याबाबत परवानगी देण्यात यावी ही विनंती.

विभागाचे स्पष्ट मत/अभिप्रायः- अंबा वेलफेअर फाऊंडेशन यांनी साईआश्रम भक्तनिवास विभागातील शताब्दीमंडपामध्ये १५०० साधकांसाठी दादाभगवान निवासी सत्संग शिबीर आयोजित करणेबाबत मानस असल्याचे कळविले असुन त्यासाठी सदर मंडप व कार्यक्रमासाठी येणा-या साधकांच्या निवासव्यवस्थेबाबत विनंती केली आहे.

साईआश्रम भक्तनिवास विभागाकडे कायमस्वरुपी ६५x३०० फुट याआकाराच्या पॉली कार्बोनेट शेडची उभारणी बांधकाम विभागामार्फत करण्यात आली आहे. त्यात गर्दीच्या काळात साईभक्तांची अतिरिक्त निवासव्यवस्थाकरण्यात येत असुन, शताब्दी महोत्सवाच्या अनुषंगाने देश-विदेशातील साई मंदिर प्रतिनिधींचे चर्चासत्र, शेतक-यांसाठी "झिरो बजेट नैसर्गिक व अध्यात्मिक शेती तसेच विषमुक्त शेती, तसेचश्री साई दिव्य कथाइ. विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

अंबा वेलफेअर फाऊंडेशन यांनी सदर सत्संगासाठी लागणारा सेवा आकार/खर्च देण्यास तयार असलेबाबत कळविले असुन, सदर विनंती पत्रात नमुद केले प्रमाणे सदर सत्संगासाठी मंडप व निवासव्यस्था द्यावयाची झाल्यास,

१) साईआश्रम भक्तनिवास विभागातील शताब्दी मंडपसंस्थान मार्फत उपलब्ध करुन देता येईल, याकामी संस्थानचे बांधकाम विभागामार्फत सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे कडुन सदर जागा, मंडप, व ॲम्फीथीएटरचा सेवाआकार निश्चीत करुन त्याप्रमाणे सेवाआकार घेता येईल.

२) मंडपामध्ये, मॅट, कनात, खुर्च्या, ध्वनीक्षेपनइत्यादि अनुशंगीक बाबींची व्यवस्था आयोजकांना स्वखर्चाने करावी लागेल.

३) सदर सत्संगासाठी येणा-या १५०० साधकांसाठी निवासव्यवस्था करावयाची झाल्यास, प्रत्येक रुम मध्ये ५ व्यक्ती याप्रमाणे ३०० नॉन.एसी खोल्या उपलब्ध करुन द्याव्या लागतील व प्रत्येक खोलीचा रु ३०० प्रमाणे ३०० खोल्यांसाठी रु ९०,०००/- प्रतिदिवस याप्रमाणे चार दिवसांसाठी ३,६०,०००/- इतका सेवाआकार होईल. तसेच माहीती व तंत्रज्ञान विभागामार्फत दि.१०/०१/२०१९ ते दि.१३/०१/२०१९ अखेर ३०० खोल्यांचे ऑनलाईन आरक्षण कमी करुन नियमाप्रमाणे सेवाआकार घेऊन निवासव्यवस्था उपलब्ध करुन देता येईल. तसेच वेळोवेळी आयोजकांचे खोल्यांच्या मागणी प्रमाणे माहीती व तंत्रज्ञान विभागामार्फत खोल्यांचे आरक्षण कमी करता येईल.

४) संस्थान नियमाप्रमाणे ॲम्फीथीएटर व शताब्दी मंडपासाठी लागणारा विद्युत पुरवठा विद्युत विभागामार्फत बसविण्यात आलेल्या स्वतंत्र विद्युत मिटरव्दारे देता येईल. तसेच ॲम्फीथीएटरमध्ये आयोजकास स्वःखर्चाने शेड उभारावे लागेल.

५) सदर कार्यक्रमासाठी येणा-या साधकांना जेवण तयार करण्यासाठी ॲम्फीथीएटरची मागणी केली असुन, साईआश्रम भक्तनिवास विभागामध्ये प्रसादालय विभागामार्फत जेवणाची स्वतंत्र व्यवस्था असल्याने व साईभक्तांची सुरक्षितता, स्वच्छता इ. बाबी विचारात घेता आज पर्यंत इकडील विभागात आयोजकांना अन्नपदार्थ

तयार करणेबाबत परवानगी देण्यात आलेली नाही.तसेच अंबा वेलफेअर फाऊंडेशन यांनी अन्न पदार्थ बाहेरुन आणुन संस्थान परिसरात वितरीत केल्यास व त्यापासुन साईभक्तांना किंवा साधकांना काही बाधा निर्माण झाल्यास संस्थानच्यानावलौकीकास बाधा येऊन कायदेशीर बाबी निर्माण होऊ शकतात. याकरीता अंबा वेलफेअर फाऊंडेशन यांना प्रसादालयामार्फत तयार करण्यात आलेले अन्न पदार्थ प्रसादालय हॉलमध्ये देता येईल अशी इकडील विभागाची धारणा आहे.

६) सदर सत्संग कार्यक्रमाचे व्हि.डी.ओ रेकॉर्डींग करणेस, त्याकामी लाईट, साऊंड रेकॉर्डींग सिस्टीम लावणेसाठी शासन नियमाप्रमाणे तात्पुरती परवानगी संस्थानचे सी.सी.टी.व्ही विभागामार्फत देता येईल.

७) कार्यक्रमाचे कालावधीपर्यंत दादाभगवान सत्संगाचे बॅनर गेट व परिसरात लावणेबाबत परवानगी देता येईल.

८) सत्संगासाठी आलेल्या साधकांना त्यांच्या आय.डी वर मंदिरामध्ये सुलभ दर्शनाची सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत कळविले असुन, संस्थान अधिनस्त सर्व निवासस्थानांमध्ये तसेच जनसंपर्क कार्यालयामार्फत पेड व बायोमॅट्रीक दर्शन पास सुविधा उपलब्ध असलेबाबत माहीती व तंत्रज्ञान विभाग (बायोमॅट्रीक पास) व जनसंपर्क कार्यालयामार्फत कळविता येईल.

९) यापुढे सदर मंडपात कार्यक्रमांची मागणी आल्यास फक्त धार्मिक/सांस्कृतीक कार्यक्रमांसाठी सेवाआकार घेऊन सदर मंडप देता येईल.

१०) सदरील मंडपामध्ये लग्न समारंभ, सामाजिक, राजकिय व अनुषंगीक कार्यक्रमासाठी परवानगी देणे साईभक्तांच्या निवासाच्या दृष्टीने योग्य होणार नाही अशी इकडील विभागाची धारणा आहे.

उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.६८६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, अंबा वेलफेअर फाऊंडेशन यांचे साईआश्रम भक्तनिवास विभागातील स्थायी शताब्दी मंडपामध्ये दि.१०/०१/२०१९ ते दि.१३/०१/२०१९ अखेर दादाभगवान निवासी सत्संग शिबीर आयोजित करणेस मान्यता देण्यात आली. तसेच याबाबत खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

**१. याकामी संस्थानचे बांधकाम विभागामार्फत सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे कडुन सदर जागा, मंडप, व ॲम्फीथीएटरचा सेवाआकार निश्चीत करुन त्याप्रमाणे सेवाआकार त्यांचेकडून आकारणेत यावा, असे ठरले.**

**२. सदर सत्संगासाठी येणा-या १५०० साधकांसाठी निवासव्यवस्था करावयाची झाल्यास ऑनलाईन आरक्षण कमी करुन नियमाप्रमाणे सेवाआकार घेऊन निवासव्यवस्था उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**३. संस्थान नियमाप्रमाणे ॲम्फीथीएटर व शताब्दी मंडपासाठी लागणारा विद्युत पुरवठा विद्युत विभागामार्फत बसविण्यात आलेल्या स्वतंत्र विद्युत मिटरव्दारे देता यावा व विद्युत मिटरनुसार येणारे बिल त्यांचेकडून आकारणेत यावे.**

**४. संस्थानचे परिसरात जेवण तयार करणेस परवानगी देऊ नये.**

**५. सदर सत्संग कार्यक्रमाचे व्हि.डी.ओ रेकॉर्डींग करणेस, त्याकामी लाईट, साऊंड रेकॉर्डींग सिस्टीम लावणेसाठी शासन नियमाप्रमाणे तात्पुरती परवानगी संस्थानचे सी.सी.टी.व्ही विभागामार्फत देण्यात यावी.**

**६. कार्यक्रमाचे कालावधीपर्यंत दादाभगवान सत्संगाचे बॅनर गेट व परिसरात लावणेस परवानगी देण्यात यावी.**

**७. सदर कार्यक्रमासाठी आवश्यक असणारी इतर व्यवस्था आयोजकांनी स्वखर्चाने करावी.**

**तसेच साईआश्रम भक्तनिवास विभागातील टेन्साईल फेब्रीक शेड (शताब्दी मंडप) कोण-कोणत्या कार्यक्रमासाठी उपलब्ध करुन देता येईल व त्यासाठी आकारण्यात येणारे शुल्क याबाबत स्वतंत्र नियमावली तयार करुन मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेत यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही-प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)**

---

आयत्या वेळेचा
विषय नं.१० **फिजिशियन या पदाची जाहिरात देऊनही डॉक्टर्स उपलब्ध न झाल्याने वाढीव प्रोत्साहन भत्ता (Incentives) देणेबाबत निर्णय होणेबाबत .**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद-** कलम १३ (४) नुसार समितीस संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमन्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यां व्यतिरिक्त) व कर्मचा-यांची नेमणूक करता येईल.

परंतु ज्या अधिका-याला किंवा कर्मचा-याला दरमहा दोन हजार रुपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-याची किंवा कर्मचा-याची नेमणूक, समितीकडून, असे पद राज्य शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत केली जाणार नाही.

आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र. ३ "सदर पदांवर नव्याने नियुक्ती करताना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिद्धी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नियुक्ती करावी" तसेच अट शर्त अ.नं. ८ मध्ये "समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पद्धतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही" असे नमुद आहे.

**प्रस्तावना-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये अस्थायी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी एक फिजिशियन डॉ अविनाश लक्ष्मणराव जाधवर कार्यरत आहेत. त्यांना सदर पदाचे वेतनश्रेणीनुसार होणारे सुरवातीचे वेतनाईतके मासिक मानधन रू. ६७,६००/- व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देण्यात येत आहे.

डॉ जाधवर यांनी दि. १६/११/२०१७ रोजीचे अर्जामध्ये खालीलप्रमाणे नमुद आहे.

मी डॉ अविनाश जाधवर संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये फिजिशियन म्हणुन माहे सप्टेंबर २०१५ पासून कार्यरत आहेत. मी एकमेव पुर्णवेळ स्वरूपात फिजिशियन म्हणुन मागील दोन वर्षांपासून काम करत आहे. सध्या मला दरमहा सरासरी वेतन रू. ६७,०००/- मिळत असून संस्थान नियमानुसार इंन्सेंटीव्ह सरासरी रू. ५०,०००/- ते ६०,०००/- इतके मिळत आहे. सध्या मला मिळणारे वेतन कमी असून पुर्णवेळ फिजिशियन पदावर काम करणा-या इतर रूग्णालयातील डॉक्टरांना यापेक्षा जास्त वेतन मिळते. तसेच मी पुर्ण वेळ फिजिशियन असल्यामुळे माझ्याकडे कामाचा व्यापही जास्त आहे. रात्री अपरात्री आलेल्या रूग्णांना मला दररोज सेवा द्यावी लागते. त्यामुळे माझ्या कामाचा व पदाचा विचार करता मला दरमहा दीड ते दोन लाखापर्यंत वेतन अधिक संस्थान नियमानुसार इंन्सेंन्टीव्ह देण्यात यावा, अशी मागणी डॉ जाधवर यांनी केली आहे.

तथापि, डॉ जाधवर यांना माहे एप्रिल २०१७ ते मार्च २०१८ या कालावधीत खालीलप्रमाणे मानधन व प्रोत्साहन भत्ता अदा करणेत आलेला आहे.

| अ नं | महिना | मानधन | प्रोत्साहन भत्ता | एकूण दिलेली रक्कम | अ नं | महिना | मानधन | प्रोत्साहन भत्ता | एकूण दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एप्रिल १७ | ६४००० | ८७,८७० | १५१८७० | ७ | ऑक्टोबर १७ | ६७६०० | ७१,०४० | १३८६४० |
| २ | मे १७ | ६४००० | ७३,६५० | १३७६५० | ८ | नोव्हेंबर १७ | ६७६०० | ९५,७३० | १६३३३० |
| ३ | जून १७ | ६४००० | ६८,०१० | १३२०१० | ९ | डिसेंबर १७ | ६७६०० | ६४,५०० | १३२१०० |
| ४ | जूलै १७ | ६७६०० | २१,१५० | ८८७५० | १० | जानेवारी १८ | ६७६०० | ९१,१७० | १५८७७० |
| ५ | ऑगष्ट १७ | ६७६०० | १,३६,६२० | २०४२२० | ११ | फेब्रुवारी १८ | ६७६०० | ६५,८५० | १३३४५० |
| ६ | सप्टेंबर १७ | ६७६०० | ९३,७५० | १६१३५० | १२ | मार्च १८ | ६७६०० | १,००,६८० | १६८२८० |

डॉ जाधवर यांची १ वर्ष कालावधीकरीता Adhoc basis पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात फिजिशियन या पदावर दिलेल्या नेमणूकीचा कालावधी दि. ११/०७/२०१८ अखेर संपुष्टात येत असुन त्यांनी दि. ०३/०७/२०१८ अखेर पासून राजीनामा मंजुर करणेबाबत अर्ज सादर केलेला आहे.

डॉ. जाधवर यांचे कामकाज समाधानकारक असुन त्यांचे फिजिशियन या पदाचे सेवेची रूग्णालयास आवश्यकता आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता ०३ व श्री साईनाथ रूग्णालायाकरीता ०२ अशी एकुण फिजिशियनची रिक्त ०५ पदे रिक्त आहेत. साईबाबा रूग्णालयात सध्या एक फिजिशियन कार्यरत असुन त्यांनीही राजीनामा दिलेला आहे व साईनाथ रूग्णालयात सध्या एकही फिजिशियन कार्यरत नाही. फिजिशियन हे अत्यंत महत्वाचे पद

असुन रूग्णालयातील इतर सर्व स्पेशालिटी या फिजिशियनचे सल्यानुसार (फिटनेस) ऑपरेशन व औषधोपचार करतात.

यामुळे फिजिशियन या पदाची दोन्ही रूग्णालयांमध्ये आवश्यकता आहे. सध्या डॉ जाधवर यांना वेतन व इन्सेंटीव धरून सरासरी प्रतिमहा रू. १,४५,०००/- देण्यात येत आहे. त्यामुळे त्यांना सध्याच्याच मानधनावर ११ महिने मुदतवाढ द्यावी असे प्रस्तावित करण्यात येत आहे.

तसेच त्यांचे मागणीनुसार दीड लाख वेतन + इन्सेंटीव्ह देणेबाबत निर्णय झाल्यास त्याप्रमाणे नविन जाहिरात देऊन भरती प्रक्रीया राबवून फिजिशियन या पदावर वैद्यकीय अधिका-यांची नेमणूक करावी असे दि. ३०/०६/२०१८ रोजीचे मा व्यवस्थापन समिती सभेसमोर प्रस्तावित करण्यात आले होते.

उपरोक्तप्रमाणे प्रस्ताव दि. ३०/०६/२०१८ रोजीचे मा व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र ४४० नुसार सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तुत प्रकरणी दि. २७ जुन २०१८ रोजीचे पत्रान्वये शासनाने श्री साईबाबा रूग्णालयातील डॉक्टरांना मासिक वेतनाव्यतिरीक्त प्रोत्साहन भत्ता (Inecentives) मंजूर केलेला असल्याने डॉ जाधवर यांची मागणी मान्य करता येणार नाही.

डॉ. जाधवर यांनी दि. ०३/०७/२०१८ अखेर पासून राजीनामा मंजुर करणेबाबत अर्ज दिलेला आहे. परंतु डॉ जाधवर यांचे कामकाज समाधानकारक असुन त्यांचे फिजिशियन या पदाचे सेवेची रूग्णालयास आवश्यकता असल्याने प्रशासनाने डॉ जाधवर यांचेशी चर्चा करून, राजीनामा मागे घेणेबाबत विनंती करावी, त्यांनी राजीनामा मागे घेतल्यास पुर्वी प्रमाणेच मासिक मानधन रू.६७,६००/- व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता यानुसार पुढील ११ महिन्यांसाठी मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरले.

सध्या साईबाबा हॉस्पिटलकरीता ०३ व साईनाथ रूग्णालयाकरीता ०२ अशी एकुण ५ फिजिशियनची पदे रिक्त आहेत. दोन्ही रूग्णालयांना फिजिशियन डॉक्टरांची आवश्यकता असल्याने तातडीने फिजिशियनची पदासाठी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन भरती प्रक्रिया राबविणेत यावी, फिजिशियन या पदाची जाहिरात देऊनही डॉक्टर्स उपलब्ध न झाल्यास वाढीव प्रोत्साहन भत्ता (Incentives) देणेबाबत प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करावा, असे ठरले.

विभागाचा अभिप्राय- वैद्यकीय संचालक यांनी डॉ जाधवर यांना विनंती केल्याने त्यांनी राजीनामा मागे घेतलेला असुन उपरोक्त निर्णयास अनुसरून त्यांना दि. १३/०७/२०१८ रोजी दि. १२/०७/२०१८ पासुन पुढे ११ महिने कालावधीकरीता फिजिशियन या पदावर कंत्राटी पध्दतीने तात्पुरती नेमणूक देवुन एकत्रीत मासिक मानधन रू. ६७,६००/- व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देणेत आलेला आहे.

उपरोक्त निर्णयास अनुसरून साईबाबा हॉस्पिटलकरीता ०३ व साईनाथ रूग्णालयाकरीता ०२ अशी एकुण ५ फिजिशियनची पदे भरणेकरीता जाहीरात प्रसिध्द करून दि. १४/०८/२०१८ रोजी वॉक इन इंटरव्युव्ह घेणेत आल्या. फिजिशियन या पदासाठी ०२ उमेदवार उपस्थित होते. दोन्ही उमेदवारांची निवड करून दि. १०/०९/२०१८ रोजी नेमणूक आदेश देणेत आलेले आहेत. तथापि दोन्ही उमेदवार कामावर हजर झालेले नाहीत. याबाबत संस्थानमधील डॉक्टर्सशी चर्चा केली असता एवढ्या कमी मानधनावर फिजीशीयन उपलब्ध होणार नाहीत, असे त्यांचे मत आहे. फिजिशियन या पदाकरीता वेतनाव्यतिरीक्त सध्या देण्यात येत असलेल्या प्रोत्साहन भत्यात वाढ केल्यास फिजिशियन या पदावर उमेदवार उपलब्ध होऊ शकतील.

प्रस्ताव- सध्या श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये एकच पुर्णवेळ फिजीशियन डॉ. जाधवर कार्यरत असुन त्यांचे काम समाधानकारक असुन पुर्णवेळ फिजीशियन या पदांची आवश्यकता असल्याने या पदाकरीता वाढीव प्रोत्साहन भत्ता (Incentives) देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.६८७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये एकच पुर्णवेळ फिजीशियन डॉ. जाधवर कार्यरत आहेत, त्यांचे काम समाधानकारक असुन पुर्णवेळ फिजीशियन या पदांची आवश्यकता असल्याने त्यांना सध्या देण्यात येत असलेल्या प्रोत्साहन भत्त्यामध्ये ५० टक्के वाढ करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११** **मे.महिंद्रा फाउंडेशन,मुंबई यांचे कडुन विविध मेडीकल इक्वींपमेंटस व मशिनरी देणगी स्वरूपात स्विकारणेबाबत .**

**प्रस्ताव-** श्री. आनंद महिंद्रा यांचे बहीण व मेव्हुणे यांनी दि.१०.०२.२०१८ रोजी श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयास भेट दिली होती त्यावेळी दोन्ही रूग्णालयाकरीता आवश्यक असणारे विविध मेडीकल इक्वींपमेंटस व

मशिनरी यांची यादी व पत्र त्यांना देण्यात आले होते. त्यानंतर त्यांचे मागणीनुसार दि. १६.०२.२०१८ रोजी ई मेल द्वारे सदर मशिन्सचे Technical Specification कंपनीस पाठविणेत आले. मे. महिंद्रा ॲन्ड महिंद्रा, मुंबई यांचे दि. १८.०४.२०१८ रोजीचे ई मेल अन्वये विविध मेडीकल इक्वींपमेंटस व मशिनरी यांचे कोटेशन तपासुन स्वाक्षरी करुन पाठविण्यास कळविले होते. त्यानुसार दि. २०.०४. २०१८ रोजीचे पत्रान्वये सदर कोटेशन तपासुन कंपनीस परत पाठविणेत आले.

त्यानंतर पत्र क्र. ७८६/ २०१८ दि. १०.०५. २०१८ रोजी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांचे स्वाक्षरीने मे. महिंद्रा फाउंडेशन, मुंबई यांना विविध मेडीकल इक्वींपमेंटस व मशिनरी देणगी स्वरूपात देणेसाठी पत्र व्यवहार करणेत आला होता. दि.१२.०६.२०१८ रोजीचे ई मेल अन्वये पुन्हा एकदा कंपनीस श्री साईनाथ रूग्णालयातील जनरल व ई.एन.टी. ओ.टी मधील विविध मेडीकल इक्वींपमेंटस व मशिनरी यांची यादी पाठविणेत आली होती. कंपनीने दि. २८.०६.२०१८ रोजीचे ई मेल अन्वये मशिनरी पाठविणेसाठीचा पत्ता व संपर्क करणेची व्यक्ती व त्यांचे दुरध्वनी क्रमांक इ. माहीती मागविणेत आली होती. सदर माहीती दि.३०.०६.२०१८ रोजीचे ई मेल अन्वये देणेत आली आहे. कंपनीने दि. २९.०६.२०१८ रोजीचे ई मेल अन्वये सदर देणगी ही मे. महिंद्रा फाउंडेशन, मुंबई यांचे द्वारे दिली जाणार असुन त्याकरीता मे.महिंद्रा फाउंडेशन, मुंबई यांचे नावे पत्र देणेसाठी कळविले होते.

मेडीकल इक्वींपमेंटस व मशिनरी देणगी बाबत जा.नं.SSS/SSBH/WS/2625/2018 Date-29/09/2018 अन्वये The Trustees, Mahindra Foundation, Gateway,Building, Apollo Bunder, Mumbai यांना पत्र पाठविले होते. त्यामध्ये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था हे महिंद्रा फाऊडेशनकडुन देणगी दाखल विविध मेडीकल इक्वींपमेंटस व मशिनरी स्विकारणेसाठी कोणत्याही प्रकारचा करारनामा करु शकत नाही. तसेच करारनामा न करता जर महिंद्रा फाऊडेशन देणगी दाखल विविध मेडीकल इक्वींपमेंटस व मशिनरी देण्यास तयार असेल तर ते स्विकारता येतील असे कळविले होते.

परंतु महिंद्रा फाऊडेशन यांनी दि.०१/१०/२०१८ चे ईमेलव्दारे असे कळविले आहे की त्यांचे विधी विभागाने एक विशेष बाब म्हणुन संस्थानच्या लेटरहेडवर सोबत जोडलेल्या पत्रामध्ये दिलेप्रमाणे अटी व शर्ती संस्थानला मान्य असलेबाबत स्वाक्षरी करुन पाठविण्यात यावे.

सोबतच्या पत्रामध्ये महिंद्रा फाऊडेशन यांनी खालील बाबींचा उल्लेख केलेला आहे.

१) महिंद्रा फाऊडेशन हे पुढील ३ ते ४ वर्षाच्या कालावधीमध्ये विविध मेडीकल इक्वींपमेंटस् व मशिनरी देणगी दाखल देणार आहेत. त्याकरीता विविध कंपन्याना आवश्यकतेनुसार पुरवठा आदेश देणे , वाटाघाटी करणे व बिल अदा करणे इ. गोष्टी महिंद्रा फाऊडेशन करणार आहेत.

२) देणगी दाखल प्राप्त झालेले विविध मेडीकल इक्वींपमेंटस व मशिनरीचा वापर संस्थानने कळविलेल्या रुग्णालयामध्ये गरजू व गरीब रुग्णाकरीता केला जाईल तसेच महिंद्रा फाऊडेशनच्या परवानगी शिवाय सदर विविध मेडीकल इक्वींपमेंटस व मशिनरी इतर ठिकाणी किंवा दुस-या व्यक्तीला हस्तांतरीत करणार नाही.

३) महिंद्रा फाऊडेशन हे संस्थानचे रुग्णालयात ज्या ठिकाणी देणगी दाखल प्राप्त झालेले विविध मेडीकल इक्वींपमेंटस व मशिनरी बसविण्यात आले त्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करण्याचा हक्क राखून ठेवीत आहे. याकरीता संस्थानने महिंद्रा फाऊंडेशनला प्राप्त इक्वींपमेंटस व मशिनरी तपासणी करण्याकरीता आवश्यक त्यावेळी उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

४) महिंद्रा फाऊडेशन यांनी देणगी दाखल दिलेल्या विविध मेडीकल इक्वींपमेंटस व मशिनरीचे वापर व दुरुस्ती इत्यादीबाबत संस्थानकडुन स्पष्टीकरण मागु शकते.

५) महिंद्रा फाऊडेशन यांनी देणगी दाखल दिलेल्या विविध मेडीकल इक्वींपमेंटस व मशिनरीवर कोणत्याही प्रकारची वारंटी व त्यानंतरची दुरुस्ती देखभालीकरीता आवश्यक असणारी सेवा याबाबतीत जबाबदारी घेणार नाही. त्याकरीता संस्थानने आवश्यकतेनुसार वारंटी सेवा तसेच AMC किंवा CMC कालावधीतील सेवा सबंधित पुरवठाधारकाकडून परस्पर घेण्यात यावे.

६) महिंद्रा फाऊडेशन यांनी दिलेल्या विविध मेडीकल इक्वींपमेंटस व मशिनरीचे वापर करतांना झालेले नुकसान किंवा मशिनमुळे संस्थानचे एखादया व्यक्तीला किंवा मालमत्तेला झालेल्या नुकसानीस महिंद्रा फाऊडेशन यांना जबाबदार धरणार नाही किंवा त्याबाबतीत नुकसान भरपाईची देखील मागणी करणार नाही.

७) महिंद्रा फाऊडेशन यांनी विविध मेडीकल इक्वींपमेंटस व मशिनरीवर महिंद्रा फाऊडेशन यांचे नाव, लोगो, ट्रेडमार्क इ. संस्थान लावु शकते.

८) महिंद्रा फाऊडेशन हे देत असलेली देणगी हा त्यांचा पुर्णत: वैयक्तीक निर्णय असुन ते कधीही एक महिन्याची नोटीस देऊन सदर देणगी देण्याची कार्यवाही थांबवू शकतात.

९) महिंद्रा फाऊडेशन यांचेकडून अतिमत: संस्थान रुगणालयास प्राप्त झालेल्या देणगीबाबत अंतिम अहवाल तसेच प्राप्त झाल्याची पावती संस्थान महिंद्रा फाऊडेशन यांना देईल.

१०) उपरोक्त देणगीबाबत कोणत्याही प्रकारचा क्लेम, विवाद अथवा कार्यवाही निर्माण झाल्यास ती मुंबई न्यायालयाच्या अखत्यारीत करण्यात यावी.

तरी उपरोक्त अटी व शर्ती संस्थानला मान्य असलेबाबत स्वाक्षरी करुन महिंद्रा फाऊंडेशन यांना पत्र देण्यात यावे अशी विनंती त्यांनी केली आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- सदर ईमेलमध्ये व सोबत दिलेल्या पत्रामधील अटी व शर्तीचा विचार करता महिंद्रा फाऊंडेशन यांनी यापुर्वी पाठविलेल्या करारनाम्यातील अटीच्या मसुदयाचा समावेश दिसुन येतो.मे.महिंद्रा फाऊंडेशन हे ०३-०४ च्या कालावधीत एकुण ०६.५० कोटी रकमेची देणगी श्री साईबाबा संस्थानला टप्याटप्याने देणेस उत्सुक आहेत.

सदर मसुदयातील अटी व शर्ती संस्थानला जाचक नाहीत तथापि महिंद्रा फाऊंडेशनने देणगी स्वरुपात दिलेल्या वस्तु /उपकरणे /मशिनरी यांच्यावर महिंद्रा फाऊंडेशन यांचा कोणताही मालकी अधिकार राहणार नाही सर्व वस्तु /उपकरणे / मशिनरी श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांचे मालकीची राहील अशा स्वरुपाची अट मसुदयामध्ये समाविष्ट करुन सदर मसुदा मान्य असल्यास वैद्यकीय संचालक यांचे स्वाक्षरीने महिंद्रा फाऊंडेशन यांना पत्राव्दारे व ईमेल व्दारे कळविता येईल असे मत आहे.

**प्रस्ताव**:- महिंद्रा फाऊंडेशन, मुंबई यांनी पाठविलेल्या मसुदयातील अटी व शर्ती बाबत निर्णय होणेबाबत, तसेच मसुदयातील नियम व अटी मान्य असल्यास वैद्यकीय संचालक यांचे स्वाक्षरीने महिंद्रा फाऊंडेशन, मुंबई यांना पत्राव्दारे व ईमेलव्दारे कळविणेबाबत निर्णय होणेकामी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६८८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. महिंद्रा फाउंडेशन, मुंबई यांचे कडुन विविध मेडीकल इक्वींपमेंटस व मशिनरी देणगी स्वरूपात स्विकारणेकामी त्यांनी दिलेल्या अटी व शर्ती संस्थानला जाचक नाहीत तथापि महिंद्रा फाऊंडेशनने देणगी स्वरुपात दिलेल्या वस्तु /उपकरणे /मशिनरी यांच्यावर महिंद्रा फाऊंडेशन यांचा कोणताही मालकी अधिकार राहणार नाही सर्व वस्तु /उपकरणे / मशिनरी श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांचे मालकीची राहील अशा स्वरुपाची अट मसुदयामध्ये समाविष्ट करुन सदर मसुदा मे. महिंद्रा फाउंडेशन, मुंबई यांना मान्य असल्यास वैद्यकीय संचालक यांचे स्वाक्षरीने महिंद्रा फाऊंडेशन यांना पत्राव्दारे व ईमेलव्दारे कळविणेस मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२** **सन २०१८ दिपावली निमित्त संस्थानचे दोन्ही हॉस्पिटल मधील ११ महीने कालावधीसाठी नेमणुक केलेल्या कंत्राटी पध्दतीने वैद्यकीय अधिकारी, परिचारक/परिचारीका व इतर पदे या अधिकारी/कर्मचारी यांना सानुग्रह अनुदान देणेबाबत.**

**प्रस्ताव-** माहे ऑगस्ट, २००४ मध्ये महाराष्ट्र शासनाने संस्थानचे दैनंदिन व्यवस्थापन व प्रशासन पहाणेकरीता, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ (अधिनियम क्रमांक १४) हा कायदा पारीत केला आहे. या अधिनियमात संस्थान कर्मचा-यांचे बाबतीत प्रामुख्याने खालील तरतुदी करणेत आलेल्या आहेत-

कलम १५- मुख्य कार्यकारी अधिकारी आणि इतर अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवेच्या अटी व शर्ती या शीर्षाखालील पोटकलम (३) समितीच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांचे आणि इतर अधिका-यांचे व कर्मचा-यांचे वेतन व भत्ते आणि इतर खर्च हे व्यवस्थापन निधीतून देण्यात येतील.

कलम १६- सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे कर्मचारी संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडे नेमून देणे या शीर्षाखालील "नियत दिवसाच्या लगतपुर्वी जी व्यक्ती पूर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेच्या सेवेत असेल आणि त्याच्या कामकाजासंबंधात काम करीत असेल अशी कोणतीही व्यक्ती ही, नियत दिवसाच्या लगतपूर्वी तीला जे वेतन लागू होते त्याच वेतनावर व सेवेच्या त्याच इतर अटी व शर्तीवर, नियत दिवसापासून समितीच्या नियंत्रणाखाली, संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या कामकाजांशी संबंधीत अशा सेवेसाठी नेमून देण्यात आल्याचे व नियुक्त केल्याचे

मानण्यात येईल; आणि सेवेच्या अशा शर्तीमध्ये राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेखेरीज त्या व्यक्तीचे अहित होईल अशा रितीने समितीकडून कोणताही बदल करण्यात येणार नाही किंवा अशा व्यक्तीला सेवेतून काढून टाकण्यात येणार नाही.

कलम१७- समितीची कर्तव्ये व अधिकार या शीर्षाखालील पोटकलम (२) (घ) समितीच्या सदस्यांना व मुख्य कार्यकारी अधिका-याला व इतर अधिकारी व कर्मचारी यांना व्यवस्थापन निधीतून वेतन, मानधन, फी व भत्ते आणि इतर देय रकमा नियमित प्रदान करील.

तसेच या व्यतिरिक्त कलम १५ चे तरतुदीत उल्लेख केलेल्या व्यवस्थापन निधीबाबत या अधिनियमात कलम २२ - व्यवस्थापन निधी व त्याचा विनियोग या शीर्षाखालील तरतुदीत पोटकलम (३) (ख) मध्ये समितीचे इतर अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते देणे असे स्पष्टपणे नमूद करणेत आलेले आहे.

उपरोक्त अधिनियमातील तरतुदीनुसार, महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने तसेच महाराष्ट्र शासनाचे मान्यतेने दरवर्षी संस्थान सेवकांना दिपावली उत्सवाकरीता त्यांच्या एकूण वार्षीक वेतनाच्या ८.३३% इतके सानुग्रह अनुदान देण्यात येत आहे.

मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन पत्र क्र. सासंवि-२०११/५३८/प्र.क्र. ६९/ पूर्नबांधणी-१२/का.१६, दि. २३/०१/२०१३ चे पत्रान्वये शासनाने शासनाच्या प्रचलित धोरणानुसार कर्मचा-यांना बोनस देण्याचे बंद असतांना संस्थानच्या आस्थापनेवरील कर्मचा-यांना शासनाची मान्यता न घेता परस्पर बोनस आदा करणेत आला आहे याबाबत खुलासा करणेत यावा, असे कळविलेले होते.

तथापी तदनंतर, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी त्यांचेकडील शासन निर्णय क्रमांक सासंवि १०१६/१४३२/प्र.क्र.१८२/कार्या-१६, दि.२९ ऑक्टोबर, २०१६ आणि शासन निर्णय क्र. सासंवि १०१७/१५३९/प्र.क्र.१६६/कार्या-१६,दि.०५ ऑक्टोबर, २०१७ तसेच आता शासन निर्णय क्रमांक सासंवि १०१८/१९६३/प्र.क्र.३७/कार्या-१६, दि.२९ मे, २०१८अन्वये अनुक्रमे सन २०१६, सन २०१७ व सन २०१२ ते २०१५ या कालावधीतील सानुग्रह अनुदान वाटपास मान्यता दिलेली आहे.

सन २०१७ मध्ये मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०८/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७६५ नुसार व मा. शासनाकडील दि. ०५ ऑक्टोबर,२०१७चे शासन निर्णयानुसार व मान्यतेनुसार,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या सेवेतील पात्र स्थायी (कायम) व अस्थायी (कंत्राटी) कर्मचा-यांना दि.०१/१०/२०१६ ते दि.३०/०९/२०१७ या कालावधीत मिळालेल्या त्यांच्या एकूण वार्षिक वेतनाच्या/मानधनाच्या ८.३३% इतके सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात आलेले होते. याकामीलेखाशाखा विभागाकडील दिनांक १०/०८/२०१८ रोजीचे अहवालानुसार, एकूण रु. ७,७०,९८,०७८/- मात्र इतकी रक्कम पात्र संस्थान स्थायी (कायम) व अस्थायी (कंत्राटी तसेच ११ महीने कालावधीसाठी एकत्रित मानधनावर नेमणुक केलेल्या अधिकारी/कर्मचारी) सेवकांना सानुग्रह अनुदानापोटी आदा करण्यात आलेली आहे.

तसेच संस्थानचे स्थायी (कायम) व अस्थायी (कंत्राटी) कर्मचा-यांना दिनांक ०१/१०/२०१७ ते ३०/०९/२०१८ या कालावधीतील त्यांच्या एकुण वार्षिक वेतनाच्या ८.३३ टक्के दराने सानुग्रह अनुदान देणेस मा. व्यवस्थापन समितीचे दि. २२/०८/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५१३ नुसार मान्यता मिळालेली आहे व सदर विषयांकीत प्रस्ताव मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडेस मान्यतेस्तव सादर करण्यात आलेला होता. त्यास अनुसरुन मा. शासनाकडील दि. २२ ऑक्टोबर,२०१८ चे शासन निर्णयातील, अटी व शर्तीनुसार दिपावली सन २०१८ करिता सानुग्रह अनुदान आदा करणेस मान्यता दिलेली आहे. त्यानुसार जा. नं. एसएसएस/साप्रशा /आस्था /२२१४/२०१८ दि.२३/१०/२०१८ रोजीचे आदेशातील खालीलप्रमाणे नमुद असलेल्या अटी-शर्ती नुसार सानुग्रह अनुदान अदा करणेस मान्यता देण्यात आलेली आहे.

१. दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१७ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१८ या कालावधीत संस्थान सेवेत कार्यरत असलेल्या स्थायी (कायम) व कंत्राटी (अस्थायी) कर्मचा-यांना सदरील कालावधीतील त्यांच्या एकूण वार्षिक वेतनाच्या ८.३३ टक्के इतके सानुग्रह अनुदान देणेत यावे.

२. संस्थान आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने कार्यरत असणा-या शासकीय अधिकारी / कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान अनुज्ञेय नाही.

३. दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१७ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१८ या कालावधीत संस्थान आस्थापनेवरील स्थायी (कायम) तसेच मानधनावर सेवेत असलेले अधिकारी व कर्मचारी, कंत्राटी पध्दतीने नेमणूका देण्यात आलेले अधिकारी / कर्मचारी, कंत्राटी सल्लागार / मोजणीदार, डीटीपी ऑपरेटर, ग्रंथपाल, अर्धवेळ सहाय्यक

शिक्षक यांना दिलेल्या त्यांच्या एकूण वार्षिक वेतनाचे ८.३३ टक्के दराने होणारी रक्कम सानुग्रह अनुदान म्हणून आदा करणेत यावी.

४. दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१७ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१८ या कालावधीत ज्या कर्मचा-यांवर गैरवर्तनाचा ठपका ठेवून अथवा ज्या कर्मचा-यांवर शिस्तभंगाची कारवाई करुन, संस्थान सेवेतून कमी केलेले आहे. तसेच ज्या कर्मचा-यांनी या कालावधीत संस्थान सेवेचा राजीनामा दिलेला आहे, अशा अधिकारी / कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देय होणार नाही.

५. अस्थायी (कंत्राटी) कर्मचारी यांना सानुग्रह अनुदानाची रक्कम संबंधीत कंत्राटदारामार्फत देणेत यावी. सर्व कंत्राटदारांनी उपरोक्त कालावधीमध्ये संस्थानला पुरविण्यात आलेल्या कुशल, अकुशल व एकत्रित मानधनावरील तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचा-यांसह इतर सुरक्षा कर्मचारी ईत्यादी सर्व कंत्राटी कर्मचा-यांची सानुग्रह अनुदानाची बिले कामगार अधिकारी यांचेमार्फत मुख्य लेखाधिकारी, लेखाशाखा यांचेकडेस अदायगीसाठी सादर करावीत.

६. मुख्य लेखाधिकारी-तथा-प्रशासकीय अधिकारी, लेखाशाखा यांनी उपरोक्त आदेशानुसार दिपावली - सन २०१८ साठी आदा करणेत आलेल्या सानुग्रह अनुदानाची तपशीलवार माहिती मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना विहित वेळेत सादर करावी.

उपरोक्त अटी-शर्तीनुसार संस्थानचे आस्थापनेवरील स्थायी (कायम) व अस्थायी (कंत्राटी) कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान अदा करण्यात आलेला आहे. तरी संस्थानचे दोन्ही हॉस्पिटलमधील ११ महीने कालावधीसाठी कंत्राटी/मानधन पध्दतीने नेमणुक केलेल्या वैद्यकीय अधिकारी, परिचारक/परिचारीका व इतर पदे या अधिकारी/कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान अदा करणेबाबत उपरोक्त आदेशातील असलेल्या अटी-शर्तीमध्ये स्पष्ट नमुद नाही.

तरी संस्थानचे दोन्ही हॉस्पिटलमधील ११ महीने कालावधीसाठी कंत्राटी/मानधन पध्दतीने नेमणुक केलेल्या वैद्यकीय अधिकारी, परिचारक/परिचारीका व इतर पदे या अधिकारी/कर्मचा-यांना सन २०१८ चे सानुग्रह अनुदान अदा करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६८९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे दोन्ही हॉस्पिटलमधील ११ महीने कालावधीसाठी कंत्राटी/मानधन पध्दतीने नेमणुक केलेल्या वैद्यकीय अधिकारी, परिचारक/परिचारीका व इतर पदे या अधिकारी/कर्मचा-यांना ११ महिन्याच्या कालावधीतील त्यांच्या एकुण वेतनाच्या ८.३३ टक्के दराने सानुग्रह अनुदान देण्यास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)**

---

आयत्या वेळेचा
विषय नं.१३ **साईआश्रम भक्तनिवास, साई धर्मशाळा व व्दारावती भक्तनिवास विभागातील आऊटसोर्स कर्मचाऱ्यांना दिपावली सानुग्रह अनुदान रक्कम देणेबाबत.**

**प्रस्ताव-** प्रस्तावीक:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ चे तरतुदीनुसार श्रींचे दर्शनासाठी राज्यभरातून, देशभरातून, देश-विदेशातून येणा-या साईभक्तांचे निवासाचे सोयीसाठी साईआश्रम भक्तनिवास १५३६ तसेच साई धर्मशाळा १९२ हॉल व व्दारावती भक्तनिवासविभागात एकूण ३१६ खोल्यावापरात आहे. या तीनही विभागातील निवासी साईभक्तांना अधिकाधिक चांगली सेवा सुविधा उपलब्ध व्हावी याकरीता सन २०१८-१९ या वर्षातील दि.०१/०३/२०१८ ते दि.२८/०२/२०१९ अखेर एम.पी.एन्टरप्रायजेस ॲण्ड असोसिएटस.लि,पुणेयांना या तीनही विभागातीलयांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग /स्वच्छतेची कामेआऊटसोर्सिंगपध्दतीनेकरुन देणेचाकार्यादेश देण्यात आला होता. परंतू कार्यादेशातील अटी शर्तीनुसार सदर कॉन्टॅक्ट्रर काम समाधानकारक करत नसल्याने, मा.व्यवस्थापन समिती दि.०५/१०/२०१८ रोजीचे सभेतीलआयत्या वेळेचा विषय नं.२४ निर्णय क्र.६३६ अन्वये सदर कॉन्टॅक्ट्रर यांचा कार्यादेश रद्द करुन, त्यांना ब्लॅक लिस्ट करण्यात आले आहे.

मागणी:- एम पी एन्टरप्रायजेस ॲण्ड असोसिएटस लि पुणे यांचा कार्यादेश रद्द केल्याने संस्थानचे इतर विभागात कार्यरत असलेल्या कॉन्ट्रॅक्टरकडून दि.१५/१०/२०१८ ते दि.३१/१२/२०१८ या कालावधीकरीता अथवा ई-निविदा प्रक्रिया करुन नवीन ठेकेदाराची नेमणूक होईपावेतो (यापैकी जे अगोदर घडेल ते) काम करुन घेणेकामी कोटेशन मागविणेत आले होते. त्यामध्येबी.व्ही.जी.इंडिया,लि पुणे यांचे दर निम्नतम असल्याने त्यांनादि.१५/१०/२०१८ ते दि.३१/१२/२०१८ या कालावधीसाठी कार्यादेश देऊन काम करुन घेण्यात येत आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५/१०/२०१८ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.६३६ अन्वये एम.पी.एन्टरप्रायजेस ॲण्ड असोसिएटस.लि,पुणे यांचा कार्यादेश रद्द केल्याने, दि.०१/०३/२०१८ ते दि. ३१/०७/२०१८ अखेर ०५ महिन्यांचे आउटसोर्स कर्मचारी यांना देण्यात आलेल्या कार्यादेशातील**साई भक्तनिवास व साई धर्मशाळाअट नं. ३४ व व्दारावती भक्तनिवास अट नं. ३३ नुसार माहे ऑक्टोबर ते सप्टेबर या एक वर्ष कालावधीत हाऊसकिपींग कुशल, अकुशल आऊटसोर्स कामगारांना मिळणा-या वेतनाचे रक्कमेवर ८.३३% याप्रमाणे सानुग्रह अनुदान रक्कम कामगारांना दिपावली सणाचे ०७ दिवस अगोदर अदा करणेत यावे.**अशी अट नमुद आहे.

सदर एम.पी.एन्टरप्रायजेस ॲण्ड असोसिएटस.लि,पुणे कंपनीने कार्यादेशातील अटी शर्तीनुसार कामकाज न केल्याने त्यांनी केलेल्या माहे मार्च ते जुलै-२०१८ या कालावधीतील खालील कोष्टकात नमुदप्रमाणे प्रत्येक महिन्याच्या बिलातुन रक्कम कपात करून घेण्यात आली आहे.

१) साई आश्रम भक्तनिवास –

| अ.नं | महिना | वार्षिक कॉन्ट्रॅक्ट रक्कमेतून ५ % अनामत रक्कम | पी.एफ रक्कम | उशिरा पेमेंट केल्याने कपात रक्कम | लेबर लायसन्स सादर न केल्याने दंडाची रक्कम | पोलीस व्हेरिफिकेशन दंड रक्कम | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | मार्च १८ | ४२,९२,१४९/- | - | -- | -- | -- | ४२,९२,१४९/- |
| २ | एप्रील१८ | -- | ३०,०००/- | ३,५००/- | -- | -- | ३३,५००/- |
| ३ | मे १८ | -- | ५,००,०००/- | १,५००/- | -- | -- | ५,०१,५००/- |
| ४ | जुन १८ | -- | ५,५०,०००/- | ३,५००/- | -- | -- | ५,५३,५००/- |
| ५ | जुलै १८ | -- | ५,५०,०००/- | ६,५००/- | २,०००/- | २०,०००/- | ५,७८,५००/- |
| | एकुण रक्कम | ४२,९२,१४९/- | १६,३०,०००/- | १५,०००/- | २,०००/- | २०,०००/- | ५९,५९,१४९/- |

२) साई धर्मशाळा-

| अ.नं | महिना | वार्षिक कॉन्ट्रॅक्ट रक्कमेतून ५ % अनामत रक्कम | पी.एफ रक्कम | उशिरा पेमेंट केल्याने कपात रक्कम | लेबर लायसन्स सादर न केल्याने दंडाची रक्कम | पोलीस व्हेरिफिकेशन दंड रक्कम | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | मार्च १८ | १७,६८,७६६/- | - | -- | -- | -- | १७,६८,७६६/- |
| २ | एप्रील १८ | -- | ५०,०००/- | ३,५००/- | -- | -- | ५३,५००/- |
| ३ | मे १८ | -- | १,६०,०००/- | २,०००/- | -- | -- | १,६२,०००/- |
| ४ | जुन १८ | -- | २,००,०००/- | ४,०००/- | -- | -- | २,०४०००/- |
| ५ | जुलै१८ | -- | २,३०,०००/- | ३९,०००/- | -- | -- | २,६९,०००/- |
| | एकुण रक्कम | १७,६८,७६६/- | ६,४०,०००/-- | ४९,०००/- | -- | -- | २४,५७,२६६/- |

३) व्दारावती भक्तनिवास –

| अ. नं | महिना | वार्षिक कॉन्ट्रॅक्ट रक्कमेतून ५ % अनामत रक्कम | पी.एफ रक्कम | उशिरा पेमेंट केल्याने कपात रक्कम | लेबर लायसन्स सादर न केल्याने दंडाची रक्कम | पोलीस व्हेरिफिकेशन दंड रक्कम | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | मार्च १८ | ६,२१,२२९/- | - | -- | -- | -- | ६,२१,२२९/- |
| २ | एप्रील १८ | -- | २०,०००/- | ३,५००-/ | -- | -- | २३,५००/- |
| ३ | मे १८ | -- | १,००,०००/- | १,५००-/ | -- | -- | १,०१,५००/- |
| ४ | जुन १८ | -- | ८६,०००/- | ३,५००-/ | -- | -- | ८९,५००/- |
| ५ | जुलै १८ | -- | ८२,०००/- | ३,०००-/ | -- | -- | ८५,०००/- |
| | एकुण रक्कम | ६,२१,२२९/- | २,८८,०००/- | ११,५००/- | -- | -- | **९,२०,७२९/-** |

**विभागाचे स्पष्ट मत / अभिप्राय –**

१) एम.पी.एन्टरप्राईज असोसिऐटस लि.पुणे यांना साई आश्रम भक्त निवास, साई धर्मशाळा व व्दारावती भक्तनिवास या तिनही निवासस्थानाचा हाऊसकिपिंग कामाचा कार्यादेश दिनांक ०१.०३.२०१८ त २८.०२.२०१९ या एक वर्ष कालावधीसाठी कार्यादेश देण्यात आला होता. त्यांनी दिनांक १२.१०.२०१८ चे पत्रानुसार आम्ही काम करु शकत नसल्याचे कळविलेने मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०५.१०.२०१८ रोजीचे सभेतील विषय नं.२४ निर्णय क्र. ६३६ अन्वये एम.पी.एन्टरप्राईज असोसिऐटस लि.पुणे यांचा आऊटसोर्स कामाचा ठेका रद्द करुन त्यांची संस्थानकडे जमा असलेली ५ टक्के सुरक्षा अनामत रक्कम संस्थान खाती जमा करुन घेण्यात यावी तसेच त्यांना संस्थानकडून देय असलेल्या रकमेतून इतर ठेकेदारामार्फत (एजन्सी मार्फत ) कर्मचा-याचे दोन महिन्याचे वेतन देण्यात यावे व त्यांचा काळ्या यादीत समावेश करण्यात यावा असा निर्णय झालेला आहे.

२) मे.बी.व्ही जी इंडीया लि.पुणे दिनांक १५.१०.२०१८ चे मंजूर टिपणीअन्वये तीनही निवासस्थानाचा कार्यादेश देण्यात आलेला आहे.

३) एम.पी.एन्टरप्राईज असोसिऐटस लि.पुणे यांनी माहे मार्च,एप्रिल,मे,जून ,जुलै-२०१८ या पाच महिन्याचे आऊटसोर्स कंत्राटी कर्मचा-यांचे कार्यादेशातील साई भक्तनिवास व साई धर्मशाळाअट नं. ३४ व व्दारावती भक्तनिवास अट नं. ३३ नुसार माहे ऑक्टोबर ते सप्टेबर या एक वर्ष कालावधीत हाऊसकिपींग कुशल, अकुशल आऊटसोर्स कामगारांना मिळणा-या वेतनाचे रक्कमेवर ८.३३% याप्रमाणे सानुग्रह अनुदान रक्कम कामगारांना दिपावली सणाचे ०७ दिवस अगोदर अदा करणेत यावे. अशी अट नमुद आहे.

४) एम.पी.एन्टरप्राईज असोसिऐटस लि.पुणे यांना साईआश्रम भक्तनिवास, व्दारावती भक्तनिवास व साईधर्मशाळा या विभागामार्फत अदा करण्यात आलेल्या बीलाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**अ) साईआश्रम भक्तनिवास**

| महिना | श्रमदिन संख्या | बीलाची मुळ रक्कम | १८%GST | एकूण सर्व करासह रक्कम |
|---|---|---|---|---|
| मार्च १८ | १४३०० | ५३,३२,९९६/- | ९,५९,९३९/- | ६२,९२,९३५/- |
| एप्रिल १८ | १३५११ | ५२,५५,०१०/- | ९,४५,९०२/- | ६२,००,९१२/- |
| मे १८ | १३८८८ | ५२,०४,८६२/- | ९,३६,८७५/- | ६१,४१,७३८/- |
| जुन १८ | १३९५१ | ५३,८८,९२१/- | ९,७०,००६/- | ६३,५८,९२७/- |
| जुलै १८ | १४६१३ | ५४,२७,५७६/- | ९,७६,९६४/- | ६४,०४,५४०/- |
| एकूण | ७०,२६३ | २,६६,०९,३६५/- | ४७,८९,६८६/- | ३,१३,९९,०५२/- |

**ब) साईधर्मशाळा**

| महिना | श्रमदिन संख्या | बीलाची मुळ रक्कम | १८%GST | एकूण सर्व करासह रक्कम |
|---|---|---|---|---|
| मार्च १८ | ४३४६ | १६,३४,४३८/- | २,९४,१७५/- | १९,२८,६१३/- |
| एप्रिल १८ | ४१०८ | १६,२४,३०९/- | २,९२,३७६/- | १९,१६,६८५/- |
| मे १८ | ४४९० | १६,६९,५१४/- | ३,००,५१२/- | १९,७०,०२७/- |
| जुन १८ | ५१४१ | १९,४१,४५५/- | ३,४९,४६२/- | २२,९०,९१७/- |
| जुलै १८ | ५२९८ | १९,१८,८५१/- | ३,४५,३९३/- | २२,६४,२४४/- |
| एकूण | २३,३८३ | ८७,८८,५६८/- | १५,८१,९१८/- | १,०३,७०,४८६/- |

**क) व्दारावती भक्तनिवास**

| महिना | श्रमदिन संख्या | बीलाची मुळ रक्कम | १८%GST | एकूण सर्व करासह रक्कम |
|---|---|---|---|---|
| मार्च १८ | २१९६ | ८,२७,५०४/- | १,४८,९५१/- | ९,७६,४५५/- |
| एप्रिल १८ | २१५८ | ८,३९,९८१/- | १,५१,१९६/- | ९,९१,१७७/- |
| मे १८ | २२८२ | ८,५४,०६६/- | १,५३,७३२/- | १०,०७,७९८/- |
| जुन १८ | २२३१ | ८,६२,४०२/- | १,५५,२३२/- | १०,१७,६३४/- |
| जुलै १८ | २१७६ | ८,२२,३०७/- | १,४८,०१५/- | ९,७०,३२३/- |
| एकूण | ११,०४३ | ४२,०६,२६०/- | ७,५७,१२७/- | ४९,६३,३८७/- |

५) एम.पी.एन्टरप्राईज असोसिऐटस लि.पुणे यांचे यांचेकडून सुरक्षाअनामत रक्कम संस्थानकडे रक्कम कपात करुन ठेवण्यात आलेली आहे त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

| अ.न | विभागाचे नांव | ५% सुरक्षा अनामत रक्कम | ८.३३% सानुग्रह अनुदान देय रक्कम | शिल्लक रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१. | साईआश्रम भक्तनिवास | ४२,९२,१४९/- | १८,११,९०४/- | २४,८०,२४५/- |
| ०२. | साईधर्मशाळा | १७,६८,७६६/- | ६,०६,७९८/- | ११,६१,९६८/- |
| ०३. | व्दारावती भक्तनिवास | ६,२१,२२९/- | २,८३,६४१/- | ३,३७,५८८/- |
| | एकूण | ६६८२,१४४/- | २७,०२,३४३/- | ३९,७९,८०१/- |

उपरोक्त तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे एम.पी.एन्टरप्राईज असोसिऐटस लि.पुणे यांचेकडून कपात केलेले ५% सुरक्षा अनामत रक्कम आऊटसोर्स कामगारांना रक्कम रुपये २७,०२,३४३/-सानुग्रह अनुदान म्हणून देता येईल. उर्वरित शिल्लक रक्कम संस्थान खाती जमा करण्यास मान्यता असावी

६) सदरची सानुग्रह अनुदान रक्कम ही मे.बी.व्ही.जी इंडिया लि.पुणे मार्फत आऊट सोर्सिंग कर्मचा-यांना आदा करता येईल असे मत आहे.

सदर प्रस्ताव व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६९०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास, साई धर्मशाळा व व्दारावती भक्तनिवास विभागातील आऊटसोर्स कर्मचाऱ्यांना माहे मार्च, एप्रिल,मे,जून,जुलै-२०१८ या पाच महिन्याचे कालावधीतील त्यांच्या एकुण वार्षिक वेतनाच्या ८.३३ टक्के दराने सानुग्रह अनुदान / Labour Welfare Fund सध्याचे तात्पुरते ठेकेदार बी.व्ही.जी.इंडीया यांचेमार्फत देण्यास मान्यता देण्यात आली. सानुग्रह अनुदानाच्या होणाऱ्या रकमेवर GST, Service Charges, TDS ची रक्कम बी.व्ही.जी.इंडीया यांना देण्यात यावी. सदर सानुग्रह अनुदानाचा खर्च एम.पी.एंटरप्राईजेस असोसिएटस लि.पुणे यांचेकडून जप्त केलेल्या ५% सुरक्षा अनामत रकमेमधुन व त्यांच्या संस्थानकडे प्रलंबीत असलेल्या देय रकमेतून करण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास/प्र.अधिक्षक,साई धर्मशाळा/ प्र.अधिक्षक, व्दारावती भक्तनिवास)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१४ **मा.पंतप्रधान,भारत सरकार यांचे नियोजित दौऱ्या निमीत्त मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नं.८९ व ९० येथे जाणे-येणे कामी ओढयावर आर.सी.सी.पाईप टाकुन रस्ता तयार करणे व हेलीपॅड रस्त्यावरुन मुख्य मंडपाकडे येण्यासाठी रॅम्प तयार करणेकामी आलेल्या रु.२७,२३०/- मात्रचे खर्चाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूद:- अधिनियम कलम २१(१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

मा. व्यवस्थापन समिती निर्णय:- दि.०५/१०/२०१८ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील नि. क्र. ६१५."…. यावर सविस्तर चर्चा होवून, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रमांकरीता निमंत्रीत करण्यात आलेल्या मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे शिर्डी येथील दौ-याचे निमित्ताने करावयाच्या कार्यक्रमाकरीता प्रांसगिक खर्चासाठी रु.२० लक्ष मात्रचे खर्चास मान्यता देणेत आलेली आहे. तसेच सदर कार्यक्रमाकरीता ऐनवेळी करावी लागणारी आवश्यक ती कामे करण्यास व त्याकामी येणा-या अंदाजे खर्चास मान्यता देण्यात आली ".

**प्रस्तावना**– श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे सांगता समारंभासाठी मा.पंतप्रधान, भारत सरकार उपस्थित राहिले होते. सदर कार्यक्रमासाठी मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं.८९ व ९० येथे मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थेची उभारणी करणेत येऊन कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला आहे.

दि.०९/१०/२०१८ रोजीचे पत्राने, उपविभागीय पोलीस अधिकारी, शिर्डी यांनी, मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे दि.१९/१०/२०१८ रोजीचे नियोजित कार्यक्रमासाठी कार्यक्रमस्थळावर लोकांना येणेसाठी सितानगर रोड निश्चित करणेत आलेला असून, सितानगर येथील ओढयावर बनविण्यात आलेल्या कच्चा २० फूट पुलावरुन इतक्या मोठया प्रमाणात जनसमुदाय गेल्यास तेथे चेंगराचेंगरी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. करीता सितानगर येथील ओढयावर नव्याने ५० फूट रुंदीचे किमान नवीन ०२ पुल तात्काळ तयार करणेबाबत कळविले होते. तसेच मा.पोलीस अधिक्षक, अहमदनगर व मा.पोलीस महानिरिक्षक, नाशिक परिक्षेत्र यांनी समक्ष पहाणी दरम्यान दिलेल्या सुचनांनुसार बांधकाम विभागाचे दि.०८/१०/२०१८ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये पंतप्रधान सभा

मंडपाचे ठिकाणी नागरिक व साईभक्तांना जाणेसाठी नाल्यावर श्री. तकाराम गोंदकर यांचे क्षेत्रालगत संस्थानकडे उपलब्ध असलेले ४ फुट व्यासाचे ०४ आर.सी.सी पाईप क्रेन मशिनव्दारे उचलून मजूर ठेकेदार यांचेमार्फत बसविणेत आलेले आहेत. तसेच एस.पी.जी, नवी दिल्ली व पोलीस विभाग यांचे सुचनेनुसार हेलीपॅड रस्त्यावरुन मुख्यमंडपाकडे येण्याकरीता मुरुम टाकून रॅम्प तयार करणेत आलेला आहे. त्यासाठी खालील प्रमाणे खर्च आलेला आहे.

| अं.क्र | पुरवठादार / ठेकेदार यांचे नाव, पत्ता. | कामाचा तपशिल | केलेले एकूण काम | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | परिमाण | एकक | दर | एकूण रक्कम |
| ०१ | साईमौनी क्रेन सर्व्हिसेस, कोपरगाव | संस्थानचे मध्यवर्ती भांडार येथील ०४ फुट व्यासाचे ०६ नग आर.सी.सी. पाईप क्रेन मशिनव्दारे उचलून ट्रॅक्टरमध्ये टाकणे व ते कार्यस्थळावर उतरविणे. (१२ टन मशीनव्दारे). | ०६ | तास | रु.७००/- प्रती तास | रु.४,२००/- |
| ०२ | साईच्छा क्रेन सर्व्हिस, शिर्डी | श्री.तुकाराम गोंदकर यांचे क्षेत्रालगत नाल्यावर संस्थानकडील उपलब्ध ०४ फुट व्यासाचे ०४ नग आर.सी.सी. पाईप क्रेन मशिनव्दारे नाल्यामध्ये टाकून रस्ता तयार करणे. (१५ टन मशीनव्दारे). | ०५ | तास | रु.८५०/- प्रती तास | रु.४,२५०/- |
| ०३ | सदगुरु सप्लायर्स, शिर्डी | संस्थानचे मध्यवर्ती भांडार येथून ०४ फुट व्यासाचे ०६ नग आर.सी.सी. पाईप वाहतूक करणे व मुरुम वाहतूक करणे. | ०२ | ट्रॅक्टर | रु.१५९०/- प्रती दिवस | रु.३,१८०/- |
| ०४ | श्री.निवृत्ती चांदगुडे, चासनळी ता.कोपरगाव | नाल्यावर संस्थानकडील उपलब्ध ०४ फुट व्यासाचे ०४ नग आर.सी.सी. पाईप नाल्यामध्ये टाकून फिटींग करणे मजूरीकाम. | ०४ | नग | रु.८००/- प्रती पाईप | रु.३,२००/- |
| ०५ | श्री.सोमनाथ भाऊसाहेब मते, निघोज | जे.सी.बी व्दारे लेव्हलींग करणे. | ०४ | तास | रु.७००/- प्रती तास | रु.२,८००/- |
| ०६ | श्री.एस.के.येवले, संगमनेर | नाल्यावरील पुल व हेलीपॅड रस्त्यावरुन मुख्यमंडपाकडे येण्याकरीता मुरुम टाकून तयार करणेत आलेल्या रॅम्पवर रोलरव्दारे रोलींग करणे. | ०८ | तास | रु.१२००/- प्रती तास | रु.९,६००/- |
| | | | | | **एकूण रक्कम** | **रु.२७,२३०/-** |

विभागाचा अभिप्राय – वरीलप्रमाणे श्री. तुकाराम गोंदकर यांचे क्षेत्रालगत नाल्यावर ४ फुट व्यासाचे ०४ नग आर.सी.सी. पाईप क्रेन मशिनव्दारे उचलणे, ट्रॅक्टरव्दारे वाहतूक करणे, रोलरव्दारे दबाई करणे, त्यासाठी आवश्यक मुरुम वाहतूक करणे व मजुरी ठेकेदार यांचेमार्फत पाईप बसविणे तसेच हेलीपॅड रस्त्यावरुन मुख्य मंडपाकडे येण्यासाठी रॅम्प तयार करणेकामी रक्कम रु.२७,२३०/- मात्र इतका खर्च आलेला आहे. सदरहु नाल्याचे काम हे शिर्डी नगरपंचायत हद्दीत येत होते. तथापी मा. पंतप्रधान यांचा कार्यक्रम असल्याने सदरहू काम हे ताताडीचे स्वरुपाचे असल्याने तसेच याकामी खुपच कमी अवधी असल्याने सदरहु काम वेगवेगळया एजन्सीकडून तातडीने करुन घेण्यात आलेले असून त्याकामी रु.२७,२३०/- मात्र खर्च आलेला आहे.

प्रस्ताव– मा. पंतप्रधान, भारत सरकार यांचे दौ-या निमित्त श्री. तुकाराम गोंदकर यांचे क्षेत्रालगत नाल्यावर ४ फुट व्यासाचे ०४ नग आर.सी.सी. पाईप क्रेन मशिनव्दारे उचलून नाल्यामध्ये टाकणे, ट्रॅक्टरव्दारे वाहतूक करणे, रोलरव्दारे दबाई करणे, त्यासाठी आवश्यक मुरुम वाहतूक करणे व मजुरी ठेकेदार यांचेमार्फत बसविणे तसेच हेलीपॅड रस्त्यावरुन मुख्य मंडपाकडे येण्यासाठी रॅम्प तयार करणेकामी रक्कम रु.२७,२३०/- मात्र इतका खर्च आलेला आहे. तरी झालेले खर्चास तसेच संबधीतांची देयके अदा करणेसाठी मान्यतेस्तव व माहितीस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.६९१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.पंतप्रधान,भारत सरकार यांचे नियोजित दौऱ्या निमीत्त मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नं.८९ व ९० येथे जाणे-येणे कामी ओढयावर आर.सी.सी.पाईप टाकुन रस्ता तयार करणे व हेलीपॅड रस्त्यावरुन मुख्य मंडपाकडे येण्यासाठी रॅम्प तयार करणेकामी आलेल्या रक्कम रु.२७,२३०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)**

---

आजचे व्यवस्थापन समिती सभेमध्ये मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळी खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

आयत्या वेळेचा

विषय नं.१५, निर्णय क्र.६९२ संस्थान मार्फत सन २०१९ ची संस्थानप्रकाशीत दैनंदिनी व वेगवेगळया आकाराच्या दिनदर्शिका प्रकाशित करण्यात आलेल्या आहेत.

श्री साईबाबांचा प्रचार व प्रसार म्हणून इतर प्रकाशनाखेरीज दरवर्षी संस्थान मार्फत श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका प्रकाशित केली जाते. दरवर्षी मा.अध्यक्ष महोदय, मा.उपाध्यक्ष महोदय,मा.विश्वस्त, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,मा.उप जिल्हाधिकारी , मा.उपकार्यकारी अधिकारी व सर्व प्रशासकीय अधिकारी, यांना संस्थानच्या वतीने खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे सन २०१९ ची श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका विनामूल्य भेट म्हणून देण्यास व त्याची रक्कम प्रकाशने विभागखाते (Publication Expenses ) खर्ची टाकणेस मान्यता देण्यात आली.

| अ.नं | तपशिल | श्री साई दैनंदिनी २०१९ (देणगी मूल्य रु.९०/-) नग संख्या | श्री साई दिनदर्शिका (१ पाने) २०१९ (देणगी मूल्य रु.१५/-) नग संख्या |
|---|---|---|---|
| ०१. | मा.अध्यक्ष महोदय, मा.व्यवस्थापन समिती | १५० | १५० |
| ०२. | मा.उपाध्यक्ष महोदय, मा.व्यवस्थापन समिती | १५० | १५० |
| ०३. | मा.अध्यक्ष- छाननी समिती- (श्री.के.यू. चांदीवाल साहेब) | १५० | १५० |
| ०३ | मा.सदस्य, मा.व्यवस्थापन समिती<br>(प्रत्येकी १५० नग प्रमाणे ८ मा. समिती सदस्य) | १२०० | १२०० |
| ०४ | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी | १५० | १५० |
| ०५ | मा.उप जिल्हाधिकारी,<br>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी | ७५ | ७५ |
| ०६ | मा.उप जिल्हाधिकारी,<br>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी | ७५ | ७५ |
| ०७. | पोलिस उपअधिक्षक,<br>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी | ७५ | ७५ |
| ०७ | मा.उप कार्यकारी अधिकारी,<br>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी | ७५ | ७५ |
| ०८ | सर्व प्रशासकीय अधिकारी आणि मा. कार्यकारी अभियंता,<br>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी<br>(प्रत्येकी ३५ नग प्रमाणे x ०५ व्यक्ती) | १७५ | १७५ |
| ०९. | विधी व न्याय विभाग | ५० | ५० |
| | एकूण नग | २३२५ | २३२५ |
| | एकूण खर्च | २,०९,२५०/- | ३४,८७५/- |

(कार्यवाही-प्र.अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१६, निर्णय क्र.६९३ दि.०५.१०.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६१३/१७ अन्वये साईप्रसाद निवासस्थान विभागाकरीता महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ, मुंबई यांचे शासनाने निश्चीत केलेल्या दरपत्रकानुसार बेडशिट खरेदी करण्यास व त्यासाठी येणाऱ्या रक्कम रु.१२,२१,२२९/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

आजचे सभेत यावर चर्चा होऊन, महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी यांना बेडशिट व पिलोकव्हरचे वेगवेगळया नमुन्यासह व्यवस्थापन समितीचे सभेसमोर उपस्थित राहण्यास कळविण्यात यावे, असे ठरले. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१७, निर्णय क्र.६९४ दि.०५.१०.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६२३ अन्वये श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे, कंत्राटी सल्लागार (सेवा निवृत्त नायब तहसिलदार) यांना दि.१९.१०.२०१८ पासून दि.१८.१०.२०१९ पर्यंत एक वर्ष कालावधीसाठी एकत्रित रक्कम रु.२५,०००/- मात्र इतक्या मासिक मानधन तत्वावर कंत्राटी कर्मचारी म्हणून मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तथापी त्यांचे कामकाजाबाबत काही समिती सदस्यांनी आक्षेप घेतलेला आहे. याकरीता त्यांना मागील एक वर्षात केलेल्या कामाच्या अहवालासह व्यवस्थापन समितीचे सभेसमोर उपस्थित राहणेबाबत कळविण्यात यावे. (प्र.अधिक्षक,मालमत्ता विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१८, निर्णय क्र.६९५ आजचे सभेत मुख्याध्यापक, श्री साई-श्रध्दा ग्रामिण मुक-बधिर विद्यालय (निवासी) शिर्डी यांनी जागतिक दिव्यांग दिनानिमित्त दिव्यांगांच्या जिल्हा स्तरीतय क्रिडा व सांस्कृतीक स्पर्धा कार्यक्रमासाठी दि.११.१२.२०१८ व १२.१२.२०१८ रोजी सशुल्क /मोफत सुविधा मिळणेबाबत मा.अध्यक्ष् महोदय यांना निवेदन दिले.

यावर चर्चा होऊन, जागतिक दिव्यांग दिनानिमित्त दिव्यांगांच्या जिल्हा स्तरीतय क्रिडा व सांस्कृतीक स्पर्धा कार्यक्रमाकरीता संस्थानमार्फत खालील प्रमाणे सुविधा उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली.

१. स्पर्धेसाठी उपस्थित राहणाऱ्या ५०० दिव्यांग विद्यार्थ्यी व कर्मचाऱ्यांसाठी साईबाबा भक्तनिवास येथे दि.११.१२.२०१८ रोजी सकाळी ९.०० वाजेपासुन दि.१२.१२.२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यत आवश्यकतेनुसार हॉल व रुम सशुल्क देण्यात यावे.

२. वाहन विभागा शेजारील मैदान क्रिडा स्पर्धा व बक्षिस वितरण कार्यक्रमासाठी मंडप उभारणी, विद्युत पुरवठयासह मोफत उपलब्ध करुन द्यावे.

३. सायंकाळी ६.०० ते रात्रौ ११.०० या वेळेत दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सांस्कृतीक कार्यक्रमासाठी श्री साईबाबा कन्या विद्यालयाचे कार्यक्रम स्टेज, तीन वर्ग खोल्या, ५ ते ६ टेबल व विद्युत पुरवठा मोफत उपलब्ध करुन देण्यात यावा.

४. दि.११.१२.२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता साईआश्रम निवासस्थान येथे दिव्यांग विद्यार्थी व कर्मचाऱ्यांसाठी मोफत भोजन व्यवस्था करण्यात यावी.

५. तसेच दिव्यांग विद्यार्थी व कर्मचाऱ्यांसाठी ७०० नाष्टा पाकीटे व ५०० चहा मोफत देण्यात यावा.

६. दिव्यांग विद्यार्थी व कर्मचाऱ्यांची दि.१२.१२.२०१८ रोजी सकाळी १० ते ११ या वेळेत मोफत दर्शन व्यवस्था करण्यात यावी.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, श्री साईबाबा भक्तनिवास/ उपकार्यकारी अभियंता, विद्युत विभाग/ मुख्याध्यापक, कन्या विद्या मंदिर व ज्यु.कॉलेज/ प्र.अधिक्षक, प्रसादालय विभाग, प्र.अधिक्षक, कॅन्टीन विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१९, निर्णय क्र.६९६ दि.२२.०८.२०१८ व दि.०६.०९.२०१८ रोजीचे सभेतील निर्णयानुसार भारत सरकारच्या टांकसाळीकडून १०,००० चांदीची नाणी तयार करुन घेण्यास व सदर नाणी विश्वस्त, मान्यवर, संस्थानचे अधिकारी/ कर्मचारी , व प्रतिनियुक्तीवरील अधिकारी यांना शताब्दी महोत्सवानिमित्त सप्रेम भेट देणेबाबत व उर्वरीत नाणी साईभक्तांना विक्री करीता उपलब्ध करुन देणेस मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार शासनाचीदि.१७.१०.२०१८ रोजी मान्यता देखील प्राप्त झालेली आहे.

तसेच कंत्राटी कर्मचाऱ्यांना शताब्दी महोत्सवानिमित्त चांदीची नाणी सप्रेम भेट देणेबाबतचा प्रस्ताव दि.३०.१०.२०१८ रोजी मान्यतेसाठी शासनाचे विधी व न्याय विभागाकडे सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्ताव अद्यापावेतो प्रलंबीत आहे.

उपरोक्त निर्णय व शासनमान्यतेनुसार भारत सरकारच्या मुंबई येथील टांकसाळीतुन १०००० पैकी नमुन्याप्रमाणे २५ ग्रॅम वजनाची १००० नाणी थेट खरेदी करण्यात येऊन साईभक्तांना विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

आजचे सभेमध्ये याबाबत सविस्तर चर्चा होऊन, उर्वरीत ९,००० चांदीची नाणी थेट भारत सरकारच्या मुंबई येथील टांकसाळीतून नमुन्याप्रमाणे खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली. तथापी सदर चांदीची नाणी कोणासही सप्रेम भेट देऊ नये. सर्व चांदीची नाणी साईभक्तांना खरेदी किंमतीत विक्री करीता उपलब्ध करुन द्यावेत, असे ठरले. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

वरील निर्णय क्र.६३८ ते ६९६ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर सायंकाळी ०६.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| श्रीमती रुबल अग्रवाल (भा.प्र.से.) | (सुरेश हावरे) |
| मुख्यकार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.